| ४४०३ पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च<br>६४०३- पशुसंवर्धनावरील कर्जे<br>दत्तमत्त<br>मूळ - रु. २१,५०,५८<br>पुरक रु. --<br>वर्षभरात परत केलेल्या (मार्च २०११) रकमा रु. २०,२४,२८ | २१,५०,५८ | १,२५,४४ | (-) २०,२५,१४ |

**टिपा व भाष्ये :-**

अनुदानातील बचत खालील लेखाशिर्षाखाली झाली :-

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| १०१ पशुवैद्यकीय सेवा व पशु आरोग्य १०१ (००)(०३) पशु वैद्यकीय व जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे यांचे जीएलपी/जीएमपी मानकानुसार बळकटीकरण करणे<br>मूळ रु. १,५०.००<br>पुर्नविनियोजन रु. (-) ८१.२९ | ६८.७१ | ६७.७५ | (-) ०.९६ |

**टिपा व भाष्ये :-**

पशु वैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे यांचे जीएलपी/जीएमपी मानकानुसार बळकटीकरण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रस्तावानुसार (रु.५८.७९ लाख) आणि तसेच वित्त विभागाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या (रु.२२.५० लाख) सुधारित अंदाजांवर आधारित मार्च २०१२ मध्ये रु.८१.२९ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्थेच्या लस निर्मिती प्रयोगशांळाच्या इमारतींचे बांधकाम/रिनोव्हेशन यावर सार्वजनिक बांधकाम विभाग या अंमलबजावणी यंत्रणेचे कामांच्या प्रगतीनुसार होणाऱ्या खर्चाचा अंदाज घेऊन रु.५८.७९ लाख निधी कमी करणे प्रस्तावित केले, तसेच वित्त विभागाच्या मंजूर सुधारित अंदाजानुसार रु. २२.५० लाख निधी कमी करावा लागला. असा एकूण रु.८१.२९ लाखाचा निधी मार्च, २०१२ मध्ये परत करावा लागला.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| १०१ पशुवैद्यकीय सेवा व पशु आरोग्य<br>१०१ (००)(०४) राज्य शासकीय पशु वैद्यकीय संस्थांचे, बळकटीकरण करणे केंद्र हिस्सा ७५%<br>मूळ रु. १२,००.००<br>पुनर्विनियोजन रु.(-)१२,००.०० | ---- | ---- | ---- |

**टिपा व भाष्ये :-**

योजने अंतर्गत केंद्र सरकारकडून केंद्राचा हिस्सा म्हणून ७५% एवढी रक्कम न दिली गेल्याने परिणामी २५% राज्य हिश्श्याची बचत झाल्याने मार्च २०१२ मध्ये रु.१२००.०० लाख एवढी संपूर्ण तरतुद परत करण्यात आली.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र पुरस्कृत शासकीय पशुवैद्यकीय संस्थांचे बळकटीकरण/बांधकाम या योजने अंतर्गत केंद्र सरकारकडून केंद्राचा हिस्सा म्हणून ७५% एवढी रक्कम न दिली गेल्याने मार्च, २०१२ मध्ये रु.१२००.०० लाख एवढी संपूर्ण तरतूद परत करण्यात आली.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| १०१ पशुवैद्यकीय सेवा व पशु आरोग्य<br>१०१ (००)(०५) राज्य शासकीय पशु वैद्यकीय संस्थांचे, बळकटीकरण करणे राज्य हिस्सा २५%<br>मूळ रु. ४,००.००<br>पुनर्विनियोजन रु.(-)४,००.०० | ---- | ---- | ---- |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र पुरस्कृत शासकीय पशुवैद्यकीय संस्थांचे बळकटीकरण/बांधकाम या योजने अंतर्गत केंद्र सरकारकडून केंद्राचा हिस्सा म्हणून ७५% एवढी रक्कम न दिली गेल्याने परिणामी २५% राज्य हिश्श्याची बचत झाल्याने मार्च २०१२ मध्ये रु.४००.०० लाख एवढी संपूर्ण तरतूद परत करण्यात आली.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ४४०३ - पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च<br>१११ - मांस संस्करण<br>१११ (००)(०१) पशु पोषण संशोधन केंद्रातील गुण नियंत्रण प्रयोगशाळा<br>मूळ रु. १,५०.००<br>पुनर्विनियोजन रु.(-)१,५०.०० | ---- | ---- | ---- |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

वित्त विभागाकडून गुणनियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई या संस्थेच्या बळकटीकरणांतर्गत निधीच्या खर्चास मंजुरी मिळाली नाही.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| १११ - मांस संस्करण<br>१११ (००)(०२) पशु पोषण संशोधन केंद्रातील गुण नियंत्रण प्रयोगशाळा केंद्र पुरस्कृत योजना<br>मूळ रु. १,७२.००<br>पुनर्विनियोजन रु.(-)१,७२.०० | ---- | ---- | ---- |

**टिपा व भाष्ये :-**

**(एक)** पशु पोषण संशोधन केंद्रातील गुण नियंत्रण प्रयोगशाळा बळकट करण्यासाठी वित्त विभागाने मान्यता न दिल्यामुळे आणि (दोन) वित्त विभाकडून मंजूर करण्यात आलेल्या सुधारित अंदाजावर आधारित मार्च, २०१२ मध्ये वर नमूद केलेल्या उपलेखाशिर्षाखालील रु.७२२ लाख एवढी संपूर्ण तरतूद परत करण्यात आली.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

वित्त विभागाकडून गुणनियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई या बळकटीकरणांतर्गत निधीच्या खर्चास मंजुरी मिळाली नाही.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+)<br>बचत (- )** |
|---|---|---|---|
| १९५ पशुसंवर्धन सहकारी संस्थांना सहाय्य<br>१९५ (००)(०१) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - सहकारी कुक्कूट पालन संस्थांना भाग भांडवली अंशदान (राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ)<br>मूळ रु. १०.००<br>पुनर्विनियोजन रु.(-)१०.०० | ---- | ---- | ---- |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या योजने अंतर्गत सहकारी कुक्कूटपालन संस्थांचे भागभांडवलाकरिता प्रस्ताव न आल्यामुळे रु.१०.०० लाख एवढी संपूर्ण तरतूद परत करण्यात आली.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+)<br>बचत (- )** |
|---|---|---|---|
| ६४०३ पशुसंवर्धनावरील कर्जे<br>१९५ सहकारी संस्था पशु संवर्धनासाठी कर्जे<br>१९५ (००)(०१) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ पुरस्कृत योजना<br>मूळ रु. १०.००<br>पुनर्विनियोजन रु.(-)१०.०० | ---- | ---- | ---- |

**टिपा व भाष्ये :-**

**(एक)** या योजने अंतर्गत कर्जाकरिता प्रस्ताव न आल्यामुळे आणि (दोन) वित्त विभागाकडून मंजूर करण्यात आलेल्या सुधारित अंदाजावर आधारित मार्च २०१२ मध्ये वर नमूद केलेल्या उपलेखाशिर्षाखालील रु.२० लाख एवढी संपूर्ण तरतूद परत करण्यात आली.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या योजने अंतर्गत सहकारी कुक्कूट पालन संस्थांचे कर्जाकरिता प्रस्ताव न आल्यामुळे रु.१०.०० लाख एवढी संपूर्ण तरतूद परत करण्यात आली.

**साक्ष :-**

**अनुदान क्र.डी-९ ‘ पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च ’**

**१.७** पशुसंवर्धन विभागाशी संबंधित अनुदान क्र.डी-९ ‘ पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च ’ या संदर्भात समितीने दिनांक १७ फेब्रुवारी २०१६ रोजी विभागीय सचिवांची तसेच इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी १०१ - पशुवैद्यकीय सेवा व पशु आरोग्य या शिर्षांतर्गत १५० लाखाचे नियोजन केले होते. सध्या या प्रकल्पाची परिस्थिती काय आहे, किती खर्च झाला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता सदरील प्रकल्प पुणे येथे असून पूर्ण झालेला आहे. २०११-२०१२ मध्ये नव्हेतर २०१४ मध्ये प्रकल्प पूर्ण झालेला आहे. हा बॅक्टेरियल व्हॅक्सीनचा प्रकल्प असून व्हायरल व्हॅक्सीनचा प्रकल्प आर.के.बी.वाय. मध्ये चालू आहे व्हायरल व्हॅक्सीन प्रकल्पामध्ये ५ कोटीपर्यत खर्च झाला आहे. यामध्ये आता तीन बॅचेससुद्धा घेण्यात आलेल्या असून ते आय.बी.आर.आय. ने पाससुद्धा केलेला आहे. तीन बॅचेस घटसर्प व फऱ्याच्या आहेत एच.एस.बी.क्यु. व ब्लॅक क्वॉटर असे याला म्हणतात. एका बॅचमध्ये ५ लाख लसी बनतात. बॅक्टेरियल व्हॅक्सीनच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याला जेवढी लस लागते, तेवढी लस विभागातर्फे स्वतः तयार करीत आहोत. पोल्ट्री व व्हायरल लसी करिता दुसरे काम आर.के.बी.वाय. मध्ये चालू आहे यातून तीन बॅचेस पास झालेल्या आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१०१ पुशुवैद्यकीय सेवा व पशु आरोग्य १०१ (००) (०४) राज्य शासकीय पशुवैद्यकीय संस्थांचे बळकटीकरण करणे, केंद्र हिस्सा ७५% या शीर्षांतर्गत १२ कोटी व ४ कोटीचे नियोजन केले होते. ते आहरित केल्यावर केंद्र सरकारची काही मदत मिळाली नाही का, तसेच योजना कधी सुरू झाली ? अशी विचारणा समितीने केली असता सन २०१०-२०११ पासून ही योजना चालू झालेली आहे. E.S.B.H.D. योजना आहे. २०१०-२०११ मध्ये १० कोटी रुपये आले होते. या रकमेचा हिशोब देण्याबाबत केंद्र शासनाकडे ३ वेळा सांगितले आहे. १० कोटीपैकी फक्त ८ लाख रुपये शिल्लक होते, बाकीची रक्कम खर्च झाली. याबाबत आपण त्यांना तीन वेळा प्रस्ताव पाठविला होता, पाठपुरावासुध्दा केला. ३७० दवाखाने त्या योजनेत घेतले होते यापैकी आता फक्त ८ लाख रुपये अखर्चित राहिले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

कोणत्या योजनेतून हे होते ? १२ कोटीची वेगळी व ४ कोटीची वेगळी योजना कशी आहे ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, E.S.B.H.D. ही योजना ७५:२५ रेश्योची आहे. २५ टक्के शेअर खर्च राज्य शासनाने करावयाचा होता. २०११-१२ मध्ये रक्कम मिळाली नाही. त्यांना उपयोगीता प्रमाणपत्राबाबत समाधान देऊ शकलो नाही म्हणून यावर्षीची १६ कोटीची योजना पूर्ण व्यपगत झालेली आहे असे समितीने गृहित धरावे का अशी विचारणा समितीने केली.

विभागाने भरपूर पाठपुरावा केला असून तीन वेळा हिशोब देण्याबाबत सांगितले. फक्त ८ लक्ष रुपये अखर्चित होते. सध्याच्या नार्मसप्रमाणे ६०-७० टक्के खर्च झाला तरी पुढचा हप्ता मिळतो. दुर्दैवाने त्यावर्षी मिळाले नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु विभागाचा प्रयत्न होता, याचा सर्व पत्रव्यवहार विभागाकडे आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

प्रत्येक गोष्टीला आलेला निधी प्रत्यार्पित केलेला दिसत आहे. मांस संस्करणमध्ये सुद्धा प्रत्यार्पित केलेले दिसत असून पशुसंवर्धन व पोषण केंद्राचासुद्धा निधी प्रत्यार्पित केलेला आहे. विभाग नियोजन करतो, आऊट ले घेतो आणि शेवटच्या क्षणी निधी पुनर्विनियोजन करून प्रत्यार्पित करून टाकता असे समितीने मत व्यक्त केले असता याबाबतची कारणे वेगवेगळी असल्याचे विभागीय सचिवांनी असे विदित केले.

४४०३ - पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च १११-मांस संस्करण १११(००)(०१) पशुपोषण संशोधन केंद्रातील गुणनियंत्रण प्रयोगशाळा या शीर्षांतर्गतचे रु. १५०.० लक्ष तसेच १११ मांस संरक्षण १११ (००)(०२) पशु पोषणसंशोधन केंद्रातील गुणनियंत्रण प्रयोगशाळा-केंद्र पुरस्कृत योजना या शीर्षांतर्गतचा रुपये १७५.०० लक्ष इतक्या रकमेमध्ये वित्त विभागाकडून प्रयोगशाळेला मान्यता मिळाली नाही. याला वित्त विभागाची मान्यता नसताना विभागाने आऊट ले कसा घेतला आहे याबाबत समितीने विचारणा केली असता त्यामध्ये केंद्र सरकारकडून डायरेक्ट चेक आलेला आहे. राज्य शासनाच्या शेअरकरिता आपण वित्त विभागाला तीन वेळा प्रस्ताव पाठविला आहे. मार्च मध्येही प्रस्ताव पाठविला होता. त्यांचे समाधान झाले नाही म्हणून तो रिजेक्ट केलेला आहे. यामध्ये दोन पार्ट आहेत. एक १.५० कोटीचा आहे व दुसरा १.७० कोटीचा आहे. एक चेक डायरेक्ट केंद्र सरकारकडून आल्यामुळे रक्कम उचलण्याची गरज पडली नाही. डायरेक्ट चेक मिळून त्याच कारणासाठी खर्च झाला आहे. बांधकामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून माहिती घेऊन वित्त विभागाची पुर्तता करण्यासाठी वेळ लागत होता. पुर्तता करून तीन वेळा वित्त विभागाला निधी रिलीज करण्याकरिता फाईल गेली होती अल्टीमेटली त्यांचे समाधान झाले नाही म्हणून शेवटपर्यत निधी रिलीज केला नाही.

दिनांक ७ नोव्हेंबरला प्रस्ताव गेला असून दिनांक ९ नोव्हेंबर ला माहिती घेऊन त्यांच्या मुद्यांची पुर्तता केली. दिनांक १७ ऑक्टोबरला दोन मुद्यांची माहिती घेण्यात आली व परत सादर करण्यात आले. दिनांक १२ डिसेंबरला दोन मुद्यांचा फेरप्रस्ताव सादर करण्यात आला. दिनांक २८ मार्च ला सुद्धा प्रस्ताव सादर केला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

२८ मार्चला प्रस्ताव देऊन काय उपयोग आहे, त्यानंतर ३१ मार्च ३ दिवसांनी येतो. यानंतर निविदा कधी काढणार अशी विचारणा समितीने केली असता सदरील बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग करीत होता त्यांनी काढलेल्या मुद्याची माहिती गोळा करून त्यांच्याकडे देण्यात येते होती. यामध्ये तीच पद्धत आहे की, वित्त विभागाच्या मंजुरी शिवाय १०० टक्के रक्कम वितरित होत नव्हती आता त्यांनी ही पद्धत बदलली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

७० टक्के व नंतर ३० टक्के नियतव्यय वाटप करण्याचा अधिकार दिलेला आहे. समितीचा मुद्या असा आहे की, एका बाजूला विभाग नियतव्यय देऊन टाकतो व वित्त विभागाची मान्यता नसताना या योजनेसाठी नियतव्यय मागतो असे मत समितीने व्यक्त केले.

वित्त विभागाची मान्यता नव्हती असे नाही. वित्त विभाग कागदपत्रे पाहूनच नियतव्यय देत असतो सार्वजनिक बांधकाम विभाग बांधकाम करीत होता. त्यांना जेवढी रक्कम लागत होती त्या अनुषंगाने विभागाने प्रस्ताव दिलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

बांधकाम सुरू होते व मध्यंतरी बाकीच्या विषयाला वित्त विभागाने मान्यता दिली नाही बांधकाम सुरू असताना तो बजेटेड भाग असल्याचे समितीने सांगितले असता तेव्हा बजेटेड कामांनासुद्धा वित्त विभागाकडे जावे लागत होते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

वित्त विभागाने विभागाला निधी वितरित केला नाही की वित्त विभागाने विभागाच्या प्रकल्पाला मान्यता दिली नाही प्रकल्पाचे काम सुरू होते व वित्त विभागाने नियतव्यय उपलब्ध असताना सुद्धा विभागाला हा निधी वितरीत केला नाही असे पशुसंवर्धन विभागाचे म्हणणे आहे काय अशी विचारणा समितीने केली असता प्रकल्पाला मान्यता होती पण निधी वितरित केला नाही असे विभागीय सचिवांनी स्पष्ट केले.

पशुसंवर्धन विभाग वित्त विभागाकडे फाईल्स पाठवित असतो परंतु त्यांचे समाधान झाले नाही. फाईल मान्य झाल्यास बीडीएसवर रिलिज मिळते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला त्याअनुषंगाने सदर प्रकल्प बजेटड आहे यामुळे विभागाकडे फाईल पाठविण्याची गरज नसून मागील वेळी प्रत्येक वितरणाच्या वेळी त्यांच्याकडून फाईल मागविली जात होती का अशी विचारणा समितीने केली.

सदर प्रकल्प बजेटड व ऑन गोईंग असल्यामुळे ७० टक्के कर्ज दाखवून उर्वरित ३० टक्के घेण्याची पद्धत त्यावेळी नव्हती ती पद्धत नंतर सुरू झाली असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

राज्यात गोहत्या बंदी असल्यामुळे पशुसंवर्धन विभागाचे काम वाढले आहे काय, गोहत्या बंदीनंतर किती जनावरे वाढली आहेत ? विभागाची जबाबदारी वाढल्यामुळे विभागाने बजेटमध्ये तरतूद मागितली आहे का ? गोहत्त्या बंदीनंतर जनावरांच्या संख्येत किती वाढ झाली व त्याकरिता कोणती सुविधा देण्यात आली ? आपल्याकडे दुष्काळी भागातील किती जनावरे आहेत, त्या संबंधीची आकडेवारी उपलब्ध आहे का तसेच पाणी, चाऱ्या अभावी किती जनावरे दगावली आहेत यासंबंधी माहिती समितीने विचारली असता गोहत्या बंदीमुळे २ ते ३ टक्के जनावरांची संख्या वाढली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले तसेच गोहत्त्या बंदीमध्ये फक्त बैलांची कत्तल बंद झाली आहे. परंतु कायद्यानुसार म्हशींच्या कत्तलीला बंदी नाही. यावर्षी ६ महिन्यांपर्यंत किती म्हशींची कत्तल करण्यात आली, त्याची आकडेवारी समितीकडे सादर करता येईल. उस्मानाबाद जिल्ह्यात दुष्काळी भागात माहे सप्टेंबर महिन्यात भेट दिली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

याअनुषंगाने समितीने उस्मानाबाद, मराठवाडा येथील जनावरांच्या मृत्यूंची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाची जबाबदारी वाढल्यामुळे वित्त विभागाकडून जास्त निधीची मागणी करणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

सन २०१५-१६ च्या बजेटच्या वेळी तीन पट निधीची मागणी केली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सदर आकडेवारी एक आठवड्याच्या आत समितीकडे सादर करावी असे समितीने सांगितले असता माहिती उपलब्ध करून देण्याबाबत विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले तथापि माहिती अप्राप्त आहे.

विभागाने समितीला वित्त विभागाने निधी वितरित न केल्याची माहिती दिली आहे. वित्त विभागाने पशुसंवर्धन विभागाकडे दिनांक १३ जानेवारी रोजी कामाच्या परिस्थितीबाबत माहिती विचारली होती. परंतु सदरहू माहिती वेळेवर सादर न केल्यामुळे विभागाला निधी मिळू शकला नाही. पूर्वी दिलेल्या निधीपैकी किती काम झालेले आहे, त्याची समितीला माहिती द्यावी. दिनांक १३ जानेवारी रोजीची फाईल २८ मार्च रोजी सादर केल्यास निधी कसा वितरित होणार ? परिणामी विभागाला निधी सर्मपित करावा लागला, अशी समितीची धारणा असल्याचा खुलासा समितीने केला.

पशुसंवर्धन विभागाला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून माहिती घेऊन त्यानंतर सादर करावी लागत होती. यापूर्वी विभागाकडे दोन वेळा माहिती सादर केली होती. त्यांनी जानेवारीमध्ये काढलेल्या मुद्याच्या संदर्भात विभागाने मार्च महिन्यात उत्तर दिले व त्याच वेळी निधीची मागणी केली होती असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले असता दोन-अडीच महिन्याच्या काळात विभागाने तत्परतेने कार्यवाही केली असती तर सदर निधी मिळू शकला असता असे समितीचे मत असल्याचे सांगितले. १९५ पशुसंवर्धन सहकारी संस्थांना सहाय्य या योजनेअंतर्गत १० लक्ष रुपयांची मूळ तरतूद होती तसेच ६४०३ - पशुसंवर्धनावरील कर्जे, १९५ (००)(०१) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ पुरस्कृत योजना या योजनेकरिता १० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे निधी खर्च होऊ शकला नाही, यामुळे सदर निधी शासनाकडे प्रत्यार्पित करण्यात आला, असे विभागाकडून सांगण्यात आले आहे याबद्दल माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, कुक्कूटपालन सहकारी संस्थांना हमी न देण्यासंबंधी शासनाने २००१ मध्ये धोरणात्मक निर्णय घेतला होता. यामुळे हमी संपल्यानंतर कर्ज घेण्यासाठी कुक्कूटपालन संस्था पुढे येणे बंद झाल्या. सध्याच्या परिस्थितीत कुक्कूटपालन संस्थांकडून जवळपास १५० कोटी रुपयांची रकमेची थकबाकी येणे प्रलंबित आहे. जेवढी मुद्दल तेवढे व्याज अशा पद्धतीने वन टाईम सेटलमेंटकरिता शासनाकडून प्रयत्न केला जात आहे. याकरिता मंत्रिमंडळासमोर जाऊन माफी योजना जाहीर करावी लागेल. ज्या संस्था या योजनेत समाविष्ट होणार नाही, त्यांना अवसायनात घेऊन त्यांचे लिलाव करावे लागतील.

कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये अशा किती संस्थांकडून थकबाकी येणे प्रलंबित आहे व थकबाकीची रक्कम किती आहे या समितीच्या प्रश्नाला साधारणतः १५० कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

७३ कुक्कुटपालन संस्थांपैकी फक्त १५ कुक्कुटपालन संस्था सुरू आहेत, २९ कुक्कुटपालन संस्था बंद आहेत, २६ कुक्कुटपालन संस्था अवसायनात आहेत आणि ३ संस्था स्वतःची मालमत्ता विकून कर्ज मूक्त झाल्या आहेत. त्या संस्थांकडे जमिनी असतात त्याशिवाय ते व्यवसाय करु शकत नाहीत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. याअनुषंगाने प्रत्येक ठिकाणी जमिनीची किंमत वेगळी असते ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणली.

उपरोक्त बाब विचारात घेऊन वनटाईम सेटलमेंटचा विचार केला जात असून दंडात्मक व्याजामुळे रक्कम जास्त झाली आहे. ही योजना जाहीर करून त्यात जे सहभागी होतील त्यांना एक मुद्दल आणि तेवढ्याच रकमेचे व्याज भरण्यास सांगितले जाईल. १५० कोटी रुपयांची थकबाकी आहे. एक मुद्दल आणि एक व्याज केल्यामुळे सदर रक्कम कमी होऊन ती ६० ते ७० टक्क्यांप्रमाणे होईल अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली तसेच प्रत्यक्ष ५२ कोटी रुपयांचे मुद्दल असून कर्जाची रक्कम ३१ कोटी रुपयांचे २० कोटी रुपयांचे भाग भांडवल आणि एक कोटी रुपयांची अनुदान त्यांना देण्यात आले होते. मुद्दल, व्याज आणि दंडव्याज मिळून १२८ कोटी रुपयांची थकबाकी असून प्राथमिक वसुली १३ कोटी रुपयांची झाली असल्याचा खुलासाही विभागीय सचिवांनी केला.

सदर संस्थांकडून थकबाकीची वसुली करीत असताना त्यांच्याकडे तेवढी मालमत्ता नसावी अशी शंका समितीने उपस्थित केली असता जमिनीची किंमत महत्त्वाची असून शेडची किंमत कमी असते शहराच्या जवळ असल्यास जमिनीची किंमत चांगली मिळू शकते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या संदर्भात तातडीने निर्णय घेणे अत्यावश्यक आहे. जेणेकरून हा विषय मार्गी लागू शकेल. या बाबतीत वित्त विभागाकडे तातडीने प्रस्ताव सादर करावा अशी सूचना समितीने विभागास दिली.

सदर योजनेत किती संस्था सहभागी होणार आहेत, ही बाब प्रथम जाहीर केल्याशिवाय नक्की किती आर्थिक बोजा पडणार आहे हे निश्चित सांगता येणार नाही. याकरिता प्रथम योजना जाहीर करावी लागेल हे समजावून सांगण्यासाठी विभागाकडून ३ वर्षांपासून प्रयत्न करीत आहोत. अनेक लोक त्या संस्था घेण्यास तयार आहेत सदर जमिनींची नोंदणी झाल्यामुळे ती जमीन परस्पर विकू शकत नाहीत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

शहरी भागात जागेची किंमत वाढत आहे त्या दृष्टीने जागेचे व्हॅल्यूएशन करून वनटाईम सेटलमेंट करावे तसेच ही योजना वित्त विभागाकडे पाठवून त्यांनी यासंबंधी लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी समितीमार्फत त्यांना सूचना करणार असल्याचे समितीने विभागास सांगितले.

राज्यात डॉक्टरांची किती पदे रिक्त आहेत ? राज्यात सध्या कोणत्याही ठिकाणी डॉक्टर कार्यरत नाहीत, इन्शुरन्स उतरविण्यात आलेला नाही, अशी परिस्थिती असल्याची बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणली तसेच राज्यात जिल्हापरिषद स्तरावर पशु वैद्यकीय दवाखाने तसेच पॉलिक्लिनिक येथे वर्ग-१ डॉक्टरांची किती पदे प्रलंबित आहेत एम.पी.एस.सी. च्या माध्यमातून डॉक्टरांची पदे भरण्यात येणार आहेत का या बाबतची माहिती व रिक्त पदांची जिल्हानिहाय माहिती देण्यास विभागास सांगितले.

एकूण ७ हजार पदे मंजूर आहेत, त्यापैकी ४,८०० पदे भरलेली आहेत व २,२०० पदे रिक्त आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

दरवर्षी एम.पी.एस.सी.मार्फत डॉक्टरांची पदे भरण्याची प्रक्रिया केली जाते. परंतु सदर प्रक्रियेसाठी खूप वेळ लागतो. सन २०१५ मध्ये ४०० पदांपेक्षा जास्त पदांची मागणी करण्यात आली होती. परंतु आरक्षणानुसार काही पदे मिळू न शकल्यामुळे २८८ पदे भरता आली. नवीन धोरणानुसार अमरावती विभागात पशूधन विकास अधिकाऱ्याची (एलडीओ) ची बहुतांश पदे भरण्यात आली आहेत. नागपूर विभागात एलडीओची रिक्त पदे जास्त होती. तेथे १५ टक्क्यांपर्यंत रिक्त पदांची संख्या आणली आहे. 'गट-ब' डॉक्टरांच्या पदोन्नतीची प्रक्रिया जीएडीच्या परवानगीने करावी लागते. सदर प्रक्रिया सुरू आहे. पुढील काळात एम.पी.एस.सी.कडून ३०० पदांची मागणी करण्यात येणार आहे. शासनाने संपूर्ण पदे भरण्यास बंदी घातली आहे. यामुळे एकूण आस्थापनेच्या ४ टक्के आणि एकूण रिक्त पदांच्या ५० टक्के यापैकी कमी असलेली पदे विभागाला भरता येऊ शकतात. ३० टक्के डॉक्टरांची पदे कमी आहेत. त्यांच्याकडे इतर अनेक कामे असताना अतिरिक्त कार्यभार दिला जातो. याबाबतीत उपाययोजना करणे आवश्यक असून रिक्त पदांची संख्या २,२०० आहे. परंतु एकूण पदांच्या ४ टक्क्याप्रमाणे ३२० पदे भरता येऊ शकतील असे मत समितीने व्यक्त केले असता ही पदे फक्त एलडीओची नसून खात्यातील सर्व कॅटेगरीतील आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

राज्यात एकूण खाजगी पशुवैद्यकीय दवाखान्यांची संख्या किती आहे ? तसेच दुसरा मुद्दा असा आहे की, एम.पी.एस.सी.मधून निवड झालेले उमेदवारांना त्यांच्या सोयीनुसार नेमणूक न दिल्यास ते पदावर रुजू होत नाहीत. तशी परिस्थिती विभागाकडे आहे का या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, तशी परिस्थिती नसून नेमणूक दिल्यानंतर १२ उमेदवार विद्यापीठात लेक्चरर म्हणून सिलेक्ट झाल्यामुळे कामावर रुजू झाले नाहीत त्यांची स्वतंत्र यादी विभागाने पाठविली आहे. तसेच ३ उमेदवार इतर कारणामुळे कामावर रुजू झाले नाहीत. तसेच त्यांना पहिली नियुक्ती ज्या ठिकाणी दिली जाते, तेथेच त्यांना रुजू व्हावे लागते त्यांना एनपीए देय नाही.

एम.पी.एस.सी.कडे ॲडिशनल यादी आणि नवीन रिक्वीझिशन पाठविण्यात येत आहे. एलएसएस खालील कॅडरमध्ये २९० रिक्त पदांपैकी १५० पदे भरता येऊ शकतील. तसेच तिन्ही कॅडरमध्ये पदोन्नती देता येते या संबंधी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेले आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

डॉक्टरांची जास्तीत जास्त पदे वाढविणे आवश्यक आहे. विदर्भाच्या लोकांना जास्तीत जास्त संधी मिळत नाही त्यामुळे सदर लोकांना त्याच ठिकाणी नेमणूक देणे गरजेचे आहे. अन्यथा त्यांना इतरत्र ठिकाणी किंवा नेमणूक दिल्यास त्यांना कामावर रुजू होण्यास अडचणी येतील असे मत समितीने व्यक्त केले.

संवर्ग वाटपात रोस्टरनुसार कार्यवाही करावी लागते. त्यानुसार नागपूर, अमरावती, नाशिक व औरंगाबाद व त्यानंतर कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात उमेदवारांना नेमणूका दिल्या जातात. पहिल्यांदा नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद असे रोस्टर चालवावे लागते. जे शिल्लक राहीले ते पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात जातात. कारण नवीन धोरण लागू झाले आहे. पदोन्नतीमध्ये त्यांना विचारुन विभाग वाटले जातात त्यात त्यांना विचारुन चार विभाग द्यावे लागतात असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**समितीचे अभिप्राय :-**

पशुसंवर्धन विकास विभागाच्या सन २०११-२०१२ च्या विनियोजन लेख्याबाबत विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये समितीच्या असे निदर्शनास आले की, विभागाकरिता मंजूर तरतूद रु.२१.५० कोटी पैकी फक्त रु. १.२६ कोटी एवढी तरतूद खर्च झाली तर रु.२०.२५ कोटी एवढा निधी खर्च करण्यास विभाग अयशस्वी ठरले. निधी खर्च न होण्याची कारणे बांधकामाची गती कमी असणे, केंद्र शासनास पूर्वीच्या प्राप्त निधीचे उपयोगीता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे केंद्र शासनाने निधी वितरित न करणे, परिणामी राज्य शासनाने अर्थसंकल्पीत केलेला निधी खर्च झाला नाही. वित्त विभागाने १३ जानेवारी रोजी विचारणा केलेली माहिती विलंबाने २८ मार्च रोजी सादर केली. परिणामी वेळेअभावी निधी खर्च झाला नाही. सहकारी कुक्कुटपालन संस्थांकडून प्रस्ताव न आल्याने निधी अखर्चित राहिला, विभागाने साक्षीदरम्यान नमूद सर्व कारणे प्रशासकीय स्वरूपाची आहेत. या कारणास्तव अर्थसंकल्पित निधी खर्च न होणे हे कारण समितीस संयुक्तीक वाटत नसल्याचे मत समितीने व्यक्त केले.

कुक्कुटपालन सहकारी संस्थांना हमी न देण्यासंबंधी शासनाने २००१ मध्ये धोरणात्मक निर्णय घेतला होता. यामुळे हमी संपल्यानंतर कर्ज घेण्यासाठी कुक्कुटपालन संस्था पुढे येणे बंद झाल्या. सध्याच्या परिस्थितीत कुक्कुटपालन संस्थांकडून जवळपास १५० कोटी रुपयांची रकमेची थकबाकी येणे प्रलंबित आहे. साधारणतः १५० कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

७३ कुक्कुटपालन संस्थांपैकी फक्त १५ कुकूटपालन संस्था सुरू आहेत, २९ कुक्कुटपालन संस्था बंद आहेत, २६ कुकूटपालन संस्था अवसायनात आहेत आणि ३ संस्था स्वतःची मालमत्ता विकून कर्ज मूक्त झाल्या आहेत.

उपरोक्त बाब विचारात घेऊन वनटाईम सेटलमेंटचा विचार केला जात असून दंडात्मक व्याजामुळे रक्कम जास्त झाली आहे. ही योजना जाहीर करून त्यात जे सहभागी होतील त्यांना एक मुद्दल आणि तेवढ्याच रकमेचे व्याज भरण्यास सांगितले जाईल. एक मुद्दल आणि एक व्याज केल्यामुळे सदर रक्कम कमी होऊन ती ६० ते ७० टक्क्यांप्रमाणे होईल. ५२ कोटी रुपयांची मुद्दल असून कर्जाची रक्कम ३१ कोटी रुपये २० कोटी रुपयांचे भाग

भांडवल आणि एक कोटी रुपयांचे अनुदान त्यांना देण्यात आले होते. मुद्दल, व्याज आणि दंडव्याज मिळून १२८ कोटी रुपयांची थकबाकी असून प्राथमिक वसुली १३ कोटी रुपयांची झाली असल्याचा खुलासाही विभागीय सचिवांनी केला होता.

**समितीच्या शिफारशी :-**

**१.८ शिफारस क्रमांक (१) :** पशुसंवर्धन विकास विभागाच्या सन २०११-२०१२ च्या विनियोजन लेख्याबाबत विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये समितीच्या असे निदर्शनास आले की, विभागाकरिता मंजूर तरतूद रु.२१.५० कोटी पैकी फक्त रु. १.२६ कोटी एवढी तरतूद खर्च झाली तर रु. २०.२५ कोटी एवढा निधी खर्च करण्यास विभाग अयशस्वी ठरला. निधी खर्च न होण्याची कारणे बांधकामाची गती कमी असणे, केंद्र शासनास पूर्वीच्या प्राप्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे केंद्र शासनाने निधी वितरित न करणे, परिणामी राज्य शासनाने अर्थसंकल्पीत केलेला निधी खर्च झाला नाही. वित्त विभागाने १३ जानेवारी रोजी विचारणा केलेली माहिती विलंबाने २८ मार्च रोजी सादर केली. परिणामी वेळेअभावी निधी खर्च झाला नाही. **सहकारी कुक्कुटपालन संस्थांकडून प्रस्ताव न आल्याने निधी अखर्चित राहिला, विभागाने साक्षीदरम्यान नमूद केलेली सर्व कारणे प्रशासकीय स्वरूपाची आहेत. या कारणास्तव अर्थसंकल्पित निधी खर्च न होणे ही गंभीर बाब आहे. निधी अखर्चीत राहण्यास जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांत समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**१.९ शिफारस क्रमांक (२) :** राज्यातील कुक्कुटपालन संस्थांकडे कर्जाची मुद्दल, व्याज व दंडव्याज अशी एकूण रु. १२८ कोटींची थकबाकी आहे. सदर थकीत रक्कम वसुलीची कार्यवाही करणे आवश्यक आहे. **कुक्कुटपालन संस्थांकडे असलेली कर्जाची मुद्दल व्याज व दंडव्याजाच्या थकबाकीसंदर्भात उक्त संस्थांसाठी सवलतीची योजना तयार करावी व संपूर्ण थकीत रक्कम वसूल केल्याबाबतची माहिती समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१.१० शिफारस क्रमांक (३) :** विभागाच्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची २,२०० पदे रिक्त आहेत. **रिक्त पदांमुळे विभागाकडील योजना राबविण्यावर विपरीत परिणाम होत आहे तसेच वसुली व इतर कामकाजावरसुध्दा परिणाम होत आहे ही बाब विचारात घेता विभागाने रिक्त २,२०० पदे सहा महिन्यांत भरण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

# मत्स्यव्यवसाय विकास विभाग

**१.११ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र. डी - १० मधील प्रधानशीर्ष ४४०५ ' मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च ' व ६४०५- ' मत्स्यव्यवसायासाठी कर्ज ' या शीर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.**

**अनुदान क्रमांक डी -१० मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च**

**(रुपये हजारांत)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ४४०५ - मत्स्यव्यवसायसावरील भांडवली खर्च -<br>६४०५ -- मत्स्यव्यवसायासाठी कर्ज दत्तमत्त.<br>मूळ<br>५४,८३,०० | | | (-) १२,७५,८५ |
| पुरक -- | ५४,८३,०० | ४२,०७,१५ | (+) १२,५३,२१ |

**टिपा व भाष्ये :--**

वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च, २०१२) अनुदानातील बचत खालील शिर्षाखाली झाली.

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात प्रधानशिर्ष ४४०५-मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च व ६४०५-मत्स्यव्यवसायासाठी कर्ज यामध्ये दत्तमत्त मूळ तरतूद रुपये ५४८३.०० लाख प्राप्त झाले असून अंतिम सुधारित तरतूद वर्षअखेर रु.५४८३.०० लाख मिळाले. वर्ष अखेर प्रत्यक्ष खर्च रु.४२०७.१५ लाख झाले. वर्ष भरात रु.(-) १२७५.८५ लाख बचत झाली आहे. मार्च २०१२ अखेर रक्कम रुपये १२५३.२१ लाख परत करण्यात आलेली आहे.

अनुदानातील बचत व खर्चाची कारणे पुढील उपशिर्ष निहाय देण्यात येत आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ४४०५ - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च<br>१०१-गोड्या पाण्यातील मत्स्यव्यवसाय<br>१०१ (००)(०४) पंचवार्षिक योजनांतर्गत गोड्यापाण्यातील कोळंबी बीज उबवणी केंद्र/राज्य योजनांतर्गत योजना.<br>मूळ- ३०.००<br>पुनर्विनियोजन (-)३०.०० | - | - | - |

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात गोड्या पाण्यातील कोळंबी बीज उबवणी केंद्र/राज्य योजनांतर्गत योजना या उपशिर्षामध्ये मूळ तरतूद रु. ३०.०० लाख प्राप्त झाले. विभागास मच्छिमारांकडुन मागणी करण्यात आली नाही. त्यामुळे रु. ३०.०० लाख पुर्नविनियोजनाद्वारे पूर्ण तरतूद समर्पित करण्यात आली.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ४४०५ - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च--<br>१९५, सहकारी संस्थांना मदत<br>१९५ (०१)(११) जतन वाहतूक व पणन, बर्फ कारखाना, शित गृहे रासविम-<br>मूळ- १,७५.००<br>पुर्नविनियोजन (-)१,७५.०० | - | - | - |

**टिपा व भाष्ये :-**

मच्छिमार सहकारी संस्थांकडुन मागणी न झाल्याने (रु. १२२.७० लाख) तसेच वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारित अंदाजामुळे (रु. ८२.३० लाख) मार्च, २०१२ मध्ये वर नमूद केलेल्या शिर्षाखाली पुर्नविनियोजन / प्रत्यार्पण याद्वारे रु.२०५ लाख एवढी संपूर्ण तरतूद काढण्यात आली.

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-२०१२ या वर्षात - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च या लेखाशिर्षाखाली मूळ तरतूद रु.१७५.०० प्राप्त झाले. विभागास मच्छिमारांकडुन मागणी करण्यात आली नसल्यामुळे पुर्नविनियोनाद्वारे रु. १७५.०० लाख तरतूद समर्पित करण्यात आली.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+)<br>बचत (- )** |
|---|---|---|---|
| ४४०५ - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च--<br>१९५, सहकारी संस्थांना मदत<br>१९५(०१)(०३) यांत्रिक नौका (रासवि) महामंडळ हिस्सा--<br>मूळ- २,६२.००<br>पुर्नविनियोजन (-)६७.३७ | १,९४.६३ | १,८९.४१ | (-)५.२२ |

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात-मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था, यांत्रिक नौका या लेखाशिर्षाअंतर्गत मूळ तरतूद रु. २६२.०० लाख प्राप्त झाले असून सुधारित अंदाजानुसार रु.-६७.०० लाख पुर्नविनियोजनाद्वारे समर्पित करण्यात आली. आर्थिक वर्षात अंतिम सुधारित रुपये १९४.६३ लाख पैकी प्रत्यक्ष खर्च रु. १८९.४१ लाख झालेला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे मंजूर गटाचे मंजुरी आदेश प्राप्त न झाल्यामुळे रु.५.२२ लाख बचत झालेली आहे. एकूण प्राप्त अनुदानाच्या तुलनेत बचत मर्यादीत आहे.

**(रुपये लाखांत)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+)<br>बचत (- )** |
|---|---|---|---|
| ४४०५ - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च<br>१९५, सहकारी संस्थांना मदत<br>१९५(०१)(१०) यांत्रिक नौका (रासविम) महामंडळ हिस्सा--<br>मूळ- १०,५०.००<br>पुर्नविनियोजन (-)२,६८.०७ | ७,८१.९३ | ७,८१.९१ | (-)०.०२ |

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात-मत्स्यव्यवसाय भांडवली खर्च, यांत्रिक नौका या लेखाशिर्षाअंतर्गत मूळ तरतूद रु. १,०५०.०० लाख प्राप्त झाले असून वित्त विभागाने मान्य केलेल्या सुधारित अंदाजानुसार पुनर्विनियोजनाद्वारे रु.२६८.०७ लाख समर्पित करण्यात आली. वर्ष अखेर अंतिम सुधारित तरतूद रु. ७८१.९३ लाख प्राप्त झाले असून रु.७८१.९१ लाख अंतिम खर्च झाला आहे. एकुण प्राप्त अनुदानाच्या तुलनेत बचत मर्यादीत आहे.

**(रुपये लाखांत)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ४४०५ - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च<br>१९५, सहकारी संस्थां<br>१९५ (०१)(१२) सुरक्षण वाहतूक, ट्रक, टँकर खरेदी विक्री व गोदामे बांधणे रासवि महामंडळ<br>मूळ- २४.००<br>पुनर्विनियोजन (-)१५.९७ | ८.०३ | ८.०३ | -- |

**टिपा व भाष्ये :-**

मच्छिमार सहकारी सदस्यांकडून मागणी न झाल्याने (रु.२६५.३२ लाख) आणि तसेच वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारित अंदाजामुळे (रु.८६.०९ लाख) मार्च, २०१२ मध्ये वर नमूद केलेल्या शिर्षाखाली पुनर्विनियोजन/ प्रत्यार्पण याद्वारे रु.३५१.४१ लाख एवढा निधी काढण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-२०१२ या वर्षात सुरक्षण वाहतूक टँकर खरेदी विक्री व गोदामे बांधणे रासविनी हिस्सा या लेखाशिर्षाअंतर्गत मूळ तरतूद रु. २४.०० लाख प्राप्त झाले असून विभागास मच्छिमारांकडुन मागणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे पुनर्विनियोजनाद्वारे रु. १५.९७ लाख समर्पित करण्यात आली. ट्रक टेम्पोच्या प्रस्तावाकरिता रासविनी हिस्सासाठी शासनाकडून मंजुरी प्राप्त प्रस्तावाप्रमाणे बीडीएसवर उपलब्ध झालेल्या रु. ८.०३ लाख प्राप्त झाली असून तरतुदीच्या मर्यादीत पूर्ण खर्च करण्यात आला आहे.

**(रुपये लाखांत)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ४४०५ - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च<br>१०३ सागरी मत्स्यव्यवसाय<br>१०३(००)(०२) लहान मासेमारी बंदरे राज्य योजनांतर्गत योजना<br>मूळ ३,००.००<br>पुनर्विनियोजन (-)२,७३.८४ | २६.१६ | २६.१६ | -- |

**टिपा व भाष्ये :-**

प्रत्यक्ष गरजेवर आधारित (रु.२२८.८४ लाख) व वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारित अंदाजानुसार रु. (रु.४५ लाख) मार्च, २०१२ मध्ये रु.२७३.७४ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात - सागरी मत्स्यव्यवसाय लहान मासेमारी बंदरे राज्य योजनांतर्गत योजना या उपतशिर्षामध्ये मूळ तरतूद रु.३००.०० लाख प्राप्त झाले असून प्राप्त झालेल्या बीडीएसच्या तरतुदीप्रमाणे व वित्त विभागाने मान्य केलेल्या सुधारित अंदाजानुसार तरतूद पुनर्विनियोजनाद्वारे रु.२७३.८/४ लाख समर्पित करण्यात आली.

बीडीएसवर पूर्ण तरतूद प्राप्त झालेली नाही. तसेच अभ्यास अहवालाबाबत कॅफोस, पुणे यांचे मार्फत प्राप्त झालेल्या देयकानुसार व बीडीएसवर प्राप्त झालेल्या देयकानुसार रु.२६.१३ लाख पूर्ण खर्च करण्यात आले.

**(रुपये लाखांत)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (अ) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ४४०५ - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च<br>१९०, सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूक १९० सार्वजनिक १९०(००)(०१) मत्स्यव्यवसाय महामंडळ रा.यो. योजना<br>मूळ- २,००.००<br>पुनर्विनियोजन (-)२,००.०० | -- | -- | -- |

**टिपा व भाष्ये :-**

मत्स्यव्यवसाय विकास महामंडळाकडून मागणी न झाल्याने (रु.१४३.९१ लाख) त्याचप्रमाणे मच्छिमार सहकारी संस्थेचे (रु.२६.०९ लाख) वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारित अंदाजानुसार रु. ३०.०० लाख यामुळे मार्च २०१२ मध्ये पुनर्विनियोजन / प्रत्यार्पण याद्वारे रु. २०० लाख एवढी संपूर्ण तरतूद काढण्यात आली.

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च या लेखाशिर्षामध्ये मूळ तरतूद रु. २००.०० लाख प्राप्त झाले असून मत्स्यव्यवसाय विकास महामंडळाकडून मागणी करण्यात आली नसल्याने व बीडीएसवर तरतूद रु. २००.०० लाख पूर्ण समर्पित करण्यात आली.

**(रुपये लाखांत)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ६४०५ - मत्स्यव्यवसायासाठी कर्जे<br>१९५ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना कर्जे पं.यो.यो. संवर्धन परिवहन व पणन<br>१९५ (००)(०२) सुरक्षण वाहतूक व विक्री (रासवि महामंडळ)<br>मूळ- ३,२०.००<br>पुनर्विनियोजन (-)३,०२.६३ | १७.३७ | - | -१७.३७ |

**टिपा व भाष्ये :-**

मच्छिमार सहकारी संस्थेकडून ट्रक व टेंम्पो करीता प्रस्ताव न आल्याने (रु.१४२.६३ लाख) वित्त विभागाने मंजुर केलेल्या सुधारित अंदाजावर आधारित (रु.१६० लाख) यामुळे मार्च, २०१२ मध्ये पुनर्विनियोजन प्रत्यार्पण याद्वारे रु. ३०२.६३ लाख एवढा निधी काढण्यात आला.

रु.१७.३७ लाखांच्या अंतिम बचतीची कारणे मागवून सुद्धा अद्याप कळविण्यात आलेली नाहीत, तरी ती कळवावी. (ऑगस्ट, २०१२).

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-१२ या आर्थिक वर्षात - मत्स्यव्यवसायासाठी कर्जे यामध्ये सुरक्षण वाहतूक व विक्री (रासविनि हिस्सा) या लेखाशिर्षाअंतर्गत मूळ तरतूद रु.३२०.०० लाख प्राप्त झाली. वित्त विभागाने मान्य केलेल्या सुधारीत अंदाजानुसार पुनर्विनियोजनाद्वारे रु.३०२.६३ लाख समर्पित करण्यात आली.

अंतिम सुधारित तरतूद रु.१७.३७ लाख मिळाले ट्रक आणि टेम्पोचे प्रस्तावाकरिता रासविनि हिश्शासाठी शासनाकडून मंजुरी प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार बीडीएसवर उपलब्ध झालेल्या तरतुदीच्या मर्यादीत मंजुरी प्राप्त झाल्यानुसार तरतूद वितरित करण्यात आली. परंतु अंतिम क्षणी बीडीएसवर तरतूद प्राप्त झाल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्याची बीडीएस स्लीप निघू शकली नाही. त्यामुळे कोषागाराने देयके स्वीकारली नसल्यामुळे रु.१७.३७ लाख बचत झाली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ६४०५ - मत्स्यव्यवसायासाठी कर्जे १९५ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना कर्जे पं.यो.यो. १९५(००)(०१) पं.यो.यो. यांकि नौका / खेल सागरी मासेमारी होड्यांसाठी अंशदान (रासवि महामंडळ हिस्सा)<br>मुळ- २८,८८.००<br>पुनर्विनियोजन -१,७६.३३ | २७,११.६७ | २७,११.६५ | -०.०२ |

**टिपा व भाष्ये :-**

वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारित अंदाजानुसार मार्च २०१२ मध्ये पुनर्विनियोजन/पत्यार्पण याद्वारे रु.१७६.३३ लक्ष एवढा निधी काढण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात मत्स्य व्यवसाय विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहेः--

सन २०११-१२ या आर्थिक वर्षात - मत्स्यव्यवसायासाठी कर्जे यामध्ये मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना कर्जे यांत्रिक नौका / खोल सागरातील नौकांसाठी कर्जे या उपशिर्षामध्ये मूळ तरतूद रु.२८८८.०० लाख प्राप्त झाली असून वित्त विभागाने मान्य केलेल्या सुधारित अंदाजानुसार पुनर्विनियोजनाद्वारे रु.१७६.३३ लाख समर्पित करण्यात आले. अंतीम सुधारीत तरतूद रु.२७११.६७ लाख मिळाले यांत्रिक नौकेच्या प्रस्तावाकरिता ५५% रासविनि हिश्शासाठी शासनाकडून मंजुरी प्राप्त झालेल्या प्रस्तावाप्रमाणे बीडीएसवर उपलब्ध झालेल्या तरतुदीच्या मर्यादित रु.२७११.६५ लाख खर्च करण्यात आले एकूण प्राप्त अंतिम तरतुदीच्या तुलनेत रु.०.०२ लाख बचत मर्यादित आहे.

**(रुपये लाखांत)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ४४०५ - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च,<br>१९५ सहकारी संस्थांना मदत<br>१९५(०१)(०५) जतन, वाहतूक व पणन (रासवि महामंडळ हिस्सा)<br>मूळ- २,३०.००<br>पुनर्विनियोजन -२,६०.०० | ४,९०.०० | ४,९०.०० | -- |

**टिपा व भाष्ये :-**

राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाद्वारे मान्यता मिळालेल्या संस्थाकरिता मार्च २०१२ मध्ये पुनर्विनियोजन प्रत्यार्पण याद्वारे रु.२६० लाख एवढ्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात मत्स्यव्यवसाय विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे:--

सन २०११-१२ या आर्थिक वर्षात - मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना जतन, वाहतूक व विक्री रासविनि योजना या उपशीर्षामध्ये मुळ तरतूद रु. २३०.०० लाख प्राप्त झाली. राष्ट्रीय सहकार विकास निगमने मंजूर केल्याप्रमाणे संस्थांना निधी उपलब्ध करून देण्याकरीता पुनर्विनियोजनाद्वारे रु.+२६०.०० लाख अधिकचे मिळाले असे एकुण रु. ४९०.०० लाख अंतिम सुधारित तरतूद प्राप्त झाली. शासन मान्यताप्राप्त झाल्यानुसार ससून डॉक मत्स्यउद्योग सहकारी सोसायटी मर्यादित, मुंबई या संस्थेस रासविनि भागभांडवलासाठी रु. ३००.०० लाख व इतर संस्थांकरिता रु. १९०.०० लाख पूर्ण खर्च झाला आहे.

**साक्ष :-**

१.१२ समितीने दिनांक १७ फेब्रुवारी २०१६ रोजी उपरोक्त ज्ञापनाच्या संदर्भात सचिव, मत्स्यव्यवसाय विभाग, दुग्धव्यवसाय विभाग यांची साक्ष घेतली. मत्स्यव्यवसाय विभागाशी संबंधित मागणी क्र.डी-१० ४४०५-मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च या शीर्षांतर्गत मत्स्यव्यवसाय संदर्भात प्राथमिक माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, मत्स्य व्यवसाय विभागामध्ये काही नवीन सुधारणा झालेल्या आहेत. सन २०१४ मध्ये सुधारित तलाव ठेका धोरण आणले होते, त्यानंतर त्याला स्थगिती मिळाली होती. सन २०१५ मध्ये ते ठेका धोरण अंमलात आलेले आहे. या सुधारित तलाव ठेका धोरणाप्रमाणे आता लिलाव पद्धतीने तलाव देण्यात येतील, याशिवाय जादा मत्स्यव्यवसाय वाढण्याच्या दृष्टीकोनातून सहकारी संस्थांची नोंदणी करून घेण्यात येत आहे. यामध्ये एकतर उत्पादन वाढेल, व्यवसायामध्ये स्पर्धा होईल, तसेच ५, १०, १५ वर्षे सहकारी संस्थांकडे तलाव ठेवण्याची तरतूद आहे. यामुळे दीर्घकालिन उपाययोजना करता येतील. संबंधित सहकारी संस्थेने गुंतवणूक केली तर जादा वर्षे त्यांच्याकडे तलाव राहू शकतील. पर्ससीन नेट मच्छिमारीवर निर्बंध आणण्यासाठी मागील

आठवड्यात एक नोटिफिकेशन काढले. सन २०१२ मध्ये सोमवंशी कमिटीचा अहवाल आलेला होता, तो शासनाच्या विचाराधीन होता. आता तो अहवाल नुकताच मंजूर झालेला आहे. त्या अनुषंगाने नोटिफिकेशन काढले आहे. आधी आपण अशा पद्धतीच्या मच्छीमारीवर बंदी घातली होती. यावर हायकोर्टाने स्थगिती दिली. त्यानंतर विभाग सुप्रीम कोर्टात गेले. सोमवंशी अहवालाच्या अनुषंगाने जे आक्षेप होते, त्याची पूर्तता करून आता नोटिफिकेशन काढलेले आहे. सागरी मच्छीमारीवर अमर्याद पर्ससीन नेटमुळे नुकसान होत होते. छोटे छोटे मासे काढले जात होते, त्या संख्येवर आता निर्बंध येतील. त्यांची नेट साईज वाढलेली आहे. कोणत्या महिन्यापर्यंत ते मासेमारी करू शकतील, त्याशिवाय पेट्रोलीयमचा अंतर्भाव केलेला आहे गेल्यावर्षी टोकन पद्धत लावलेली आहे.

६४०५- मत्स्यव्यवसायासाठी कर्ज या शीर्षांतर्गत सन २०११-२०१२ मध्ये १२ कोटी ७५ लाख रुपयांची बचत झालेली आहे. मत्स्यव्यवसाय या हेडखाली दत्तमत्त खर्चामध्ये मूळ रक्कम ५४ कोटी ८३ लाख रुपये दाखविली आहे. त्यापैकी ४२ कोटी रुपये खर्च करण्यात आले आणि १२ कोटी ७५ लाख रुपये बचत झाली आहे, त्याचे कारण काय आहे ? तसेच डी-१० १०१- ‘ गोड्या पाण्यातील मत्स्यव्यवसाय ’ या शीर्षांतर्गत मच्छिमारांकडून मागणी करण्यात आली नाही म्हणून विभागाकडून विनियोजनाद्वारे पूर्ण ३० लाख रुपयांची रक्कम समर्पित केली आहे अशी विचारणा समितीने केली असता पालघर येथे हे केंद्र असून तेथे कोळंबीचे उत्पादन होते. हे केंद्र फ्रान्स सरकारसोबत करार करून बांधलेले आहे. त्यांचे जे व्याज आहे, ते फेडण्यासाठी आपण तरतूद करीत होतो. सदरचे केंद्र सक्सेसफूल न झाल्यामुळे त्यांची व्याजाची मागणी येत नाही त्यामुळे हे व्यपगत झालेले आहेत. प्रत्यक्षात आपण इतर सोर्समधून गोड्या पाण्यामधील कोळंबी मच्छिमारांना उपलब्ध करून दिलेली आहे.

केंद्र जेव्हा स्थापन करण्यात आले होते तेथे इन्फ्रास्ट्रक्चरनिहाय सुविधा उपलब्ध करून द्यायला हव्या होत्या. त्यांच्या व्याजाची रक्कम उपलब्ध करून देण्याची तरतूद केली होती, परंतु त्यांनी कर्जाची रक्कम मागितली नाही काय? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, फ्रान्स सरकारसोबत करार करून हे केंद्र उभारले होते. तेथे सर्व सुविधा उपलब्ध होत्या आणि आजही आहेत. उत्पादन घेताना त्यामध्ये व्हायरल इन्फेक्शन होऊ लागले होते. फ्रान्स सरकारच्या एक्स्पर्टनी पाच वर्षे प्रयत्न केला. दरवर्षी त्यांनी उत्पादन घेतले, त्यात त्यांना सक्सेस मिळाला नाही. त्या ठिकाणचे वातावरण, तेथील सॉईल टेस्टींग, अशा वेगवेगळया कारणांमुळे व्हायरल इन्फेक्शन होत असल्यामुळे वापरण्यासारखे उत्पादन त्यामध्ये झाले नाही कारण विभागाला माहिती नाही व्याजाची मागणी होत नव्हती म्हणून सदरची रक्कम दिसते आहे या ठिकाणी शासनाची एकूण भांडवली गुंतवणूक ६ कोटी ८९ लाख रुपयांची आहे.

मच्छिमारांसाठी ज्या योजना आहेत, त्या त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत का? या योजनांची जनजागृती होत नाही का, की त्यांना या योजनांमध्ये इंटरेस्ट नाही. दोन तीन मच्छिमारांकडून मागणी करण्यात आली नाही त्यामुळे ही रक्कम व्यपगत होत आहे. विभागाचे अधिकारी तेथपर्यंत पोहोचत नाहीत काय?

मच्छिमारांकडून मागणी आली नाही हे उत्तर संयुक्तिक वाटत नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले. यावर मागणी आली असती तर तेथे इन्फ्रॉस्ट्रक्चर उपलब्ध होते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

मच्छिमारांना या प्रकल्पाऐवजी दुसरीकडून पुरवठा करीत होतो. कर्जाच्या परतफेडची रक्कम ३० लाख रुपये होती तसेच फ्रान्स सरकारची मुद्दल रक्कम दिलेली असून त्या रकमेच्या व्याजाची मागणी होत नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच फ्रान्स सरकार व्याजाची मागणी करीत नाहीत, परंतु विभाग तरतूद करून ठेवतो. फ्रान्स सरकारकडून व्याजाची मागणी न झाल्यामुळे ती रक्कम व्यपगत होते. व्याजाची रक्कम फ्रान्स सरकारला द्यावयाची होती त्यासंबंधीची माहिती पुस्तिका उपलब्ध आहे. विभागाकडून मेळावे घेण्यात येतात. तीन-चार महिन्यांत मच्छिमार संस्थांची बैठकही घेण्यात येते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

७ कोटी रुपये खर्च करून इन्फ्रास्ट्रक्चर उभारलेले आहे. तेथे उत्पादन होत नाही तेथे कोणी कब्जा करीत असेल किंवा मेन्टेनन्सचा खर्च करावा लागत असेल तर अशा परिस्थितीत त्याचा उपयोग प्रत्यक्षात काही कामासाठी होऊ शकतो काय ? अशी विचारणा समितीने केली.

पीपीपी खाली खाजगी उद्योजक घ्यायला कोणी तयार आहेत काय, या अनुषंगाने एक टेंडर काढून टेस्ट केलेली आहे. त्यानंतर अशी सूचना आली की, ऑफसेट रक्कम जास्त आहे त्यामुळे आता ऑफसेट रक्कम कमी करावी असा प्रस्ताव समोर आलेला आहे. त्यावर विभाग निर्णय घेणार आहे. १०० हेक्टर्सच्या वर जितके तलाव आहेत, त्या सर्वांचे नवे धोरण २०१५ मध्ये अंमलात आलेले आहे. १००० हेक्टर्सपर्यंतच्या ४७ धरणांचा त्या धोरणामध्ये समावेश आहे. सन २००१ पर्यंत सहकारी संस्थांची नोंदणी होत नव्हती म्हणून वर्षभर मत्स्य सहकारी संस्थांची नोंदणी करण्यात आली. त्यानुसार ३०० मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांची नोंदणी झालेली आहे. या अनुषंगाने ज्या तलावांची मुदत संपते त्या सर्वांना लिलावामध्ये घेतले जाणार आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस अवगत केली.

विभागाने आता मोठ्या धरणाच्या लिलावासंबंधी नवीन धोरण सांगितले. टेंडरच्या अटी आणि शर्ती इतक्या जाचक आहेत की, त्यामुळे कहार समाजातील लोकांना टेंडर भरता येत नाही. ते लोक पैसे भरू शकतात, परंतु त्यांना ऑन लाईन टेंडर भरण्याचे समजत नाही. अशा परिस्थितीत काही मोठे लोक कॉन्ट्रॅक्ट घेतात आणि कहार समाजाच्या लोकांना त्यांच्या अखत्यारित कामाला लावतात ज्या समाजाचा मूळ धंदा आहे, अशा लोकांना कामाला लावायचे, अशी परिस्थती सगळीकडेच आहे. ज्यांचा या व्यवसायाशी संबंध नाही असे लोक टेंडर घेतात.

अशा लोकांचा अर्थाअर्थी या धंद्याशी काही संबंध येत नाही. त्यांच्यापैकी पिढ्यान पिढ्या कोणी हे काम केलेले नाही असे लोक या कहार समाजाच्या लोकांना हायर करून हे लोक कामाला लावतात ही अतिशय गंभीर बाब आहे. विभाग ज्यांच्यासाठी हे धोरण आणतो, ते त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही तेथे पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत, परंतु त्यांच्यापर्यंत परिस्थिती पोहचत नाही, अशी परिस्थिती असल्याची खंत समितीने

व्यक्त केली असता यामध्ये ई टेंडर काढले जात नाही लिफाफा पद्धतीने टेंडर भरले जाते. अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

समितीची अशी एक सूचना आहे की, विभाग अशा संस्थेची स्थापना करताना या संस्थेमध्ये कहार समाजातील ५ लोकांना घेण्यात यावे आणि त्यांच्याकडे जातीचे प्रमाणपत्र असले पाहिजे कहार समाज हा मच्छिमार करणारा समाज आहे. या सहकारी संस्थेमध्ये कहार समाजाचे किमान ५ लोक असणे आवश्यक आहे, अशा प्रकारची अट व शर्तींचा त्यामध्ये समावेश करावा. त्या लोकांना न्याय देण्याच्या हेतूने अशा प्रकारच्या अटी घालण्यात याव्यात अशी सूचना समितीने विभागास केली.

सहकार विभागाचे शासन निर्णय आहेत, परंतु नियम मत्स्यव्यवसाय विभाग त्यांना सजेस्ट करतो. समितीने केलेली सूचना स्वागतार्ह आहे. प्रॅक्टिकली ते करता येईल की नाही हे तपासून पहावे लागेल केवळ जातीच्या निकषावर करीत आहोत म्हणून त्याला चॅलेंज व्हायला नको असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

जे लोक पारंपरिक मच्छीमारीचा व्यवसाय करतात, त्यांचेकडे जमिनी नाहीत असे लोक तलाव, नदीमध्ये जाळी टाकून मच्छीमारी करतात. विभाग को-ऑपरेटीव्ह संस्था स्थापन करतो आणि बंद लिफाफ्यात निविदा मागवितो यामुळे काही विशेष लोकांनाच हे टेंडर मिळते. जे खरोखर या व्यवसायामध्ये राबणारे लोक आहेत, ते असेच भटकत राहतात. असे लोक त्यांना रोजंदारीवर काम मिळावे म्हणून मोठ्या लोकांच्या मागे लागतात आणि हे मोठे लोक यांना राबवून घेतात. जे मोठ मोठे तलाव आहेत अशा ठिकाणी बिहारमधून लोक आणून त्यांनी मच्छीमारी केली असल्याचे समितीला आढळून आलेले आहे. हे लोक त्या मच्छीमारांना साधे जवळ सुद्धा येऊ देत नाहीत. यामधून कसा व्यवहारी मार्ग काढता येईल ते मत्स्यव्यवसाय विभागाने पहावे अशी सूचना समितीने केली.

यामधील काही अटी व शर्तींमध्ये बदल करणे शक्य आहे. एनआरएलएम अंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत जे काम केले जाते त्यामध्ये कुक्कुट पालन, शेळी-मेंढी इत्यादी व्यवसायामध्ये चांगले काम होतांना दिसत आहे. या लोकांना अशा प्रकारचे प्रशिक्षण देऊन त्यानंतर त्यांना टेंडर प्रक्रियेमध्ये आणता येईल. या प्रक्रियेमध्ये दोन-तीन मुद्दे तपासून त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचा प्रयत्न करावा लागेल, असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

तो महाराष्ट्राचा रहिवासी असावा, अशी अट यामध्ये घालण्यात यावी या समितीच्या सूचनेवर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, रहिवासीमध्ये ठेकेदार सुद्धा येतात, एखाद्या सहकारी संस्थेला काम दिले तरी ते कॉन्ट्रॅक्ट देऊन टाकतात. म्हणून आता लिलाव त्याच संस्थेकडे राहणार नाही लिलावासाठी पाच वर्षांची मुदत असते. त्याने गुंतवणूक केली तर त्याला १० वर्षाचा कालावधी मिळतो त्याने आणखी गुंतवणूक केली तर १५ वर्षांचा कालावधी मिळतो. त्या मच्छीमारांनी मत्स्य बिज तलावामध्ये घातले आणि काही सुधारणा केली तर त्याला लाँग टर्म मच्छीमारी करता येईल असेही समितीस अवगत केले.

माजलगाव धरणावर औरंगाबाद आणि अहमदनगरचे लोक काम करीत आहेत ते मत्स्य बिज दरवर्षी टाकत असतातच. विभागातर्फे यामध्ये काय सुधारणा करणार आहात?

उपरोक्त समितीच्या मतानुषंगाने शॉर्ट टर्म उद्देश ठेवायला नको दूरदृष्टीकोन हा उद्देश ठेवावा असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

हे क्लॉज भांडवलदार आणि गुंतवणुकदारांच्या फायद्याचे आहेत. हे लोक अधिक गुंतवणूक करणारे आहेत म्हणूनच त्यांना हे ठेके मिळणार आहेत. प्रत्येक वर्षी या लोकांनी स्पर्धेत असायला हवे असे मत समितीने व्यक्त केले.

लाँग टर्म हिशोबाने तुम्ही दरवर्षी मत्स्य बिज घातले आणि त्यामध्ये सुधारणा केली तर त्यातून तुम्ही उत्पन्न घेऊ शकता. परंतु पाच वर्षांच्या नंतर त्यांच्याकडे तलावच राहणार नसेल तर मग कोणी सुधारणा करणार नाही म्हणून त्यांनी इतक्या रकमेची कमीतकमी गुंतवणूक केली तरच त्यांना कालावधी वाढवून मिळेल. यासंबंधी एक तलाव ठेका समिती आहे ते तपासणी करतात. त्या समितीसमोर हा विषय ठेवला जातो ती समिती ठरविते की, याला मुदत वाढवून द्यावयाची की परत निविदा काढायची यामध्ये १०० ते १००० हेक्टर आणि १००० हेक्टरच्या पुढे अशा तीन प्रकारच्या कॅटेगिरी आहेत. जास्त गुंतवणुकीची प्रकरणे ४७ प्रकारच्या इरिगेशन तलावाच्या बाबतीतील आहेत. त्यामुळे त्या तलावांच्या बाबतीत हा विषय प्रामुख्याने येतो. १०० ते १००० हेक्टरच्या आतील लहान तलावांमध्ये गुंतवणुकीचा फारसा विषय येत नाही. समिती सदस्यांनी माजलगांव येथील तलावाच्या बाबतीत उल्लेख केला आहे तो सुद्धा मोठा तलाव आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

समितीचा उद्देश एवढाच आहे की, दरवर्षी तलावांच्या ठेक्याबाबत स्पर्धा झाली पाहिजे. त्यामुळे कमीतकमी लहान तलावांच्या बाबतीतील अट कमी करावी. समितीला हे मान्य आहे की, मोठ्या तलावांसाठी गुंतवणूक लागणार आहे, त्यावर भांडवली खर्च करावा लागणार आहे. परंतु लहान तलावांसाठी पाच वर्षांची नव्हे तर दर वर्षाची अट ठेवावी, जेणेकरून यामध्ये स्पर्धा होऊन इतरही लोकांना यामध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल.

मायनर इरिगेशन टँकच्या बाबतीत दरवर्षी ठेका द्यावयास हरकत नसून मोठ्या तलावांच्या बाबतीत नव्हे तर मायनर इरिगेशन टँकच्या बाबतीत दरवर्षी ठेका द्यावा अशी समितीच्या माध्यमातून शिफारस करण्यात येईल. विभागाने सुद्धा त्या दृष्टीने विचार करावा, अशी सूचना समितीने विभागास केली.

विभागाचे मत आहे की, १ वर्षाची अट खूपच कमी होईल ही अट किमान ३ वर्षे असावयास पाहिजे याही समितीने ५ वर्षे असलेली अट ३ वर्षे करावी असे सुचविले.

या बाबतीत आवश्यक तेवढी जनजागृती झालेली नाही. तसेच विभागाची योजना सुद्धा लोकांपर्यंत पोहचली नाही. कारण गोड्या पाण्यातील कोळंबी बीज असो किंवा भांडवली खर्चातील १७५ लाख रुपये विभागाने पुनर्नियोजित केलेले असोत. समिती जाणून घेऊ इच्छिते की, या योजनांबाबत जनजागृती होण्यासाठी विभागाने कोणते प्रयत्न केले? या समितीच्या प्रश्नाच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी अशी माहिती समितीस अवगत केली की, जनजागृतीसाठी ‘आत्मा’ च्या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात बैठका होतात, याशिवाय घडी पत्रिका, पुस्तके सुद्धा उपलब्ध आहेत. या बरोबरच मेळावे देखील आयोजित केले जातात. दरवर्षी आयोजित

करण्यात येणाऱ्या मत्स्यगंधा प्रदर्शनामध्ये या संदर्भातील माहिती दिली जात होती. याविषयी अमरावती, नंदुरबार, पालघर-ठाणे येथील माहिती आहे.  शिवाय जी पुस्तके प्रदर्शित केलेली आहेत त्याची सुद्धा माहिती आहे. तसेच दर तीन ते सहा महिन्यांच्या कालावधीत विभागाकडून मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांच्या बैठका घेतल्या जातात. या माध्यमातून त्यांना योजनांची माहिती दिली जाते.  तसेच त्यांच्या डिझेल परताव्याच्या प्रलंबित प्रकरणांबाबत तसेच एनसीडीसीच्या कर्ज प्रकरणाबाबत माहिती दिली जाते. त्यामुळे या माध्यमातून संबंधितांना योजनांची पुरेशी माहिती दिली जाते. मी या ठिकाणी समितीला कोळंबी उत्पादनाच्या बाबतीत माहिती दिली. एनसीडीसीच्या बाबतीत सांगू इच्छितो की, बर्फ कारखान्यासाठी ५० लाख रुपयांची गुंतवणूक करावी लागते, शीतगृहासाठी सुध्दा साधारणतः ५० लाख रुपयांची गुंतवणूक करावी लागते. प्रोसेसिंग प्लांटसाठी १५ ते २० कोटी रुपयांची गुंतवणूक करावी लागते. त्यामुळे ही प्रकरणे कमी प्रमाणात येतात ही वस्तुस्थिती आहे. एमएफडीबीची योजना चांगली असली तरी त्यामध्ये २० टक्के  भाग भांडवल आहे.

प्रोसेसिंग प्लांट संदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, प्रोसेसिंग प्लांट म्हणजे मच्छीवर प्रोसेसिंग करून टिनींग करणे, मच्छीला बोनलेस करणे किंवा निर्यात करण्यासाठी त्याची विशिष्ट पॅकींग करणे होय. प्रोसेसिंग प्लांटची किंमत १५ ते २० कोटी रुपये असते. त्यामुळे अशी प्रकरणे कमी प्रमाणात येतात. एनसीडीसीच्या योजनांसाठी डीपीडीसी कडून निधी मिळतो, भाग भांडवल मिळते, शिवाय स्वतःचा १० टक्के हिस्सा असतो. यामध्ये कर्ज केवळ ५० टक्के असते. तसेच १० टक्के राज्य शासनाचा हिस्सा असतो. अशाप्रकारे अनुदान मिळते.  तसेच कर्जाची परतफेड केली तर भागभांडवल हे त्यांच्या सबसिडीमध्ये कन्व्हर्ट होते. त्यामुळे योजना जरी चांगली असली तरी त्यासाठी बर्फ कारखाना, शीतगृह किंवा प्रोसेसिंग प्लांटसाठी मात्र मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागते. त्यामुळे एनसीडीसीच्या या प्रकरणामध्ये ट्रक किंवा टेम्पो यांच्याच माध्यमातून वाहतूक केली जाते. त्यामुळे या योजनेमध्ये फारसा प्रतिसाद नाही. परंतु अन्य योजनेमध्ये एनसीडीसीकडून मत्स्यबीजसाठी, बोटींग किंवा जाळ्यांसाठी वर्कीग कॅपिटल दिले जाते. त्यामुळे त्या योजनांमध्ये चांगला प्रतिसाद आहे. कारण हे काम ५-१० लाख रुपयांत होते.

एखाद्याने हा प्लांट टाकल्यानंतर त्यालाच फिशींगचे कंत्राट  मिळेल काय ? अशी समितीने विचारणा केली.

विभाग त्याचे टायअप बघतो सहकारी संस्था असा प्लांट टाकू शकतात सहकारी संस्थांचे सभासद किती आहेत, त्यांचे एक्झिस्टींग प्रोडक्शन काय आहे हे तपासून विभाग एनसीडीसीकडे शिफारस करतो. डीपीडीसी मार्फत १० टक्के अनुदान मिळते, त्यांचा स्वतःचा हिस्सा १० टक्के असतो, एनसीडीसी २० टक्के भागभांडवल व ५० टक्के कर्ज देते. तसेच राज्य सरकार १० टक्के कर्ज देते. एनसीडीसीच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या ५० टक्के कर्जाची परतफेड चांगली असेल तर उरलेले भागभांडवल सबसिडीमध्ये कन्व्हर्ट होते, असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आपल्या राज्याला ७००-८०० कि.मी. चा सागरी किनारा लाभलेला आहे. परंतु मत्स्यव्यवसाय विभागाकडे कर्मचारी वर्गाची अतिशय कमतरता आहे. खालच्या स्तरातील लोकांपर्यंत योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी विभागाकडे जी यंत्रणा पाहिजे ती कमी आहे. विभागाच्या माध्यमातून विविध योजनांच्या संदर्भात लोकांचे प्रबोधन करण्यात येत नाही. ज्या ठिकाणी कोळी बांधव राहतात त्या ठिकाणापर्यंत विभागाच्या योजनांची माहिती पुरविण्याची कोणतीही व्यवस्था विभागाकडे उपलब्ध नाही. मला वाटते ही व्यवस्था केली तर यामध्ये फार फरक पडेल. आपण आंध्रप्रदेश आणि गुजरात राज्याचे उदाहरण बघावे. ओरिसा आणि महाराष्ट्राची तुलना व्यावसायिकदृष्ट्या होऊ शकत नाही. कारण ओरिसा राज्यातील मच्छीमारांसाठी तेथील राज्य सरकारने केलेल्या व्यवस्था आपण बघितल्या तर लक्षात येईल की, त्या ठिकाणी प्रबोधनाच्या दृष्टीने त्यांनी काय काम केले आहे. ओरिसा राज्यात शेवटच्या माणसाला विभागाच्या योजनांची माहिती आहे. परंतु आपल्याकडे पार विणणे किंवा छोट्या होड्या बांधणे, या व्यतिरिक्त अन्य कामांसाठी सरकार अनुदान देते हे कोणालाच माहीत नाही. अधिकारी मंडळी आपापल्या कार्यालयात बसतात. खालच्या स्तरापर्यंत योजनांची माहिती पोहचविण्यासाठी कोणती व्यवस्था आहे वा असावयास पाहिजे हे विभागाच्या सचिवांनी समितीस सांगावे. आवश्यकता वाटल्यास समितीच्या माध्यमातून या संदर्भात शिफारस करण्यात येईल असे मत समितीने व्यक्त केले.

विभागीय सचिवांनी हे मान्य केले की, जिल्हा स्तरापर्यंतच विभागाचे अधिकारी आहेत तालुक्यापर्यंत अधिकारी नाहीत. तसेच हे सुद्धा खरे आहे की, विभागामध्ये रिक्त पदे मोठ्या प्रमाणावर आहेत. अनेक ठिकाणी रिजनल रिक्रुटमेंट बोर्ड रद्द झाले. ही १९९५-९६ ची गोष्ट आहे. १९९८-९९ मध्ये रिक्रुटमेंट झाली. २००१ पर्यंत परिस्थिती वाईट नव्हती. परंतु २००१ मध्ये पदांच्या आढाव्या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. आढावा पूर्ण करून २००८ पर्यंत आम्ही पदे भरू शकलो नाही. कारण २००८ पर्यंत विभागाचा आढावाच पूर्ण झाला नव्हता. २००८ ते २०१० पर्यंत पदे भरण्याची मुदत होती. त्यानंतर पुन्हा २०१० मध्ये पदे भरण्यावर बंदी आली. २०१० मध्ये लावण्यात आलेली बंदी २०१२ मध्ये उठविण्यात आली. २०१२ मध्ये पदे भरण्यास मान्यता देऊन जाहिरात देण्यात आली. सदरहू पदांची नेमणूक २०१५ मध्ये करण्यात आली. आता पुन्हा पदे भरण्यावर बंदी आलेली आहे. त्यामुळे किमान या बंदीच्या अगोदर विभागाने काही नेमणुका केल्या. सहायक मत्स्यव्यवसाय अधिकारी हे तांत्रिक पद आहे. तसेच त्यांच्या हाताखाली काम करणारे वर्ग-४ मधील मत्स्य क्षेत्री ही पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत सद्य:स्थितीत ३० टक्के पदे रिक्त असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१९५-सहकारी संस्थांना मदत १९५ (०१) (०३) यांत्रिक नौका हिस्सा या अंतर्गत सिंधुदुर्ग सहकारी संस्थेच्या गटाला मंजुरी का मिळाली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता या संदर्भात बी.डी.एस. स्लीपला ३१ मार्चला मंजुरी मिळाली होती. त्यावेळी वित्त विभागामध्ये आज ज्याप्रकारे आपोआप ७० टक्के निधी वितरित होत होता तशी परिस्थिती नव्हती. त्यावेळी प्रत्येक वेळा आपल्याला प्लान ग्रांटसाठी सुद्धा वित्त विभागाकडे फाईल पाठवून त्यांची मंजुरी घ्यावी लागत होती. ३१ तारखेला ती मंजुरी मिळाली आणि ती तेथेच

कम्युनिकेट होऊन बी.डी.एस. स्लीप काढेपर्यंत ट्रेझरी बंद होऊन गेली. त्यामुळे बी.डी.एस. स्लीप त्यावेळी निघाली नाही. परंतु पुढच्या वर्षी त्यास मंजुरी मिळाली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१९५ (०१) (१२) संरक्षण वाहतूक ट्रक टँकर खरेदी विक्री व गोदामे बांधणे या शिर्षांतर्गत २६५.३२ लाख रुपयांची मागणी न झाल्याने वित्त विभागाने मंजूर केलेले सुधारित अंदाज ८६.०९ लाख नमूद केले आहे. विभागाने यासंदर्भात जो शेरा नमूद केला आहे त्यासंदर्भातील नेमकी वस्तुस्थिती काय आहे ते स्पष्ट करून सांगावे. मच्छीमार सहकारी संस्थेच्या सदस्यांकडून मागणी न झाल्याने व वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारित अंदाजामुळे मार्च, २०१२ मध्ये वर नमूद केलेल्या शीर्षाखाली पुनर्नियोजनाद्वारे ३५१.४१ लक्ष एवढा निधी काढण्यात आला हा विषय नेमका काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता पुनर्नियोजनाच्या माध्यमातून १५ लाख रुपये परत गेले आणि ८ लाख रुपये शिल्लक होते. ते सर्व खर्च झाले असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने या विषयी नमूद केलेला शेरा समितीला मान्य आहे. परंतु त्याखाली मच्छीमार सहकारी संस्थेच्या सदस्यांकडून मागणी न झाल्याने असे जे नमूद केले आहे ते नेमके काय आहे ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, समिती जे सांगत आहात तो महालेखाकार यांचा आक्षेप आहे आणि विभागाचे उत्तर मात्र दुसऱ्या बाजूला नमूद करण्यात आलेले आहे. ही मागणी आठमाहीत रिव्हाईज इस्टीमेटमध्ये कमी झाली होती. जी रक्कम शिल्लक राहिली होती ती सर्व खर्च झाली आहे.

सार्वजनिक १९० (००) (०१) मत्स्यव्यवसाय महामंडळ राज्य योजना या अंतर्गत मत्स्य व्यवसाय विकास महामंडळासाठी २ कोटी रुपयांची तरतूद केली होती. परंतु नंतर ही तरतूद पुनर्नियोजनाच्या माध्यमातून विथ्ड्रॉ करण्यात आली. याचा अर्थ कोणताही प्रस्ताव विभागाकडे येत नाही, असे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता एनएफडीसीची भाग भांडवलाच्या मंजुरीची मर्यादा ४ कोटी रुपये होती. ही ४ कोटी रुपयांची मर्यादा वाढवावी अशाप्रकारचा प्रस्ताव त्यांनी पाच वर्षे केला होता. ते २००५ पासून ते २०१० पर्यंत ४ कोटी रुपयांची मर्यादा वाढविण्याबाबत शासनाकडे मागणी करीत होते. परंतु शासनाकडून त्यांची मागणी मान्य करण्यात आली नाही. परंतु आपण हेडमध्ये मात्र ती तरतूद ठेवत होतो. परंतु त्यांनी नेमकी त्या वर्षी मागणी केली नाही. परंतु २०१३ मध्ये त्यांची मागणी मान्य झाली आहे. त्यानुसार ४ कोटी रुपयांची भाग भांडवलाची मर्यादा ६ कोटी रुपयांपर्यंत वाढविली आहे. ६ कोटी रुपयांपैकी ४.५ कोटी रुपये भाग भांडवल पोहचले आहे आणि १.५ कोटी रुपये त्यांच्याकडे शिल्लक आहेत. भाग भांडवलाची मर्यादा ६ कोटी रुपये करण्यात आल्यासंदर्भातील जी.आर २०१३ मध्ये काढलेला आहे. त्यामुळे आता ते प्रोजेक्टच्या हिशेबानुसार भाग भांडवल उचलतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१९५- मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना कर्जे पं.यो.यो. संवर्धन परिवहन व पणन या शिर्षांतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या बाबतीत ऐनवेळी मंजुरी मिळाल्याचे नमूद केले आहे. या ठिकाणी सुद्धा १७ लाख ३७ हजार रुपये बी.डी.एस. मुळे थांबले काय ? या ठिकाणी मंजुरीची अडचण नव्हती असे समितीने सांगितले असता त्यांनी दर

पाच वर्षे भागभांडवल वाढवून देण्याबाबत मागणी केली होती. परंतु भागभांडवल वाढवून मिळाले नाही म्हणून त्यांनी नंतरच्या वर्षी मागणी केली नाही. त्यांनी २००६ ते २०१० या कालावधीत भागभांडवल वाढवून देण्याची मागणी केली. परंतु २०११-१२ मध्ये मात्र त्यांनी मागणी केली नाही. परंतु २०१३ मध्ये त्यांचे भागभांडवल वाढवून ४ कोटी रुपयांच्या ऐवजी ६ कोटी रुपये केले. वाढीव २ कोटी रुपये त्यांना नंतर मिळाले आहेत. आजच्या तारखेपर्यंत त्यांनी ४.५ कोटी रुपये खर्च केले असून उर्वरित १.५ कोटी रुपये त्यांच्याकडे आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला तसेच या ठिकाणी ही बी.डी.एस. ची स्लीप निघाली नव्हती. बाकी सर्व ठिकाणी स्लीप निघाली होती. फक्त सिंधुदुर्ग जिल्ह्यात ती निघाली नाही परंतु पुढील आर्थिक वर्षात त्यांना तो निधी मिळाला असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

बीडीएसवर स्लीप न निघण्याचे कारण नमूद करताना सचिव, वित्त विभाग यांनी असे विदित केले की, त्या वर्षात BEAMS was fully functional. त्यांनी हेडक्वॉर्टरवरून शेवटच्या मिनिटाला निधी रिलीज केला असेल तर स्लीप निघणार नाही. कारण रात्री १२.०० वाजता सिस्टीम बंद होते.

या अनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, ओरोस येथे नवीन ट्रेझरी ॲक्टीव्हेट झाली नाही त्यामुळे रत्नागिरीला यावे लागले. यामध्ये विलंब झाला. ३१ मार्चला निधी रिलीज झाला. रात्री १२.०० वाजेपर्यंत सिस्टीम सुरू असते. १२.०० वाजेनंतरची स्लीप निघाली नाही. रात्री १२.०० वाजेनंतर सिस्टीम लॉक झाली आणि ती रक्कम व्यपगत झाली. ३१ मार्चची रक्कम प्रत्यार्पित सुद्धा करू शकलो नाही.

उपरोक्त विभागीय सचिवांच्या माहितीच्या अनुषंगाने सचिव, वित्त विभाग यांनी पुढील अभिप्राय दिले. विभाग ने दिनांक ३१ मार्च को ही फंड रिलीज किया होगा. इसका मतलब यह है कि इसमें सिस्टम का फॉल्ट नहीं है. ३१ मार्चला मध्यरात्री म्हणजेच १२.०० वाजेनंतर त्यांनी प्रोसेस केली असेल तर स्लीप निघणार नाही.

या अनुषंगाने मत्स्यव्यवसाय विभागाच्या सचिवांनी असे स्पष्टीकरण केले की, त्यावेळी अशी पद्धत होती की, प्लानच्या सर्व बाबी वित्त विभागाकडे रिलीजसाठी जात होत्या. आता त्यांनी प्लानमध्ये ७० टक्के आणि नॉन प्लानमध्ये ९० टक्के रिलीज आपोआप मान्य केले आहे यासाठी फाईल पाठविण्याची गरज नाही. पूर्वी नियोजन आणि वित्त विभागाकडे फाईल जात होती परंतु आता ती परिस्थिती नाही. भांडवलाच्या बाबतीत विभागाला सांगितले की, तुम्ही १०० टक्के तुमची रक्कम रिलीज करू शकता त्यावेळी ही पध्दत नव्हती. शिवाय विभागाकडून सुद्धा चूक झाली की, शेवटच्या क्षणाला प्रस्ताव गोळा करून मागणी करीत होतो, ३१ तारखेला निधी रिलीज होतो, बी.डी.एस. उघडतो आणि नंतर त्यांना कळवितो शिवाय दुसरी अडचण अशी होती की, ही प्रोसेस सिंधुदुर्गाला होत नव्हती कारण तेव्हा रत्नागिरीला ट्रेझरी होती. त्यामुळे रत्नागिरीला प्रोसेस करावी लागली. आता ही प्रोसेस ओरोसला होऊ लागली आहे. त्यामुळे आता पूर्वीसारखी अडचण राहिलेली नाही. त्यामुळे पूर्वी सिंधुदुर्ग येथील गटाला जो निधी मिळाला नव्हता तो २०१०-१२ मध्ये मिळाला आहे.

१९५ (००) (०१) पं.यो.यो. यांत्रिक नौका खोल सागरी मासेमारी/होड्यासाठी अंशदान या शीर्षांतर्गत २७ कोटी ११ लाख रुपये नौका खरेदीसाठी संस्थेला दिले आहेत. यामध्ये रा.स.वि.नि. हिस्सा म्हणजे काय आहे ? अशी विचारणा समितीने केली.

एन.सी.डी.सी. म्हणजेच राष्ट्रीय सहकार विकास निगम आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. सर्वात जास्त रक्कम सरेंडर होणाऱ्या विभागापैकी एक मत्स्यव्यवसाय विभाग दिसतो. रि-ॲप्रोप्रिएशनसाठी सर्वात जास्त वाव याच विभागात दिसतो. तसेच हा विभाग अत्यंत दुर्लक्षित आहे असे दिसून येते. सर्वात जास्त रि-ॲप्रोप्रिएशनला संधी या विभागात मिळते असे मत समितीने व्यक्त केले.

परंतु आता निधी व्यपगत होऊ देत नाही. केंद्र सरकारचा निधी सुद्धा व्यपगत होऊ देत नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१९५ (०१) (०५) जतन वाहतूक व पणन नौकासाठी कर्जे या शीर्षांतर्गत मूळ रक्कम २३० होती. पुर्ननियोजनाच्या माध्यमातून आपण रक्कम वजा केल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे ही रक्कम आपण वजा केली की व्यपगत केली ? यावर विभागीय सचिव यांनी सदर रक्कम व्यपगत केल्याचे सांगितले.

विभागाने मच्छीमार सहकारी संस्थांना आणि खाजगी संस्थांना किती ठेके दिले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता सहकारी संस्था आणि खाजगी संस्थांना १००० हेक्टरच्या वरील क्षेत्रासाठी निविदा प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात येते. १००० हेक्टरच्या खालील क्षेत्राच्या बाबतीत मात्र सहकारी संस्था पुढे आल्या नाही तर खाजगी संस्थांना सहभागी करून घेण्यात येते.

दहा हजार रुपयांची वरच्या ठेक्यामध्ये टेंडर प्रोसेसमध्ये हे सर्व डिटेल्स समाविष्ट केले जातात. जर सहकारी संस्थासमोर आली नाही तर खाजगीला पुन्हा टेंडर प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेता येते. पहिल्या कॉलनंतर हजार हेक्टरच्या खाली आणि पहिल्या कॉलनंतर हजार हेक्टरच्या वर खाजगी संस्थांना यामध्ये डायरेक्ट पार्टिसिपेट करून घेता येते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**समितीचे अभिप्राय**

टेंडरच्या अटी आणि शर्ती इतक्या जाचक असतात की, त्यामुळे कहार समाजातील लोकांना टेंडर भरता येत नाही. ते लोक पैसे भरू शकतात, परंतु त्यांना ऑन लाईन टेंडर भरण्याचे समजत नाही. अशा परिस्थितीत काही मोठे लोक कॉन्ट्रॅक्ट घेतात आणि कहार समाजाच्या लोकांना त्यांच्या अखत्यारित कामाला लावतात ज्या समाजाचा मूळ धंदा आहे, अशा लोकांना कामाला लावायचे, अशी परिस्थती सगळीकडेच आहे. ज्यांचा या व्यवसायाशी संबंध नाही असे लोक टेंडर घेतात असे समितीने मत व्यक्त केले.

अशा लोकांचा अर्थाअर्थी या धंद्याशी काही संबंध येत नाही. त्यांच्यापैकी पिढ्यान पिढ्या कोणी हे काम केलेले नाही असे लोक या कहार समाजाच्या लोकांना हायर करून हे लोक कामाला लावतात. विभाग ज्यांच्यासाठी हे धोरण आणतो, ते त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही तेथे पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न करावा आपण करीत आहोत, परंतु त्यांच्यापर्यंत परिस्थिती पोहचत नाही, अशी खंत समितीने व्यक्त केली.

अशा संस्थेची स्थापना करताना या संस्थेमध्ये कहार समाजातील ५ लोकांना घेण्यात यावे आणि त्यांच्याकडे जातीचे प्रमाणपत्र असले पाहिजे कहार समाज हा मच्छिमार करणारा समाज आहे. या सहकारी संस्थेमध्ये कहार समाजाचे किमान ५ लोक असणे आवश्यक असल्याचा अभिप्राय समितीने व्यक्त केला.

**समितीच्या शिफारशी :-**

**१.१३ शिफारस क्रमांक (१) :** मत्स्यव्यवसाय विकास विभागाच्या मच्छिमारांसाठीच्या योजनांबाबत चर्चा करताना समितीने सूचित केले की, मच्छीमार संस्थेची निवड करताना त्या संस्थेमध्ये किमान पाच स्थानिक मत्स्यव्यवसाय करणाऱ्या समाजाच्या लोकांचा समावेश असावा. **तसेच संस्थेचे सर्व सभासद महाराष्ट्रातील निवासी असावे या अटीचा समावेश असावा. समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांत समितीस सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

# नियोजन विभाग

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०११-१२ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालासंदर्भात अनुदान क्र.ओ-१ मधील प्रधानशीर्ष 'जिल्हा प्रशासन', ओ-७-३४५१ 'सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा', ओ-८ ३४५२ 'पर्यटन', ओ-१०-४५१५ 'इतर ग्रामविकास कार्यक्रमांवरील भांडवली खर्च' या शीर्षाखाली बचत व अधिक खर्च झाल्याप्रकरणी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.--

**अनुदान क्रमांक ओ-१ जिल्हा प्रशासन**

**(रुपये हजारांत)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| २०५३, जिल्हा प्रशासन<br>दत्तमत-<br>मूळ- ३,७५,१०,००<br>पूरक- १,३२,५०,०२<br>वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च, २०१२) | ५,०७,६०,०२ | ३,२४,१९,५४ | -१,८३,४०,४८<br><br>१,७०,४६,९७ |

**टिपा व भाष्ये**

मूळ तरतूदी इतकाही खर्च करण्यात आला नाही.

रु. १,८३,४०.४८ लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता, त्या वर्षामध्ये प्राप्त झालेली पूरक अनावश्यक ठरली.

अनुदानातील पुढील शीर्षाखाली झाली.

**ज्ञापन**

**महालेखापरिक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांचे अभिप्राय : अभिप्राय नाहीत. व त्या अनुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही/ अभिप्राय.

**(रु. लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| २०५३, जिल्हा प्रशासन,<br>०९३, जिल्हा आस्थापना<br>०९३(०४)(०१) मानव विकास निर्देशांकात वाढ करणे<br>मूळ- ३,७५,००.००<br>पूरक- ०.०२<br>पुर्नविनियोजन- -१,५७,९४.४१ | २,१७,०५.६१ | २,१७,०४.५४ | -१.०७ |

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ८०० इतर खर्च<br>८००(०१)(०१) मानव विकास निर्देशांकात वाढ करणे अनुसूचित जाती, उप योजना<br>पूरक- ५०,००.००<br>पुर्नविनियोजन- -१२,५०.०० | ३७,५०.०० | ३७,५०.०० | --- |

**टिपा व भाष्य :**

(एक) नगर परिषदांच्या, त्याचप्रमाणे ग्रामपंचायत व जिल्हा परिषदांच्या निवडणुकांमुळे अंमलात असलेली आचार संहिता यामुळे आणि (दोन) ही योजना राबविण्यात अपुरा असलेला कर्मचारी / अधिकारीवर्ग इत्यादींमुळे आणि (तीन) ही योजना अंमलात आणण्यामध्ये म्हणजेच एप्रिल २०११ ऐवजी सप्टेंबर २०११ पासून ५ महिन्यांच्या झालेल्या विलंबामुळे मार्च-२०१२ मध्ये रु. १७०४४.४१ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| २०५३, जिल्हा प्रशासन,<br>०९३,- जिल्हा आस्थापना<br>०९३(०४)(०२) मानव विकास कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी इमारतींचे बांधकाम<br>पूरक- ८२,५०.०० | ८२,५०.०० | ६९,६३.२५ | -१२,८६.७५ |

**टिपा व भाष्य :**

रु. १२८६.७५ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे मागवूनसुद्धा कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २०१२).

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर बचत मुख्यत्वे सर्व योजना सर्वच जिल्ह्यात समानतेने लागू होत नसल्यामुळे तसेच कार्यक्रम उशिरा सुरु झाल्यामुळे झाली आहे. (सप्टेंबर, २०११ पासून)

महालेखापालांचे अभिप्राय : No remarks

व त्या अनुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही/अभिप्राय : निरंक

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-१२ मध्ये मानव विकास मिशन अंतर्गत अंगणवाडी इमारतींच्या बांधकामासाठी केंद्र शासनाकडून 'एकवेळ केंद्रीय अर्थसहाय्यापोटी' रुपये ८२.५० कोटी निधी मंजूर केला होता. त्यानुसार अंगणवाडी केंद्रे राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत असल्यामुळे नियोजन विभागाने सदर निधी रुपये ८२.५० कोटी महिला व बालकल्याण विभागास खर्च करण्यास दिनांक १५ डिसेंबर २०११ रोजी मान्यता दिली. त्यापैकी प्रथम रुपये ६९.६३ कोटी इतका निधी (बी.डी.एस.द्वारे) डिसेंबर, २०११ मध्ये उपलब्ध करून देऊन उर्वरित रुपये १२.८७ कोटी बी.डी.एस. द्वारे दिनांक ३१ मार्च २०१२ रोजी उपलब्ध करुन दिला होता. तथापि बी.डी.एस.द्वारे दिनांक ३१ मार्च २०१२ रोजी उपलब्ध करून दिलेला निधी प्रत्यक्षात आहरित करतांना तांत्रिक अडचणी उद्‌भवल्यामुळे आहरित होऊ शकला नाही.

वरील निधी मागणी क्रमांक O-१ खाली अर्थसंकल्पित करून उपलब्ध करून दिला असल्यामुळे महिला व बालकल्याण विभागाने वेळीच समर्पित करणे आवश्यक होता. तथापि सदर विभागाने मार्च, २०१४ मध्ये नियोजन विभागास कळविले आहे. त्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करण्याचे त्या विभागास कळविण्यात येत असून सदर निधी रुपये १२.८७ कोटी इतका निधी कोषागारातून प्रत्यक्ष आहरित न झाल्यामुळे तसेच संबंधित विभागाकडून सन २०१४ मध्ये कळविण्यात आल्यामुळे समर्पित आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत.

**महालेखापालांचे अभिप्राय :**

Specific reasons stated in the Explanatory Memorandum for not surrendering the saving of Rs. 12.87 crore may be incorporated in the reply to the PAC.

व त्या अनुषंगाने केलेली कार्यवाही/अभिप्राय :-

विभागाचे स्पष्टीकरण वरीलप्रमाणे असून पीएसीसमोर मांडण्यात येईल.

**अनुदान क्रमांक ओ-७ सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा**

**(रुपये लाखांत)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ३४५१, सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा<br>दत्तमत-<br>मूळ १,१३,५८,२८<br>पूरक १,२२,९७ | १,१४,८१,२५ | ७८,८१,३६ | -३५,९९,८९ |
| वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २०१२) | | | ३६.१३.३४ |
| भारित -<br>मूळ ३,१०,०२<br>पूरक ...... | ३,१०,०२ | २,६७,५० | -४२,५२ |
| वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च, २०१२) | | | १५,२५ |

**टिपा व भाष्ये :**

मूळ तरतुदी इतकाही खर्च करण्यात आला नाही. या वर्षामध्ये प्राप्त झालेली रु. १२२.९४ लाखाची पूरक तरतूद अनावश्यक सिद्ध झाली.

अनुदानातील रु. ३५९९.८९ लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता, परत केलेला रु. ३६१३.३४ लाख इतका निधी अत्याधिक असल्याचे सिद्ध झाला अनुदानातील बचत पुढील शीर्षाखाली झाली.

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालाचे अभिप्राय : व त्याअनुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही/अभिप्राय :

**(रु.लाखांत)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ३४५१,सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा ०९०-सेक्रेटरिएट ०९० (०१) (०१) नियोजन विभाग<br>मूळ ८२५.८३<br>पूर्नविनियोजन -७६.०८ | ७,४९.७५ | ७,४६.९० | -२.८५ |

**टिपा व भाष्ये :**

निरंक

**ज्ञापन :**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**अभिप्राय :**

सन २०११-१२ साठी ३४५१०१८२-०९०-०९० (०१) (०१) नियोजन विभाग या मुख्य लेखाशीर्षाखाली रु. ८२५.८३ लाख एवढी मूळ अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली होती. सदर लेखाशीर्षाखाली शासन ज्ञापन नियोजन विभाग क्र. पुर्ननि २०१२/ प्र. क्र. ३७/ का १४२४, दि. ३१/३/२०१२ अन्वये पुर्नविनियोजनाने रु. ३.७५ लाख कोटी अधिक रक्कम उपलब्ध करून दिल्याने सन २०११-१२ साठी एकूण तरतूद रु.८२९.५८ लाख एवढी झाली. त्यापैकी अंतिम खर्च (FMG) रु.७४९.७५ लाख एवढा झालेला आहे. उर्वरित रु. ७९.८३ लाख निधी प्रत्यार्पित करण्यात आलेला आहे. आदेश क्र. एफएमजी २०१२/ प्र. क्र. ४६/१४२४, दिनांक ३१.३.२०१२ अन्वये अंतिम प्रत्यार्पित तरतूद महालेखापाल, मुंबई यांना कळविण्यात आली आहे.

विनियोजन लेखाच्या परिच्छेदामध्ये दर्शविण्यात आलेली अंतिम सुधारित तरतूद ७,४९,७५ लाख एवढी दाखविली असून प्रत्यक्ष खर्च रु. ७,४६.९० लाख एवढा दर्शविला आहे. व त्या अनुषंगाने २.८५ लाख एवढी बचत दाखविलेली आहे. विनियोजन लेख्यामध्ये दर्शविलेला खर्च हा प्रत्यक्ष महालेखापालांकडे नोंदविलेला खर्च आहे व सदर खर्चाचा ताळमेळ घातलेला असून तो विभागाच्या खर्चाशी जुळलेला आहे.

अंतिम फेरबदल केलेल्या तरतुदीचे आदेश काढताना कळविलेला खर्च हा अर्थसंकल्पीय प्रणालीवरून (BEAMS) वरून घेतलेला आहे. यास्तव खर्च अधिक दिसत असल्याने रु. २.८५ लाखांची बचत दिसून येते. प्रत्यक्षात अशी बचत झालेली नाही.

**महालेखापालाचे अभिप्राय**

In Appropriation Account include both re-appropriation and surrender. Under the said sub-head Rs. (-) 79.83 lakh surrendered and Rs. + 3.75 lakh of additional provision there by final figure of Rs. (-) 76.08 lakh is exhibited. Department has stated in Explanatory Memorandum the FMG is confirmed. However, there is difference in FMG and also in expenditure figure stated by the Department when compared with Appropriation account the reason for difference is due to non-confirmation of FMG and non-reconcilliation of expenditure with the A.G. (A & E) – I, Mumbai. the reason for not carrying out the prescribed procedure may be explainded in PAC.

**(रुपये लाखांत)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (अ) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ३४५१, सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा<br>१०१ नियोजन आयोग/नियोजन मंडळ<br>१०१ (००) (०१) राज्य नियोजन मंडळ<br>मूळ १,००.६०<br>पूरक ९७.४४<br>पूनर्विनियोजन -९२.९३ | १,०५.११ | १,०५.०४ | -०.०७ |

**टिपा व भाष्ये :-**

निश्चित अंशदान निवृत्ती वेतन योजनांतर्गत ६ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या प्रदानासाठी असलेली देयके सादर करयात न आल्यामुळे आणि रिक्त पदे त्याचप्रमाणे आर्थिक उपाययोजना यामुळे वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च, २०१२ मध्ये रु. १६९.०१ लाख इतका निधी पुनर्विनियोजन/प्रत्यर्पण याद्वारे काढण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राज्य नियोजन मंडळाच्या वेतन, भत्ते, प्रवास खर्च, कार्यालयीन खर्च यावरील खर्चासाठी या उपलेखाशीर्षाखाली तरतूद केली आहे.

राज्य नियोजन मंडळावर तज्ञ व्यक्ती तसेच कर्मचारी वर्गाच्या नियुक्त्या अपेक्षित असल्याने जुलै, २०११ मध्ये पुरवणी तरतूद देखील प्राप्त करून घेण्यात आली. तथापि, तज्ज्ञ व्यक्तीच्या नेमणुका न होणे, कर्मचारी/अधिकाऱ्यांची पदे न भरणे व काटकसरीच्या उपाययोजना या कारणांमुळे रु. ९२.९३ लक्ष तरतूद प्रत्यार्पित करून पुनर्विनियोजित करण्यात आली.

प्रत्यक्ष आवश्यकतेनुसार ठेवलेल्या रु.१०५.११ लक्षच्या तुलनेत रु.१०५.०४ लक्ष खर्च करण्यात आला आहे. रु.०.०७ लक्षची बचत अत्यल्प म्हणून क्षमापित करण्यात यावी.

**(रु.लाखांत)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (अ) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ३४५१, सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा<br>०९० (०१) (०३)<br>नियोजन विभाग (योजनांतर्गत)<br>(३४५१ ०५०२)<br><br>मूळ अनुदान ५०.००<br>पूर्नविनियोजन -२८.८३ | २१.१७ | २०.८० | -०.३७ |

**टिपा व भाष्ये :**

मुख्यत्वेकरुन, (एक) ३१ मार्च २०१२ पर्यंत संगणकाच्या खरेदीसाठी त्याचप्रमाणे नुतनीकरणाच्या कामासाठीची कार्यवाही अपूर्ण राहिल्यामुळे मार्च, २०१२ मध्ये प्रत्यर्पण/पुनर्विनियोजन यांद्वारे रु.२८.८३ लाखांची निधी काढण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

दिनांक ३१ मार्च, २०१२ पर्यंत संगणकाच्या खरेदीसाठी त्याचप्रमाणे नुतनीकरणाच्या कामासाठीची कार्यवाही अपूर्ण राहिल्यामुळे रु. २८.८३ लाखांचा निधी प्रत्यार्पित करण्यात आला आहे.

तथापि, उपलब्ध तरतूद रु. २१.१७ लाख पैकी रु. ०.३७ लाख इतकी रक्कम शिल्लक राहिली. उपलब्ध तरतुदीच्या तुलनेत झालेली बचत ही १.७५% असल्याने क्षमापित करण्याची विनंती करण्यात यावी.

**(रु.लाखांत)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ३४५१, सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा<br>०९० सेक्रेटरिएट ०९० (०४) (०१)<br>विशेष नियुक्त कार्यालय<br>मूळ अनुदान २०००.००<br>पूर्नविनियोजन -११९३.०७ | ८०६.९३ | ८०६.९३ | ---- |

**टिपा व भाष्ये :**

जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रस्ताव न आल्यामुळे, मार्च २०१२ मध्ये रु.११९३.०७ लाख इतका निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापाल कार्यालयाने यावर 'No Remarks' असे अभिप्राय दिले आहेत. सदर स्पष्टीकरण महालेखापाल कार्यालयाने अनौ, संदर्भ क्र. लेखापरीक्षा/एएडब्ल्यु/अशासकीयसंदर्भ/नि.वि./०७,९/३४५१, ३४५४/२०११-१२/UOR-७६/O.W.No.२१०, दिनांक ३१ जुलै २०१३ अन्वये संमत केले आहे.

**(रु.लाखांत)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ३४५१, सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा<br>०९० सेक्रेटरिएट ०९० (०१) (०६)<br>महाराष्ट्र योजनांतर्गत योजना माहिती व्यवस्थापन पद्धती<br>मूळ अनुदान १००.००<br>पूर्नविनियोजन -५३.८८ | ४६.१२ | ४६.१२ | ---- |

**टिपा व भाष्ये :**

राज्य योजना माहिती व्यवस्थापन पध्दतवर कमी खर्च झाल्यामुळे मार्च, २०१२ मध्ये रु. ५३.८८ लाख इतका निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापाल कार्यालयाने यावर 'No Remarks' असे अभिप्राय दिले आहेत. सदर स्पष्टीकरण महालेखापाल कार्यालयाने अनौ, संदर्भ क्र. लेखापरीक्षा/एएडब्ल्यु/ अशासकीयसंदर्भ/ नि.वि./०-७,९/३४५१,३४५४/ २०११-१२/UOR-७६/O.W.No. २१०, दिनांक ३१ जुलै २०१३ अन्वये संमत केले आहे.

**(रु.लाखांत)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (अ) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ३४५१, सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा<br>०९० (०१) (०८)<br>प्रस्तावित सार्वजनिक खासगी भागीदारी प्रकल्पाकरिता व्यावहारीक सल्लागार यांच्या खर्चाची प्रतिपूर्ती<br>मूळ अनुदान १,००.००<br>पूनर्विनियोजन -१,००.०० | ---- | ---- | ---- |

**टिपा व भाष्ये :**

प्रशासकीय विभागाकडून PPP अंतर्गत प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे व्यवहार सल्लागारांची नेमणुक करण्यत आली नाही. यास्तव सन २०११-२०१२ मध्ये तरतूद केलेला रु. १०० लाख इतका संर्पूण निधी मार्च २०१२ मध्ये परत करण्यात आला.

**ज्ञापन :**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

प्रशासकीय विभागाकडून ppp अंतर्गत प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे व्यवहार सल्लागारांची नेमणुक करण्यात आली नाही. यास्तव सन २०१०-२०१२ मध्ये तरतूद केलेला रु. १०० लाख इतका संपूर्ण निधी मार्च २०१२ मध्ये परत करण्यात आला.

**(रु.लाखांत)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ३४५१, सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा<br>०९० सेक्रेटरिएट ०९० (०४) (०२)<br>नक्षलग्रस्त जिल्ह्यांसाठी एकात्मिक कृती योजना (केंद्र पुरस्कृत योजना)<br>मूळ अनुदान ६०००.००<br>पूनर्विनियोजन -२०००.०० | ४०,००.०० | ४०,००.०० | ----- |

**टिपा व भाष्ये :**

केंद्र सरकारकडून वेळेत निधी देण्याची माहिती प्राप्त न झाल्यामुळे माहे मार्च २०१२ मध्ये रु. २००० लाख इतका निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.-

महालेखापाल कार्यालयाने यावर ‘No Remarks’ असे अभिप्राय दिले आहेत. सदर स्पष्टीकरण महालेखापाल कार्यालयाने अनौ, संदर्भ क्र. लेखापरीक्षा/एएडब्ल्यु/अशासकीयसंदर्भ/नि.वि./ ०-७,९/३४५१,३४५४/२०११-१२/UOR-७६/O.W.No.२१०, दिनांक ३१.०७.२०१३ अन्वये संमत केले आहे.

**(रु.लाखांत)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ३४५१, सेक्रेटरीएट-आर्थिक सेवा<br>०९० (०१) (१०) नियोजन विभाग (योजनांतर्गत)<br>(३४५१ २७७३) ई-गव्हर्नन्स कार्यक्रमाची अंमलबजावणी.<br>पूरक - १०.००<br>पुनर्विनियोजन -१०.०० | ----- | ----- | ----- |

**टिपा व भाष्य :-** इतर शिर्षाकडून झालेला संगणकावरील खर्च त्याचप्रमाणे त्यावर चालू असलेला संगणकावरील खर्च त्याचप्रमाणे त्यावर चालू असलेला खर्च यासाठी धोरण आखण्यात न आल्यामुळे मार्च २०१२ मध्ये रु. १० लाख इतका संपूर्ण निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

**महालेखापरिक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर निधीतून कोणता खर्च करावा याबाबत निश्चित धोरण ठरविण्यात आलेले नसल्याने तसेच संगणकाकरिताचा खर्च इतर लेखाशिर्षातून भागविला गेला असल्याने सदर संपूर्ण निधी परत करण्यात आला.

**महालेखापालांचे अभिप्राय Reason for surreder of funds may be incorporated in the reply to PAC No.लेखापरीक्षा /एफ.ए.ए.टी. अशासकीय संदर्भ/ नि.वि.ओ-७/३४५१/२०११-१२/UOR-४४४ जावक क्र.५२३ दिनांक ०८/०१/२०१६.**

माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने ई-गव्हर्नन्सच्या संदर्भात सर्व मंत्रालयीन विभागांना प्रत्येकी रु.१० लाख प्रमाणे उपलब्ध करुन दिले होते. तथापी खर्चाबाबत मा. व. तं. संचालनालयाचे सुस्पष्ट आदेश नसल्यामुळे सदर निधी खर्च होऊ शकला नाही.

**(रु.लाखांत)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ३४५१, सेक्रेटरीएट-आर्थिक सेवा<br>१०१-नियोजन आयोग/नियोजन मंडळ<br>१०१ (०३) (०१) जिल्हा नियोजन समिती पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना<br>मूळ ५३५.००<br>पुनर्विनियोजन -४२.६९ | ४९२.३१ | ४९४.८६ | + २.५५ |

**टिपा व भाष्य :-** रिक्त पदांची भरती करण्यात न आल्यामुळे मार्च, २०१२ मध्ये रु. ४२.६९ लाख निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहेः--

या लेखाशीर्षा अंतर्गत मूळ तरतूद रु.५३५.०० लाख इतकी होती. शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र.जिवायो-१००७/प्र.क्र.२९/ का १४४४, दिनांक १४ मे, २००८ अन्वये निर्माण करण्यात आलेली ९१ नवनिर्मित पदांवरील खर्चासाठी तसेच जिल्हा नियोजन समिती कार्यालयांसाठी जुन्या निम्नलिखित झालेल्या वाहनांबदली नवीन वाहने खरेदी करण्यासाठी यासाठी सदरची तरतूद करण्यात आली होती. जिल्ह्यांकडून प्राप्त माहितीच्या आधारे होत असलेली बचत रु.४२.६९ लाख मार्च, २०११ अखेर समर्पित करण्यात आली. परंतु, या लेखाशीर्षाखाली एकूण रु. ४९६.८६ इतका निधी खर्च झाल्याने, वेतन व भत्त्यांसाठी रु. २.५५ लक्ष इतका अधिक खर्च झालेला आहे.

मात्र सदरचा अधिक खर्च मूळ तरतुदींच्या ५% पेक्षा कमी असल्याने सदरचा परिच्छेद वगळण्यात यावा.

**महालेखापालांचे अभिप्राय,**

The difference in the expenditure booked as per the Appropriation Accounts and that of the department should have been setright by carrying out timely reconcilation and by proposing NOE to A.G. (A & E) office. the reason for non reconclation and non Proposal of TE/ NOE may be explained in PAC.

महालेखापाल कार्यालयातील ताळमेळाच्या बैठकीपर्यंत जिल्ह्यांकडून सदर लेखाशीर्षांतर्गत केलेल्या खर्चाचे प्रत्यक्ष आकडे प्राप्त न झाल्यामुळे BDS प्रणालीवरील खर्चाचे आकडे विचारात घेण्यात आल्याने त्यावेळी खर्चाचा ताळमेळ होऊ शकला नाही परिणामी महालेखापांकडील विनियोजन लेख्यातील खर्चाच्या नोंदी व विभागाच्या प्रत्यक्ष खर्च यात तफावत दिसते. सदर खुलासा लोकलेखा समितीसमोर करावा लागणार आहे.

**(रु.लाखांत)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ३४५१, सेक्रेटरीएट-आर्थिक सेवा<br>०९० (०३) (०१) संवैधानिक विकास मंडळे / योजना<br>मूळ ३,१०.००<br>पुनर्विनियोजन -१५.२३ | २,९४.७७ | २,६७.५० | -२७.२७ |

**टिपा व भाष्य :-** सभापतींनी कालावधी पूर्ण केल्यामुळे दौऱ्यांवरील खर्च कमी झाल्याने आणि काटकसरीचे उपाय यामुळे मार्च, २०१२ मध्ये परत केलेला रु. १५.२३ लाख एवढा निधी रु. २७.२७ लाख इतका अंतिम बचत लक्षात घेता, अपुरा सल्याचे सिध्द झाले. त्याबाबतची कारणे, मागवूनही कळविण्यात आलेली नाहीत.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**विकास** मंडळांच्या अध्यक्षांचा कार्यकाल पूर्ण झाल्यामुळे दौऱ्यांवरील खर्चात घट आणि काटकसरीचे उपाय यामुळे रु. २७.२७ लक्ष इतकी बचत झाली आहे.

महालेखापालांचे अभिप्राय : Reasons for saving may be incorporate in the reply to PAC. व त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही.

स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात बचतीची कारणे अंतर्भूत करण्यात आली आहेत.

## अनुदान क्रमांक ओं-८ पर्यटन

(रु.हजारात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ३४५२, पर्यटन<br>दत्तमत-<br>मूळ १,६९,८९.८७<br>पूरक १२,८९,८७<br>वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च, २०१२) | १,८१,८९,८७ | १,४४,९५,७१ | -३६,९४,१६<br><br>३७,०२,७९ |

**टिपा व भाष्ये :-**

मूळ तरतूद इतकाही खर्च झाला नाही. या वर्षामध्ये प्राप्त करण्यात आलेली रु. १२८९.८७ लाख इतकी पूरक तरतूद रु. ३६९४.१६ लाख इतक्या अंतिम बचतीच्या दृष्टीने अनावश्यक सिध्द झाली आणि रु. ३७०२.७९ लाख इतका परत केलेला निधी अत्याधिक असल्याचे सिद्ध झाले.

**ज्ञापन :-**

**महालेखापरिक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे:--
अभिप्राय उपशिर्षनिहाय सोबत जोडले आहे.

(रु. लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ३४५२, पर्यटन<br>०१, पर्यटकांना पायाभूत सोयी<br>१०१, पर्यटक केंद्र<br>१०१,(००)(०१) श्रीक्षेत्र देहू, आळंदी, भंडारा डोंगर व पालखीतळ विकास विशेष कृती कार्यक्रम.<br>मूळ ८५,००.००<br>पुनर्विनियोजन -१२,७२.६० | ७२,२७.४० | ७२,२७.८५ | + ०.४५ |

**टिपा व भाष्ये :-** अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे देण्यात आलेला निधी मर्यादेच्या आत खर्च झाल्यामुळे वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च, २०११ मध्ये रु. २५२२.२६ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ३४५२ ,पर्यटन<br>०१, पर्यटकांना पायाभूत सोयी<br>१०१, पर्यटक केंद्रे<br>१०१, (००)(०२) राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज, गुरुकुंज आश्रम अमरावती, विकास विशेष कृती कार्यक्रम.<br>मूळ २५,००.००<br>पुनर्विनियोजन -३,७४.२५ | २१,२५.७५ | २१,२९.६८ | (+) ३.९३ |

**टिपा व भाष्य :-**

अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे देण्यात आलेला निधी मर्यादेच्या आत खर्च झाल्यामुळे वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च, २०११ मध्ये रु. २५२२.२६ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

**महालेखापरिक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे:-

आर्थिक उपाययोजना केल्याने रु. १२,७२.६० लाख एवढा निधी परत करण्यात आलेला आहे. मूळ तरतूदीच्या तुलनेत झालेला अधिकचा खर्च रु. ०.४५ लाख हा केवळ ०.००५% असल्याने तो क्षमापित करण्याची विनंती करण्यात येत आहे.

**विभागाने केलेली कार्यवाही / अभिप्राय :-**

**अधिकच्या खर्चाची कारणे स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद करण्यात आली आहे.**

**(रु. लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ३४५२, पर्यटन<br>०१, पर्यटकांना पायाभूत सोयी<br>१०१, पर्यटक केंद्र<br>१०१,(००)(०२) राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज, गुरुकुंज आश्रम अमरावती, विकास विशेष कृती कार्यक्रम.<br>मूळ २५,००.००<br>पुनर्विनियोजन -३,७४.२५ | २१,२५.७५ | २१,२९.६८ | (+) ३.९३ |

**टिपा व भाष्ये:-**

अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे देण्यात आलेला निधी मर्यादेच्या आत खर्च झाल्यामुळे वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च, २०११ मध्ये रु. २५२२.२६ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

आर्थिक उपायोजना केल्याने रु. ३,७४.२५ लाख एवढा निधी परत करण्यात आलेला आहे. मूळ तरतूदीच्या तुलनेत झालेला अधिकचा खर्च रु.३.९३ लाख हो केवळ ०.१५% असल्याने तो क्षमापित करण्याची विनंती करण्यात येत आहे.

**अधिकच्या खर्चाची कारणे स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद करण्यात आली आहे.**

(**रु.** लाखात)

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ३४५२, पर्यटन<br>०१, पर्यटकांना पायाभूत सोयी<br>१०१, पर्यटक केंद्र<br>१०१,(००)(०३) श्री गजानन महाराज, शेगाव तीर्थक्षेत्र विकास विशेष कृती कार्यक्रम.<br>मूळ ५५,००.००<br>पुर्नविनियोजन -८,२५.४१ | ४६,७४.५९ | ४६,७८.९४ | (+) ४.३५ |

**टिप व भाष्ये :-**

अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे देण्यात आलेला निधी मर्यादेच्या आत खर्च झाल्यामुळे वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च, २०११ मध्ये रु. २५२२.२६ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अर्थिक उपायोजना केल्याने रु. ८,२५.४१ लाख एवढा निधी परत करण्यात आलेला आहे. मूळ तरतूदीच्या तुलनेत झालेला अधिकचा खर्च रु. ४.३५ लाख हा केवळ ०.०८% आल्याने तो क्षमापित करण्याची विनंती करण्यात येत आहे.

अधिकच्या खर्चाची कारणे स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद करण्यात आली आहे.

(रु. लाखात)

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| पृष्ठ क्रमांक ३९४<br>मागणी क्रमांक ओ-८<br>३४५२, पर्यटन<br>०१, पर्यटकांना पायाभूत सोयी<br>१०१, पर्यटक केंद्र<br>१०१,(००)(०५) श्रीक्षेत्र परशुराम कुंड कार्यक्रम.<br>मूळ २,००.००<br>पुर्नविनियोजन -५०.०० | १,५०.०० | १,५०.०० | -- |

**टिप व भाष्ये :-**

अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे देण्यात आलेला निधी मर्यादेच्या आत खर्च झाल्यामुळे वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च, २०११ मध्ये रु. २५२२.२६ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

**महालेखापरिक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.:-

**आर्थिक** उपाययोजना केल्याने रु. ५०.०० लाख एवढा निधी परत करण्यात आला आहे.

(रु. लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ३४५२, पर्यटन<br>०१, पर्यटकांना पायाभूत सोयी<br>१०१, पर्यटक केंद्र<br>१०१,(००)(०५) श्रीक्षेत्र परशुराम कुंड कार्यक्रम.<br>मूळ २,००.००<br>पुनर्विनियोजन -५०.०० | १,५०.०० | १,५०.०० | -- |

**टिपा व भाष्ये :-**

अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरित केलेला निधी मर्यादेच्या आत खर्च झाल्यामुळे आणि स्थानिक लोकांच्या क्षोभामुळे, तात्पुरत्या रस्त्यांच्या बांधकामांना प्रारंभ होऊ शकला नसल्याने मार्च, २०१२ मध्ये १८०.५३ लाख निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

**महालेखापरिक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे:-

आर्थिक उपाययोजना केल्याने रु. ५०.०० लाख एवढा निधी परत करण्यात आला आहे.

(रु. लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ३४५२, पर्यटन<br>०१, पर्यटकांना पायाभूत सोयी<br>१०१, पर्यटक केंद्र<br>१०१,(००)(०४) श्रीक्षेत्र जेजूरी तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम.<br>मूळ २,००.००<br>पूरक २,८९.००<br>पुनर्विनियोजन -१.८०.५३ | ३,०९.३४ | ३,०९.२४ | (-) ०.१० |

**टिपा व भाष्ये :-**

अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत केलेला निधी मर्यादेच्या आत खर्च झाल्यामुळे आणि स्थानिक लोकांच्या क्षोभामुळे, तात्पुरत्या रस्त्यांच्या बांधकामांना प्रारंभ होऊ शकला नसल्याने मार्च, २०१२ मध्ये १८०.५३ लाख निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

**महालेखापरिक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे:-

आर्थिक उपाययोजना केल्याने रुपये १,८०.५३ लाख एवढा निधी परत करण्यात आला आहे. मूळ तरतूदीच्या तुलनेत झालेली बचत रुपये ०.१० लाख ही केवळ ०.०५% असल्याने ती क्षमापित करण्याची विनंती करण्यात येत आहे.

बचतीचे कारण स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद करण्यात आले आहे.

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| मागणी क्रमांक ओ-८<br>३४५२, पर्यटन<br>०१, पर्यटकांना पायाभूत सोयी<br>१०१, पर्यटक केंद्र<br>१०१,(००)(०६) महालक्ष्मी देवस्थान विकास कार्यक्रम (कोल्हापूर)<br>पूरक १०,००.००<br>पुनर्विनियोजन -१०,००.०० | -- | -- | -- |

**टिपा व भाष्ये :-** जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडून नकाशे व अंदाज न मिळाल्यामुळे प्रशासकीय मान्यता देण्यात आली नाही त्यामुळे मार्च, २०१२ मध्ये रु.१००० लाख एवढी संपूर्ण तरतूद परत करण्यात आली.

**ज्ञापन :-**

**महालेखापरिक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे:-

कोल्हापूर येथे महालक्ष्मी शक्तीपीठाच्या ठिकाणी सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रुपये १०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येईल असे मा.उप मुख्यमंत्री, वित्त यांनी सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये घोषित केले होते. त्याअनुषंगाने सन २०११-१२ मध्ये पूरक मागणीन्वये रुपये १०.०० कोटीची तरतूद ठेवण्यात आली होती. तथापि, जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे विकास आराखडा प्राप्त न झाल्याने रुपये १०.०० कोटी एवढा निधी परत करण्यात आलेला आहे.

## अनुदान क्रमांक ओ-१० इतर ग्रामविकास कार्यक्रमांवरील भांडवली खर्च

(रु.हजारात)

| शीर्ष | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| ४५१५, इतर ग्रामविकास कार्यक्रमांवरील भांडवली खर्च<br>दत्तमत-<br>मूळ .. ३१,७९,८२,६६<br>पूरक .. २,३४,०५,१३<br>वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च, २०१२) | ३४,१३,८७,७९ | ७,७०,४८,६६ | -२६,४३,३९,१३<br>२६,२७,१८,२० |

**टिपा व भाष्ये :-**

**मूळ** तरतुदी इतका देखील खर्च झाला नाही. वर्षभरात मिळालेली रु २३४०५.१३ लाख इतकी मूळ तरतूद अनावश्यक असल्याचे सिद्ध झाले.

२. अनुदानातील बचत खालील शीर्षाखाली झाली.

**ज्ञापन :-**

**महालेखापरिक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे:-

उपशिर्षनिहाय सोबत जोडले आहे.

(रु.लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| ४५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च<br>१०२, सामूहिक विकास<br>१०२ (०१)(४१), पापल,जिल्हा अमरावती, विकास योजना<br>पूरक ५००.००<br>पुर्नविनियोजन -२७५.०१ | २२४.९९ | २२४.९९ | ------ |

**टिपा व भाष्ये :-**

वर्षाच्या अखेरीस कामाची सुरुवात केल्यामुळे आणि प्रशासकीय मान्यता मिळाली होती तरी ही ५ कामांसाठी जमिनीची अनुपलब्धता यामुळे मार्च २०१२ मध्ये रु.२७५.०१ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

**महालेखापरिक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे:-

सदर कामासाठी दिनांक ८.११.२०११ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सन २०११-१२ या वर्षासाठी रु.५००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित करण्यात आला होता. तथापि वर्षाच्या अखेरीस कामाची सुरूवात केल्यामुळे आणि ५ कामांसाठी जमीन उपलब्ध न झाल्यामुळे मार्च, २०१२ मध्ये रु.२७५.०१ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

**महालेखापालांचे अभिप्राय :- 'No Remarks'**

**त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही/अभिप्राय :-** निरंक

| **शीर्ष** | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| ४५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च<br>१०२, सामूहिक विकास<br>१०२ (४१) तेराव्या वित्त आयोगाअंतर्गत जिल्हा अभिनव योजना<br>मूळ ७००.००<br>पुर्नविनियोजन -७००.०० | --- | ---- | --- |

**टिपा/ भाष्य :-**

या योजने अंतर्गत मार्गदर्शक सूचना निश्चित न केल्यामुळे आणि जिल्ह्यांकडून ५ वर्षांसाठीच्या कामांचे अंदाज प्राप्त न झाल्याने मार्च, २०१२ मध्ये रुपये ७००.०० लाख एवढा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

**महालेखापरिक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे:-

तेराव्या वित्त आयोगा अंतर्गत नाविन्यपूर्ण योजनांसाठी केंद्र शासनाकडून सन २०११-१२ पासून दरवर्षी रुपये ७००.०० लाख या प्रमाणे ५ वर्षांसाठी रुपये ३५००.०० लाख देण्यात येणार होते. त्यामुळे सन २०११-१२ मध्ये सदर योजनेसाठी रुपये ७००.०० लाख इतकी तरतूद करण्यात आली होती. परंतू, केंद्र शासनाच्या सूचनेनुसार सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचा शासन निर्णय निर्गमित झाला नसल्याने आणि जिल्ह्यांकडून नाविन्यपूर्ण योजनांबाबतचे प्रस्ताव प्राप्त न झाल्याने मार्च, २०१२ अखेर सदर तरतूद समार्पित करण्यात आली.

महालेखापालांचे अभिप्राय : **No Remarks**

**विभागाने केलेली कार्यवाही/अभिप्राय**

(रुपये लाखात)

| **शीर्ष** | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| १०२, सामूहिक विकास<br>१०२ (००)(०१), आमदाराचा स्थानिक विकास कार्यक्रम<br>मूळ : ५,८२,८६,९८<br>पूरक : २,२२,०५.१२<br>पुर्नविनियोजन : -७६,६७.८० | ७,२८,२४.३० | ७,३०,१३.४१ | +१,८९.११ |

विधानपरिषद आणि विधानसभेच्या सभासदांना वाटप केलेल्या निधीमध्ये अचानक वाढ केल्यामुळे तेथे पूरक मागणी करण्यात आली. तरीही रु.७६,६७.८० लाख एवढ्या निधीचे प्रत्यार्पण/पुर्नविनियोजन झाले. म्हणून प्रस्ताव वेळेत प्राप्त झाले नाहीत आणि जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजित करण्यास विलंब झाला.

**टिपा व भाष्ये :-** रु.१८९.११ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१२)

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहेः--

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात प्रती विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, प्रतीवर्ष रुपये १.५० कोटी निधी अनुज्ञेय होता. सदर निधीत वाढ करुन दिनांक १३ मे २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सन २०११-१२ या आर्थिक वर्षात प्रती आमदार प्रती वर्ष रुपये २.०० कोटी निधी अनुज्ञेय करण्यात आला. याप्रमाणे निधीत एकदम वाढ झाल्याने जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव वेळेत प्राप्त न झाल्याने पुरेशी कामे मंजूर होऊ शकली नाहीत. परिणामी प्रथम निधी समर्पित करण्यात आला. तदनंतर मंजूर कामांसाठी निधी आवश्यक असल्याचे लक्षात आल्याने तो आहरित करण्यात आला. त्यामुळे अधिक खर्च झाल्याचे दिसून येत आहे. तथापि, सदर अधिक खर्च मूळ तरतुदीच्या मर्यादेतच असून एकूण तरतुदीच्या ०.२६% म्हणजे ०.५% पेक्षाही कमी असल्याने क्षमापित करण्यात यावा.

महालेखापालांचे अभिप्राय :- Reasons for excess may be incorporated in the reply to PAC. व त्या अनुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही/अभिप्राय :- अधिक खर्चाची कारणे वर नमूद केलेली आहेत.

(रुपये लाखात)

| शिर्ष | एकूण अनुदान किंवा विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| ४५१५, इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च<br>१०२ (००)(०२), संवैधानिक विकास मंडळाच्या क्षेत्रांतर्गत विकास कार्यक्रम<br>मूळ : ५०,००.००<br>पुर्नविनियोजन : (-)२०.००.०० | ३०,००.०० | १२.७२.०४ | -१७,२७.९६ |

**टिपा व भाष्ये :**

कोणत्याही विशिष्ट कारणाशिवाय मार्च, २०१२ मध्ये रु.२००० लाख एवढा निधी काढण्यात आला. रु. १७२७.९६ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत.

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

१. नाशिक व कोकण पॅकेज अंतर्गत वाडीजोड रस्ते (सर्वसाधारण) योजने (४५१५ ०८१६) साठी रु. अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याने रु.२००० लाख इतक्या निधीचे पुर्नविनियोजन करण्यात आले.
२. जिल्हा यंत्रणांकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त न झाल्याने अशा प्रस्तावांकरिता निधी उपलब्ध करुन देता आला नाही. तसेच, मा.राज्यपालांच्या निदेशांनुसार विकास मंडळांनी अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी मंडळांकडून प्रस्ताव न आल्याने रु.१७,२७.९६ इतकी बचत झाली

**महालेखापाल यांचे अभिप्राय :**

Reasons for saving may be incorporated in the reply to PAC.

व त्याअनुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :

स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात बचतीची कारणे अंतर्भूत करण्यात आली आहेत.

(रुपये लाखात)

| **शिर्ष** | **एकूण अनुदान किंवा विनियोजन** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (अ) बचत (-)** |
|---|---|---|---|
| ४५१५, इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च<br>२०० (०१) (०१) अर्थसंकल्पात भांडवली नियतव्ययाची ठोक तरतूद (राज्य योजना)<br>मूळ : २५,४६,९५.६६<br>पुनर्विनियोजन : -२५,४६,९५.६६ | ---- | ---- | ---- |

मूळ अंदाजात या शीर्षाखालील अर्थसंकल्पात नसलेला भांडवली खर्च, संबंधित विभागांना त्यांच्या गरजेनुसार पूरक अनुदानाद्वारे वितरित करण्यात आला आणि म्हणून रु.२५४६९५.६६ लाख इतका निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

मागणी क्र.ओ-१०, मुख्य लेखाशीर्ष ४५१५, इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च, ८००-इतर खर्च, ८००(०१) (०१) हे लेखाशीर्ष शासनाच्या नियोजन विभागामार्फत हाताळण्यात येत नाही. वार्षिक योजना सन २०११-१२ अंतिम झाल्यानंतर अर्थसंकल्पिय अधिवेशनात इतर विभागांना ठरवून दिलेल्या नियतव्ययातील विना अर्थसंकल्पित उर्वरित नियतव्यय वित्त विभागाने मागणी क्रमांक ओ-१०, मुख्यलेखाशीर्ष ४५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च, ८००. इतर खर्च, ८००(०१)(०१) अर्थसंकल्पात न केलेल्या भांडवली नियतव्ययाची ठीक तरतूद या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित केलेला आहे.

वार्षिक योजनेसाठी निर्धारित केलेला संपूर्ण नियतव्यय अर्थसंकल्पित व्हावा, या उद्देशाने वित्त विभागाने अर्थसंकल्पित न झालेला नियतव्यय अर्थसंकल्पित केलेला आहे. त्यानंतरच्या विधिमंडळ अधिवेशनात योजनांतर्गत तरतूदींच्या पुरवणी मागण्या जसजशा अर्थसंकल्पित होतात तसतसा हा नियतव्यय कमी होत जातो. प्रशासकीय विभागांची ठोक तरतूद असल्याने विभागांनी संबंधित लेखाशिर्षाखाली निधी प्राप्त करुन घेऊन आवश्यकतेप्रमाणे खर्च केलेला आहे. प्रत्यक्षात या तरतूदीतून कोणताही खर्च करण्यात येत नाही. सबब, या लेखाशिर्षाखाली सन २०११-१२ मध्ये बचत झालेली नाही.

**महालेखापालांचे अभिप्राय :- 'No Remarks'**

महालेखापाल, मुंबई यांचा अनौपचारिक संदर्भ क्र.लेखापरीक्षा/एफ.ए.ए.ए.टी/अशासकीय संदर्भ/नि.वि./ओ-१०/४५१५/२०११-१२/यु.ओ.आर.२४१/जा.क्र.४३१, दिनांक १२ डिसेंबर २०१३ अन्वये सदर स्पष्टीकरणात्मक टिप्पणीस मान्यता घेतली आहे.

**व त्या अनुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही / अभिप्राय- 'निरंक'**

| शीर्ष | एकुण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| मागणी क्र.ओ-१०<br>४५१५, इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च,<br>१०२-सामूहिक विकास,<br>१०२ (००)(३८) वाडीजोड मार्ग<br>मूळ ०.०१<br>पुनर्विनियोजन २०,००.०० | २०,००.०१ | १८,९३.४३ | -१,०६.५८ |

**टिपा व भाष्य**

वर नमूद केलेल्या शीर्षाखाली कोणत्याही विनिर्दिष्ट कारणांशिवाय मार्च, २०१२ मध्ये रुपये २६२०.२७ लाख इतका जादा निधी पुनर्विनियोजनाद्वारे पुरविण्यात आला.

वर नमूद केलेल्या शीर्षाखालील अंतीम अधिक खर्चाची/बचतीची कारणे विचारणा करुनही कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१२).

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :----

शासनाने जाहीर केलेल्या सन २००९-१० ते २०११-१२ या ३ वर्षाच्या कोकण व नाशिक विकास पॅकेज अंतर्गत वाडीजोड रस्ते योजनेकरिता सन २०११-१२ मध्ये जिल्ह्यांच्या मागणीस अनुसरुन रु.२०००.०० लाख इतका निधी या लेखाशिर्षाखाली पुनर्विनियोजनाने उपलब्ध करुन देण्यात आला.

सदर निधी कोकण व नाशिक विभागातील जिल्ह्यांना दिनांक ६ मार्च २०१२ च्या आदेशान्वये वितरित करण्यात आला होता. मात्र, रायगड जिल्ह्यास वितरित केलेल्या रुपये ५.०० कोटी निधीपैकी रुपये १०६.५८ लक्ष इतका निधी, वाडीजोड रस्ते योजनेतील कामांची निविदा प्रक्रीया आर्थिक वर्ष संपण्यास थोडाच कालावधी उरल्याने मुदतीत पूर्ण होऊ शकत नसल्याने व काही कामांचे प्रस्ताव जिल्हाधिकारी, रायगड यांना प्राप्त न झाल्याने बचत होणार होता. त्यामुळे सदर बचत रुपये १०६.५८ लक्ष दिनांक ३१ मार्च २०१२ च्या आदेशान्वये शासनास प्रत्यार्पित केला आहे. (प्रत्यार्पण आदेशाच्या प्रती सोबत सादर.)

(रुपये लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| ४५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च<br>१०२ सामूहिक विकास<br>१०२ (००)(३९) आमदाराचा स्थानिक विकास कार्यक्रम (कामांची शिफारस न करता आणि २००९-१० मध्ये परिसीमनापूर्वी प्रतिनिधित्व नसल्याने व्यपगत अनुदानानुसार तरतूद)<br>मूळ ०.०१<br>पुर्नविनियोजन ५२७.५८ | ५२७.५९ | ५४२.०५ | +१४.४६ |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहेः-

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मा.आमदार महोदयांनी कामांची शिफारस केल्यानंतर काम करण्यात येते. मतदारसंघाला प्रतिनिधित्व नसल्याने शिफारशीअभावी कामे होऊ शकली नाही. त्यामुळे निधी व्यपगत झाला. त्यानंतर नव्याने प्रतिनिधित्व प्राप्त झाल्यानंतर विधानसभा सदस्यांकडून शिफारशी आल्याने पुर्नविनियोजनाने निधी उपलब्ध करुन देण्यात आला. सदर कामे पूर्ण करण्याकरिता आवश्यकतेनुसार निधी देऊन उर्वरित निधी समर्पित करण्यात आला होता. तथापि, क्षेत्रीय यंत्रणेकडून वितरित केला गेलेला अखर्चित निधी खर्च झाल्याने अतिरिक्त खर्च दिसून येतो.

महालेखापालांचे अभिप्राय :- Reasons for excess may be incorporated in the reply to PAC.

व त्या अनुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही/अभिप्राय :-

अधिक खर्चाची कारणे वर नमूद केलेली आहेत.

(रुपये लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| ४५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च<br>१०२ सामूहिक विकास<br>१०२ (००)(४०) आमदाराचा स्थानिक विकास कार्यक्रम (२००९-१०) या वर्षात पदावधी संपण्यापूर्वी ज्या आमदारांनी राजीनामा दिला त्यांनी (विधानपरिषद सदस्य) शिफारस केलेल्या कामांसाठी अतिरिक्त तरतूद)<br>मूळ ०.०१<br>पुर्नविनियोजन ९२.६९ | ९२.७० | १०२.७४ | +१०.०४ |

**टिपा व भाष्ये :**

वर नमूद केलेल्या शिर्षाखाली कोणत्याही विनिर्दिष्ट कारणांशिवाय मार्च, २०१२ मध्ये रुपये २६२०.२७ लाख इतका जादा निधी पुर्नविनियोजनाद्वारे पुरविण्यात आला. वर नमूद केलेल्या शिर्षाखाली अंतिम अधिक खर्चाची/बचतीची कारणे विचारणा करुनही कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१२)

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नियोजन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहेः-

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मा.आमदार महोदयांनी कामांची शिफारस केल्यानंतर त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येते. त्यानंतर निधी वितरण करुन काम करण्यात येते. विधानपरिषद सदस्यांनी राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या जागी आलेल्या आमदारांनी सुचविलेली कामे करण्याकरिता पुर्नविनियोजनाने निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. तरी कामे पूर्ण करण्याकरिता आवश्यकतेनुसार निधी ठेवून उर्वरित निधी समर्पित करण्यात आला. तथापि, क्षेत्रीय यंत्रणेकडून वितरित केला गेलेला अखर्चित निधी खर्च झाल्याने अतिरीक्त खर्च दिसून येतो.

महालेखापालांचे अभिप्राय :- Reasons for excess may be incorporated in the reply to PAC.

व त्या अनुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही/अभिप्राय :-

अधिक खर्चाची कारणे वर नमूद केलेली आहेत.

**साक्ष :-**

२.२ समितीने अनुदान क्र.ओ-१ "जिल्हा प्रशासन", ओ-७ "सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा", ओ-९ "पर्यटन", ओ-१० "इतर ग्रामविकास कार्यक्रमांवरील भांडवली खर्च" या संदर्भात माहिती घेण्याच्या दृष्टीने दिनांक १७ फेब्रुवारी २०१६ तसेच दिनांक २ मार्च, २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

**अनुदान क्र.ओ-१ "जिल्हा प्रशासन"**

नियोजन विभागाच्या ओ-१ परिच्छेदामध्ये महिला व बालविकास विभागाचा परिच्छेद आला असल्याने समितीने नियोजन विभाग तसेच महिला व बालविकास विभागाची संयुक्त साक्ष घेण्याबाबत एकमत झाले.

साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा प्रशासन या शिर्षांतर्गत मूळ तरतूद रुपये ३७५.१० कोटी सुद्धा खर्च झाली नसून १३२ कोटी रुपयांची पूरक तरतूद करुन घेतली असल्याने मोठ्या प्रमाणात बचत झाल्याचे दिसले. याबाबत विभागीय सचिवांनी माहिती द्यावी असे सांगितले असता विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, यामध्ये मूळ तरतूद ३७५ कोटी १० लाख रुपयांची होती. पूरक मागणी १३२ कोटी ५० लाख रुपयांची घेतली. पूरक मागणी घेण्याची दोन कारणे होती. एक कारण होते की, अनुसूचित जातीची एक नवीन योजना घेतली होती. त्यासाठी ५० कोटी रुपये घेतले. केंद्र सरकारची जी ग्रँट येते ती आंगणवाडीसाठी होती. ८२ कोटी ५० लाख रुपये घेतले. ३७५ कोटी रुपये हे मूळतः मानव विकास योजनेसाठी होते. परंतु मानव विकास योजना

वेळेवर चालू होईल अशी अपेक्षा होती. ती उशीरा म्हणजे सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये सुरु झाली. या कारणामुळे निधी पूर्ण खर्च होऊ शकला नाही. अनुसूचित जातीच्या योजनेसाठी ५० कोटी रुपये घेतले होते. त्यामध्ये ३७ कोटी ५० लाख रुपये खर्च झाले व १२ कोटी ५० लाख रुपये खर्च होऊ शकले नाही. त्यांचीही दोन तीन कारणे आहेत. पहिले कारण योजना उशीरा सुरु झाली. दुसरे कारण कर्मचारी अधिकारी वर्ग यांची संख्या परीपूर्ण नव्हती. तसेच तिसरे कारण काही ठिकाणी आचारसंहिता सुरु होती या कारणांमुळे ते पैसे खर्च होऊ शकले नाहीत. विभागाने यामध्ये सांगितले की, आचारसंहिता असल्यामुळे सप्टेंबर, २०११ पासूनच ही सर्व कामे सुरु झाली.

एप्रिल, २०११ ऐवजी सप्टेंबर, २०११ पासूनच पाच महिन्याच्या झालेल्या विलंबामुळे हे पैसे शिल्लक राहिले. योजना उशीरा सुरु केल्यामुळे पैसे शिल्लक राहिले कि आणखी काही कारण होते अशी विचारणा समितीने केली असता  योजना सुरु होण्यास उशीर झाला कारण दिलेल्या निकषानुसार १२५ तालुक्यांची निवड करावयाची होती तसेच दुसरे कारण काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संख्या ज्या प्रमाणात पाहिजे होती त्याप्रमाणात ती नव्हती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

एकूण ५० कोटी आणि ८२ कोटींची पूरक मागणी कधी घेतली ? अशी विचारणा समितीने केली असता ८२ कोटींची मागणी जुलै मध्ये घेतली होती कारण ती सेंट्रल गव्हर्मेंटची ग्रँटस् होती ही घेणे आवश्यक होते ५० कोटी रुपयांची मागणीही माहे जुलैमध्ये घेतली होती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

मानव विकास निर्देशांकामध्ये वाढ करण्याची आपली योजना आहे. त्यामध्ये अधिकारी, कर्मचा-यांची संख्या कमी असल्याचे सांगण्यात आलेले आहे. त्याबाबत काय परीस्थिती आहे ? व कर्मचारी वर्ग कमी असण्याची कारणे काय आहेत ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, त्यावेळी कर्मचारी डेप्युटेशनवर येत होते त्याप्रमाणे कर्मचारी आले नव्हते  ती एक कमतरता होती. दिनांक ३१ मार्च २०१२ मध्ये परीस्थिती वाईट होती जवळपास ९२ पदांपैकी  ८७ पदे त्यावेळी रिक्त होती. आताची परिस्थिती आहे ती जवळपास ५० टक्के पदे भरलेली आहेत.

यामध्ये ८२ कोटी ५० लाख रुपये महिला व बाल कल्याण विभागाला एकावेळी केंद्रीय अर्थ सहाय्यापोटी पैसे मिळाले. त्यामध्ये १२ कोटी ८६ लाख रुपये बी.डी.एस. वर उपलब्ध नसल्यामुळे किंवा तांत्रिक अडचणीमुळे उपलब्ध होऊ शकले नाहीत याची काय करणे आहेत त्याबाबत थोडक्यात समितीला सांगावे असे समितीने सांगितले.

शेवटला निधी वितरित केला होता त्यावेळी बी.डी.एस. प्रणाली सुरु झाली होती व स्ट्रीम लाईन होत होती. त्यामुळे कधी कधी टेक्निकल अडचणी येत होत्या. या कारणांमुळे विभाग निधी आहरित करु शकला नाही हे सर्व पैसे केंद्र सरकार राज्याला अनुदान म्हणून देत होती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१२ कोटी रुपये न मिळण्याचे कारण काय आहे ? विभागाची त्यावेळी पूर्ण ८२ कोटी रुपयांची मागणी होती. ८२ कोटी रुपयांची मागणी असतांना सुद्धा पूर्ण पैसे वितरित केले नाहीत. शेवटच्या क्षणी वितरित केले. त्यामुळे हे पैसे अखर्चीत राहिले तसेच आता याबाबतची स्थिती काय आहे ? सविस्तर चौकशी व जबाबदारी निश्चित करण्याची प्रक्रिया दोन वर्षापासून सुरु आहे. त्याची सद्य:स्थिती काय आहे ? हे कशामुळे झाले ? अशी विचारणा समितीने केली असता बी.डी.एस. टेक्निकल कारणास्तव त्यावेळी ऑपरेट झाले नाही अशी माहिती समितीस सचिव, नियोजन विभाग यांनी दिली.

महिला व बालविकास विभाग निधी काढू शकला नाही ही वस्तुस्थिती आहे. मुद्दा असा आला आहे की, नियोजन विभागाला का कळविले नाही ? ही बी.डी.एस. ऑन लाईन पद्धत आहे. विभागाने ऑन लाईन आहरित केले नाही तर त्यांना लगेच कळते की, विभागाने १२ कोटी रुपये आहरित केलेले नाहीत. मात्र जुलै किंवा ऑगस्ट, २०१२ मध्ये महिला व बालविकास विभागाने कम्युनिकेट केले त्या कम्युनिकेशनमध्ये उशीर झाला असा एक मुद्दा आला होता. आधी केले असते तर ते रिॲप्रोप्रियेट करुन दुसरीकडे वर्ग करता आले असते नियोजन विभागाचा अशा प्रकारचा मुद्दा आहे असा खुलासा नियोजन विभागाच्या सचिवांनी केला.

माहे जून महिन्याच्या आधी महिला व बालविकास विभागाने कम्युनिकेट केले असते तर रिॲप्रोप्रिएशन झाले असते असा मुद्दा आहे असे समितीने सांगितले असता दिनांक ३१ मार्चला पैसे वितरित झाले होते. या कारणामुळे रिॲप्रोप्रियेशन करणे शक्यच नव्हते असा खुलासा विभागीय सचिव, नियोजन विभाग यांनी केला.

केंद्र सरकारच्या ८२ कोटी रुपयांपैकी १२ कोटी रुपये शिल्लक राहिले ते पुढच्या वर्षामध्ये अर्थसंकल्पित करता आले का ? हा निधी महिला व बालविकास विभाग यांना देण्यात आला का अशी समितीने विचारणा केली असता शिल्लक राहिलेले १२ कोटी ते पुढच्या वर्षात अर्थसंकल्पित झाले नाहीत. ते पैसे केंद्राकडून नियोजन विभागाकडे आले व जमा झाले एकंदरीत निधीमध्ये आले त्यानंतर सन २०१२-१३ मध्ये पुन्हा वितरित झाले नाहीत.

१२ कोटी ८६ लाख रुपये या महिला बाल कल्याण विभागाला पुढच्या वर्षी देण्यात आले का ? तसेच महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी सप्टेंबर, २०१२ मध्ये माहिती दिल्याचे सांगितले असून नियोजन विभागाचे म्हणणे आहे की त्यांना सन २०१४ मध्ये कळविण्यात आले आहे या दोन तारखांमध्ये तफावत आहे त्यामुळे नेमकी कोणत्या तारखेत सत्यता आहे हे विभागाने स्पष्ट करावे. याशिवाय १२ कोटी रुपये कोठे आहेत याची माहिती समितीला पाहिजे असून तिसरा मुद्दा मानव विकास निर्देशांक वाढला पाहिजे यादृष्टीने जी ५० टक्के पदे रिक्त आहेत तेथे नियुक्ती झाली पाहिजे ही समितीची भावना आहे असे समितीने विभागास सांगितले.

मूळ रक्कम ३७५ कोटी रुपये होती. मानव विकास निर्देशांकामध्ये याच्यामुळे काय बदल घडला ? ॲसेट निर्माण झाले याचे इव्हॅल्युएशन केलेले आहे का ? अशीही विचारणा समितीने केली असता याबाबत सन २००१ मध्ये पहिला सर्व्हे होता. दुसरा सर्व्हे सन २०११ मध्ये झालेला आहे. सन २००१ च्या सर्व्हेमध्ये महाराष्ट्राचा ॲव्हरेज .६६ होता सन २०११ मध्ये ॲव्हरेज .७५ आहे असा खुलासा नियोजन विभागाच्या सचिवांनी केला.

ज्या जिल्ह्यामध्ये, ज्या तालुक्यामध्ये पैसे खर्च केले, ज्या गोष्टींवर खर्च केले, जसे महिला विकासमध्ये आंगणवाड्यांवर पैसे खर्च केले. याबाबत समितीची माहिती अशी आहे की, साडेचार लाखाच्या निकषात ज्या आंगणवाड्या होत्या त्या बांधल्याच गेल्या नाहीत. जसे विभागाचे पैसे येथे खर्च झाले नाहीत तसे जिल्हा पातळीवरही खर्च झाले नाहीत त्याचे इव्हॅल्युएशन काय आहे. ८२ कोटी रुपये मागविले होते त्यापैकी ६२ कोटी रुपये खर्च झाले हा खर्च त्या उद्देशासाठी झाला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता ८२ कोटीं पैकी महिला व बालविकास विभागाला ७० कोटी मिळाले होते त्यामध्ये आंगणवाडीचे बांधकाम घेतले.

७८४ आंगणवाड्या पूर्ण झाल्या असून १८५ आंगणवाड्यांची कामे प्रगतीपथावर आहेत व ती कामे मार्च, २०१६ पर्यंत पूर्ण होतील. साडेचार लाखामध्ये कामे होऊ शकत नाही सहा लाखाच्या प्लॅनिंगमध्ये केलेले आहे. केंद्राचे नॉर्म्स अजून साडेचार लाख आहे. परंतु त्यामध्ये वाढ करण्याची गरज आहे यामधून अजून ५७३ कामे घेता आली असती. ५७३ कामे अद्याप घेऊ शकलो नाही. त्यावर्षाचे जे नियोजन केले होते त्यामध्ये कामे रद्द करण्यात आली. निधी प्राप्त झाला नाही म्हणून कामे झाली नाहीत. दुसरे कारण १५० आंगणवाड्यांचे पैसे सहा कोटी पंच्याहत्तर लाख रुपये जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये ठेवले होते तिथे आहरित करायला अडचण आली. त्यामुळे १५० आंगणवाड्या बाधित झाल्या. विभाग ७८४ आणि १८५ अशा जवळपास ९०० आंगणवाडयांची कामे पूर्ण करु शकलो. १५४२ आंगणवाड्याचे विभागाचे उद्दीष्ट होते त्यापैकी ७८४ आंगणवाड्यांची कामे पूर्ण झाली १८५ आंगणवाड्यांची कामे पूर्ण होतील असा खुलासा सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी केला.

महिला व बालविकास विभागाकडे मानव निर्देशांकासाठी जेवढे पैसे आले. त्या ८२ कोटी रुपयांपैकी सुरुवातीलाच १२ कोटी रुपये कमी आले. विभागाचे १५०० अंगणवाड्यांचे उद्दीष्ट होते त्यातील ५० टक्के साध्य करु शकलात याला चांगला विकास झाला असे म्हणता येईल का ? सन २०११-१२ मध्ये साडेचार लाखाची आंगणवाडी होती अनेक आंगणवाड्या पैसे असताना निकष चाडेचार लाखाचे असल्यामुळे आंगणवाड्या सोडून दिल्या. बुलढाण्यामध्ये बँक अवसायानात गेल्याने ६ कोटी रुपये त्या बँकेत गेले. विभागाचे १५०० आंगणवाडयांचे उद्दीष्ट होते ते ७५० पर्यंत देखील पोहचू शकले नाहीत अशी खंत समितीने व्यक्त केली.

साडेसातशे ते पावणे आठशे आंगणवाड्यांची कामे पूर्ण केली असून १८५ मार्च अखेरपर्यंत पूर्ण होतील जवळपास ९०० ते ९५० अंगणवाड्यांची कामे होतील असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

शिल्लक राहिलेल्या १२ कोटी या रकमेचे पुढे काय झाले याबाबत माहिती देण्यात यावी. तसेच महिला व बाल विकास विभागाने कधी कळविले? कारण दोन्ही विभागाच्या माहितीमध्ये तफावत आहे ते सुद्धा स्पष्ट करण्यात यावे असे समितीने विभागास निदेश दिले तथापि अद्याप माहिती अप्राप्त आहे.

**अनुदान क्र. ओ-७ "सेक्रेटरीएट आर्थिक सेवा"**

७३४५१ सेक्रेटरीएट आर्थिक सेवा या शीर्षांतर्गत २ लाख ८५ हजार इतकी बचत दिसून येते. परंतु प्रत्यक्षात तशी बचत झालेली नाही याबाबत माहिती द्यावी तसेच ३.७५ कोटी या पुनर्विनियोजनाने उपलब्ध करुन दिलेल्या रकमेबाबतची माहिती देण्यात यावी असे समितीने सांगितले असता एकूण उपलब्ध निधी ८.२९ कोटी होता. रिकन्सेलिएशनच्या वेळी करेक्ट करायला पाहिजे होते परंतु ती करेक्ट झालेली नाही. या कारणामुळे बचत दिसते आहे परंतु प्रत्यक्षात ती बचत नाही मूळ तरतूद ८ कोटी २९ लक्ष ५८ हजार इतकी होती कारण पुनर्विनियोजनाद्वारे ३.७५ लक्ष एवढी अधिक रक्कम मिळाली होती. तसेच पुनर्विनियोजनामध्ये रुपये ७६ लक्ष ने रक्कम कमी झाली असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

रुपये ७६ लक्ष रक्कम जर कमी केली तर ७४५ लक्ष होईल काय? अशी विचारणा समितीने केली तसेच ८.२९ कोटी मधून ७६ लक्ष कमी केले तर किती रक्कम होते? विभाग महालेखाकार यांच्या रिकन्सीलिएशनची फिगर घेत नाही जी बीडीएस वरची यादी आहे ती घेत आहे असे समितीने सांगितले असता बीडीएसची फिगर घेण्याचे कारण असे आहे की, खालच्या आपल्याकडे माहिती येण्यामध्ये थोडा वेळ जात असल्याने बीडीएसमध्ये फिगर अपडेट होत नाही. त्यामुळे ट्रेझरीचा खर्च आणि बीएम्सचा खर्च यामध्ये तफावत राहते. आपली सिस्टम अशा प्रकारची आहे की त्यामध्ये एक स्लीप ड्रॉ करण्यात येते ती बीम्स एक्सपेंडीचर म्हणून दिसते आहे. स्लीप ड्रॉ केल्यानंतर स्लीप बिलाला लावून ट्रेझरीला सबमीट करतात. काही ठिकाणी असे होते की, स्लीप लाऊन ट्रेझरीमध्ये सबमीट करतात त्यावेळी बिल पेंडींग राहतात आणि त्याची एक्झॅट फिगर मिळत नाही. बिम्सच्या नंतरची जी स्टेप आहे ते रियल टाईम नाही या कारणामुळे ही तफावत आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या अनुषंगाने महालेखाकार यांनी असे विदित केले की, The figures of the A.G. are for the whole year. We have to see the figures booked by the A.G. and the difference in the figures. During the year 2011-12 the unreconciled amount is about 62%.

जून, २०१२ महिन्यात मंत्रालयात आग लागली होती त्यामध्ये नियोजन विभाग व कॅश सेक्शन बाधीत झाले होते या कारणामुळे त्यावेळी रिकंसीलेशन करणे शक्य नव्हते असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

या विषयावर रुपये ३.७५ जास्तीची तरतूद होती. रुपये ८२९ लक्ष पैकी पुनर्विनियोजनमध्ये ७६ लाख प्रत्यार्पित केले तर रुपये ७५३ लक्ष इतकी रक्कम असावयास पाहिजे? त्यामुळे विभागाची बचत अजून वाढावयास पाहिजे. एकूण अनुदान जे उपलब्ध होते ते अनुदान रुपये ७२९ लक्ष इतके होते. रुपये ७२९ पैकी किती खर्च झाले ? अशी विचारणा समितीने केली असता पुनर्विनियोजन रुपये ७९.८३ लक्ष इतके झाले. तसेच ७२९ रुपये एकूण अनुदानापैकी रुपये ७४६ लक्ष इतके खर्च झाले असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले असता समितीने अशी विचारणा केली की, विभागाने दिलेल्या उत्तरात बचत झाली नाही असे म्हटले आहे

तथापि बचत झाली आहे हे विभागाने मान्य करावे या अनुषंगाने विभागीय सचिवांनी असे सांगितले की, महालेखाकार यांचेकडे जाऊन रिकंसीलीएशन करण्यात आले होते आणि त्यांनी मान्य केले होते की, बचत झालेली नाही.

या अनुषंगाने महालेखाकार यांनी असे विदित केले की, Reconciliation position is very poor. For e.g. in the year 2014-15 more than 40% reconciliation has not been done. Planning department is the Nodal Department.

विभागाकडे डिस्ट्रीक्टचे प्लॅन असते त्यामध्ये जिल्ह्यामधून माहिती घेण्यामध्ये वेळ जातो आहे. डिस्ट्रीक्ट प्लॅन फार मोठा असतो टोटल बजेटच्या १० टक्के डिस्ट्रीक्ट प्लॅन असतो. नियोजन विभागाचा जो प्लॅन आहे त्याचा रेशियो घेतला तर डीपीडीसीचा निधी फार मोठा असतो प्रत्येक जिल्ह्यातून माहिती घेण्यामध्ये उशिर होतो त्यामुळे रिकन्सीलिएशन करण्याला वेळ लागतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने समितीला सांगितले आहे की, आग लागली म्हणून रिकन्सलेशन होऊ शकले नाही. परंतु महालेखाकारांचे म्हणणे आहे की इतर वेळचे देखील रिकन्सलेशन झालेले नाही या समितीच्या प्रश्नावर प्रत्येक जिल्ह्याकडून डीपीडीसीची माहिती घ्यावी लागते त्यामुळे रिकन्सीलिएशनला उशिर होत आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

मागणी क्र. ओ-७ ३४५१- सेक्रेटरीएट आर्थिक सेवा- नक्षलग्रस्त जिल्ह्यांसाठी एकात्मिक कृती योजना या शीर्षांतर्गत रुपये ६० कोटीपैकी २० कोटी रुपये विभागाने प्रत्यार्पित केलेले आहेत त्याची कारणे काय आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता याबाबत केंद्र सरकारकडून जो निधी प्राप्त झाला होता तो उशिरा प्राप्त झाला त्या कारणामुळे ते प्रत्यार्पित करावे लागले.

केंद्र सरकारकडून निधीची ऑर्डर उशिरा आली. दिनांक २९ मार्चला २५ कोटी रुपयांची एक ऑर्डर आली आणि दुसरी ऑर्डर १२ एप्रिल, २०१२ रोजी आली. पुढील वर्षी विभागाने २० कोटी पुन्हा घेतले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सध्या या योजनेची काय स्थिती आहे? सन २०१५-२०१६ साठी काय योजना आखलेली आहे अशी समितीने विचारणा केली.

उपरोक्तच्या अनुषंगाने महालेखाकारांनी समितीस असे विदित केले की, Regarding the point-lack of reconciliation, the department has replied that the department could not get actual expenditure figures of Districts under this major head. But we are doing reconciliation for the whole year.

महालेखाकार यांनी व्यक्त केलेल्या मतानुषंगाने विभागाने पुढील खुलासा केला. I would request you to kindly understand BIMS. In BDS system first the slip comes. After the Slip, the Bill is

prepared and along with the Slip the Bill is submitted to the Treasury. You take the expenditure from the Treasury; we get the expenditure from the Districts. There is delay in getting the actual expenditure from the Districts and some times the correct expenditure does not come from the Districts. You take the figures from the treasury and not from the system because the system does not provide you, as on today, for the real time expenditure booking at the Treasury level. It does not happen even today.

Here the question of real time is not applicable. Because this is end of the year Booking. After the Bill has been paid, the vouchers have been created and send to the A.G.Office असे मत महालेखाकारांनी यावेळी व्यक्त केले.

महालेखाकारांनी व्यक्त केलेल्या उपरोक्त मताच्या अनुषंगाने विभागाने पुढील खुलासा केला We are dependent on the Districts and when information flows from the Districts, sometimes it is delayed and sometimes it may not be correct. That is why the problem arises.

What you are saying applies for the whole year. But at the end of the year, till the month of June, you have time to reconcile. Then how can you say that you do not have the figures. This cannot be acceptable because the payment has already been made and the vouchers have been created and send to the A.G. Office and on the basis of that the A.G. Office books it. So what you are saying that information is not available for the whole year does not seem to be acceptable असे मत महालेखाकार यांनी व्यक्त केले.

या अनुषंगाने विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला. If you look at the expenditure pattern in many of the Bills you will see that most of the expenditure takes place in the month of February, March. It does not take place across the year.

नियोजन आयोग/नियोजन मंडळ, जिल्हा नियोजन समिती पंचवार्षिक योजनांतर्गत योजना या उपशीर्षांतर्गत प्रशासकीय खर्च दिलेला आहे. एकूण प्रशासकीय खर्चाच्या जून अखेरपर्यंत याचे रिकन्सलेशन होत नसल्याने हा प्रश्न उद्‌भवत होता आणि याच विषयावर महालेखाकारांनी आक्षेप घेतले आहे की, बील विभागाकडे आल्यानंतर जूनपर्यंत रिकन्सलेशन झालेच पाहिजे असे समितीने विभागास सांगितले असता महालेखाकार यांनी आपले मत पुढीलप्रमाणे व्यक्त केले. बीडीएस का जो है this is not expenditure, it is authorisation.

उपरोक्त अनुषंगाने विभागीय सचिवांनी पुढील खुलासा केला In BDS system there is a provision for this type of expenditure also. Till we draw the slip, it is real time but beyond that it is not real time because of two reasons. One reason is that there are certain departments which are outside the Treasury System because they are PLA account, second reason is the Bill goes to the treasury, there are objections and the Bills come back. But, when the expenditure is recorded in the treasury that does not get real time. That is not real time even today. The effort is being made by the finance department to make it real time. Once

that becomes real time then this whole issue will be sorted out. The reconciliation issue will be sorted out. Whatever is drawn from the treasury will get reflected real time on the system. Once it is reflected real time then reconciliation will not be an issue at all.

यावर महालेखाकारांनी There is importance of reconciliation. It should be done असे मत व्यक्त केले.

रिकन्सिलिएशन संदर्भात जिल्हा स्तरावर माहिती न मिळाल्यामुळे ते वेळेवर झालेले नाही, या संदर्भात विभागाचे काय म्हणणे आहे ? यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, विभागाकडून या बाबत वेळोवेळी कळविण्यात येत आहे. प्रत्यक्ष स्थितीमध्ये काही ठिकाणाहून माहिती वेळेवर येत नाही तर काही वेळा आलेली माहिती बरोबर नसते. यामुळे रिकन्सिलिएशनमध्ये अडचण येते.

या अनुषंगाने समितीने असे मत व्यक्त केले की, प्रत्येक महिन्याला रिकन्सिलिएशन झाले पाहिजे, या संदर्भात शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. वर्षाच्या अखेरनंतर ३ महिने होऊन देखील रिकन्सिलिएशन झालेले नाही ही वस्तुस्थिती आपण मान्य करीत आहात. नियोजन विभाग जर काही भूमिका घेणार नसेल तर इतर कोणताही विभाग भूमिका घेणार नाही. वित्त विभागाकडून ही प्रक्रिया सुरू असून ते लवकर होईल. माहिती वेळेवर व अचूक आली की नाही, हे महत्वाचे आहे यामुळे अडचण येत आहे. ही प्रोसेस पूर्ण झाल्यानंतर हा विषय संपणार आहे असे मत समितीने व्यक्त केले तसेच संवैधानिक विकास मंडळ/योजना या शीर्षांतर्गत झालेल्या बचतीची कारणे काय आहेत ? दौऱ्यावरील खर्च व त्यावरील काटकसरीमुळे ही बचत झाली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली. काटकसरीची उपाययोजना केलेली असल्याचे तसेच दि. ५ सप्टेंबर २०११ रोजी माननीय राज्यपालांच्या आदेशानुसार त्याचा कालावधी संपला होता. यामुळे अध्यक्षांच्या संबंधातील खर्च झाला नाही त्यामुळे बचत झाली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या अनुषंगाने महालेखाकार यांनी पुढील मत व्यक्त केले I would like to point out one more thing. We have created a software for online reconciliation. You ask the officials of the department to use this facility and do the reconciliation online. It will solve lot of your problems. महालेखाकारांनी व्यक्त केलेल्या मतानुषंगाने विभागीय सचिवांनी We will do it असे आश्वासीत केले.

**ओ-८**

अनुदान क्र.ओ-८ "पर्यटन" या संदर्भात समितीने दिनांक २ मार्च, २०१६ रोजी विभागीय सचिवांनी तसेच इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी ओ-८ "पर्यटन" यामध्ये दोन-तीन ठिकाणी अधिक खर्च केलेला आहे. अधिकची जी रक्कम आहे ती फार किरकोळ आहे तरी पण, महालेखाकारांनी नमूद केले आहे की, "Specific reasons for excess may be incorporated" त्यामध्ये श्री क्षेत्र देऊळ, आळंदी, भंडार डोंगर येथील कृषी विकास कार्यक्रम तुकडोजी महाराज गुरुकुंज आणि त्याच बरोबर गजानन महाराज

परसेंटेजप्रमाणे खूप कमी आहे ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास  आणली असता यामध्ये एक कारण असे असू शकेल की, त्यामध्ये एक पीएलए अकाऊंट होता. काही ठिकाणी पीएलए अकाऊंट मागील वर्षी तसेच पुढील वर्षी खर्च करण्यात येतो. त्यामध्ये रक्कम व्यपगत होत नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

पीएलएमध्ये ओव्हर ड्राफ्ट घेता येतो का ? तसेच पीएलए मध्ये अधिक रक्कम व्यपगत करता येत नाही का  पीएलएची काय पध्दत आहे ? याबाबत माहिती देण्यास समितीने सांगितले.

शेगांव, अमरावती, गुरुकुंज येथे रिसेंटली झाला होता. या वर्षीचे जे बजेट आहे, त्यामध्ये थोड्या प्रमाणात जास्त रक्कम दिसेल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

अनुदान क्र. ओ-१० 'इतर ग्रामविकास कार्यक्रमांवरील भांडवली खर्च' या शीर्षांतर्गत उपशीर्ष १०२ (००) (०२) संवैधनिक विकास मंडळाच्या क्षेत्रांतर्गत विकास कार्यक्रम या खाली नाशिक, कोकणला २० कोटी रक्कम वळती केलेली आहे यामध्ये विभागाचे म्हणणे सांगावे असे समितीने सांगितले असता यामध्ये वेळेवर प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे रक्कम वळती केलेली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

२ कोटी रुपये वळती केले तो मान्य आहे आता त्या व्यतिरिक्त १७ कोटी २७ लक्ष रुपये इतके मोठ्या प्रमाणात अखर्चित राहिलेले असून २० कोटी निधी वळती केली व कोकणच्या वाडी जोड रस्तासाठी तेथे पण १ कोटी ६ लक्ष रुपये रक्कम बचत झाली आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की,  जिल्हाधिकाऱ्याकडून प्रस्ताव वेळेवर प्राप्त न होणे जो निधी होता तो प्रत्येक विकास मंडळाला वेगवेगळया प्रकारचे अभ्यास करण्यासाठी प्रस्ताव वेळेवर प्राप्त न झाल्यामुळे रक्कम बचत राहिली आहे तसेच रायगडमध्ये निविदा प्रक्रियामध्ये उशीर झाल्यामुळे रक्कम बचत झाली.

१०२ (००) (३९) आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम यामध्ये आमदार फंडाचा जो सेव्हिंगचा खर्चाचा मुद्दा आहे त्यामध्ये अधिक रक्कम खर्च केली आहे. ज्याप्रमाणे खासदार फंडासारखा आमदार फंडाप्रमाणे करणे आवश्यक आहे. पुर्नजिवित करण्याची वेळच भासणार नाही. केवळ शेवटच्या वर्षामध्ये आपण केले पाहिजे. येथे १४ लक्ष जास्तीचे रक्कम दिसते ती रक्कम दिसण्याचे कारण काय ? अशी विचारणा समितीने केली.

जो खर्च होता तो 'ए' हेडचा होता तो 'बी' हेडमध्ये बुक झाला त्यामुळे बी हेडमध्ये रक्कम जास्त दिसते हे मुख्य कारण असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१०२ (००) (४०) या शीर्षांतर्गतही १० लक्ष ४ हजार रुपये अधिक खर्च झाला आहे यासंदर्भात ही उपरोक्त प्रमाणेच कारण असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले तसेच महालेखाकार यांना एजीला नोट ऑफ एरर दिलेले आहे असेही नमूद केले.

महालेखाकारांनी विभागीय सचिव यांना अशी विचारणा केली की, Here it is reflected as excess and in the explanation of the department it is mentioned the amount had to be surrendered. Then it is said that there is misclassification. So, it is not clear whether it is excess or surrender or misclassification.

या प्रकरणामध्ये ४५१५ च्या प्रकरणामध्ये जो अतिरिक्त खर्च होता त्यामध्ये अक्चुअल खर्च होता ते ४५१५०६६५ चा होता जो बुक झाला ००१२ मध्ये आणि वेळेवर रिकन्सीलीएशन झाले नाही ते मान्य आहे या कारणामुळे तो अधिक दिसला. प्रत्येक जिल्हातील महालेखाकार कार्यालयाकडून तपासणी केली त्यामध्ये असे निदर्शनास आले की, ज्या शीर्षामध्ये बुक करणे आवश्यक होते त्याऐवजी दुसऱ्या शीर्षांतर्गत बुक झाला आणि वेळेवर रिकन्सीलीएशन होणे आवश्यक होते तथापि ते झाले नाही हे विभाग मान्य करतो.

रिकन्सीलीएशन थोडे पलीकडे आहे बीम्सवर काही स्कीमच्या इश्यू करतो सब टेझरीचा एक्सपेंडिचर रिअल टाईम नाही. परंतु विभागाकडे पुढील ४ ते ५ महिने व दुसरे असे आहे की, वन, जलसंपदा, दुग्धव्यवसाय विकास व सार्वजनिक बांधकाम विभाग या चारही चेक सिस्टीमनी चालत होते, कारण दुर्गम भागाला चेक ऐवजी ऑथराईजेशन पुश करुन बँकेला अॅडवाईज देऊ म्हणजे ऑनलाईन माहिती मिळू शकेल ही झाली खर्चाची माहिती. दुसरे असे की, जमा रकमेची दोन्हीमध्ये व्याज होत नाही रिक्नसलेशनचे बीम्स होणार नाही. ई-चलन १०० टक्के इन्ट्रोडयुस करु व जितके पैसे जमा होतील तितकी रक्कम सिस्टीमने चलन काढल्यानंतर त्याचे लेखा शीर्षामध्ये रिकन्सीलीएशन प्रश्न उद्‌भवणार नाही ज्यांनी चलन पास केले, बँकेमध्ये केलेले चलन, ट्रेझरीला व एजीला एकच जाऊ शकेल व लेखाशिर्ष इकडे तिकडे वर्गीकरण केले तर तो प्रश्न राहणार नाही. एक्सपेंडिचर बील पोर्टल तसेच तिसरा मुंबईच्या पीएओ अकाऊंटला क्लासीफाईड अकाऊंट तयार करणे. हे चार ते पाच प्रश्न आहेत ते सोबत घेतले आहे आणि विभागाचा प्रयत्न आहे की, एनआयसी, एजी व बँकच्या मदतीने या चार ते पाच महिन्यात झाले तर रिकन्सीलीएशनमुळे इतके प्रश्न मिसअॅप्रोप्रीएशनमुळे अकाऊंटला येतात ते राहणार नाहीत. ज्यांनी जास्त खर्च केलेला आहे किंवा कमी खर्च केलेला असला तरी तेवढाच मुद्दा राहणार आहे. यामध्ये रिकन्साईलेशनचा प्रश्न राहणार नाही अशी विस्तृत माहिती नियोजन विभागाच्या सचिवांनी समितीस सांगितली.

जो अधिक खर्च झालेला आहे तो योग्य नाही तसेच संबंधितांनी दिलेले स्पष्टीकरण योग्य नाही असे समितीला वाटले तर त्यावेळी विभागाला अमान्य करता येईल का ? अशी विचारणा समितीने केली असता अमान्य केले तरी अकाऊंट रेक्टीफाय होणार नाही कारण आपण उशीरा चर्चेला घेतो, परंतु पैसे परत मिळू शकतात असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

**समितीच्या शिफारशी :-**

**२.३ शिफारस क्र. (१)** मागणी क्र.ओ-१ या शीर्षाखाली सन २०११-१२ मध्ये मानव विकास मिशनअंतर्गत अंगणवाडी इमारतीच्या बांधकामासाठी केंद्र शासनाकडून मंजूर रुपये ८२.५० कोटी पैकी रुपये ६९.६३ कोटी एवढा निधी डिसेंबर, २०११ मध्ये उपलब्ध करुन खर्च करण्यात आला. उर्वरीत निधी रु.१२.८७ कोटी महिला व बालविकास विभागाने कोषागारातून आहरित केला नाही व वर्षाअखेरीस समर्पितही केला नाही. नियोजन विभागास कळविले देखील नाही त्यामुळे नियोजन विभागाने समर्पित आदेश निर्गमित केले नाहीत. परिणामी रुपये १२.८७ कोटी एवढा निधी व्यपगत झाला. **निधी व्यपगत होण्यास कारणीभूत महिला व**

**बालविकास विभागातील संबंधितांची चौकशी करुन कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

२.४ **शिफारस क्रमांक (२) :** अनुदान क्रमांक ओ-७ 'सेक्रेटरीएट आर्थिक सेवा' या शीर्षाखाली विभागाने केलेला प्रत्यक्ष खर्च व महालेखाकार यांचेकडे नोंदविलेला खर्च यात तफावत आहे. विभागाने ताळमेळाचे काम पूर्ण न केल्यामुळे ही तफावत कमी झालेली नाही ही बाब समितीच्या निदर्शनास आली. ताळमेळाचे काम पूर्ण न करण्याबाबत विभागाने सादर केलेला खुलासा स्वीकारण्यायोग्य नाही. वित्त विभागाच्या निर्देशानुसार दरमहा ताळमेळाचे काम पूर्ण करावयाचे आहे व संपूर्ण आर्थिक वर्षाचे ताळमेळाचे काम माहे जूनपर्यंत पूर्ण करावयाचे आहे. सदरचा कालावधी जिल्हा स्तरावरुन खर्चाचे अहवाल प्राप्त करुन कोषागार कार्यालयाकडील खर्चाशी ताळमेळ घेण्यास पुरेसा आहे. तथापि, विभाग अशी कार्यवाही करण्यास अपयशी ठरला आहे. **महालेखाकारांनी ताळमेळाकरिता तयार केलेल्या संगणकीय अज्ञावली (Software) चा वापर करुन सन २०११-१२ व तद्नंतरच्या सर्व वर्षाच्या ताळमेळाचे काम पूर्ण करुन खर्चाच्या नोंदीमधील तफावत दूर करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

२.५ **शिफारस क्रमांक (३) :** लोकलेखा समितीकडून विविध विभागाच्या विनियोजन लेख्यांबाबत साक्ष घेताना असे निदर्शनास आले की, जवळपास सर्वच विभागांनी ताळमेळाचे काम विहित वेळेत पूर्ण केले नाही, चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव महालेखाकार कार्यालयास विहित वेळेत सादर केले नाहीत. **अशा चुकांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शासनाच्या सर्व विभागांमध्ये व्दिनोंदी लेखापध्दती व लेख्यांचे संगणकीकरण सक्तीचे करण्यात यावे व याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही वित्त विभागाने करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

# पर्यावरण विभाग

**३.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करत असताना अनुदान क्रमांक यु-४ - परिस्थितीकी व पर्यावरण मधील प्रधान लेखाशीर्ष ३४३५ - परिस्थितीकी व पर्यावरण या शीर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे :—

**अनुदान क्रमांक यु-४-परिस्थितिकी व पर्यावरण**

**(रु.हजारात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| ३४३५-परिस्थितिकी व पर्यावरण<br>मूळ १२,११.००<br>पूरक ३,९४.०० | १६,०५,०० | ९,१६,४० | (-) ६,८८,६० |
| वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च, २०१०) | | | ६,८८,६० |

**टिपा व भाष्ये :-** अनुदानाची बचत पुढील शीर्षाखाली झाली.

**ज्ञापन :** :—

**महालेखापरिक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पर्यावरण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सरोवर संवर्धनाच्या प्राप्त प्रस्तावांची विहित शासन निर्णयाच्या आधारे केलेल्या छाननीनंतर मंजूर कामे व त्यासाठीची रक्कम वजा जाता १०३ (०२) (०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना (३४३५ ०१८२) या शीर्षाखाली उर्वरित निधी प्रत्यार्पित करण्यात आला.

**(रु.लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| ०४ प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण<br>१०३ वायू व जल प्रदूषण प्रतिबंध,<br>१०३ (०२) (०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना<br>मूळ ८,००,००<br>पुनर्विनियोजन (-) १,२०.०० | ६,८०.०० | ६,८०.०० | --- |

**(रु.लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
| --- | --- | --- | --- |
| ०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण<br>१०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध,<br>१०३ (०२) (१३) पर्यावरणविषयक जनजागृती शिक्षण व वातावरण बदल कृती योजना<br>मूळ ३,००.००<br>पुर्नविनियोजन (-) ७४.२५ | २,२५.७५ | २,२५.७५ | --- |

**टीपा व भाष्ये :—**

**प्रत्यक्ष** खर्चाच्या आधारे मार्च, २०१२ मध्ये वर नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली रु.१९४.२५ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

**ज्ञापन :—**

**महालेखापरिक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पर्यावरण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

**१०३** (०२) (१३) पर्यावरणविषयक जनजागृती, शिक्षण व वातावरण बदल कृती योजना (३४३५ १३०२) या शीर्षाखाली बचत ग्रीन आयडीया या कार्यक्रमांतर्गत सुकाणू समितीने मंजूर केलेल्या योजनांवर खर्च करण्यात आला. सुकाणू समितीने उर्वरीत प्रस्ताव यथायोग्य न ठरविल्याने बचत झाली आहे.

**(रु.लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
| --- | --- | --- | --- |
| ०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण<br>१०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध,<br>१०३ (०२) (१२) महाराष्ट्र किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकारण (३४३५ १२९४)<br>मूळ १,००.००<br>पुर्नविनियोजन (-) १,००.०० | ---- | ---- | ---- |

**टीपा व भाष्ये :—**

महाराष्ट्र किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना न झाल्याने मार्च, २०१२ मध्ये रु. १०० लाख एवढी संपूर्ण तरतूद परत करण्यात आली.

**ज्ञापन :—**

**महालेखापरीक्षकांच्या** उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पर्यावरण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

किनारा क्षेत्र व्यवस्थापन अधिसूचना, २०११, दिनांक ६ जानेवारी, २०११ रोजी प्रसिद्ध झाली. सदर अधिसूचनेन्वये किनारी क्षेत्राचे नकाशे तयार करण्याची जबाबदारी राज्य, शासनाकडे देण्यात आली. त्यामुळे सदर कामासाठी वित्तीय वर्ष २०११-१२ मध्ये अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली.

परंतु नकाशे तयार करण्यासाठी अधिकृत संस्था भारत सरकार पर्यावरण विभागाने जाहिर करणे, ह्या संस्थांकडे सदर काम करण्याची अनुकूलता असल्याबाबत विचारणा करणे, राष्ट्रीय किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी जानेवारी, २०१२ मध्ये दर निश्चित करणे, तसेच विधी व न्याय विभागाच्या सल्ला मसलतीने संस्थांबरोबर करावयाचे एम.ओ.यु. निश्चित करणे ह्या कामांमुळे अर्थसंकल्पिय तरतूद त्या वित्तीय वर्षामध्ये वितरित होऊ शकली नाही, त्यामुळे ती पुनर्विनियोजित करण्यात आली.

**(रु.लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण<br>१९२, इतर अशासकीय संस्थांना सहाय्य<br>१९२ (०१) (०१) राज्य नदी संरक्षण योजना<br>पूरक ३,९४.००<br>पुनर्विनियोजन - ३,९४.०० | ---- | ---- | ---- |

**टीपा व भाष्ये :—**

योजना पूर्ण न झाल्याने वित्त विभागाच्या मान्यतेनुसार राज्य नदी संवर्धन योजनेकरिता जुलै, २०११ मध्ये घेण्यात आलेली रु. ३९४ लाख एवढी संपूर्ण तरतूद मार्च, २०१२ मध्ये परत करण्यात आली.

**ज्ञापन :—**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात पर्यावरण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

३४३५ ०१९२ (०१) (०१) राज्य नदी संरक्षण योजना (३४३५ १३२९) या योजनेबाबत मार्गदर्शन सूचना अंतिम स्वरूपात निर्गमित न झाल्याने रक्कम खर्ची पडली नाही. मार्च, २०१२ मध्ये रु. ३९४ लाख एवढी संपूर्ण तरतूद करण्यात आली.

**साक्ष -**

**३.२** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या विनियोजन केले अहवालातील पर्यावरण विभागाच्या अनुदान क्रमांक यु-४ संदर्भात समितीने दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी अतिरिक्त मुख्य सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. सदर साक्षीच्यावेळी समितीने विचारणा केली की, पर्यावरण विभागाने एकूण १२ कोटी ११ लाख रुपयांचा नियतव्यय घेतला होता. १५ टक्के कपात झाली असली तरी १० कोटी ३० लाख रुपये मिळाले होते. आणखी ३ कोटी ९४ लाख रुपये मागण्यात आले. १२ कोटी ११ लाख रुपयांच्या अगोदर मूळ नियतव्यय मिळाला, तोच खर्च झाला नाही. त्यामुळे ॲडिशनल ३९४ लाख रुपयांची मागणी करण्याचे कारण काय याचे स्पष्टीकरण करताना विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सदरहू ३ कोटी ९४ लाख रुपये राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेसाठी मागितले होते. ही योजना केंद्र शासनाची असून त्यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा असतो. सदरहू योजना केंद्र सरकारद्वारे मंजूर केली जाईल, अशी अपेक्षा होती. त्यामुळे ते अपरिहार्य होते. परंतु केंद्राने मार्च, २०१६ पर्यंत योजना मंजूर केली नाही.

३ कोटी ९४ लाख रुपयांचा निधी केवळ त्याच योजनेसाठी मागविण्यात आला होता काय? केंद्र शासनाने तशा प्रकारची योजना तयार केल्याबाबत विभागास सूचित केले होते काय? केंद्र सरकारने योजना मंजूर न करण्याची कारणे काय आहेत? राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रस्ताव केव्हा सादर केला होता? व त्यावर केंद्र शासनाने केव्हा त्रुटी काढल्या आणि सदरहू त्रुटी राज्य शासनाने केव्हा पूर्ण केल्या? याबाबत स्पष्टीकरण देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, रु. ३ कोटी ९४ लाख ची मागणी यांचे योजनेसाठी करण्यात आली होती व याबाबत केंद्र शासनाने सूचित केले होते. सदरहू योजना नवीन होती. तसेच त्यामध्ये केंद्र शासनाने अनेक उप प्रश्न विचारलेले होते. त्यामुळे त्यास खूप वेळ लागला होता. सदरहू प्रस्ताव जानेवारी, २०११ चा होता. परंतु त्यामध्ये राज्य शासनाचा हिस्सा असल्यामुळे तो वित्त विभागाकडे पाठविण्यात आला होता. त्यामध्ये वित्त विभागाने त्रुटी काढल्या होत्या. तसेच सदरहू प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर न्यावा लागेल, असेही वित्त विभागाकडून सांगण्यात आले होते. त्यानंतर राज्य शासनाने या योजनेस दिनांक ०१ मार्च २०१४ रोजी मान्यता दिली. त्यानंतर विभागाने केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला. परंतु राज्य शासनाने २०१४ मध्ये मंजुरी दिल्यामुळे व त्यासंदर्भातील शासन निर्णय २०१४ मध्ये काढल्यामुळे त्यास विलंब झाला.

सदरहू प्रस्तावास दिनांक ०१ मार्च २०१४ पर्यंत राज्य शासनाची मंजुरी मिळाली नव्हती. राज्य शासनाची मंजुरी मिळाल्यावर केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला. म्हणजेच केंद्र शासनाकडे सदरहू प्रस्ताव वित्त विभाग, नियोजन विभाग किंवा पर्यावरण विभाग यांच्यामुळे उशिरा गेला, असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, तरतूद नसली तरी योजना रखडू नये, याकरिता अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येते पुरवणी मागण्यांद्वारे तरतूद प्राप्त झाली, परंतु शासन निर्णय आला नाही, केंद्र शासनाची योजना मंजूर झाली नाही, अशी अडचण निर्माण झाली होती. परंतु आता केंद्र शासनाने योजना मंजूर केल्यानंतरच बजेट प्रोव्हिजन करायची, असे विभागाने धोरण स्वीकारलेले आहे.

पर्यावरण विभागाकडे नगरपरिषदांचे सरोवर संवर्धनाबाबतचे किती प्रस्ताव प्राप्त झाले व त्यापैकी केंद्र शासनाकडे किती प्रस्ताव पाठविण्यात आले आहे. यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी विदित केले की, सरोवर संवर्धनामध्ये विभागाने आतापर्यंत ४० प्रकल्प घेतलेले आहेत. त्यापैकी ४ पूर्ण झाले असून ६, ७ प्रकल्प ९० टक्के पूर्ण झालेले आहेत. उर्वरित प्रगतीपथावर आहेत. त्यासंदर्भात वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.

पर्यावरण संदर्भात प्रत्येक गावामध्ये दिल्या जाणाऱ्या योजनेचे निकष सांगताना सचिवांनी खुलासा केला की, सरोवर संवर्धन योजना प्रत्येक गावी देता येत नाही. ज्या गावांमध्ये जुने तलाव आहेत व ते लोकसंख्या वाढल्याने गावातील सांडपाण्यामुळे प्रदुषित झाले आहेत. अशा तलावांच्या संवर्धनासाठी सांडपाणी इतर ठिकाणी वळविण्यात येते. तसेच त्यावर प्रक्रिया करण्यात येते आणि तलावांचे संवर्धन करुन त्याला संरक्षण दिले जाते. याकरिता योजना घेण्यात येते.

विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया, भंडारा हे जिल्हे तलावांचे जिल्हे आहेत. चंद्रपूर जिल्ह्याला निधी दिलेला आहे. परंतु इतर गोंदीया, भंडारा, गडचिरोली या जिल्ह्यामधील एकाही प्रस्तांवाना मान्यता दिलेली नाही. चंद्रपूर जिल्ह्याला निधी देण्यात आला. प्रदूषित क्षेत्र निश्चित झालेल्या क्षेत्राला किती निधी देण्यात आलेला आहे. जो भाग प्रदूषित म्हणून घोषित झालेला आहे, त्या भागामध्ये नवीन उद्योग येत नाहीत, अशा भागातील प्रदुषण कमी करण्यासाठी शासनाने किती निधी दिलेला आहे. अशा भागाकरिता निधी दिला नसल्याचे दिसून येते. तलावामध्ये सांडपाणी जाऊ नये, याकरिता व्यवस्था करण्याकरिता, आरोग्याच्या दृष्टीने व पर्यावरणाच्या दृष्टीने सदर निधी दिला जातो.

चंद्रपूर सारख्या शहराला किंवा ज्या, ज्या ठिकाणी पर्यावरणाला धोका आहे, अशा ठिकाणी निधी न देता इतर ठिकाणी निधी देण्यात आला. त्याबद्दल विचार केला पाहिजे. तसेच विशेषतः तलावांच्या जिल्ह्यांमध्ये देखील निधी देण्याबाबत कार्यवाही करावी.

उद्योग उभारणीसाठी परवानगी देत असताना एसटीपीची अट घातली जाते. परंतु जेव्हा विभागीय सचिवांचा दौरा असतो तेव्हाच एसटीपीचे मीटर सुरु केले जाते. इतर वेळेस ते बंद असते. त्यामुळे स्वतंत्र इलेक्ट्रीक मीटर बसविण्यात यावे व त्याचे नेहमी रिडींग घ्यावे, असे केले तर एसटीपी चालविला किंवा कसे याबाबत ॲनालिसीस होईल. विभागाचे अधिकारी गेल्यावर ते चालू दिसते. त्यामुळे असे केल्यास यास आळा बसेल. असे मत समितीने व्यक्त केले.

केंद्र सरकारचे निकषामुळे किंवा राज्य शासनाच्या वेगळ्या निकषामुळे वित्त विभागाला या प्रस्तावास मान्यता देण्यास वेळ लागला काय? आता सदरहू अंमलबजावणी झाली आहे काय ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, त्यावेळी सदरहू योजना नवीन होती. केंद्र शासनाच्या योजनेला स्थानिक संस्थांचा १०, २० किंवा ३० टक्के हिस्सा द्यायचा होता. परंतु स्थानिक संस्था कमजोर असून त्यांना ते परवडत नसल्यामुळे त्यांना बळकट करण्याकरिता तरतूद करण्यात आली होती. परंतु हा निर्णय घेण्यासाठी एक, दोन वर्षांचा कालावधी लागला. ४० पैकी ४ प्रस्ताव मंजूर झालेले आहेत. तसेच ७ प्रस्ताव केंद्र शासनाकडे विचाराधीन

आहेत. सुकाणू समितीने काही प्रस्ताव मान्य केले तर काही प्रस्ताव अमान्य केले जे प्रस्ताव मंजूर झालेले आहेत त्याचा वेळोवेळी आढावा घेतला जातो.

पर्यावरण विषयक जनजागृती, शिक्षण व वातावरण बदल कृती योजना (३४३५१३०२) या शिर्षाखालील बचत ग्रीन आयडीया या कार्यक्रमांतर्गत सुकाणू समितीने मंजूर केलेल्या योजनांवर खर्च करण्यात आला. सुकाणू समितीने उर्वरित प्रस्ताव यथायोग्य न ठरविल्याने बचत झाली आहे. याचाच अर्थ ते प्रस्ताव अमान्य केले आहेत. केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे याबद्दलचे निकष वेगवेगळे आहेत काय, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, लेक कन्झर्वेशन योजना ही बाब ग्रीन आयडीया संदर्भातील आहे. सामाजिक किंवा पर्यावरणाच्या दृष्टीने एखाद्या गावातील पक्षी, नदी, तलाव यांचे संवर्धन करण्याचा यामागे उद्देश होता. यानुसार एका व्यक्तीला ५ ते १० हजार रुपये मिळत होते. स्थानिक लोकांना प्रोत्साहित करण्याकरिता ही योजना असून पर्यावरण विभागामध्ये अशा प्रकारच्या लहानलहान स्थानिक योजना मोठ्या प्रमाणात आहेत. नदी संवर्धन आणि तलाव संवर्धन योजना ह्या मोठ्या योजना आहेत. तलाव संवर्धनासाठी असलेला निधी वाढवून देण्याबाबत समितीने शिफारस करावी, जेणे करुन जास्तीत जास्त लोकांना त्याचा फायदा घेता येईल.

प्रदूषित भागातील जनतेचा विचार व्हायला पाहिजे, त्यांना एक रुपयाही मिळालेला नाही. चंद्रपूर भागातील क्षेत्र देशातील चौथ्या क्रमांकाचे प्रदूषित क्षेत्र असल्याने तेथील एसटीपी प्लँटचे मीटर वेगळे करण्यात यावे. त्याबद्दल शासन कोणती भूमिका घेणार आहे. यासंदर्भात विभागीय सचिवांना आश्वासित केले की, याबाबत निश्चित योग्य ती भूमिका घेतली जाईल. जेव्हा एसटीपी प्लॉट मीटरची तपासणी करतात, तेव्हा ते चालू रहाते, हे शक्य आहे. इलेक्ट्रीकचे बील पाहिल्यावर ते लक्षात येईल. एका दिवसाचे देयक जास्त असते की, संपूर्ण महिन्याचे देयक जास्त असते, तपासणीअंती लक्षात येईल. याकरिता वेगळे मीटर घेण्याचे आदेश काढण्यात येतील.

जल प्रदूषणाच्या संदर्भामध्ये काही सर्व्हे झालेले असून प्रदूषण दूर करण्याच्या अनुषंगाने काय उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये २००९ मध्ये सर्व्हे झाला होता. त्यामध्ये पोल्यूटेड स्ट्रेचेस आयडेन्टीफाय करण्यात आले होते. त्याचे ०५ वर्ग करण्यात आले होते. म्हणजेच ०१ ते ०५ असा प्राधान्यक्रम ठरविण्यात आला होता. जास्त प्रदूषण असलेल्या ठिकाणच्या प्रदूषणाचे निवारण करण्यासाठी प्रायोरिटी ०१ देण्यात आली होती. अशा प्रकारे त्या खालोखाल पुढील प्राधान्यक्रम ठरविले होते. याकरिता ॲक्शन प्लॅन तयार करण्यात आला होता. त्यादृष्टीने संबंधित ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आले होते. आता प्रायोरिटी ०१ मध्ये २००९ या वर्षात ४ स्ट्रेचेस होते. २०१५ मध्ये केंद्र शासन व राज्य शासनामार्फत झालेल्या सर्व्हेमध्ये केवळ २ स्ट्रेचेस असल्याचे आढळून आले आहे. म्हणजेच दोन कमी झालेले आहे. प्रायोरिटी २ मध्ये २००९ मध्ये ०५ होते ते आता एकही नाही. प्रायोरिटी ३ मध्ये १८ होते, ते आता ०९ झाले आहे. संबंधित ठिकाणी प्रदूषण कमी झालेले असून चांगल्या सुधारणा झालेल्या आहेत. प्रदूषण एकदम कमी झाले असे नाही, परंतु ते काही प्रमाणात कमी झालेले आहे.

प्रदूषण कमी होत आहे, याकरिता विभागाने कोणती उपाययोजना केली? दरवर्षी उद्योग वाढत आहेत. तसेच ५ कोटी रुपये खर्च केले नाही. असे असताना प्रदूषण कसे कमी झाले. पैसे खर्च न करता प्रदूषण कसे कमी झाले ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, पर्यावरण विभागावर दोन प्रकारची जबाबदारी असते. तरतूद केलेल्या निधीतून काही चांगल्या योजना राबविण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच रेग्युलेटरी रोलची देखील बाब आहे. टाऊनशिप, इंडस्ट्री यांचे मॉनिटरिंग करुन, कम्प्लायन्स करुन, सांडपाण्यावर आळा घालून ते कमी केले जाऊ शकते. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, विभागाला प्रदूषण कमी करण्यास काही प्रमाणात यश आलेले आहे व प्रदूषण कमी झाल्याचे अहवालानुसार आढळून येते. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. पूर्वीपेक्षा आता प्रदूषण नियंत्रणात आहे, अशी परिस्थिती नाही.

समितीच्या मताच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी खुलासा केला की, लोकसंख्या वाढत आहे. तसेच उद्योगिकरण व शहरीकरण वाढत आहे. त्यामुळे सांडपाण्यामध्ये देखील वाढ झालेली आहे. यामध्ये केवळ २० टक्के ट्रीटमेन्ट होत असून ८० टक्के ट्रीटमेन्ट होत नाही. त्यासंदर्भात घटनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्था, म्हणजेच मोठ्या ग्रामपंचायती, नगरपरिषदा, नगरपालिका यांची जबाबदारी आहे. याबाबत गेल्या दोन वर्षांपासून पावले उचललेली असून यामध्ये यश मिळालेले आहे. प्रत्येक नगरपालिका आणि नगरपरिषदेच्या वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी २५ टक्के तरतूद सांडपाणी प्रक्रिया किंवा पर्यावरण संतुलनासाठी निर्माण करण्यात येणाऱ्या इन्फ्रास्ट्रक्चर करिता वापरण्यात यावी. त्याप्रमाणे २५ टक्के तरतूद केली असल्याचे २३ मोठया महानगरपालिकांनी कळविलेले आहे. महानगरपालिकांनी सदरहू निधी पर्यावरण संतुलनासाठी वापरला की, रस्ते किंवा इतर कामासाठी वापरला याकरिता मॉनिटरिंग करण्यात येणार आहे. याकरिता निधीची आवश्यकता आहे. तसेच त्या, त्या महानगरपालिकांनी दर वर्षी २५ टक्के निधी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी व पर्यावरण संतुलनासाठी वापरल्यास तीन, चार वर्षात यामध्ये चांगला फरक दिसून येईल. ही मोठी उपाययोजना ठरेल.

विभागीय सचिवांच्या उक्त खुलाशावर समितीने नाराजीने असे मत व्यक्त केले की, ही माहिती विषयाला धरुन नाही. जल प्रदुषण कमी करण्यासाठी विभागाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. या विषयाच्या अनुषंगाने विभागाने प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही केलेली नाही, ही जनरल माहिती दिलेली आहे. नुकताच जो सर्व्हे आहे, त्यानुसार हवेच्या प्रदुषणामध्ये कमतरता आली, तथापि, त्यामध्ये पोल्युटेड वॉटर असल्याबाबतचा अहवाल आहे. यावर विभागीय सचिवांनी स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विभाग हा रेग्युलेटरी विभाग आहे. रुल्स ऑफ बिजनेस प्रमाणे सांडपाणी प्रक्रिया पूर्ण करणे आणि नदी, तलाव यांचे संवर्धन करण्याची मूळ जबाबदारी स्थानिक संस्थांची आहे. रेग्युलेट करण्याची जबाबदारी पर्यावरण विभागाची असून ते विभाग करीत आहे.

समितीने असेही विचारले की, महानगरपालिका आणि नगरपरिषदा यांनी वर्षातील एकूण बजेट पैकी २५ टक्के निधी याकरिता खर्च करावा, ही बाब ठीक आहे. परंतु औद्योगिकरण जास्तीत जास्त ग्रामीणभागामध्येच आहे. महानगरपालिका क्षेत्राबाहेर औद्योगिकरण असल्यास संबंधित ग्रामपंचायत हा खर्च उचलू शकेल काय? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, ग्राम विकास विभागाने इको-सेन्सिटिव्ह व्हिलेज ही योजना सुरू केली होती व त्यासाठी निधीही दिला होता. सांडपाणी प्रक्रिया करण्यासाठी निधीची तरतूदही केली होती.

समितीने असे विचारले की, सर्वे केला जातो व त्यानंतर प्रस्ताव तयार केले जातात. असे प्रस्ताव सुकाणु समितीने अमान्य केले आहेत. मग सुकाणु समिती आणि शासन या वेगवेगळ्या यंत्रणा आहेत का ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, तीन-चार योजनांबाबत चर्चा सुरु असल्याने सुकाणु समितीचा आणि याचा काही संबंध नाही. हा सर्वे मोठ्या पातळीवर होत असतो आणि नदीच्या ९० ते १०० कि.मी.परिसरात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण आहे, असा अहवाल त्यांच्याकडून दिला जातो. सुकाणु समितीचा उल्लेख वेगळ्या योजनेसाठी आहे. तलाव संवर्धन समितीही आहे. परंतु, या समितीचा आणि याचा काही संबंध नाही.

सुकाणु समितीला सादर करण्यात येणारे प्रस्ताव स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फतच तयार केले जात असतात. छोट्या छोट्या रकमा खर्च करू शकत नाही. ते प्रस्ताव अमान्य होतात. एकीकडे विभाग तरतूद वाढविण्याची मागणी करतो. परंतु, याबाबतचे प्रस्तावच अमान्य होतात व त्यामुळे पैसे खर्च होत नाहीत. मग पैसे वाढवून देण्याची आवश्यकता आहे का ? असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, एकाच कामासाठी दोन विभागाकडून निधी देण्याची प्रथा नाही. म्हणून ग्राम पंचायतींनी आपल्या अर्थसंकल्पात पर्यावरणासंबंधीच्या उपाययोजनांसाठी ५ किंवा १० टक्के निधी राखून ठेवावा, अशा प्रकारची शिफारस समितीने शासनाला करावी, हे प्रस्ताव एन.जी.ओ. किंवा ग्राम पंचायत यांच्यामार्फत येत असतात. तलाव संवर्धन योजनेसाठी ८ कोटी रुपयांची तरतूद होती. ती १५ टक्के कमी करून ६.८८ करण्यात आली आहे. ही रक्कम खर्च झालेली आहे. हरित योजनेसाठी ३ कोटी रुपयांची तरतूद होती. त्यामध्ये १५ टक्के कट लावण्यात आला व उर्वरित रक्कम खर्च झालेली आहे.

समितीने यावर असे विचारले की, राज्यात अनेक मोठ्या प्रकल्पामधून प्रदूषण होत आहे. त्या ठिकाणी एसटीपी लावण्यात आलेले असतात. परंतु, त्याचे कार्यान्वयन योग्य प्रकारे होत नाही. केंद्रीय स्तरावरील व राज्य स्तरावरील सेमिनारला आपण पर्यावरण सचिव म्हणून उपस्थित असता. या सेमिनारला देशाचे पर्यावरण सचिव देखील उपस्थित असतात. आपण अशा सेमिनारमध्ये असा प्रस्ताव दिला पाहिजे की, जे प्रकल्प एसटीपी किंवा अन्य पर्यावरण विषयक इक्विपमेंट प्रोजेक्टमध्ये लावतील त्यांना इन्कम टॅक्स व इतर टॅक्समध्ये कन्सेशन दिले पाहिजे. अशा प्रकारची विनंती पर्यावरण विभागाने केंद्र शासनाला केली पाहिजे. जेनेकरून पर्यावरणविषयक उपाययोजनांसाठी प्रकल्पांना प्रोत्साहन मिळेल व ते चांगल्याप्रकारे सहभाग घेऊ शकतील. अशा प्रकारची विनंती आपण केंद्र सरकारला करणार आहात का ? आपण ५ प्रायॉरिटीज निश्चित केल्या आहेत. काही प्रायॉरिटीज

पुढे निघुन गेल्या आहेत. त्याबाबत आपण काही विचार करणार आहात का ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, या सूचनांचा विचार करण्यात येईल.

स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या बजेटच्या २५ टक्के रक्कम पर्यावरणविषयक उपाययोजनांवर खर्च केली पाहिजे. त्यादृष्टीने समितीने अशी सूचना केली की, पर्यावरण विभागाने ग्राम विकास व नगरविकास विभागाला असे कळवावे की, त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांना तशा सूचना द्याव्यात. कारण, स्थानिक स्वराज्य संस्थांना ग्राम विकास विभाग व नगरविकास विभागाकडून निधी दिला जात असतो. त्यांना तेराव्या व चौदाव्या वित्त आयोगाकडून आणि वैशिष्ट्यपूर्ण योजनांमधून निधी मिळत असतो. स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाकडून जो निधी प्राप्त होतो त्यामधून देखील २५ टक्के निधी पर्यावरणविषयक उपाययोजनांसाठी राखून ठेवण्यात यावा, हा रेशिओ मेंटेन करावा, अशा प्रकारच्या सूचना या विभागांनी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिल्या पाहिजेत. त्याप्रमाणे ग्राम विकास विभाग व नगरविकास विभागाला पर्यावरण विभागाकडून कळविण्यात यावे यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

पर्यावरण विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीचा अनुभव चांगला नाही. याबाबत समितीने उदाहरण दिले की, विभागाचे अधिकारी वार्षिक तपासणीसाठी जातात. पेट्रोल पंपसाठी पर्यावरण विभागाची एन.ओ.सी.लागते. त्यासाठी ५०० रुपये पूर्वी घेतले जात होते. आता १० हजार रुपये घेतले जातात आणि प्रदुषण होत नाही, असे लिहून देतात. अशी किती तरी उदाहरणे आहेत. पर्यावरण विभागाचे अधिकारी कार्यालयात बसून पर्यावरणविषयक तपासणी करतात. या संदर्भात आपण कार्यपध्दतीमध्ये काही सुधारणा करणार आहात का ?

यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, विभागाने सायंटिफिक मॉनिटरींगसाठी काही पावले उचलली आहेत. पर्यावरणविषय परवानगीचे अर्ज व रिनिवल अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यापूर्वी दरवर्षी रिनिवल घ्यावे लागत होते. माहे डिसेंबर, २०१५ मध्ये विभागाने असा निर्णय घेतला आहे की, वार्षिक रिनिवल ऐवजी ५ वर्षांनी रिनिवल घ्यावयाचे आहे. यापूर्वी पर्यावरण अधिकारी त्यांच्या इच्छेप्रमाणे तपासणीसाठी जात होते. आता ते त्यांच्या इच्छेप्रमाणे तपासणी करणार नाहीत. रेड कॅटिगरीच्या कारखान्यांसाठी किती वेळा व कधी तपासणी करावी, ग्रीन कॅटेगरीच्या कारखान्यांसाठी किती वेळा व कधी तपासणी करावी, हे आता संगणकाव्दारे एम.पी.सी.बी.च्या मुख्य कार्यालयातून निश्चित केले जाणार आहे. आता पारदर्शकपणे लोकांना हे कळू शकेल की, अमूक इंडस्ट्रिचे इन्स्पेक्शन होणार आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, आता दरवर्षी तपासणी होणार नाही. परंतु, आज मोठ्या प्रमाणावर हवा प्रदुषण, पाणी प्रदुषण होत आहे. ५ वर्षानंतर रिनिवलची प्रोसेस केली आहे, ते बरोबर आहे. परंतु, कारखान्यांची वार्षिक तपासणी झालीच पाहिजे. गोंदीया भागात बॉयलरमुळे मोठ्या प्रमाणावर हवेचे प्रदुषण होत असते. अनेक ठिकाणी एसटीपी लावले जातात. परंतु, ते सुस्थितीत नसतात व त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वॉटर पोल्युशन होते. पाण्याची तपासणी योग्य वेळी केली जात नाही. विभागाचे अधिकारी तपासणीसाठी जातात. ते कारखान्यात गेल्यानंतर चहापान होईपर्यंत एसटीपी सुरू केला जातो, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे तपासण्यांची

संख्या कमी करण्यात येऊ नये. तसेच, त्याचा कालावधी देखील वाढवू नये, असे मत समितीने व्यक्त केले. सुरु असलेल्या प्रकल्पाला वर्षातून एकदा भेट झालीच पाहिजे. रिनिवल व ऑनलाईन प्रोसेसबाबत विभागाने घेतलेला निर्णय योग्य आहे. प्रदुषण नियंत्राणाबाबत मात्र दरवर्षी तपासणी झाली पाहिजे. गोंदीया भागात दाल मिल आहेत, राईस मिल आहेत. त्या माध्यमातून होणाऱ्या प्रदुषणाकडे लक्ष दिले पाहिजे. आज अशी परिस्थिती आहे की, ओपन कारमध्ये त्या भागात फिरता येणे शक्य नाही. मॉनिटरिंगच्या दृष्टीकोनातून नवीन टेक्नॉलॉजी घेतली पाहिजे. नवीन सॉफ्टवेअर निर्माण केले पाहिजे. सर्व कारखान्यांचा पोल्युशन डाटा त्यावर आला पाहिजे आणि सामान्य माणसाला देखील अलर्ट मिळाला पाहिजे. अशी काही पध्दत विभागाकडून सुरू करणार का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केली की, सदर प्रोसेसविषयी माहिती दिली. विभाग मॉनिटरींग अधिक स्ट्रिक्ट करणार आहे. ज्या उद्योगांमधून मोठ्या प्रमाणात प्रदुषण होत असते, असे १७ उद्योग शोधण्यात आले आहेत. अशा १७ उद्योगातील हवेचा दर्जा ऑनलाईन पध्दतीने साठवली जाईल व रिफ्लेक्ट होईल अशा प्रकारचे अत्याधुनिक इक्विपमेंट इन्स्टॉल करण्यासंबंधी या उद्योगांना कळविण्यात आले आहे. त्यांनी ही इक्विपमेंट न बसविल्यास त्यांना रिनिवल मिळणार नाही. या माध्यमातून आपल्याला ऑनलाईन डाटा उपलब्ध होऊ शकेल आणि निश्चित केलेल्या पातळीपेक्षा जास्त पोल्युशन होत असेल तर संबंधित कारखान्यांवर आपण कारवाई करू शकू. २० टक्के उद्योगांनी ही इक्विपमेंट बसविलेली आहेत. उर्वरित उद्योगांकडे पाठपुरावा सुरू आहे. येत्या एक वर्षात १०० टक्के उद्योगांमध्ये ही इक्विपमेंट बसविली जातील.

**<u>१०३ (२) (१२) महाराष्ट्र किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकण (३४३५ १२९४) या शीर्षातंर्गत</u>** महाराष्ट्र किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना न झाल्याने मार्च, २०१२ मध्ये रू. १,००.०० लाख एवढी संपूर्ण तरतूद परत करण्यात आली आहे. याबाबतचे कारण काय आहे ? यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाचा एक इनिशिएटिव्ह होता. समुद्र किनाऱ्यांचा सर्व्हे करून हायटाईड, लोटाईड याबाबतचे मॅपिंग करण्यासाठी यामध्ये तरतूद होती. सन २०११ मध्ये यासाठी १ कोटी रुपयांची तरतूद केली होती. तथापि, कोणत्या संस्थेमार्फत सर्वे करावयाचा आहे, हे केंद्र शासनाने ठरवावयाचे होते. केंद्र शासनाने जानेवारी, २०१२ मध्ये दर निश्चिती केली. त्यामुळे त्या कालावधीत या संस्थांबरोबर ॲग्रिमेंट किंवा एम.ओ.यु.होऊ शकला नाही. म्हणून ही रक्कम समर्पित करण्यात आली आहे. त्यानंतर ॲग्रिमेंट झाले असून कामही सुरू झाले. या संदर्भातील प्रक्रिया फार मोठी होती. संस्था निश्चित झाल्यानंतर त्यांच्याबरोबर ॲग्रिमेंट करावयाचे होते. त्यानंतर मॅपिंग त्या संस्थांमार्फत होणार. ते केंद्र शासनाकडे पाठवावयाचे आहे. केंद्र शासनाने व्हॅलिडेट केल्यानंतर ते जाहीर केले जाणार होते. सॅटेलाईट इमेजच्या माध्यमातून मॅपिंग होते. परंतु, त्या ठिकाणी मॅनग्राव्हज आहेत की, नारळाची झाडे आहेत हे त्या इमेजवरून लक्षात येत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष जागेवर जाऊन सर्व्हे करावा लागतो.

**समितीच्या शिफारशी :-**

**३.३ शिफारस क्रमांक (१) :** पर्यावरण विभागाच्या अनुदान क्र. यु-४, ३४३५ 'परिस्थिती व पर्यावरण' याशिर्षाखाली अर्थसंकल्पीय तरतूद रु.१६.०५ कोटी पैकी ९.१६ कोटी एवढा निधी खर्च व रु.६.८८ कोटी एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी परत करण्यात आला अथवा व्यपगत झाला. याबाबत समितीच्या समोर साक्षीदरम्यान निधी खर्च न होण्यास सुकाणू समितीची मान्यता नसणे नकाशे तयार करण्यास अधिकृत भारत सरकार पर्यावरण विभागाने जाहीर न करणे, सदर संस्थाची अनुकुलता वेळेवर प्राप्त न होणे, राष्ट्रीय किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाने उशिरा दर निश्चित करणे, एमओयु निश्चित करण्यास लागलेला विलंब या बाबी समितीच्या निदर्शनास आल्या. निधी अर्थसंकल्पित असताना अशा प्रशासकीय स्वरुपाचा बाबीकरीता निधी खर्च न होणे याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली, या संदर्भात अशा प्रशासकीय बाबींमुळे निधी परत /व्यपगत होणार नाही याकरीता आवश्यक ती उपाययोजना करावी**. केंद्र शासनाचा निधी राज्याच्या विविध योजनांकरिता उपलब्ध होण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे. त्याकरिता एका विशेष अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३.४ शिफारस क्रमांक (२) :** पर्यावरण विभागाने डिसेंबर, २०१५ मध्ये पर्यावरण विषयक दाखला नुतनीकरण (रिनिवल) व तपासणी बाबत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयावर चर्चा केल्यानंतर समितीने अशी शिफारस केली की, पर्यावरण दाखला नुतनीकरण (रिनिवल) पाच वर्षानंतर करण्यास हरकत नाही तथापि मोठ्या प्रमाणावर हवेचे प्रदुषण व पाणी प्रदुषण विचारात घेता प्रदुषण तपासणी दरवर्षी झाली पाहिजे. अनेक ठिकाणी एसटीपी लावले जातात परंतू ते सुस्थितीत नसतात त्यामूळे मोठ्या प्रमाणावर पाणी प्रदुषण होते. राज्यातील ज्या भागात उद्योगामुळे होणाऱ्या प्रदुषणाकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच एक लाख लोकसंख्येसाठी प्रदूषण मापक यंत्र बसवावयास पाहिजे. जल प्रदूषण होऊ नये म्हणून प्रदूषित पाण्यावर शत प्रतिशत प्रक्रिया करुन प्रदूषण मुक्त पाणी समुद्रात सोडले पाहिजे. १०० पेक्षा जास्त निवासी गाळे असलेल्या इमारतींमध्ये सिवरेज ट्रिटमेंट प्लांट उभारुन तेथील सांडपाणी मलनिःस्सारण केंद्रात सोडले पाहिजे. **प्रदुषणाचे मॉनिटरींग करीता नवीन तंत्रज्ञान विकसित केले पाहिजे. कारखानदार व सामान्य जनतेला सावधानतेचा इशारा मिळाला पाहिजे. याबाबत जिल्हानिहाय प्रदूषणाचा सहामाही अहवाल प्रसिध्द केला पाहिजे. या सर्व बाबीसंदर्भात विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

# सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभाग

**४.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करत असतांना अनुदान क्रमांक व्ही-३-सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च मधील प्रधान शीर्ष ४४२५-सहकारावरील भांडवली खर्च, ४४३५- इतर कृषि विषयक कार्यक्रमावरील भांडवली खर्च, ४८५१-ग्रामोद्योग व लघुउद्योग यावरील भांडवली खर्च, ५४७५- इतरसर्वसाधारण आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च, या शीर्षाअंतर्गत बचत व अधिक खर्च झालेला आहे. बचत व अधिक खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

**अनुदान क्रमांक व्ही-३ -सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च**

**(रुपये हजारांत)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| **प्रधान शिर्ष**<br>**४४२५ -** सहकारवरील भांडवली खर्च<br>**४४३५ -** इतर कृषिविषयक कार्यक्रमांवरील भांडवली खर्च<br>**४८५१ -** ग्रामोद्योग व लघुउद्योग यांवरील भांडवली खर्च<br>५४७५ इतर सर्वसाधारण आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च<br>**मूळ -** १,५१,२४,६२<br>**पूरक -** २८,२८,००<br>वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च- २०१२) | १,७९,५२,६२ | १,१६,७५,६८ | (-) ६२,७६,९४<br>६२,३४,३६ |

**टिपा व भाष्ये :-**

**मूळ** तरतूदी इतकाही खर्च झाला नाही.

२ रु. ६२७६.९४ लाख एवढी अनुदानातील बचत लक्षात घेता, पूरक विनियोजनाद्वारे घेतलेला रु. २८२८ लाख इतका निधी अनावश्यक असल्याचे सिध्द झाले.

३ अनुदानातील रु. ६२७६.९४ लाख इतक्या अंतिम बचतीपैकी, फक्त रु. ६२३४.३६ लाख इतका अपेक्षित निधी वर्षभरात परत करण्यात आला.

## अनुदानातील बचत पुढील शीर्षाखाली झाली

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| **४४२५ - सहकारवरील भांडवली खर्च**<br>**१०८ -** इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका.<br>**१०८ (०२) (०५) -** कृषि संस्करण संस्थांना भाग भांडवली अंशदान<br>(राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ)<br>**मूळ** ५,००.००<br>**पुर्नविनियोजन (-)** ५,००.०० | -------- | -------- | -------- |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-१२ या आर्थिक वर्षाम्ध्ये रु. ५००.०० लाख तरतूद मंजूर करण्यात आली होती. सदर आर्थिक वर्षामध्ये सुधारित अंदाज रु.४२५.०० लाख उपलब्ध करुन देण्यात आले होते. अपेक्षित प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे सदर योजनेमध्ये खर्च झाला नाही. त्यामुळे अनुदान परत करण्यात आले होते.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| **१०८ -** इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका.<br>**१०८ (०३) (०१) -** सहकारी साखर कारखाने - सहकारी साखर कारखान्यांना भाग भांडवली अंशदान<br>(राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ)<br>**मूळ** २१.००<br>**पुर्नविनियोजन (-)** २१.०० | -------- | -------- | -------- |

**ज्ञापन :-** महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.——

नविन सहकारी साखर कारखाना उभारणीसाठी शासकीय भागभांडवल दिले जाते. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात या बाबीसाठी मूळ तरतूद रु. २१.०० लाख करण्यात आली होती. या आर्थिक वर्षात शिवशक्ती

सहकारी साखर कारखान्याचे नियमानुसार आवश्यक तेवढे स्वभाग भांडवल न झाल्याने कारखान्यास सदरची रक्कम वितरीत केली नाही म्हणून रु. २१.०० लाखाचे पुर्नविनियोजन करण्यात आले.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|---|
| **१०८ -** इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका.<br>**१०८ (०४) (०४) -** सहकारी सूत गिरण्यांना भाग भांडवली अंशदान<br>(विशेष घटक योजना) | | | | |
| **मूळ** | २५,००,०० | | | |
| **पुर्नविनियोजन (-)** | १७,५३.४३ | ७,४६.५७ | ७,४६.५७ | -------- |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सदर लेखाशिर्षाखाली मूळ तरतुद रु.२५००.०० लाख इतकी प्राप्त झाली. सुधारीत अंदाजाद्वारे रु. ३७५.०० लाख इतकी तरतुद वित्त विभागाने कमी उपलब्ध करुन दिली. यास्तव, सुधारीत अंदाजाद्वारे रु. २१२५.०० लाख इतकी तरतुद प्राप्त झाली. त्यापैकी पात्र प्रस्तावांना रु. ७४६.५७ लाख इतकी तरतुद खर्च करण्यात आली. आर्थिक वर्षात विभागाकडे पात्र प्रस्ताव प्राप्त न झाल्याने या लेखाशीर्षाखाली रु. १३७८.४३ लाख निधी शिल्लक होता. हा निधी दि.३१/३/२०१२ च्या आदेशांन्वये समर्पित करण्यात आला.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|---|
| **४८५१ - ग्रामोद्योग व लघुउद्योग यावरील भांडवली खर्च**<br>**१०९ -** संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग सहकारी संस्था<br>**१०९ (०२) (०१) -** औद्योगिक सहकारी संस्थांना भाग भांडवली अंशदान | | | | |
| **मूळ** | ५०.०० | | | |
| **पुर्नविनियोजन (-)** | १५.६५ | ३४.३५ | ३४.३५ | -------- |

**टिपा व भाष्ये :-**

सुधारीत अंदाजपत्रकांच्या आधारे (रु.४६०.६५ लाख) आणि (दोन) प्रस्ताव प्राप्त न झाल्याने (रु.१८२९.४३ लाख) असा एकूण रु. २२९०.०८ लाख इतका निधी मार्च, २०१२ मध्ये वर नमूद केलेल्या शिर्षाखाली परत करण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये मूळ तरतुद रु.५०.०० लाख एवढी होती. सदर रकमेवर वित्त विभागाने १५% कपात केली असून, सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये रु.४२.५० लाख तरतुद उपलब्ध करण्यात आली होती. मंजूर अनुदानातून रु.३४.३५ लाख तरतुद खर्च झाली आहे. उर्वरित रु. ८.१५ लाख इतकी तरतुद खर्च झाली आहे. उर्वरित रु.८.१५ लाख इतकी तरतुद पात्र संस्थांचे दुसऱ्या हप्त्याचे परिपूर्ण प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयातून प्राप्त न झाल्यामुळे अखर्चित राहीली आहे. शासन निर्णय क्र. आईएस-४४२५-१२/प्र.क्र.८३/१७-स, दि.३१/०३/२०१२ अन्वये प्रत्यार्पणाचे आदेश निर्गमित केले आहेत.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| **४४२५ - सहकारवरील भांडवली खर्च**<br>**१०८ -** इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका.<br>**१०८ (०४) (०१) -** सहकारी सूत गिरण्यांना भाग भांडवली अंशदान<br>**मूळ** ७१,५८.८५<br>**पुरक** २०,२८.००<br>**पुर्नविनियोजन** (-) ४,५३.०३ | ८७,३३.८२ | ८७,३३.८२ | -------- |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग (सहकार) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.—

या लेखाशिर्षाखाली मुळ तरतुद रु. ७१५८.८५ लाख इतकी तसेच पूरक मागणीद्वारे रु.२०२८.०० लाख इतकी तरतुद प्राप्त झाली होती. सुधारीत अंदाजाद्वारे या रकमेपैकी रु. ७८०८.८२ लाख इतकी तरतुद प्राप्त झाली. वित्त विभागाने सुधारीत अंदाजानुसार रु.१३७८.०३ लाख कपात केल्याचे पुर्नविनियोजन आदेश दि. २८ मार्च,२०११ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. परंतु सदर योजनेतील प्रयोजनासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याने व प्रस्तुत लेखाशिर्षामध्ये बचत होत असल्याने त्या बचतीतून सदर लेखाशिर्षाखाली रु.९९५.०० लाख इतकी अधिकची तरतूद दिनांक ३१ मार्च,२०१२ च्या पुर्नविनियोजन आदेशान्वये प्राप्त झाली ही वस्तुस्थिती खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| **मूळ तरतूद** | ७१५८.८५ लाख |
| **पुरक (+)** | २०२८.०० लाख |
| **एकूण :-** | ९१८६.८२ लाख |

**प्रत्यार्पण (सु.अ.प्रमाणे) (-)** १३७८.०३ लाख

**पुनर्विनियोजन (+)** ९२५.०० लाख

८७३३.८२ लाख

उपरोक्त प्रमाणे अंतिम सुधारित अनुदानानुसार रु.८७३३.८२ लाख इतकी तरतुद सदर आर्थिक वर्षात प्राप्त झाली असून, संपूर्ण रक्कम या आर्थिक वर्षात खर्च झालेली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| **१०८ -** इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका.<br>**१०८ (०३) (०३) -** सहकारी साखर कारखान्यांनासहवीज निर्मितीसाठी भाग भांडवली अंशदान<br>(विशेष घटक योजना)<br>**मूळ** १५,००.००<br>**पुनर्विनियोजन (-)** २,२५.०० | १२.७५.०० | १२,७५.०० | -------- |

**टिपा व भाष्ये :-**

मुख्यत्वेकरुन, सुधारित अंदाजपत्रकाच्या आधारे वर नमूद केलेल्या शिर्षाखाली मार्च,२०१२ मध्ये प्रत्यार्पणाद्वारे रु. ६७८.०३ लाख एवढा निधी काढण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.——

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना सहवीज निर्मिती प्रकल्प उभारणीसाठी शासकीय भाग भांडवल दिले जाते. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात या बाबीसाठी मूळ तरतूद रु. १५.०० कोटी एवढी करण्यात आली होती. उपलब्ध तरतुदींपैकी खाली नमूद केलेल्या साखर कारखान्यांना त्यांच्या नावाखाली दर्शविण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये शासकीय भाग भांडवल वितरीत करण्यात आले आहे.

१. माजलगाव सह.साखर कारखाना लि. बीड ४५८.०० (लाखात)
शा.नि.दि. १८/०७/२०११

२. अशोक सह.साखर कारखाना लि. अहमदनगर ११६.३२ (लाखात)
शा.नि.दि. १८/०७/२०११

३. निराभिमा सह.साखर कारखाना लि. पुणे ३५२.६८ (लाखात)
शा.नि.दि. ३०/०३/२०१२

४. सहकार शिरोमणी वसंतराव काळे सह.साखर कारखाना लि. सोलापूर ५.३४ (लाखात)
शा.नि.दि. ३०/०३/२०१२

५. कुकडी सह.साखर कारखाना लि. अहमदनगर ८३.८२ (लाखात)
शा.नि.दि. १९/१०/२०११

६. भीमाशंकर सह.साखर कारखाना लि. बीड शा.नि.दि. २९/०/२०१३ — २५८.८४ (लाखात)

---------------------

१२७५.०० (लाखात)

उपलब्ध तरतुदीतून वितरीत शासकीय भाग भांडवल वजा जाता रु. २२५.०० लाख बचत झाली आहे. सदर बचत सर्मपित केली आहे.

**(रुपये लाखांत)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| **१०८ -** इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका.<br>**१०८ (०४) (०२) -** सहकारी सूत गिरण्यांना भाग भांडवली अंशदान (रा.स.वि.नि.)<br>**मूळ** ५,००.००<br>**पुनर्विनियोजन (-)** ५,००.०० | -------- | -------- | -------- |

**टिपा व भाष्ये :-**

(एक) सुधारीत अंदाजपत्रकाच्या आधारे (रु.७५ लाख) आणि (दोन) (४४२५-१०८-०४-०१) - सहकारी सूत गिरण्यांना भाग भांडवली अंशदान या शिर्षाखाली निधी उपलब्ध करुन देण्यासाठी (रु.४२५ लाख) असा एकूण रु. ५०० लाख इतका निधी मार्च, २०१२ मध्ये प्रत्यार्पण/पुनर्विनियोजनाद्वारे काढण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

प्रधान लेखाशिर्ष ४४२५ सहकारावरील भांडवली खर्च १०८, इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका (०४) सहकारी सूतकताई गिरण्या (०४) (०२) सहकारी सुतकताई गिरण्यांना भाग भांडवली अंशदाने (रा.स.वि.नि.) (४४२५०३४७) ३२, अंशदाने याखाली या आर्थिक वर्षासाठी मूळ तरतूद रु. ५००.०० लाख इतकी प्राप्त झाली होती. सुधारित अंदाजाद्वारे या रक्कमेपैकी रु.४२५.०० लाख इतकी तरतूद प्राप्त झाली म्हणजेच रु. ७५.०० लाख इतकी तरतूद प्राप्त झाली म्हणजेच रु. ७५.०० लाख इतकी तरतूद वित्त विभागाने कमी उपलब्ध करून दिली. यास्तव सुधारित अंदाजाद्वारे उपलब्ध करून दिलेली तरतूद रु. ४२५.०० लाख इतकी होती. सदर आर्थिक वर्षात विभागाकडे पात्र प्रस्ताव प्राप्त न झाल्याने रु. ४२५.०० लाख इतका निधी शिल्लक होता. प्रस्तुत निधीची याच मागणी क्रमांकाखालील लेखाशिर्ष (४४२५०३३८) खाली आवश्यकता असल्याने रु.४२५.०० लाखाचे दिनांक २८ मार्च २०१२ च्या आदेशान्वये पुनर्विनियोजन करण्यात आले.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| **१०८ -** इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणूका.<br>**१०८ (०२) (०८) -** कृषि संस्करण संस्थांना भाग भांडवली अंशदान (कोल्हे समिती) (राज्य योजना)<br>**मूळ -** ५,००.००<br>**पुरक -** ८,००.००<br>**पुनर्विनियोजन (-)** १०,४९.८२ | २,५०.१८ | २,०७.६० | (-) ४२.५८ |

**टिपा व भाष्ये :-**

(एक) सुधारीत अंदाजपत्रकाच्या आधारे (रु.१९५ लाख), (दोन) प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे (रु.३५४.८२ लाख) आणि (तिन) (४४२५-१०८-०४-०१) - सहकारी सूत गिरण्यांना भाग भांडवली अशंदान या शिर्षाखाली निधी उपलब्ध करून देण्यासाठी (रु.५०० लाख) असा एकूण रु.१०४९.८२ लाख इतका निधी मार्च, २०१२ मध्ये प्रत्यार्पण/पुनर्विनियोजन याद्वारे काढण्यात आला.

रु.४२.५८ लाख इतक्या अंतिम बचतीची मागविण्यात आलेली कारणे अद्याप कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट, २०१२).

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये मूळ तरतूद रु.५००.०० लाख होती. तसेच रु. ८००.०० लाख पुरवणी मागणी प्राप्त झाली होती. सदर लेखाशीर्षामध्ये रु. (-) १०४९.८२ लाख पुनर्विनियोजन झाल्यामुळे रु. २५०.१८ लाख तरतूद सुधारीत अंदाजामध्ये उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच खर्च रु. २६७.६० लाख आहे. सदर लेखाशिर्षामध्ये रु. - ४२.५८ लाख बचत झाली आहे. पात्र प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे बचत झाली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| **४४३५ - इतर कृषिविषयक कार्यक्रमांवरील भांडवली खर्च**<br>**०१ पणन व दर्जा नियंत्रण**<br>**१९९-** इतर अशासकीय संस्थांमधील गुंतवणूका<br>**१९९ (०१) (०१) -** आशियाई विकास बँक सहाय्यित कृषिविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम (कृषिविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम) (राज्य हिस्सा) (राज्य योजना)<br>**मूळ -** २,४०.००<br>**पुनर्विनियोजन - (-)** १,६५.०० | ७५.०० | ७५.०० | -------- |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित कृषिव्यापार विषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम या बाह्य सहाय्यित प्रकल्पासाठीच्या राज्य हिश्श्याची मुळ तरतूद रु. २४० लक्ष एवढी होती. या तरतुदीतून शासन निर्णय क्रमांक आरईएस-४४२५-१२/प्र.क्र.८३/१७ स, दिनांक २८ मार्च २०१२ अन्वये रु. ३६ लक्ष तरतूद प्रत्यार्प्रित करण्यात आली. त्यानंतर रु. २०४ लक्ष एवढी तरतुद शिल्लक राहिली होती. सदर रु.२०४.०० लक्ष या तरतूदी पैकी रु.७५ लक्ष तरतूद खर्च होण्याची शक्यता विचारात घेवून रु. १२९ लक्ष एवढी तरतुद शासन निर्णय दि.३१ मार्च २०१२ अन्वये प्रत्यार्प्रित करण्यात आली. वर्षाअखेर रु.७५ लक्ष एवढी तरतुद खर्च झालेली आहे. विचाराधीन बाह्य सहाय्यित प्रकल्प सन २०१० मध्ये घेण्याचे सुनिश्चित करण्यात आले. त्याबाबतच्या करारासंबंधी केंद्र शासन व ADB यांच्या बरोबर विचारविनिमय सुरू होता. त्या अनुषंगाने अंतिम करार जानेवारी, २०१२ ला झाला. त्या संबंधिचा कर्ज करार एप्रिल, २०१२ पासून अंमलात आल्यामुळे अर्थसंकल्पीय तरतुद खर्च करता येऊ शकली नाही.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| **०१ पणन व दर्जा नियंत्रण**<br>**१९९-** इतर अशासकीय संस्थांमधील गुंतवणूका<br>**१९९ (०१) (०२) -** आशियाई विकास बँक सहाय्यित कृषिविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम (कृषिविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम) (बाह्य हिस्सा) (राज्य योजना)<br>**मूळ -** १२,६०.००<br>**पुनर्विनियोजन (-)** १२,६०.०० | ------ | ------ | -------- |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित कृषिव्यापार विषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक प्रकल्प सन २०१० मध्ये घेण्याचे सुनिश्चित केले व त्याबाबतचा सर्व करार या वित्तीय वर्षामध्ये पूर्ण होतील व प्रकल्पावर खर्च होईल म्हणून बाह्य हिश्श्यासाठी रु.१२ कोटी ६० लाख तरतुद करण्यात आली. तथापि,याबाबतचा कर्ज करार जानेवारी,२०१२ ला स्वाक्षरीत झाला व सदर कर्ज करार हा एप्रिल, २०१२ पासून अंमलात येणर असल्यामुळे सन २०११-१२ साठीच्या बाह्य हिश्श्याची तरतूद खर्च होऊ शकली नाही. परिणामी सदर तरतुदीपैकी शा.नि.क्र.आरईएस-४४२५-१२/प्र.क्र.८३/१७ स, दिनांक २८ मार्च २०१२ द्वारे रु.१८९ लक्ष तरतूद आहे. सुधारित अंदाजात कमी केली व उर्वरित रु.१०७१ लक्ष तरतुद दि. ३१ मार्च,२०१२ च्या आदेशाद्वारे प्रत्यार्प्रित करण्यात आली.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| **४८५१ - ग्रामोद्योग व लघुउद्योग यावरील भांडवली खर्च**<br>**१०९ -** संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग सहकारी संस्था<br>**१०९ (०२) (३३) -** यंत्रमाग सहकारी संस्थांना भाग भांडवली अंशदान (रासविनि)<br>**मूळ** २,३९.७५<br>**पुनर्विनियोजन (-)** १,०३.७६ | १,३५.९९ | १,३५.९९ | -------- |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

प्रस्तुत योजनेंतर्गत मार्च, २०१२ पर्यंत संचालक वस्त्रोद्योग, नागपूर यांचेकडून प्रस्ताव प्राप्त न झाल्यमुळे, फक्त रु. १३५.९९ लाख इतक्या अंतिम तरतूदी एवढा निधी खर्च झाला आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| **५४७५ - इतर सर्वसाधारण आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च**<br>**१०२ - नागरी पुरवठा**<br>**१० (०२) (०१) -** टर्मिनल मार्केट/आधुनिक कृषी बाजार उभारण्याकरिता अंशदान<br>**मूळ** २,५०.००<br>**पुनर्विनियोजन (-)** १,२२.६५ | १,२७.३५ | १,२७.३५ | -------- |

**टिपा व भाष्ये :-**

(एक) सुधारीत अंदाजपत्रकाच्या आधारे (रु.२९८.४६ लाख) आणि (दोन) कोणतेही विशिष्ट कारण न देता (रु.१३५२.९५ लाख) असा एकूण रु. १६५१.४१ लाख इतका निधी वर नमूद केलेल्या शिर्षाखाली मार्च २०१२ मध्ये परत करण्यात आला. त्याची मागविलेली कारणे अद्याप कळविण्यात आलेली नाहीत, (ऑगस्ट, २०१२).

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत मुंबई, नाशिक व नागपूर येथे टर्मिनल मार्केट उभारण्याचे नियोजित आहे. त्यासाठी शासनाने केवळ जमीन गुंतवणूक करावयाची आहे व खाजगी गुंतवणूकदारांच्या माध्यमातून या प्रकल्पाची उभारणी करावयाची असून केंद्र शासन प्रति मार्केट रु. ५० कोटी एवढे अनुदान देणार आहे. या तिन्ही मार्केट बाबत अनुक्रमे खाजगी भागीदार नियुक्त होणे, जमीनीचा वाद न्यायालयात दाखल होणे व जमीन महसूल मुक्त तत्वावर मिळविणे या टप्प्यावर असून, प्रत्यक्ष कामाला सुरुवात न झाल्यामुळे रक्कम खर्च होवू शकली नाही. त्यामुळे मूळ रु.२५० लक्ष या तरतुदी पैकी दि.२८ मार्च २०१२ च्या शासन निर्णयाद्वारे रु.३७.५० लक्ष सुधारित अंदाजाच्या अनुषंगाने प्रत्यार्प्रित होवून सुधारित अंदाज रु. २१२.५० लक्ष झाले व त्यावर्षी उपरोक्त कारणामुळे केवळ रु.१२७.३५ लक्ष खर्च होण्याची शक्यता पाहून रु. ८५.१५ लक्ष तरतुद प्रत्यार्प्रित करण्यात आली. सन २०११-१२ मध्ये रु. १२७.३५ लक्ष एवढी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| **४८५१ - ग्रामोद्योग व लघुउद्योग यावरील भांडवली खर्च**<br>**१०९ -** संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग सहकारी संस्था<br>**१०९ (०२) (०८) -** महाराष्ट्र राज्य सहकारी यंत्रमाग महामंडळास भाग भांडवली अंशदान<br>**मूळ** २,००.००<br>**पुर्नविनियोजन** (-) २,००.०० | ------ | ---- | -------- |

**टिपा व भाष्ये :-**

(एक) सुधारीत अंदाजपत्रकाच्या आधारे (रु.३०लाख) आणि (दोन) (४८५१-१०९-०२-०६) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळास भाग भांडवली अंशदान या शिर्षाखाली निधी उपलब्ध करुन देण्याकरीता (रु.१७० लाख) असा एकूण रु.२०० लाख इतका निधी मार्च,२०१२ प्रत्यार्पण/पुर्नविनियोजन याद्वारे काढण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-१२ मध्ये मूळ तरतूद रु. २००.०० लाख इतकी होती तथापि मूळ अर्थसंकल्पित तरतूदीच्या ८५ टक्के मर्यादेतच निधीचे वितरण होण्याबाबत वित्त विभागाचे निर्देश असल्याने सुधारित तरतूद रु. १७०.०० लाख इतकी करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाची मागणी नसल्याने लेखाशीर्ष - ४८५१ ००९७ महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाला भाग भांडवली अंशदान या लेखाशीर्षाखाली रु. १७०.०० लाख इतकी बचत होणार असल्याने रु. १७०.०० लाख इतका निधी महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळासाठी होणाऱ्या अतिरिक्त भांडवली खर्चासाठी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**५. वरील टीप ४ मध्ये नमूद केलेली बचत अधिक खर्चाद्वारे पुढील शीर्षाखाली अंशतः प्रतिसंतुलित झाली.**

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|---|
| **४८५१ - ग्रामोद्योग व लघुउद्योग यावरील भांडवली खर्च**<br>**१०९ -** संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग सहकारी संस्था<br>**१०९ (०२) (०६) -** महाराष्ट्र राज्य सहकारी हातमाग महामंडळास भाग भांडवली अंशदान | | | | |
| **मूळ** | २,००.०० | | | |
| **पुनर्विनियोजन** | १,४०.०० | ३,४०.०० | ३,४०.०० | -------- |

**टिपा व भाष्ये :-**

मुख्यत्वेकरुन, खर्चात वाढ झाल्यामुळे मार्च, २०१२ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रु. १.४० लाख इतका अतिरिक्त निधी देण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-१२ मध्ये ४५८१ ००७९ या लेखाशीर्षाखाली मूळ तरतूद रु. २००.०० लाख इतकी होती. तथापि मूळ अर्थसंकल्पित तरतूदींच्या ८५ टक्के मर्यादेतच निधीचे वितरण होण्याबाबत वित्त विभागाचे निर्देश असल्याने सुधारित तरतूद रु. १७०.०० लाख इतकी झाली. सदर रक्कम भांडवली खर्चासाठी वितरीत करण्यात आली.

तदनंतर हातमाग महामंडळासाठी होणाऱ्या अतिरिक्त भांडवली खर्चासाठी रु. १७०.०० लाख इतका निधीची मागणी करण्यात आली असल्याने लेखाशीर्ष ४८५१ ००९७ महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळास भागभांडवली अंशदान या लेखाशीर्षाखाली रु. १७० लाख इतकी बचत होणार असल्याने रु.१७० लाख इतका निधी पुनर्विनियोजनाद्वारे हातमाग महामंडळास उपलब्ध करुन देण्यात आला.

सुधारीत तरतुद रु. १७० लाख + पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध निधी रु. १७० लाख असा एकूण रु. ३४०.०० लाख इतका निधी वितरीत करुन खर्च करण्यात आला.

**साक्ष :-**

**४.२** लोकलेखा समितीने दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजीच्या बैठकीत भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या विनियोजन लेखा अहवालातील अनुदान क्र. व्ही-३ या परिच्छेदा संदर्भात महालेखापालांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

महालेखापालांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, प्रधान शीर्ष ४४२५-सहकारावरील भांडवली खर्च ४४३५- इतर कृषि विषयक कार्यक्रमावरील भांडवलीखर्च, ४४५१-ग्रामोद्योग व लघुउद्योग यांवरील भांडवलीखर्च, ५४७५- इतर सर्वसाधारण आर्थिक सेवांवरील भांडवलीखर्च, या शीर्षाअंतर्गत मूळ तरतूद १५१ कोटी २४ लाख रुपये होती. यापैकी केवळ ११६ कोटी रुपये खर्च करण्यात आले. त्यानंतर आणखी पूरक मागणी करण्यात आली. मात्र मूळ रक्कम देखील पूर्णपणे खर्च झालेली नाही. अर्थसंकल्प तयार करताना खर्चाच्या संदर्भात विभागाने काही नियोजन केले होते काय ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर निधी कृषी संस्करण संस्थांमधील भाग भांडवलासाठी अंशदान देण्याकरिता प्रस्तावित केलेला होता. योजनेमध्ये गव्हर्नमेंट इक्विटी देण्यासाठी अटी व शर्ती निश्चित केलेल्या आहेत. मात्र अटींची पूर्तता केलेली नसल्यामुळे त्या वर्षी एकही परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाला नाही. यामुळे ही रक्कम खर्च करता आली नाही.

हे प्रस्ताव तयार करताना मागील वर्षीचा आढावा घेण्यात येतो. सन २०१०-११ मध्ये किती संस्थांचे प्रस्ताव आले व किती रकमेची मागणी आला याची माहिती तसेच सन २०१३-१४ मध्ये किती संस्थांकडून मागणी आली व त्यांना किती रक्कम देण्यात आली, याच्या सरासरी काढली काय याबाबत सांगितले की सन २०१०-२०११ मध्ये किती प्रस्ताव प्राप्त झाले याबाबतची माहिती सादर करण्यात येईल अद्याप माहिती अप्राप्त

आहे. तसेच विभागीय प्रतिनिधींनी असे ही सांगितले की, यासाठी केंद्रशासनाच्या एनसीडीसी कडून कर्ज रुपाने निधी मिळतो. सदर योजनेंतर्गत शासनाने पैसे घेतल्यानंतर त्वरीत व्याज सुरू होते काय ? बीज संस्करण हा फार मोठा संशोधनाचा विषय आहे. या संदर्भात शासनाची गंभीरता नसेल तर याचे दूरगामी परिणाम होणार आहेत. वर्षभरामध्ये एकही प्रस्ताव प्राप्त झाला नाही, याचा अर्थ विभागामधील व्यवस्थापनाकरिता जो निधी खर्च होत आहे, तो देखील वाया जात आहे. एखाद्या प्रस्तावामध्ये काही कमतरता असल्यास, काही अडचणी असल्यास किंवा त्यातील त्रुटी दूर करण्याकरिता कर्मचारी वर्ग नियुक्त केला जातो. मात्र विभागाने प्राप्त प्रस्तावातील त्रुटी दूर करण्याकरिता काही काम केलेले नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आधी अर्थसंकल्पात मध्ये तरतूद केली जाते व रक्कम संवितरित केल्यानंतर प्रतिपूर्ती मिळते. संवितरण झाल्यानंतर व्याज दर आकारला जातो. एकूण प्रकल्पातील ६० टक्के रक्कम कर्ज रुपाने वित्तीय संस्था किंवा एनसीडीसी यांच्याकडून मंजूर करून घेतली पाहिजे. असे केल्यानंतरच त्यांना भाग भांडवल देणे शक्य होईल. हे टाय अप झाले नाही तर त्यांना भाग भांडवल देता येत नाही. अनेक प्रकल्प व्हाएबल होत नसल्याने वित्तीय संस्था कर्ज देत नाहीत व यामुळे विभाग त्यांना भाग भांडवल देऊ शकत नाही.

औद्योगिकीकरण वाढवण्यासाठी योजना सुरू करण्यात येतात. वित्तीय संस्थांना एखादा प्रस्ताव व्हाएबल वाटत नसल्यास त्या वित्तीय मदत देत नाहीत. अशा वेळी निकष बदलले पाहिजेत. प्रस्ताव व्हाएबल होत नाही म्हणून निधी व्यपगत करणे, योग्य नाही. या संदर्भात विभागाची अकार्यक्षमता असे म्हंटले तर ते योग्य होईल, प्रस्ताव व्हाएबल करण्यासाठी विभागाने काय प्रयत्न केले ? यासंदर्भात विभागाने वित्तीय संस्था व प्रकल्प धारक यामध्ये समन्वयाचे काम केले होते काय ? सन २०१०-११ मध्ये देखील अशा प्रकारच्या काही अडचणी आल्या होत्या काय? सन २०११-१२ मध्ये अटी व शर्तींमध्ये काही बदल करण्यात आला होता काय? असे कोणते प्रस्ताव होते, जे व्हाएबल नव्हते? कोणाकोणाकडून प्रस्ताव प्राप्त झाले होते? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, माहिती नंतर देण्यात येईल (अद्याप माहिती अप्राप्त आहे.)

एकूण मागणीची रक्कम वर्षाअखेर परत केली जाते, हे योग्य नाही. विभागाने या संदर्भात नियोजन केले पाहिजे. सन २०१०-११ मध्ये किती प्रस्ताव आले, त्याकरिता किती निधी खर्च झाला, कोणत्या आधारावर नियोजन केले व सन २०११-१२ मध्ये किती प्रस्ताव आले, त्यापैकी किती अपूर्ण होते तसेच प्रस्ताव न आल्यास त्याचे कारण काय आहे, यामध्ये काही जाचक अटी आहेत काय, ज्यामुळे संस्था पात्र ठरत नाहीत. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींना सांगितले की, भाग भांडवलातील ५० टक्के रक्कम १० वर्षानंतर रिडिमेबल असून उर्वरित ५० टक्के रक्कम १५ वर्षानंतर रिडिमेबल आहे. रिडिमेबल रक्कमेकरिता नफ्यातील निधी राखून ठेवावा लागतो. एकूण प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के रक्कम वित्तीय संस्था किंवा एनसीडीसी यांच्याकडून कर्ज मंजूर करून घेतले पाहिजे.

यासंदर्भात कृषी विद्यापीठ किंवा इतर शासकीय संस्थांशी संलग्नित ज्या संस्था असतील त्यांना प्रशिक्षण देऊन प्रस्ताव तयार करता येईल. तसेच एखाद्या व्हाएबल प्रकल्पाकरिता स्पेसिफिक एजन्सीला प्रशिक्षण दिले तर वित्तीय संस्था देखील आर्थिक मदत देण्यास पुढाकार घेतील. यामुळे हा निधी वापरता येईल. असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले.

याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, हा संशोधनाचा विषय आहे. आपल्या देशात संशोधनामध्ये कोणीही भाग घेत नाही, त्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. अशा कार्यक्रमामध्ये काही जाचक अटी असल्यास त्यामध्ये काही बदल करता येईल काय, याचा विचार केला पाहिजे. शेतकऱ्यांपर्यंत नवीन संशोधन पोहचून त्यांना त्याचा लाभ झाला पाहिजे.

सध्या ही योजना सुरू आहे काय ? या योजनेंतर्गत विभागाकडे किती प्रस्ताव प्राप्त झाले आहेत? विभागाकडे प्रस्ताव येत नसल्यास त्याचे कारण शोधले पाहिजे. अन्यथा ही योजनाच बंद करावी. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सध्या ही योजना सुरू असून त्या करिता यंदा ३ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मात्र सध्या प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत. प्रक्रिया सहकारी संस्थांकडून प्रस्ताव मागवले जातात. नवीन तंत्रज्ञान देण्याचा प्रयत्न विभाग करीत आहे. ही योजना सहकारी संस्थांकरिता लागू आहे. संस्थांकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे हा निधी खर्च होऊ शकला नाही. संपूर्ण योजनेचा तपशील देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, राज्यात एकूण ६३५ कृषी प्रक्रिया सहकारी संस्था आहेत. त्यापैकी ११३ सहकारी संस्थांना अनुदान दिलेले आहे. एकूण १२० कोटी रुपये भाग भांडवल व कर्ज ११८ कोटी रुपये दिलेले आहे. प्रत्यक्ष वसुली फार कमी असून जवळजवळ ३०० ते ३५० कोटी रुपयांची थकबाकी आहे. विभागाच्या अधिकाऱ्यांनी हे प्रस्ताव परिपूर्ण करून घेतले पाहिजेत. तसेच वसुलीचे प्रमाण सर्वच ठिकाणी कमी आहे. किती रक्कम गुंतवली हे महत्वाचे आहे. या पूर्वी १२० कोटी रुपये दिले, परंतु मागील ५ वर्षामध्ये किती निधी देण्यात आले व किती नियतव्यय होता मागील ४-५ वर्षापूर्वी किती नियेतव्यय होता, त्यावेळी किती प्रस्ताव आले, योजनेचे काय निष्पन्न आढळून आले ही माहिती लेखी स्वरुपात समितीला कळवावी, असे समितीने सूचित केले परंतु माहिती अप्राप्त आहे.

प्रधानशीर्ष ४४२५ सहकार वरील भांडवली खर्च लेखाशीर्ष १०८ इतर सहकारी संस्थांमधील गुंतवणुका या अंतर्गत २१ लाख रुपये पुनर्विनियोजित केलेले असून त्याचे कारण कळविण्यात आले आहे. ते मान्य करण्यात आले आहे.

प्रधानशीर्ष ४४२५ अंतर्गत लेखाशीर्ष १०८ (०४) (०४) सहकारी सूत गिरण्यांकरिता भांडवली अंशदान २५ कोटी रुपयांपैकी १७ कोटी ५३ लाख रुपये प्रत्यापित केले. विशेष घटक योजनेंतर्गत सूत गिरणी असल्यामुळे प्रस्ताव प्राप्त न झाल्याने हा निधी प्रत्यार्पित करण्यात आल्याचे नमूद केले आहे. १५ टक्के निधी

कमी वितरित झालेला आहे. २५ कोटी रुपयांची तरतूद असताना एवढे कमी प्रस्ताव का प्राप्त झाले ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सहकारी तत्वावर सूत गिरणी उभारण्याची एक योजना आहे. विशेष घटक योजना थोडी वेगळी आहे. १०० रुपयाची योजना असल्यास विभागाकडून ४५ रुपये इक्विटी दिली जाते व उर्वरित ५० रुपये सामाजिक न्याय विभागाकडून कर्ज रुपाने मिळते व ५ टक्के सोसायटीची इक्विटी असते. सामाजिक न्याय विभागाकडून इक्विटीकरिता मदत दिली जाते.

ही योजना ५:४५:५० अशी आहे. म्हणजे ५ टक्के स्वतःचे भाग भांडवल, ४५ टक्के शासनाकडून भागभांडवल आणि ५० टक्के कर्ज अशी योजना आहे. या योजनेसाठी विभागाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाबाबत माहिती देताना सचिवांनी सांगितले की, सन २०११-१२ करिता तरतूद करताना दिनांक १.४.२०११ रोजी ४० कोटी रुपये प्रलंबित दायित्व होते आणि ते सहा प्रकल्पांसाठी होते. यामध्ये दोन परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाले, त्यांना निधी देण्यात आला. प्रस्ताव प्राप्त न होण्याची वेगवेगळी कारणे आहेत. पूर्वीचे सहा प्रकल्प मंजूर होते त्यांना पुढील वर्षासाठी निधी लागेल असा अंदाज करून विभागाने २५ कोटी रुपयांची मागणी केली होती. परंतु सहा पैकी फक्त दोनच प्रस्ताव विभागाकडे प्राप्त झाले. अन्य चारजणांपैकी दोघांकडून प्रस्ताव आले नाहीत. अन्य दोघांकडून प्रस्ताव आले त्यामध्ये एका प्रकरणामध्ये लेखापरिक्षणाची अडचण होती आणि दुसऱ्या प्रकरणामध्ये अगोदर दिलेला जास्त निधी शिल्लक होता त्यामुळे आणखी निधी देणे व्यावहारीक नव्हते. ज्यांचे प्रस्ताव आले परंतु त्यांना निधी दिला नाही. त्या संस्थेची नावे प्रबोधनकार ठाकरे मागासवर्गीय सूतगिरणी, सातारा आणि प्रियदर्शनी मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी, लातूर अशी आहेत. ज्यांना कर्ज दिले त्यांची नावे तसेच त्यांची काही थकबाकी बाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जी सूतगिरणी उभारणीखाली आहे तेथे थकबाकीचा प्रश्न येत नाही. सूतगिरणी सुरू झाल्यानंतर थकबाकीचा प्रश्न येऊ शकतो. गौतम मागासवर्गीय सूतगिरणी, नागपूर आणि मधुकरराव घाटे, मुखेड या सूतगिरण्यांना भागभांडवल दिलेले आहे. सूतगिरणीची निवड करण्याची पद्धत विषद करताना सचिवांनी सांगितले की, प्रथम सूतगिरणीचे रजिस्ट्रेशन करण्यासाठी अर्ज करावा लागतो. रजिस्ट्रेशन झाल्यानंतर त्या सूतगिरणीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर येतो आणि मंत्रिमंडळात सूतगिरणीची निवड करण्यात येते.

विभागाने ज्या सूतगिरण्यांना फंड वितरित केला त्या सूतगिरण्या सुरू आहेत काय ? तसेच आतापर्यंत या सूतगिरण्या चालू का झाल्या नाहीत याबाबत समितीने आश्चर्य व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, उपरोक्त दोन्ही सूतगिरण्या उभारणीखाली आहेत, त्यांच्या मशिनरी आलेल्या आहेत, आता त्या चालू होतील. एक सूतगिरणी सुरु करण्यासाठी ५३ कोटी रुपये खर्च येतो. आता तो ६० कोटी रुपयांवर गेला आहे. विभागाने ज्या सहकारी सूतगिरणीला निधी दिलेला आहे त्या सूतगिरण्याची किंमत ५३ कोटी रुपये होती. विभागाकडून ५३ कोटी रुपयांपैकी जवळपास ४५ टक्के रक्कम भागभांडवल. रुपयांमधे देण्यात येते.

शासनाकडे जेवढा निधी उपलब्ध असेल त्यातून तो देण्यात येतो. एकूण दायित्व आणि तरतूद यामध्ये तफावत असते. सूतगिरणी दोन वर्षामध्ये पूर्ण होऊ शकते. त्यासाठी दोन गोष्टींची आवश्यकता आहे पहिली गोष्ट म्हणजे निधी आणि दुसरी गोष्ट म्हणजे निर्णय. निधी असताना तो खर्च न होण्याचे कारण म्हणजे केसमध्ये उणिवा असल्यामुळे निधी मिळत नाही त्यामुळे काम रखडते. विभागाने जनरल कॅटेगरीमध्ये पुनर्नियोजन करून निधी घेतला त्यावर्षी २७० कोटी रुपये दायित्व होते आणि त्यामध्ये ३० केसेस होत्या. तसेच विभागास अर्थसंकल्पात पाहिजे त्याप्रमाणे तरतूद मिळत नाही. ज्याप्रमाणे मान्यता दिली त्याप्रमाणे तरतूद मिळत नाही. त्याबाबत शासनाच्या काही मर्यादा आहेत.

विशेष घटक योजनांसाठी किंवा आदिवासीसाठींच्या योजनांसाठी मिळणारा निधी खर्च होत नाही. सर्वसाधारण योजनेमध्ये निधीची कमतरता आहे. विशेष घटक योजनेंतर्गत असणारी सूतगिरणी असो किंवा आदिवासी क्षेत्रातील सूतगिरणी असो, या योजनांसाठी मिळणारा निधी व्यपगत होतो किंवा शेवटच्या क्षणी तो सर्वसाधारण योजनेकडे वळविण्यात येतो. तेव्हा विभागाने विशेष घटक योजनांतर्गत मिळाणारा निधी व्यपगत होणार नाही यादृष्टीने काम करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले. सर्वसाधारण योजनेमध्ये निधीची कमतरता असते. या ठिकाणी बचत झालेली आहे. तीच परिस्थिती आदिवासी योजनांच्या बाबतीत असते. तेव्हा योजनेमध्ये बदल करण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्यात आली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, विशेष घटक योजना आणि आदिवासी उपयोजनेचा निधी सर्वसाधारण योजनेमध्ये वळविता येत नाही. विशेष घटक योजनेमध्ये सूतगिरणी घेण्यासाठी संबंधितांना बोलावून प्रकल्प मार्गी लावण्यासाठी विभाग पातळीवर फार प्रयत्न झालेले आहेत. सचिव आणि संचालक पातळीवर किती बैठका घेतल्या त्याची माहिती देता येईल. प्रस्ताव न येण्याची काय कारणे आहेत याचा विभागाने अभ्यास केलेला आहे. याबाबत विभागाचा दरवर्षी आढावा घेण्याचे काम चालू असते. सन २०१५-२०१६ मध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक खर्च झालेला आहे. विशेष घटक योजनेमध्ये जास्त अडचणी आहेत.

या योजनेमध्ये शासनाचे ४५ टक्के भागभांडवल असते. त्याशिवाय विभाग आणखी ५ टक्के वितरित करतो या सर्व गोष्टी असताना देखील प्रोत्साहन मिळत नाही. या योजनेस चालना देण्याची गरज आहे. या क्षेत्राला आणि विशिष्ट वर्गाला मदत करण्यासाठी विशेष घटक योजना तयार करण्यात आली आहे. या वर्षी विभागाकडे किती प्रस्ताव प्राप्त झाले आहेत ? शासन एका खिडकीद्वारे ४५ एनओसी देणार आहे. या घटकाला मदत करण्यासाठी ही प्रक्रिया आणखी सोपी कशी करता येईल या दृष्टीने विभागाने काम करावे, अशी अपेक्षा समितीने व्यक्त केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भात विभागाचे प्रयत्न चालू आहेत आणि पुढे देखील प्रयत्न चालू राहतील. फक्त प्रस्ताव वेळेवर आणि परिपूर्ण आले पाहिजेत. आतापर्यंत

चार प्रस्ताव (पाईप लाईनमध्ये) प्रगती पथावर आहेत. ते लवकरात लवकर येतील. विभागाने या कार्यपद्धतीचा अभ्यास केलेला आहे. या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्यासारखे काही नाही. पहिली गोष्ट म्हणजे स्वतःचे भागभांडवल जमा करणे आवश्यक आहे. ते भागभांडवल जमा केले नाही तर शासनाकडून निधी मिळत नाही. तेव्हा या नियमामध्ये बदल करणे शक्य नाही. तसेच बँकेकडून उर्वरित रक्कम मिळवून घेणे आवश्यक आहे हा नियम मागासवर्गीयांसाठी लागू होत नाही कारण त्यांना समाज कल्याण विभागाकडून कर्ज मिळते आणि लेखापरीक्षण विभागास या वर्षी रक्कम वितरित करावयाची असेल तर विभागाकडून मागील सन २०१३-२०१४ पर्यंतचे लेखापरीक्षण पहाण्यात येते. नव्याने स्थापन झालेल्या सूतगिरणीच्या बाबतीत मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण देणे आवश्यक नाही.

एखादी नवीन संस्था उभी राहिली, संस्था चांगली असली, त्यांच्याकडे निधी उपलब्ध असला अशा नवीन संस्थेने मागणी केली तर त्या संस्थेला भागभांडवल देण्यात येईल काय ? नवीन संस्थेचे प्रपोझल आले तर ते मान्य करण्यात येईल काय ? या संदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, संस्था नोंदणीपर्यंतच्या गोष्टी संचालकांकडे असतात. नोंदणी झाल्यानंतर शासन किती निधी उपलब्ध आहे, सूतगिरणीची काय परिस्थिती आहे या सर्व गोष्टी तपासणे. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील कापूस उत्पादक क्षेत्रात ज्या तालुक्यांमध्ये आजपर्यंत कोणतीही सहकारी तत्त्वावर सूतगिरणी देण्यात आलेली नाही, त्याठिकाणी सूतगिरणी देण्याची शासनाची योजना आहे. मागील तीन महिन्यांत मंत्रिमंडळाने पाच मागासवर्गीय संस्थांना मान्यता दिलेली आहे.

प्रधान शीर्ष ४४२५ सहकारावरील भांडवली खर्च या शीर्षांतर्गत १०८ (०४) (०१) सहकारी सुतगिरण्यांना भाग भांडवली अंशदान या खाली ८ लाख रुपयांची बचत झाली आहे. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सहकारी सूतगिरण्यांना भाग भांडवल देण्याचा विषय आहे. परंतु त्या सर्वसाधारण वर्गातील आहेत. यामध्ये अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा जास्त खर्च झालेला आहे. तो पुनर्विनियोजनकरून सदर निधी वापरण्यात आलेला आहे.

वित्त विभागाने सर्वच ठिकाणी कपात केलेली आहे, या ठिकाणी वित्त विभागाने निधीत कपात केली नाही काय ? दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी किती देणे बाकी आहे ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, वित्त विभागाने कपात केली आहे. सर्वसाधारण वर्गामध्ये सद्यःस्थितीत १७२ कोटी रुपये दायित्व शिल्लक आहे आणि मागासवर्गीयांसाठी नवीन ५ सूतगिरण्या मान्य केलेल्या आहेत त्याचे दायित्व २०१ कोटी रुपये आहे.

प्रधान शीर्ष ४४२५ सहकारावरील भांडवली खर्च याअंतर्गत १०८ (३) (३) सहकारी साखर कारखान्यांना सहवीज निर्मितीसाठी भाग भांडवल अंशदान या संदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी

सांगितले की, राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना सहवीज निर्मिती प्रकल्प उभारणीसाठी शासकीय भागभांडवल देण्याची ही योजना आहे. ही योजना सन २००८ पासून सुरू करण्यात आली. सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षात १७ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती त्यात कपात करून वित्त विभागाकडून १५ कोटी रुपये मिळालेले आहेत. प्राप्त मूळ अनुदान १५ कोटी रुपयांमध्ये पुनर्विनियोजन करून १२.७५ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आलेले आहे.

समितीने विचारणा केली की, स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेले आहे की, उपलब्ध तरतुदीतून वितरित शासकीय भागभांडवल वजा जाता रुपये २२५.०० लक्ष रुपयांची बचत झाली आहे आणि सदर बचत समर्पित केली आहे. ही रक्कम समर्पित करण्यात आलेली आहे की कपात करण्यात आलेली आहे ? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कपात करण्यात आली आहे. समितीने त्यानुसार उत्तरात दुरुस्ती करण्यास सांगितले.

सन २००८ पासून ही योजना सुरू आहे. सन २००८ पासून सन २०११-२०१२ पर्यंत सहवीज निर्मितीसाठी साखर कारखान्यांना किती निधी देण्यात आला ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी माहिती उपलब्ध नसून समितीस नंतर सादर करण्यात येईल असे सांगितले (तथापि अद्याप माहिती अप्राप्त आहे.)

सन २००८ पासून २०११-२०१२ पर्यंत ६०-७० कोटी रुपये खर्च केले, असे गृहीत धरले तरी, सहवीज निर्मितीचे वीज निर्मिती आणि वीज वितरणाचे लेखापरीक्षण शासनाच्या कोणत्या व्यवस्थेमार्फत करण्यात येते ? एखाद्या कारखान्याने किती सहवीज निर्मिती केली, त्यापैकी किती वीज वितरित केली हे पाहण्याची व्यवस्था आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सहकार विभागाकडे लेखापरीक्षण विभाग असून त्या विभागामार्फत लेखापरीक्षण केले जाते.

सहकार विभागामध्ये प्रशासकीय आणि लेखापरीक्षण असे दोन विभाग आहेत. साखर कारखान्यांनी किती सहवीज निर्मिती केली, त्याचा किती वापर झाला ? ही माहिती आता उपलब्ध नाही. ती नंतर समितीला सादर करण्यात येईल. तथापि अद्याप माहिती अप्राप्त आहे.

६ कारखान्यांना १२.७५ कोटी रुपये दिले आहेत. ६ कारखान्यांची एकूण किती मागणी आली होती? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, ६ साखर कारखान्यांची एकूण मागणी १७.३१ कोटी रुपयांची होती. अर्थसंकल्पात १५ कोटी रुपयांची तरतूद मान्य झाल्याने त्यामध्ये सव्वादोन कोटी रुपयांचा कट लागला होता. ५ साखर कारखान्यांची मागणी प्राप्त झाली होती त्यामुळे त्यांना पैसे दिले आणि एका साखर कारखान्याची मागणी शेवटी आल्यामुळे त्यांना कमी पैसे दिले गेले. वसंत शिरोमणी सहकारी साखर कारखाना, सोलापूर असे त्या साखर कारखान्याचे नाव असून त्यांची मागणी उशिरा आली होती.

सन २००८ ते सन २०१५-२०१६ पर्यंत ज्या साखर कारखान्यांमध्ये सह वीजनिर्मिती प्रकल्प आहेत, त्यांची विद्युत लेखापरीक्षणाची माहिती समितीस देण्याबाबत समितीने सूचित केले. तथापि अद्याप माहिती अप्राप्त आहे.

विभागाने एका साखर कारखान्याला ४.५८ कोटी रुपये दिले आणि एका साखर कारखान्याला केवळ ५ लाख रुपये दिले आहेत. त्या साखर कारखान्याने किती रुपयांची मागणी केली होती? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एका साखर कारखान्याचा प्रस्ताव उशिरा आल्यामुळे त्यांना शिल्लक राहिलेले पैसे देण्यात आले. सदरहू साखर कारखान्याला २९ मार्च २०१२ रोजी पैसे वितरित केले आणि बाकीच्या कारखान्यांना जुलै, २०११ मध्ये पैसे वितरित केलेले आहेत.

या साखर कारखान्यांना सदरचा निधी कसा उपलब्ध करून दिला जातो? निधीची मागणी कशाच्या आधारे केली जाते ? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ३० टक्के निधी साखर विकास निधीतून, ६० टक्के निधी वित्तीय संस्थांकडून, ५ टक्के शासन भाग भांगडवलामधून आणि ५ टक्के निधी साखर कारखान्यांनी स्वतः उभा करावयाचा असतो. दिल्लीमध्ये केंद्र सरकारकडे या अनुषंगाने स्वतंत्र निधी आहे. एकूण प्रकल्पाच्या खर्चाच्या ६० टक्के कर्ज मिळते. ३० टक्के केंद्र सरकारकडून, ५ टक्के निधी संस्थेने उभारावयाचा आणि ५ टक्के निधी शासन देते.

ज्या कारखान्याला ५ लाख रुपये दिले आहेत त्याचे स्पष्टीकरण येत्या पंधरा दिवसांत समितीला देण्यात यावे. असे समितीने विभागास सूचित केले. तथापि अद्याप माहिती अप्राप्त आहे.

शासन साखर कारखान्यांना सह वीजनिर्मितीसाठी मदत करते, याप्रमाणे दारू निर्मितीला मदत करण्यात येते काय? एकूण प्रकल्प खर्चामध्ये वीज प्रकल्प आणि दारू प्रकल्प यांचा समावेश आहे काय? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, दारू प्रकल्पाला शासन मदत करीत नाही. सह वीज प्रकल्पासाठी ही योजना आहे. वीज प्रकल्पाच्या प्रोजेक्ट कॉस्ट विरुद्ध ही रक्कम दिली जाते. शासनाने ५ प्रकल्पांना निधी दिलेला आहे, त्यांची वीजनिर्मिती झालेली आहे किंवा नाही, याची माहिती घ्यावी लागेल. यासंदर्भात प्रत्येक वर्षी सह वीजनिर्मितीसाठी किती पैसे दिले आहेत, यासंबंधीची माहिती समितीला देण्याबाबत समितीने विभागास सूचित केले तथापि अद्याप माहिती अप्राप्त आहे.

प्रधान शीर्ष ४४२५-सहकारावरील भांडवली खर्च या शीर्षांतर्गत १०८ (०४) (०२) सहकारी सूत गिरण्यांना भाग भांडवली अंशदान यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, या सर्व प्रकल्पांसाठी ७ कोटी १२ लाख रुपयांची तरतूद केली होती त्यावेळी प्रस्ताव प्राप्त झाले होते. काही सूत गिरण्यांकडे मागील वर्षी दिलेला निधी मोठ्या प्रमाणात शिल्लक होता. जोपर्यंत शिल्लक निधी खर्च होत नाही

तोपर्यंत पुढील वर्षाचा निधी दिला जात नाही. जुलै, २०१३ मध्ये निधी दिलेला आहे. माहे जानेवारी, २०१६ पर्यंत ५५ हजार सूत गिरण्या चालू आहेत.

५ कोटी रुपयांच्या नियोजनासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, ५ कोटी रुपये फक्त एका प्रकरणासाठी होते. एनसीडीसी योजनेसंदर्भातील विस्तारासंबंधी एक प्रकरण होते. ज्यावेळी प्रस्ताव प्राप्त झाला होता त्यावेळी असे निदर्शनास आले की, सूत गिरण्यांनी मागील वर्षी दिलेले पैसे खर्च केलेले नाहीत.

१०८ (०२) (०८) कृषि संस्करण संस्थांमधील भाग भांडवली अंशदान या अंतर्गत केलेल्या तरतुदीबाबत माहिती देताना विभागास सचिवांनी सांगितले की, पहिली योजना एनसीडीसीची होती. ही योजना राज्य सरकारची अंशदान योजना म्हणून राबविली जात होती. कोकणामध्ये दिनांक २४ जून २०१५ रोजी राज्य मंत्र्यांची एक बैठक झाली होती. सदरहू बैठकीत कोकण विभागासाठी काजू, आंबा या फळपिकांना विशेष पॅकेज देण्यासाठी तरतूद केली होती. त्या अनुषंगाने ८ कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी करण्यात आली होती. यातील काही रक्कम इतर योजनांसाठी वापरावी लागली. काजू प्रक्रियेसाठी दोन प्रस्तावांना मंजुरी दिली होती. ५ कोटी रुपयांची तरतूद होती.

५ कोटी रुपयांची तरतूद होती. त्यानंतर ती ८ कोटी रुपये करण्यात आली. या रकमेत १५ टक्के कपात करण्यात आली. यातील २.६० कोटी रुपये खर्च केले. अतिरिक्त मागणी केली, परंतु मूळ रक्कमच खर्च झालेली आहे. विभागाकडे ठोस उपाययोजना नसताना विभागाने निधीची तरतूद केली. विभागाकडील पूर्वीचे पैसे खर्च झाले नाहीत. हे सर्व घाईगडबडीने झाले असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, शासनाने कोकण पॅकेजसाठी तरतूद केली होती. जून महिन्यात कॅबिनेट झाली होती आणि जुलै महिन्यात अधिवेशन होते, त्यामुळे अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आली. या योजनेमध्ये दोन भाग आहेत. सहकारी संस्थांचे भाग भांडवल आणि काजू व आंबा प्रक्रियेला मदत असे हे दोन धरक आहेत. पणन महामंडळामार्फत लघु काजू प्रक्रियेसाठी ४४५ प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्या अनुषंगाने प्रत्येकी एक लाख रुपये असे मिळून एकूण १.१६ कोटी रुपये खर्च केलेले आहेत. देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेला ४२.५८ लाख रुपये दिले होते.

निधीची मागणी नसताना कॅबिनेट मध्ये फक्त फळपिकांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय झाल्यामुळे, व मूळ तरतूद रु. पाच कोटी खर्च झाला नसतानाही, पावसाळी अधिवेशनात निधीची मागणी करण्यात आली. डिसेंबर, मार्च महिन्याच्या अधिवेशनामध्ये सदरची मागणी करता आली असती. जून महिन्यात कॅबिनटेमध्ये निर्णय झाला आणि लागलीच जुलै महिन्यात अतिरिक्त पुरवणी मागण्यांमध्ये निधी मंजूर करण्यात आला. पूर्वीचे पैसे अखर्चित होते, ८ कोटी रुपयांची घाईगडबडीत तरतूद केलेली आहे. हा परिच्छेद आक्षेपार्ह. असल्याचे मत समितीने व्यक्त करून कोणाच्या आदेशावरून ही तरतूद करण्यात आली, याला कोण जबाबदार

आहे, यासबंधीची माहिती समितीला कळविण्यात यावी असे समितीने सूचित केले व विभागीय प्रतिनिधींनी त्यास मान्यता दर्शविली. तथापि माहिती अद्याप अप्राप्त आहे.

प्रधान शीर्ष ४४३५ इतर कृषिविषयक कार्यक्रमांवरील भांडवली खर्च या शीर्षांतर्गत-१९९ (०१) (०१) आशियाई विकास बँक सहाय्यित कृषिविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम (कृषिविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम (राज्य हिस्सा) व १९९ (०१) (०२) आशियाई विकास बँक सहाय्यित कृषिविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम (कृषिविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम) (बाह्य हिस्सा) (राज्य योजना) यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हे दोन्ही परिच्छेद एकाच योजनेसाठी आहेत. (०१)(०१) ही राज्य योजना आणि दुसरा राज्य हिस्सा आहे. यासंदर्भात Asian Development Bank सोबत वाटाघाटीकरून Intigreated Value Chain चा प्रस्ताव मंजूर केला. या Intigreated Value Chain मध्ये शेतकऱ्यांसाठी शेतापासून फक्त भाजीपाला व फळांसाठी व्हॅल्यू चैन निर्माण करण्याचा प्रस्ताव होता. खाजगी संस्थेच्या सहाय्याने भाजीपाला व फळांचे पॅकिंग, कोल्ड स्टोरेज, तसेच वाहतुकीसाठी रेफ्रिजरेटेड व्हॅन्स उपलब्ध करून देणे, इत्यादी व्यवस्था निर्माण करण्याची यामध्ये संकल्पना होती. या प्रकल्पाचा एकूण खर्च १२०९ कोटी रुपये असून आशियाई विकास बँकचे ४०० कोटी रुपये, राज्य शासनाचे ९४ कोटी रुपये आणि खाजगी गुंतवणुकदाराचे ७१५ कोटी रुपये आहेत. इंटिग्रेटेड व्हॅल्यू चैन ही खाजगी प्रायव्हेट पार्टनर म्हणून करण्याचा करार करण्यात आला, परंतु सदरचा करार करण्यास उशीर झाला होता.

याबाबत समितीने विचारणा केली की, ७५ लाख रुपये कशासाठी खर्च झाले? पुढील कालावधीत ही योजना राबविली जाणार आहे का ? सन २०१२ ते २०१४ या योजनेतंर्गत सदरची रक्कम खर्च झालेली आहे काय ? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, प्रोजेक्ट मॅनेजमेंट तयार करण्यासाठी सदरची रक्कम खर्च झालेली आहे. सुरवातील ६ इंटिग्रेटेड व्हॅल्यू चैन निर्माण करण्याची संकल्पना होती. त्यातील पहिले दोन टेंडर्स काढले. पहिल्या टेंडरमध्ये नाशिक, जळगाव, अहमदनगर, या जिल्ह्यांचा समावेश होता. यामध्ये द्राक्ष, डाळिंब, केळी, टोमॅटो यांचा समावेश होता आणि दुसऱ्या टेंडरमध्ये औरंगाबाद, अमरावती, बुलढाणा, अकोला, अमरावती, या जिल्ह्यांसाठी केसर आंबा, मोसंबी, संत्रा, केळी ही पिके घेतली होती. पहिले टेंडर ११७ कोटी रुपयांचे आणि दुसरे टेंडर ४४ कोटी रुपयांचे काढले होते, परंतु सदरहू टेंडर्सला प्रतिसाद मिळाला नाही. आता पुन्हा टेंडर्स काढले असून त्याची शेवटची तारखी १६ जानेवारी २०१६ आहे.

प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी ७५ लाख रुपये खर्च केले आहेत. सदरचा प्रकल्प अहवाल चुकीचा होता विभाग केवळ या योजनेचा प्रयोग करीत आहे, परंतु सदरहू योजनेची संकल्पना साकार झाली नाही, त्यामुळे शासनाचे ७५ लाख रुपये वाया गेले आहेत काय? अशी विचारणा समितीने केली असता,

विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदरचा पहिला प्रयोग भारतात करण्यात येत आहे. एशियन डेव्हलपमेंट बँकेने महाराष्ट्र आणि बिहार या दोन राज्यांसाठी सदरचा प्रयोग सुचविला होता. सुरुवातीला काय अडचणी येतील, याची संपूर्ण जाणीव नव्हती. विभागाने पहिल्यांदा टेंडर काढले त्यामुळे त्याला प्रतिसाद मिळाला नाही.

सदरचा प्रकल्प किती कोटी रुपयांचा होता, यासाठी ७५ लाख रुपये खर्च झाले आहेत, त्यामध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश होता? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर प्रकल्प १,२०० कोटी रुपयांचा होता त्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन पथक (प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट) स्थापित करावे लागले, त्यामध्ये १-२ सल्लागार आहेत, डीपीआर तयार करावा लागला.

ही फक्त कन्सल्टिंग फी आहे. कन्सल्टिंग फीमध्ये डॉक्युमेंटेशन येते. ७५ लाख रुपये एकदा खर्च झाल्यानंतर पुढच्या वर्षी आणखी खर्च झालेला आहे का ? हा नेहमीचा होणारा खर्च आहे का ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हि कल्सल्टिंग फी नसून यामध्ये डॉक्युमेंटेशनही आहे. तसेच या प्रकल्पाचा आढावा केंद्र सरकारच्या स्तरावर वारंवार घेतला जातो.

आढावा घेणे हे ठीक आहे. एका प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनीला विभागाने एकदा ७५ लाख रुपये दिले, त्यानंतर वेळोवेळी अशाप्रकारे सल्ला घेतला जातो का ? सन २०१२, सन २०१३, सन २०१४ मध्ये खर्च झालेला आहे की फक्त ७५ लाख एकदाच दिले आहेत ? यासंदर्भात माहिती समितीस सादर करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींना समितीस आश्वासित केले तथापि, माहिती अप्राप्त आहे.

या संदर्भात मागच्या २२-२३ तारखेला एशिअन डेव्हलपमेंट बँकचे लोक आले होते, त्यावेळी स्पष्ट केले आहे. ही भूमिका विभागाने राज्य शासनाच्या वतीने केंद्र शासनाकडेही मांडली आहे. केंद्र शासनाने विनंती केली होती की, शेवटची संधी द्यावी, यानंतर प्रकल्प पुढे चालणार आहे.

एशियन डेव्हलपमेंट बँकला सुद्धा यात सहभागी करावे कारण कन्सल्टंसी चार्जेस आहेत, त्यामध्ये त्यांनी सुद्धा सहभाग घेतला पाहिजे. विभागानेच सर्व पैसे कशासाठी खर्च केले पाहिजेत ? सहभाग त्यांचाही असला पाहिजे, कारण एशियन डेव्हलपमेंट बँकेला देखील फायदा होणार आहे. पूर्ण पैसे शासनाने द्यावेत हे योग्य नाही. शेवटची संधी द्यावी असे केंद्रशासनाने म्हटले. पण शासनाचे ७५ लाख रुपये तर गेले आहेत. असे मत समितीने व्यक्त केले. ७५ लाख रुपयांच्या संदर्भात विस्तृत माहितीची नोट द्यावी. प्रकल्पाच्या डिटेल्समध्ये कोणत्या स्वरुपाची मॅनेजमेंट कन्सल्टंसी आहे, त्यांनी कोणते उपक्रम उभे करायचे आहेत, त्या माध्यमातून काय साध्य करायचे आहे या संदर्भातील माहिती समितीला पाठवावीत, अशी सूचना समितीने केली तथापि विभागाकडून अद्याप माहिती प्राप्त नाही.

प्रधानशीर्ष ४८५१ ग्रामोद्योग व लघु उद्योग यावरील भांडवली खर्च या शीर्षांतर्गत १०९(०२)(३३) यंत्रमाग सहकारी संस्थांना भाग भांडवली अंशदान (राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ) या संदर्भात माहिती

देताना विभागास सचिवांना सांगितले की, सदर विषय यंत्रमाग सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान देण्याबाबतचा आहे. सन २०११-१२ मध्ये यासाठी २ कोटी ३९ लाख रुपयांची तरतूद केली होती. त्यावेळी अपेक्षित प्रस्ताव २२ होते, २२ पैकी ४ प्रस्तावांच्या संदर्भात पाठपुरावा करण्यात येत होता. त्यावेळी अशी माहिती आली की, ४ प्रस्तावांनी पूर्वी दिलेल्या अर्थसहाय्याचा विनियोग बरोबर केला नव्हता. एनसीडीसीने ९ संस्थांची मान्यता रद्द केली होती. उर्वरित ९ प्रस्तावांपैकी ३ जणांनी प्रस्ताव सादर केले नव्हते. ६ संस्थांनी प्रस्ताव सादर केले होते, ज्या ६ संस्थांनी प्रस्ताव सादर केले होते, त्यांना विभागाने १ कोटी ३५ लाख रुपये मंजूर केले होते.

प्रधानशीर्ष ५४७५ - इतर सर्वसाधारण आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च या शीर्षांतर्गत १०२(०२)(०१) टर्मिनल मार्केट/आधुनिक कृषी बाजार उभारण्याकरिता अंशदान या संदर्भात माहिती देताना विभागास प्रतिनिधींनी खुलासा केला की, केंद्र सरकारने शेत मालाला जास्त भाव मिळावा आणि नाशवंत वस्तुंचे नुकसान कमी व्हावे या दृष्टीने ही संकल्पना हार्ड ॲण्ड स्ट्रोक मॉडेलवर नॅशनल हॉर्टिकल्चर मिशनखाली मांडली आहे. राज्य शासनाने ३ ठिकाणी मुंबई, नाशिक व नागपूर येथे टर्मिनल मार्केट उभे करण्याचे नियोजन केले होते. परंतु तेथे काही तांत्रिक अडचण आल्यामुळे खर्च करता आली नाही किंवा ते काम पुढे गेले नाही. मुंबई टर्मिनल मार्केटच्या संदर्भात टेंडर काढले होते. पण काही अटींची पुर्तता होत नसल्याने विभाग कार्यादेश (वर्क ऑर्डर) देऊ शकला नाही. नागपूरमध्ये जमीनीचे वाटप झाले होते, त्यावर न्यायालयाने स्थगिती दिली. नाशिकमध्ये अजून जमीनीचे वाटप झालेले नाही, म्हणजे जमिनीचा ताबा मिळालेला नाही आणि मंत्रिमंडळाची मान्यता सुद्धा प्राप्त नाही. ती शासनाची जागा आहे.

१ कोटी २७ लाख रुपयांचा खर्च झालेला आहे, तो कशासाठी केला आहे ? विभागाने एक्सपोर्टला प्रोत्साहन देण्यासाठी एक्सपोर्ट टर्मिनल किंवा एक्सपोर्ट सेंटर उभे केले आहे का ? या संदर्भात विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, फळे व भाजीपाला यांचे एक्सपोर्ट प्रमोशन करण्यासाठी मार्केटिंग बोर्डाला फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, राहता, अहमदनगर यासाठी काही निधी मंजूर केला आहे, निर्यात सुविधा केंद्र, मोहाडी, दिंडोरी तालुका, नाशिक यासाठी ५१ लाख रुपये निधीची मंजुरी दिली आहे असे एकूण १ कोटी २७ लाख ३५ हजार रुपये दिले आहेत. विभागाने एक्सपोर्ट टर्मिनल उभे केलेले नाही. विभाग यामध्ये सुविधा निर्माण करतो. कोल्ड स्टोरेजेस, पॅक हाऊसेस, वॉशिंग फॅसिलिटी या सुविधा सर्वांना देण्यात येणार आहेत. यामुळे एक्सपोर्टला चालना मिळेल या हेतूने हे सर्व केले आहे. यामध्ये जमिनीचे वाद नाही. पॅक हाऊसेस, वॉशिंग फॅसिलिटी या दोन्ही फॅसिलिटी सुरू आहेत. कोल्ड स्टोरेज सुरू आहे.

चांगल्या कामाकरिता हे टमिर्नल उभे राहणार होते. मुंबई, नाशिक, नागपूर येथे हे टर्मिनल उभे राहणार होते. त्या दृष्टीने ही सर्व तरतूद होती. पण आता या क्षणाला सद्यःस्थिती काय आहे ? सध्या शासनाची भूमिका

या टर्मिनल मार्केटबद्दल काय आहे ? या संदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर संकल्पनेमध्ये खाजगी लोकांनी हे मार्केट उभे करायचे आणि विभाग व्हायबिलिटी गॅप फंडिंग म्हणून त्यांना निधी देणार. निविदा तत्त्वावर ही कामे दिली जातील. मुंबईमध्ये कल्याण येथे टर्मिनल मार्केट उभे करायचे होते. जागेचे वाटप झाले. निविदा काढली होती. त्यामध्ये यशस्वी बोलीदार होता, मात्र त्याला शेतमाल हाताळण्याच्या संदर्भात अनुभव नसल्यामुळे केंद्र सरकारचा थोडा आक्षेप होता म्हणून वर्क ऑर्डर दिली नाही. आता तेथे प्रत्यक्ष काहीच नाही. नागपूर व नाशिक संदर्भात नाशिकची अजून जागाच वाटप झालेली नाही. त्यामुळे विभागास निविदा काढता आली नाही. नागपूरमध्ये जागा मिळाली होती परंतु तत्संदर्भात न्यायालयाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे विभागास त्याचीही निविदा काढणे शक्य झाले नाही. सद्य:स्थितीत नागपूरच्या प्रकरणामध्ये सरकारी वकील नेमून स्थगिती उठविण्याचा प्रयत्न विभाग करीत आहे. नागपूर अधिवेशन काळात विभागीय आयुक्त व मुख्यमंत्री यांच्या स्तरावर देखील बैठक झाली होती. परंतु त्यात विभागाला न्यायालयात यश मिळाले नाही.

एका मार्केटसाठी ५० कोटी रुपयांची तरतूद झाली होती. १५० कोटी रुपयांचे नुकसान झाले असून हे शेतकऱ्यांचे नुकसान आहे, आता परिस्थिती अशी आहे की, उक्त तीनही ठिकाणी टर्मिनल होणार नाही हे विभागाने स्वीकारले आहे. एक्सपोर्टसाठी इतर खर्च दिला आहे. विभागाला जे अनुदान मिळणार होते ते परत गेले आहे. मग हे तीनही प्रकल्प दुसरीकडे वळविता आले नाहीत का ? की पुढील वर्षीही तसाच तोटा विभाग सहन करणार आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हे नुकसान नाही. केंद्र सरकारचे नॅशनल हॉर्टिकल्चर मिशन आहे, त्यासाठी अनुदान मिळणार होते. केंद्र सरकारने केलेली तरतुद न वापरल्यामुळे हाच निधी त्या योजनेखाली इतर घटकांवर वापरण्याची त्यांनी परवानगी दिली आहे. त्यामुळे राज्य शासनाचे नुकसान झालेले नाही.

विभागाला केंद्र सरकारने तशी परवानगी दिली असेल तर तीनही प्रकल्पांसाठी दुसऱ्या ठिकाणी टमिर्नलची जागा विभागाकडून सुचविण्यात येत आहे का ? मुंबई, नाशिक व नागपूर येथे हे प्रकल्प होऊ शकत नाहीत. इतर ठिकाणचे प्रस्ताव पाठविण्यात आले का ? किंवा त्याचा तसा विचार विभागाने केला का ? दुसऱ्या योजनेंतर्गत तो खर्च केला का ? १५० कोटी रुपयांपर्यंत किती खर्च झाला ? यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हा निधी एमआयडीएचमध्ये जे इतर घटक आहेत त्यासाठी व लागवडीसाठी शेतकऱ्यांना अनुदान म्हणून दिला जातो. हा निधी मुंबई, नाशिक व नागपूर येथे प्रकल्प सुरू न झाल्यामुळे दुसरीकडे खर्च केला आहे. यासाठी स्वतंत्र असा निधी नव्हता. यासाठी निकष असे आहेत की, ५० कोटी रुपयांपर्यंत खाजगी गुंतवणूकदारांना टर्मिनल मार्केटसाठी मदत देणे शक्य आहे. विभाग वार्षिक कृती आराखडा

तयार (Annual Action Plan) करीत असतो, त्यामध्ये काही रक्कम सुरुवातीला दाखविण्यात येते, ती न वापरल्यामुळे इतर घटकांवर खर्च करण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे नुकसान झालेले नाही.

सदर निधी दुसऱ्या कामासाठी वापरला आहे. यासाठी रु. १ कोटी २९ लाख रुपये खर्च केले आहेत. टर्मिनल मार्केटचे काम होणे शक्य नाही हे माहित असतांनाही जे अनुदान मिळणार आहे ते दुसरीकडे खर्च करण्याचा प्रस्ताव करणार आहेत का ? सद्यःस्थिती ही केंद्र सरकारची योजना सुरू आहे. परंतु यासाठी स्वतंत्र निधी नसतो. योजना ही योजना तीन ठिकाणी निष्फळ ठरली आहे. ती रद्दच केली आहे. परंतु या योजनेसाठी विभागाने दुसरी शहरे का निवडली नाहीत, जेथे अशी टर्मिनल होऊ शकतात, असे काही प्रस्तावित आहे का ? ३ ठिकाणी तर प्रकल्प होणारच नाहीत. यासाठी शासनाकडील मुंबई, पुणे, ठाणे व नागपूर या सारख्या जवळपास २६ महानगरपालिका क्षेत्रातील दुसरी शहरे प्रस्तावित केली आहेत का ? यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एशिअन डेव्हलपमेंट बँकच्या प्रकल्पाच्या संदर्भात निविदा काढले आहे. पण त्याला प्रतिसाद मिळाला नाही, फार कमी प्रतिसाद मिळाला. तसेच जो प्रतिसाद मिळाला तो विभागाला योग्य वाटला नव्हता म्हणून विभाग कार्यादेश (वर्क ऑर्डर) जारी करू शकला नाही. प्रायव्हेट इनिशिएटिव्ह मॉडेलच यशस्वी होणार की नाही यावर आता चर्चा सुरू आहे. एशिअन डेव्हलपमेंट बँकमध्ये टेंडर काढून पाहिले, तेथे प्रतिसाद मिळत नाही. व्हायबिलिटी गॅप फंडिंग मॉडेल हे प्रायोगिक तत्वावरच होत नाही.

त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, बाकीचा खर्च अगोदरच का केला ? केंद्र सरकार कृषी विभागाचे कोणतेही नवीन मॉडेल किंवा योजना यांची  राज्यात अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा प्रतिसाद मिळत नाही, लोक पुढे येत नाहीत. त्यामुळे विभागाने स्वाधिकारे काही पाऊले ऊचलण्याची घेण्याची आवश्यकता आहे. केंद्र शासनाच्या योजना येतील पण फायदा होणार नाही. योजना राबविण्यासाठी राज्यात सक्षम लोक नाहीत असे नाही. एफिशिएन्सी, इनिशिएटिव्ह कमी पडत आहे, या दृष्टीने विभागाने व्यक्तिशः लक्ष घातले तर लोक मिळतील. नागपूरला होत नसेल तर अमरावती, अकोला, जळगांव, ठाणे अशी पुष्कळ सेंटर आहेत. कुठेही सेंटर होऊ शकता. ठराविक ठिकाणी केले पाहिजे असे काही नाही. विभागाने यासाठी सचिव स्तरावर स्पेशल इनिशिएटिव्ह घेतला पाहिजे. लोकांना बोलाविले पाहिजे. लोक इच्छुक आहेत. अडचणी असतील तर त्यातुन मार्ग काढून पुढे जाण्याच्या दृष्टीने लक्ष घालावे नाही तर केंद्र सरकारच्या योजनांचा फायदा राज्य शासन घेऊ शकत नाही असे होईल. असे मत व्यक्त करुन समितीने विचारणा केली की, इतर राज्यांत अशा योजना झालेल्या आहेत का ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने टर्मिनलसाठी खर्च केलेला नाही. तसेच अशा प्रकारच्या योजना इतर राज्यात कुठेच झालेल्या नाहीत.

योजना निष्फळ ठरलेली नाही. शासनाने जागा उपलब्ध करून देणे आवश्यक होते आणि मग गुंतवणूकदाराने गुंतवणूक करणे गरजेचे होते. मात्र शासनाने लिटिगेशनमुळे जागाच उपलब्ध करून दिलेली

नाही. त्यामुळे मान्य झाले नाही. अमरावती नांदगावपेठला जागा आहे. तसा विचार केला तर पुष्कळ जागा उपलब्ध होऊ शकेल. राज्यात भाजी मंडया खूप आहेत, तेथे सुद्धा विचार करावा. यापूर्वीच्या प्रकरणी मुंबईत, ठाणे येथे जागा उपलब्ध होती. निविदा काढली. मुंबईत जागा मिळाली. पण बोलीदारास अनुभव नाही म्हणून त्यावर कार्यवाही झाली नाही त्यामुळे तशी अट टाकून पुन्हा टर्मिनल मार्केटसाठी निविदा काढण्यात आली आहे काय ? तसेच सदर योजनेच्या संदर्भात दुसऱ्या शहराचा प्रस्ताव विभाग पाठविणार आहे का, जेथे जागा उपलब्ध करून देता येऊ शकेल ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यासंदर्भात जागा उपलब्ध झाली असून निविदा प्रक्रिया सुरू आहे.

प्रधानशीर्ष ४८५१ ग्रामोद्योग व लघुउद्योग यावरील भांडवली खर्च अंतर्गत उपशीर्ष १०९(०२)(०८) कृषिसंस्करण संस्थांमधील भाग भांडवली अंशदान (कोल्हे समिती) (राज्य योजना) यासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, सदर विषय महाराष्ट्र राज्य सहकारी यंत्रमाग महामंडळास भागभांडवली अंशदान देण्याबाबतचा आहे. भागभांडावल देण्यासाठी २ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पण त्यांना आवश्यकता भासली नाही. त्यांच्याकडून प्रस्ताव आला नाही. त्यामुळे तो निधी वापरता आला नाही.

दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजी झालेल्या सन २०११-१२ विनियोजन लेखे अहवालातील परिच्छेदासंदर्भात विधी मंडळाच्या लोकलेखा समितीच्या साक्षीमध्ये मागणी/आश्वासित केल्यानुसार कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांना अर्थसहाय्य मंजुरीच्या प्रस्तवांच्याबाबतीत पुढीलप्रमाणे माहिती आहे :—

(१) सन २०१०-११ मध्ये प्राप्त झालेले प्रस्ताव

(२) सन २०१०-११ मध्ये मंजूर झालेले प्रस्ताव

(३) सन २०१०-११ मध्ये किती निधी खर्च झाला

(४) सन २०११-१२ मध्ये किती प्रस्ताव आले त्यापैकी अपूर्ण प्रस्ताव

(५) सन २०१२-१३ मध्ये व्हायबल नसलेले प्रस्ताव

(६) मागील ४-५ वर्षांपासून किती नियतव्यय होता

(७) मागील ४-५ वर्षांत किती प्रस्ताव आले

(८) मागील ५ वर्षांत किती निधी देण्यात आला किती नियतव्यय होता.

(९) कृषि प्रक्रिया सहकारी संस्था पात्र प्रस्ताव प्राप्त न होण्याची सर्वसाधारण कारणे

(१०) अर्थसहाय्य मंजुरीसाठी पात्रतेच्या अटी.

(२) वरील १ ते १० बाबत एकत्रित माहिती खालीलप्रमाणे :-

१) २०१० अखेर कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना अर्थसहाय्याचे एकूण ७० प्रस्ताव शासनास प्राप्त झालेले होते व सन २०१०-११ मध्ये नव्याने ५ प्रस्ताव प्राप्त झाले.

सन २०११-१२ मध्ये प्राप्त झालेल्या ५ प्रस्तावांपैकी परिपूर्णतेच्या अभावी एका प्रस्तावास मंजुरी होऊन निधी देण्यात आलेला नाही. तथापि, तत्पूर्वी प्रलंबित असलेल्या ७० प्रस्तावांपैकी १६ प्रकल्पांना मान्यता देण्यात आलेली असून शासकीय भागभांडवल रु.४५४.३१ लक्ष, रासविनी भागभांडवल रु.१७२.७० लक्ष आणि रासविनी कर्ज रु.४४०.३४ लक्ष असे एकूण रु.१०६७.३५ लक्ष अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले आहे.

२) सन २०१०-११ मध्ये या योजनेसाठी अर्थसंकल्पीय तरतूद, झालेला खर्च इ. चा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| अर्थसंकल्पीय तरतूद | सुधारित | खर्च | समर्पित |
|---|---|---|---|
| रु.३४२९.०० लक्ष | रु.३८६०.९२ लक्ष | रु.१०६७.३५ लक्ष | रु.२७९३.५० लक्ष |

३) सन २०११-१२ मध्ये मार्च २०११ अखेर प्रलंबित प्रस्ताव-७५ व सन २०११-१२ मध्ये नविन प्राप्त प्रस्ताव ९ असे एकूण ८४ प्रस्ताव होते.

सन २०११-१२ मध्ये प्राप्त झालेल्या ९ प्रस्तावांपैकी एकही प्रस्ताव त्या वर्षी परिपूर्णतेच्या अभावी मंजूर झालेला नाही. तथापि, पूर्वीच्या एकूण ७ प्रस्तावांत अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले.

मंजूर करण्यात आलेल्या ७ प्रस्तवांमध्ये शासकीय भागभांडवल रु.१०१.७८ लाख रासविनी भागभांडवल-निरंक, रासविनि कर्ज रु.३७०.७९ लाख एकूण रु.४७२.५७ लाख अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे.

**२०११-१२ मधील अर्थसंकल्पीय तरतूद खर्च व समर्पित**

**१. तरतूद**

| | |
|---|---|
| अ) शासकीय भागभांडवल | - रु.४२५.०० लक्ष |
| ब) रासविनि भागभांडवल | -रु.४२५.०० लक्ष |
| क) रासविनी कर्ज | - रु.४२५.०० लक्ष |
| एकूण | रु.१२७५.०० लक्ष |

**२) सन २०११-१२ मधील खर्च . . रु.४७२.५७ लाख**

**३) निधी समर्पित रु.८०२.४३ लक्ष**

४) सन २०१२-१३ मार्च २०१२ अखेर ८४ संस्थांचे प्रस्ताव प्रलंबित होते आणि सन २०१२-१३ मध्ये ८ नवीन प्रस्ताव दाखल झाले.

सन २०१२-१३ मध्ये नव्याने प्राप्त एकाही प्रस्तावास परिपूर्णतेच्या अभावी मंजुरी देण्यात आलेली नाही. तथापि जुन्या प्रस्तावांपैकी ७ प्रस्तावांस मंजुरी देण्यात आली. त्यांना देण्यात आलेले अर्थसहाय्य पुढीलप्रमाणे :—

अ) शासकीय भागभांडवल - रु.१२८.८६ लाख
ब) रासविनि भागभांडवल -रु.५८.३१ लाख
क) रासविनी कर्ज - रु.२३१.६७ लाख
एकूण रु.४१८.८४ लाख

सन २०१२-१३ मध्ये अर्थसंकल्पीय तरतूद, खर्च व समर्पित पुढीलप्रमाणे :—

(रुपये लाखात)

| | **अर्थसंकल्पीय तरतूद** | **झालेला खर्च** | **समर्पित रक्कम** |
|---|---|---|---|
| **शासकीय भागभांडवल** | १३९६.८० | १२८.८६ | १२६७.९४ |
| **रासविनी भागभांडवल** | ४३६.८० | ५८.५१ | ३७८.४९ |
| **रासविनी कर्ज** | ४३६.८० | २३१.६७ | २०५.१३ |
| **एकूण** | २२७०.४० | ४१८.८४ | १८५१.५६ |

२. सन २०१३-१४ मार्च २०१४ अखेर असे एकूण ९२ संस्थांचे प्रस्ताव प्रलंबित होते. सन २०१३-१४ मध्ये ४ नवीन प्रस्ताव प्राप्त झाले तसेच त्या वर्षी ९६ प्रस्ताव उपलब्ध होते. तथापि, सदर वित्तीय वर्षात नव्याने एकाही प्रस्तावास अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले नाही.

सन २०१३-१४ मध्ये जुन्या प्रस्तावांपैकी १९ प्रस्तावांना अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले.

| | **अर्थसंकल्पीय तरतूद** | **झालेला खर्च** | **समर्पित रक्कम** |
|---|---|---|---|
| **शासकीय भागभांडवल** | ४८०.०० | ३५०.३७ | १२९.६३ |
| **रासविनी भागभांडवल** | ६४०.०० | ४७८.९४ | १६१.०६ |
| **रासविनी कर्ज** | १२००.०० | ९२२.५९ | २७७.४१ |
| **एकूण** | २३२०.०० | १७५१.९० | ५६८.१० |

सन २०१४-१५ मार्च २०१४ अखेर एकूण ९६ प्रस्ताव प्राप्त होते व सन २०१४-१५ मध्ये नवीन ३ प्रस्ताव प्राप्त झाले असे एकूण ९९ प्रस्ताव प्राप्त होते.

नवीन ३ प्रस्तावांपैकी एका प्रस्तावास सन २०१४-१५ मध्येच अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले व पूर्वीच्या जून्या प्रस्तावास अर्थसहाय्य देण्यात आले.

| | **अर्थसंकल्पीय तरतूद** | **झालेला खर्च** | **समर्पित रक्कम** |
|---|---|---|---|
| **शासकीय भागभांडवल** | ७५.०० | ६०.९३ | १४.०७ |
| **रासविनी भागभांडवल** | ७५.०० | ००.०० | ७५.०० |
| **रासविनी कर्ज** | ७५.०० | ००.०० | ७५.०० |
| **एकूण** | २२५.०० | ६०.९३ | १६४.०० |

वरीलप्रमाणे सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीत प्राप्त तरतूद, खर्च आणि समर्पित रकमेचा गोषवारा पुढीलप्रमाणे :—

| **अ.क्र.** | **वर्ष** | **अर्थसंकल्पीय तरतूद** | **सुधारित तरतूद** | **खर्च** | **प्रत्यार्पित रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१०-११ | ३४.२९ | ६८.६२ | १०.६७ | २७.९३ |
| २ | २०११-१२ | १५.०० | १२.७५ | ४.७२ | ८.०२ |
| ३ | २०१२-१३ | २८.३८ | २२.७० | ४.१८ | १०.५१ |
| ४ | २०१३-१४ | २६.०० | २३.२० | १७.५२ | ५.६८ |
| ५ | २०१४-१५ | ३.८० | २.२५ | ०.६९ | १.६४ |

कृषि प्रकिया सहकारी प्रस्तावांबरोबर सादर करावयाच्या कागदपत्रांची माहिती पुढीलप्रमाणे :-

१) संस्थेचा प्रकल्प अहवाल

२) रासविनिच्या नमुन्यातील अर्थसहाय्य मागणीबाबतचा/खेळत्या भांडवलासाठीचा कर्ज मागणी अर्ज

३) जिल्हा उद्योग केंद्र यांचे मंजुरीचे पत्र

४) निवडणूक नियम

५) संस्थेची उपविधी

६) संस्था नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

७) सभासद माहितीचा तक्ता

८) जागा, वीज, पाणी याबाबतचे खात्याचे संमती पत्र

९) प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र

१०) कृषि पिकाच्या उत्पन्नाची माहिती दर्शविणारा जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी यांचा मागील ३ वर्षांचा आवक दर्शविणारा तक्ता.

११) बाजार समितीचा दाखला

१२) कर्ज विषयक धोरणात अधीन राहून वित्तीय पुरवठा करणेबाबतचे वित्तीय संस्थेचे/बँकेचे संमती पत्र (जेथे बँकेकडून संस्था कर्ज घेणार आहे.)

१३) बँक बॅलेंस सर्टिफिकेट

१४) जागा खरेदी खत/भाडेपट्टा करार

१५) संचालक मंडळ ठराव

१६) प्रकल्पाच्या ४% सभासद भागभांडवल जमा करणे

१७) विहित नमुन्यातील १ ते ३४ मुद्यांमधील मुद्दा क्र.१४ भागधारकाचा जमिनीचा सविस्तर तपशील

१८) रुपये १०० चे स्टँप पेपरवर कर्ज परत फेडीचे हमीपत्र

१९) प्रकल्प वर्धनक्षमता तपासणी अहवाल.

वरील कागदपत्रांची, प्रकल्प अहवालाची तसेच वर्धनक्षमतेची अपूर्णता यामुळे प्रस्ताव प्राप्त झाल्यावर मंजूरीसाठी विचारात घेतले जाऊ शकत नाहीत. तसेच ज्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य दिलेले आहे, त्यांच्या दिलेल्या अर्थसहाय्याच्या विनियोगाची शक्यता, प्रकल्पामध्ये प्रगती न झाल्याने त्या संस्था पुढील अर्थसहाय्यासाठी पुढच्या वर्षी प्रस्ताव दाखल करीत नाहीत असे निदर्शनास आलेले आहे. परिणामी उर्वरित हिश्याच्या मंजुरी दिल्या जात नाहीत. त्यामुळे प्रस्ताव प्राप्त असूनही काही प्रमाणात पात्रते अभावी निधी मंजूर झालेला नाही.

**समितीच्या शिफारशी :-**

**४.३ शिफारस क्रमांक (१) :** सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या सन २०११-१२ च्या विनियोजन लेख्यांवरील विभागीय सचिवांच्या साक्षीत असे निदर्शनास आले की, कृषी संस्करण संस्थांना भागभांडवली अंशदानाकरिता अर्थसंकल्पीय तरतूद रु.५.०० कोटी अपेक्षित प्रस्ताव प्राप्त न झाल्याने संपूर्ण रक्कम रु.५.०० कोटी पुनर्विनियोजनाद्वारे वळती केली. सहकारी सूत गिरण्यांना भागभांडवलाकरिता अर्थसंकल्पीय तरतूद रु.२५.०० कोटीपैकी रु.१३.७८ कोटी समर्पित करण्यात आली. एकंदर अर्थसंकल्पीय तरतूद खर्च करण्यास विभाग अपयशी ठरले. प्राप्त प्रस्तावातील त्रुटी दूर करून निधी खर्च करण्यात आला नाही. त्यामुळे विभागामधील व्यवस्थापनाकरिता जो खर्च झाला तो वाया गेला असे म्हणावे लागेल. **अर्थसंकल्पीय तरतूद खर्च न करणे ही गंभीर बाब आहे व यापुढे अर्थसंकल्पीत निधी १००% खर्च करण्याबाबत विभागाने उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**४.४ शिफारस क्रमांक (२) :** सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या विनियोजन लेख्यांवरील साक्षीदरम्यान समितीस माहिती प्राप्त झाली नाही. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली असून त्यामध्ये साखर कारखान्यांनी किती सहवीज निर्मिती केली आहे, त्याचा किती वापर झालेला आहे, प्रतीवर्षी सहवीज निर्मितीसाठी किती पैसे दिलेले आहेत याची माहिती समितीस तातडीने देण्यात यावी तसेच मंत्रीमंडळाची मान्यता जून महिन्यात मिळाल्यानंतर तातडीने जुलै महिन्यात फळ पिकांना प्रोत्साहनासाठी रुपये ८.०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली, यापूर्वीचा अखर्चित निधी विचारात घेण्यात आलेला नाही, याची माहिती समितीस देण्यात आली नाही याशिवाय एशियन डेव्हलपमेंट बँकेकडून कर्ज घेण्यासाठी कन्सल्टंन्सी चार्जेसकरिता खर्च करण्यात आलेले रुपये ७५ लाख यासंदर्भात विस्तृत माहितीची नोट देण्याबाबत समितीने सुचित केले होते. याशिवाय अन्य मुद्यांची माहिती सादर करण्याबाबत सूचना देऊनही विभागाने अद्यापपर्यंत माहिती सादर केलेली नाही ही बाब लोकलेखा समितीच्या अधिकाराचे अवमान करणारी आहे. **लोकलेखा समितीच्या दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजीच्या बैठकीत सुचनेनंतरही माहिती सादर न करणाऱ्या संबंधितांवर निलंबनाची कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांत समितीस सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## अल्पसंख्याक विकास विभाग

**५.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या विनियोजन लेख्यांची छाननी करीत असताना अनुदान क्र. झेड ई-१ मधील प्रधान शीर्ष २०५२-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा, २०५३-जिल्हा प्रशासन, २०७५-संकीर्ण सर्वसाधारण सेवा, २२०५- कला व संस्कृती, २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण या शीर्षाखाली बचत व अधिक खर्च झाल्यासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे.**

**अनुदान क्रमांक झेड ई-१ सामाजिक सुरक्षा व कल्याण**

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| **०२ -** समाज कल्याण<br>**२०० -** इतर कार्यक्रम<br>**२०० (०१) (१७) -** राज्य अल्पसंख्याक आयोग<br>**मूळ -** ३,००.००<br>**पुनर्विनियोजन-** ५५.०० | ३,५५.०० | ३,५६.३० | (+) १.३० |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

या योजनेसाठी सन २०११-१२ या वर्षात रु. ३,५५,००,००० (रु. तीन कोटी पंचावन्न लक्ष) निधी शासनाकडून प्राप्त झाला होता. सन २०१०-११ या वर्षातील रु. १,३०,००० (रु. एक लक्ष तीस हजार) निधी शिल्लक होता. सदर निधी दिनांक ३१ मार्च २०१२ रोजी चलनाव्दारे रिझर्व बँक ऑफ इंडिया मध्ये जमा केले आहे. परंतु सदर रक्कम रिझर्व बँक ऑफ इंडियाने जनरल इंश्युरंस फंडामध्ये जमा झाल्याचे खर्चाचा ताळमेळ घालताना निदर्शनास आले. त्याबाबत अधिदान लेखा कार्यालय व महालेखापाल यांना दिनांक २२ मे २०१२ च्या पत्रान्वये आयोगाकडून कळविण्यात आले आहे. सहायक अधिदान व लेखा अधिकारी यांनी क्र. अलेका/रालेवि २अ/६५, दिनांक ९ जुलै २०१२ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त रु. १,३०,००० (रु. एक लक्ष तीस हजार) चलनाव्दारे रिझर्व बँक ऑफ इंडियामध्ये जमा केलेला व जनरल इंश्युरंस फंडामध्ये जमा झालेल्या निधीचे मुख्य लेखाशीर्ष २२३५ खाली समायोजन करण्यात आले असल्याचे कळविले आहे.

सदरहू ज्ञापनास महालेखापाल कार्यालयाने अनौपचारिक संदर्भ क्र. लेखापरिक्षा/ एफ.आई.एन.टी./ अशासकीय संदर्भ/अ.सं.वि.वि./झेड ई-१/२२३५/२०११-१२/युओआर-४९०/जावक ६०९, दिनांक १९ जानेवारी २०१६ अन्वये मान्यता दिली.

**(रुपये लाखांत)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| **२०५२ -** सचिवालय सर्वसाधारण सेवा<br>**०९० -** सचिवालय<br>**०९०(००)(०१) -** अल्पसंख्याक विकास विभाग<br>**मूळ -** २,८७.३१<br>**पुनर्विनियोजन -** -३४.७१ | २,५२.६० | २,५२.६० | - |

**टिपा व भाष्ये :-**

**मुख्यत्वेकरून,** वित्त विभागाने फक्त ९० टक्के अनुदान दिल्यामुळे पुनर्विनियोजन / प्रत्यर्पण यांद्वारे रु. ३४.७१ लाख एवढा निधी काढण्यात आला.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

अल्पसंख्याक विकास विभागामध्ये २०५२ या लेखाशीर्षांतर्गत सन २०११-१२ मध्ये कर्मचारी/ अधिकारी वर्ग अपुरा असल्यामुळे त्यावर होणारा खर्च रु. ३४.७१ मार्च अखेर प्रत्यर्प्रित करण्यात आला आहे. सदरहू ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनैपचारिक संदर्भ क्र.लेखापरिक्षा/ एफ.ए.ए.ए.टी./ अशासकीय संदर्भ/ झेड ई - १, ३/२०५२, ७६१०/२०११-१२ / अ.सं.वि.वि. / युओआर -१८२ / जावक क्र - ३७५, दिनांक ०२ जानेवारी २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (-)** |
|---|---|---|---|
| **०९० -** सचिवालय<br>**०९०(००)(०३) -** अल्पसंख्याक विकास विभाग<br>**पूरक -** १०.००<br>**पुनर्विनियोजन -** १०.०० | ----- | ----- | ------ |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सन २०११-१२ मधील ई-गव्हर्नन्स संदर्भातील देयके माहिती व तंत्रज्ञान संचालनालयामार्फत अदा करण्यात येत होती त्यामुळे एकूण अनुदान रु. १०.०० लाखापैकी रु. ८.५० इतकी रक्कम सन २०११-१२ या आर्थिक वर्षात विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसाठी लागणारी अतिरिक्त रक्कम पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तसेच रु.१.५० लाख इतकी रक्कम शासनास प्रत्यार्पित करण्यात आलेली आहे.

प्रधान महालेखाकार (ले.प.), मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.लेखापरीक्षा/ एफ.आई.एन.ए.टी/ अशासकीय संदर्भ/अ.सं.वि.वि./झेडई -१/२२३५/२०११-१२/युओआर-५३०/जावक क्र.६४८, दि. ०८ फेब्रुवारी २०१६ नुसार प्रमाणित केले आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| २२३५ - सामाजिक सुरक्षा व कल्याण<br>२००(०१)(०३) - अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी सहायक अनुदान<br>**मूळ** - १८,००.००<br>**पुनर्विनियोजन** - (-)४,५०.०० | १३,५०.०० | १३,५०.०० | ---------- |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

एकूण वितरित अनुदानाएवढाच खर्च झाला आहे. सबब विभागाचे अभिप्राय ‘निरंक’ आहेत.

सदरहू ज्ञापनास महालेखापाल कार्यालयाने अनौपचारीक संदर्भ क्र.लेखापरिक्षा / एफ.ए.ए.टी./ अशासकीय संदर्भ / अ.सं.वि.वि./ झेड ई -१/२२३५/२०११-१२/ युओआर-२६९ / जावक क्र. ow no. ३७९, दि. ५ नोव्हेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| **२२३५ -** सामाजिक सुरक्षा व कल्याण<br>**२००(०१)(०९) -** अल्पमुदतीच्या व्यवसायाधारीत पाठ्यक्रमासाठी सहायक अनुदान<br>**मूळ** - ५,००.००<br>**पुनर्विनियोजन** - (-)१,३३.८६ | ३,६६.१४ | ३६४.९२ | (-) १.२२ |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

एकूण वितरित अनुदानापेक्षा कमी खर्च झाला आहे. वितरित अनुदानामधील रु. १.२२ लाख निधी रिझर्व बँक ऑफ इंडियामध्ये प्रत्यार्पित करण्यात आला आहे. सदर बचत क्षमापित करण्यात यावी.

सदरहू ज्ञापनास महालेखापाल कार्यालयाने अनौपचारीक संदर्भ क्र.लेखापरिक्षा/एफ.ए.ए.टी./ अशासकीय संदर्भ/ अ.सं.वि.वि./ झेड ई -१/२२३५/२०११-१२/ युओआर-२६९ / जावक क्र. ow no. ३७९, दि. ५ नोव्हेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| **२२३५ -** सामाजिक सुरक्षा व कल्याण<br>**२००(०१)(१०) -** स्वयंसहायता गटाकरीता सहायक अनुदान<br>**मूळ** - १,०५.००<br>**पुनर्विनियोजन** - (-) १,०५.०० | ------- | ------- | ------- |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सदर योजना सन २०११-१२ या वर्षामध्ये प्रशासकीय कारणास्तव लेखाशीर्षाखालील केलेली तरतूद या योजनेमध्ये अपेक्षित खर्च कमी असल्याने पुनर्विनियोजनाद्वारे इतर योजनांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सदरहू ज्ञापनास महालेखापाल कार्यालयाने अनौपचारीक संदर्भ क्र.लेखापरिक्षा/एफ.ए.ए.टी./ अशासकीय संदर्भ / अ.सं.वि.वि./ झेड ई -१/२२३५/२०११-१२/ युओआर-२६९ / जावक क्र. ow No. ३७९, दि. ५ नोव्हेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकुण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| २२३५ - सामाजिक सुरक्षा व कल्याण<br>२००(०१)(१२) - संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिद्धी यासाठी<br>सहायक अनुदान<br>मूळ - ३,००.००<br>पुनर्विनियोजन - (-)१,४०.०० | १,६०.०० | १,६०.०० | |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

एकूण वितरित अनुदानाएवढाच खर्च झाला आहे. सबब विभागाचे अभिप्राय ‘निरंक’ आहेत.

सदरहू ज्ञापनास महालेखापाल कार्यालयाने अनौपचारीक संदर्भ क्र.लेखापरिक्षा / एफ.ए.ए.टी./ अशासकीय संदर्भ / अ.सं.वि.वि./ झेड ई -१/२२३५/२०११-१२/ युओआर-२६९ / जावक क्र. OW. No. ३७९, दिनांक ५ नोव्हेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| **०२ समाजकल्याण**<br>**२०० इतर कार्यक्रम**<br>**२०० (००) (१८)** उर्दू घर यासाठी<br>सहायक अनुदान<br>२२३५ ए ५५२ (केंद्र पुरस्कृत)<br>**मुळ-** २,२२.००<br>**पुनर्विनियोजन - (-)**२,२२.००<br>सहायक अनुदान | --- | --- | --- |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

मूळ अर्थसंकल्पिय तरतूद रु.२२२ लाख इतकी होती. तथापि, मुंबई, सोलापूर आणि नांदेड येथे प्रस्तावित असलेल्या उर्दू घरासाठी जागा उपलब्ध न झाल्याने सदर रक्कम वितरित न करता समर्पित करण्यात आली आहे.

**महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय :—**

Reasons for surrendering of funds states in Explanatory Memorandom explained in PAC (Marathi Version Vetted)

लेखापरिक्षा अधिकारी, महालेखापाल कार्यालय UOR-५१६/जावक क्र.६४९, दिनांक ८ फेब्रुवारी २०१६.

**(रुपये लाखांत)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (अ) बचत (- )** |
|---|---|---|---|
| **२२३५ -** सामाजिक सुरक्षा व कल्याण, राज्य योजनांतर्गत योजना,<br>**२००(०१)(३०) -** अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये दुसरी पाळी सुरू करण्याबाबत सहायक अनुदान योजना (२२३५ बी ०२२)<br>**मूळ :** ९,५८.००<br>**पुनर्विनियोजन :** - ८,२३.१५ | १,३४.८५ | १,२८.८६ | -५.९९ |

**टिपा व भाष्ये :-**

(एक) वित्त विभागाने फक्त ८५% अनुदान दिल्यामुळे (रु. १२१९.०१ लाख) आणि (दोन) अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाल्याने (रु.६६५ लाख) वर नमूद केलेल्या शीर्षाखालील मार्च, २०१२ मध्ये प्रत्यार्पण / पुनर्विनियोजन यांद्वारे रु. १८८४.०१ लाख एवढा निधी काढण्यात आला.

तथापि, वित्त विभागाने अनुदान कमी केल्याबाबतची कारणे मागणी करूनही कळविण्यात आली नाहीत. (एप्रिल, २०१२)

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सदरचा निधी पूरक निधी म्हणून प्राप्त झालेला होता. प्रत्यक्ष खर्च रु. १,२८८६ झाल्याने उर्वरित रु. ८,२३१५ कोटी इतक्या निधीचे पुनर्विनियोजन करण्यात आले. सदरहू ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारिक संदर्भ क्र. लेखापरिक्षा / एफ.ए.ए.टी / अशासकीय संदर्भ / अ.सं.वि.वि. / झेडई १,२ / २२३५,४२३५ / २०११-१२ / युओआर-३५७ / जावक क्र.४६८, दिनांक ०४ डिसेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| ०२ समाजकल्याण<br>१९० सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमांना सहाय्य<br>१९० (००) (०१) - मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळास सहाय्य (केंद्र हिस्सा) (२२३५ ए ५०७)<br>**मूळ :** १८.००<br>**पुनर्विनियोजनः** (-) १८.०० | -------- | -------- | -------- |

**ज्ञापन**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त झाले नाही. त्यामुळे खर्च नाही. निधी समर्पित करण्यात आला. सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळाकडून मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळास धनादेशाद्वारे अनुदान देण्यात येते.

सदरहू ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारिक संदर्भ क्र.लेखापरीक्षा/एफ.ए.ए.टी/ अशासकीय संदर्भ/ अ.सं.वि.वि./झेडई -१,२/२२३५,४२३५/ २०११-१२/ युओआर-३५७/ जावक क्र.४६८, दि.०४ डिसेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ०२ समाजकल्याण १९० सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमांना सहाय्य १९० (०१) (०१) - मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळास सहाय्य (राज्य हिस्सा)<br>**पूरक :** ३,०२.००<br>**पुनर्विनियोजन :** - ३,०२.०० | -------- | -------- | -------- |

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त झाले नसल्याने सदर योजनेतील राज्य शासनाचा हिस्सा देण्यात आला नाही. त्यामुळे तरतूद समर्पित करण्यात आली.

सदरहू ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारिक संदर्भ क्र.लेखापरीक्षा/एफ.ए.ए.टी/ अशासकीय संदर्भ/ अ.सं.वि.वि./झेड ई -१,२/२२३५,४२३५/ २०११-१२/ युओआर-३५७/ जावक क्र.४६८, दिनांक ४ डिसेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (अ) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ०२ समाज कल्याण<br>२०० इतर कार्यक्रम<br>२०० (०१) (१४) - अल्पसंख्यांक बहूल क्षेत्रांकरिता बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रम (केंद्र पुरस्कृत योजना) (राज्य हिस्सा)<br>**मूळ** १५,००.००<br>**पुनर्विनियोजनः** (-) १,२४.६४ | १३,७५.३६ | १३,७५.३६ | -------- |

**ज्ञापन**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासनाकडून प्राप्त मान्यतेनुसार या योजनेंतर्गत एकूण रु. १३,७५,३६,००० इतका प्रत्यक्ष खर्च झाला आहे. प्रस्तुत शीर्षांतर्गत केंद्र शासनाकडून अनुदान उपलब्ध न झाल्याने उर्वरित रक्कम शासनास प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

सदरहू ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारिक संदर्भ क्र.लेखापरीक्षा/एफ.ए.ए.टी/ अशासकीय संदर्भ/ अ.सं.वि.वि./झेड ई -१/२२३५/२०११-१२/ युओआर-२६७/ जावक क्र.३८०, दिनांक ५ नोव्हेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (अ) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ०२ समाज कल्याण<br>२०० इतर कार्यक्रम<br>२०० (०१) (१७) - अल्पसंख्यांक बहूल क्षेत्रांकरिता बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रम (केंद्र पुरस्कृत योजना) (केंद्रीय हिस्सा) (२२३५ ए ५४३)<br>**मूळ :** २५,००.००<br>**पुनर्विनियोजनः** **(-)** २०,६०.५६ | ४,३९.४४ | ४,३९.४४ | -------- |

**टिपा व भाष्ये-**

केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त न झाल्यामुळे वर नमूद केलेल्या शीर्षाखालील मार्च २०१२ मध्ये पुनर्विनियोजन/प्रत्यर्पण याद्वारे रु.२५०५.२० लाख एवढा निधी काढण्यात आला, मागणी करून देखील त्याबाबतची कारणे कळविण्यात आलेली नाही. (ऑगस्ट, २०१२)

**ज्ञापन-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासनाकडून प्राप्त मान्यतेनुसार या योजनेंतर्गत एकूण रु. ४,३९,४४,००० इतका प्रत्यक्ष खर्च झाला आहे. प्रस्तुत शीर्षांतर्गत केंद्र शासनाकडून अनुदान उपलब्ध न झाल्याने उर्वरित रक्कम शासनास प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

सदरहू ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारिक संदर्भ क्र.लेखापरिक्षा/एफ.ए.ए.टी/ अशासकीय संदर्भ/ अ.सं.वि.वि./झेडई-१/२२३५/२०११-१२/ युओआर-२६७/ जावक क्र.३८०, दिनांक ५ नोव्हेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (अ) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ०२-सामाजिक कल्याण<br>२०० इतर कार्यक्रम<br>२०० (०१) (०१) - मोफत शिकवणी व संलग्न योजना यासाठी सहायक अनुदान.<br>**मुळ :** १०.००<br>**पुनर्विनियोजन :** (-) १०.०० | ------- | -------- | -------- |

**ज्ञापन -**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर योजना सन २०१०-११ या वर्षामध्ये प्रशासकीय कारणास्तव कार्यान्वित होऊ शकली नाही. त्यामुळे वरील लेखाशीर्षाखालील केलेली तरतूद पुनर्विनियोजनाद्वारे इतर योजनांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सदरहू ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारिक संदर्भ क्र.लेखापरीक्षा/एफ.ए.ए.टी/ अशासकीय संदर्भ/अ.सं.वि.वि./झेड ई-१/२२३५/२०११-१२/युओआर-२६९/जावक क्र. OW. No.- ३७९, दिनांक ५ नोव्हेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (अ) बचत (-) |
|---|---|---|---|
| ०२-समाज कल्याण<br>२००- इतर कार्यक्रम<br>२०० (०१) (११) - मदत सेवेकरिता सहायक अनुदान.<br>**मूळ :** २५.००<br>**पुनर्विनियोजन :** (-) १५.०० | १०.०० | १०.०० | -------- |

**टिपा व भाष्ये -**

मुख्यत्वेकरून, अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाल्यामुळे वर नमूद केलेल्या शीर्षाखालील प्रत्यर्पण/पुनर्विनियोजन यांद्वारे मार्च, २०१२ मध्ये रु. २५ लाख एवढा निधी काढण्यात आला.

**ज्ञापन -**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

एकूण वितरित अनुदानाएवढाच खर्च झाला आहे. सबब विभागाचे अभिप्राय 'निरंक' आहेत.

सदरहू ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारिक संदर्भ क्र.लेखापरिक्षा/ एफ.ए.ए.टी/ अशासकीय संदर्भ/अ.सं.वि.वि./झेडई-१/२२३५/२०११-१२/युओआर-२६९/जावक क्र. OW No.-३७९, दिनांक ५ नोव्हेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (अ) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ०२- समाज कल्याण<br>२०० इतर कार्यक्रम<br>२०० (०१) (०५) - प्राथमिक शाळेमध्ये अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीकरिता पालकांना प्रोत्साहनपर रक्कम म्हणून भत्ता देण्याकरिता सहायक अनुदान.<br>**मूळ** १८,००.००<br>**पुनर्विनियोजन :** (-) २,७०.०० | १५,३०.०० | १५,३०.०० | -------- |

**टिपा व भाष्ये -**

वित्त विभागाने ८५% एवढेच अनुदान दिल्यामुळे मार्च, २०१२ मध्ये रु.२७० लाख एवढा निधी परत करण्यात आला. तथापि, वित्त विभागाने अनुदान केमी केल्याबाबतची कारणे, मागणी करुनही कळविण्यात आली नाहीत (ऑगस्ट, २०१२)

**ज्ञापन -**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

एकूण वितरित अनुदानाएवढाच खर्च झाला आहे. सबब विभागाचे अभिप्राय 'निरंक' आहेत.

सदरहू ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारिक संदर्भ क्र. लेखापरीक्षा / एफ.ए.ए.टी / अशासकीय संदर्भ / अ.सं.वि.वि. / झेडई-१ / २२३५ / २०११-१२ / युओआर-२६९ / जावक क्र. OW No.-३७९, दिनांक ५ नोव्हेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (अ) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, २०० (०१) (०६) - अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रांतील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदानांसाठी सहायक अनुदान,<br>**पूरक :** ७,००.००<br>**पुनर्विनियोजन :** - ७,००.०० | -------- | -------- | -------- |

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

६ ITI संस्थांची अंतिम निवड झाली नाही. त्यामुळे खर्च झाला नाही. तसेच मांडवी ITI च्या बांधकामासाठी मागणी न आल्याने निधी समर्पित करून पुनर्विनियोजनाद्वारे अन्य योजनांसाठी कळविण्यात आले.

सदरहू ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारिक संदर्भ क्र.लेखापरिक्षा/एफ.ए.ए.टी/ अशासकीय संदर्भ/ अ.सं.वि.वि./झेड ई -१,२/२२३५,४२३५/ २०११-१२/ युओआर-३५७/ जावक क्र.४६८, दिनांक ४ डिसेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, २०० (०१) (१५) - अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी नवीन तंत्रनिकेतने सुरु करण्यासाठी सहायक अनुदान<br>**पुरक :** १,५०.००<br>**पुनर्विनियोजन :** - १,५०.०० | -------- | -------- | -------- |

**टिपा व भाष्ये -**

**(एक)** संस्थांची निवड न केल्यामुळे (रु.७२२.५० लाख) आणि (दोन) वित्त विभागाने ८५ टक्के अनुदान दिल्यामुळे (रु.१२७.५०) वर नमूद केलेल्या शिर्षाखालील मार्च, २०१२ मध्ये प्रत्यर्पण/पुनर्विनियोजन द्वारे रु. ८५० लाख एवढा निधी काढण्यास आला. वित्त विभागाने केवळ ८५ टक्के अनुदान देणे व संस्थांची निवड न करणे यांबाबतची कारणे मागणी करून देखील कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट, २०१२)

**ज्ञापन -**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

३ तंत्रनिकेतन संस्थांची अंतिम निवड झालेली नसल्याने खर्च झाला नाही. निधी समर्पित करून अन्य योजनांसाठी वितरीत करण्यात आला.

सदरहू ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारिक संदर्भ क्र.लेखापरीक्षा/एफ.ए.ए.टी/ अशासकीय संदर्भ/ अ.सं.वि.वि./झेड ई -१,२/२२३५,४२३५/ २०११-१२/ युओआर-३५७/ जावक क्र.४६८, दिनांक ४ डिसेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| **शीर्ष** | **एकूण अनुदान** | **प्रत्यक्ष खर्च** | **अधिक खर्च (+) बचत (- )** |
|---|---|---|---|
| ०२ समाज कल्याण<br>२०० इतर कार्यक्रम<br>२०० (०१) (०७) - अल्पसंख्यांक बहूल क्षेत्रातील क्षेत्रविकास योजनांसाठी सहायक अनुदान.<br>**मुळ :** २५.००.००<br>**पुनर्विनियोजन :** (-)३२४.३८ | एकूण अनुदान २१.७५.६२ | २१.८३.६२ | (+) ८.०० |

**टिपा व भाष्ये :-**

मुख्यत्वेकरून, वित्त विभागाने ८५ टक्के अनुदान दिल्यामुळे मार्च, २०१२ मध्ये प्रत्यर्पण/ पुनर्विनियोजन यांद्वारे रु. ३२४.३८ लाख एवढा निधी काढण्यात आला.

वित्त विभागाने ८५% एवढेच अनुदान देणे व रु. ८ लाख इतका अंतिम अधिक खर्च यांबाबतची कारणे मागणी करुन देखील कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट, २०१२)

**ज्ञापन-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

यापूर्वीच्या वर्षामध्ये वितरित केलेला निधी सन २०११-१२ या वर्षात खर्च केल्यामुळे अधिकचा खर्च दिसून येत आहे. सदर अधिकचा खर्च क्षमापित करण्यात यावा. सदरहू ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने

अनौपचारिक संदर्भ क्र.लेखापरिक्षा/एफ.ए.ए.टी/अशासकीय संदर्भ/अ.सं.वि.वि./झेड ई-१/२२३५/२०११-१२/युओआर-२६९/जावक क्र. ow no. - ३७९, दिनांक ५ नोव्हेंबर २०१५ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (अ) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, २०० (०१) (१८) - प्रवाशांवरील खर्च (२२३५ ए २६७)<br>**मुळ :** रु. ७०.२६ लाख<br>**पुरक :** रु. २०.०० लाख<br>**पुर्नविनियोजन :** रु. (-) २२.६१ लाख | ६७.६५ | ८३.२६ | (+) १५.६१ |

**टिपा व भाष्ये-**

रु. १५.६१ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, (एक) 'राज्य हज समिती' अस्तित्वात नसल्यामुळे सदस्यांचे रिक्त पद न भरणे (रु.८.२७ लाख) आणि (दोन) 'खादीमुल हुज्जाज' यांच्या कमी संख्येत नियुक्त्या करणे यामुळे (रु.१४.३४ लाख) मार्च २०१२ मध्ये रु.२२.६१ लाख इतका परत केलेला निधी अनावश्यक असल्याचे सिध्द झाले त्याबाबतची कारणे, मागणी करून देखील कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट,२०१२)

**ज्ञापन -**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्यांक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

या लेखा शिर्षाखालील प्राप्त निधी, प्रत्यक्ष खर्च व समर्पित रक्कम यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| (१) या लेखा शिर्षाखाली वेतनेतर बाबी करीता वितरीत करण्यात आलेला निधी : | | रु.६३,००,००० |
| (२) वेतनेतर बाबी करीता खर्च करण्यात आलेला निधी : | (-) | रु.५५,६६,३२५ |
| (३) वेतनेतर बाबी खाली समर्पित करण्यात आलेला निधी : | | रु. ७,३३,६७५ |
| (४) या लेखा शिर्षाखाली वेतन सदराखाली वितरीत करण्यात आलेला निधी : | | रु.२०,२६,००० |
| (५) वेतन सदराखाली प्रत्यक्ष खर्च करण्यात आलेला निधी : | (-) | रु.११,९८,६५८ |
| (६) वेतन सदराखाली समर्पित करण्यात आलेला निधी : | | रु. ८,२७,३४२ |
| (७) एकूण वितरीत निधी : (१+४) | | रु.८३,२६,००० |
| (८) एकूण प्रत्यक्ष झालेला खर्च : (२+५) | | रु.६७,६४,९८३ |
| (९) एकूण समर्पित रक्कम : (३+६) | | रु.१५,६१,०१७ |

रु. १५,६१,०१७ इतकी रक्कम समर्पित करण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

(१) ४१ खादीमुलहुज्जाज ऐवजी ३१ खादीमूलहुज्जाज पात्र ठरल्याने यावर झालेल्या खर्चाची बचत.

(२) समिती अस्तित्वात नसल्याने अध्यक्षाचे मानधन, अध्यक्षांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्चाची बचत झाल्याने.

**विनियोजन लेख्यांत दर्शविण्यात आलेल्या आकडेवारीचे स्पष्टीकरण :**

(अ) या शिर्षाखाली वेतन सदराखाली एकूण रु.२०.२६ लक्ष इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती व ती पुर्णपणे वितरीत करण्यात आलेली आहे. यापैकी प्रत्यक्षात रु. ११,९८,६५८ इतका निधी खर्च करण्यात आलेला असून उर्वरित रु.८,२७,३४२ इतका निधी समर्पित करण्यात आलेला आहे.

(ब) या शिर्षाखाली वेतनेतर मुळ अर्थसंकल्पीय तरतूद रु. ५०.०० लक्ष व पुरक मागणीद्वारे रु. २० लक्ष इतकी तरतूद होती. तथापि, वित्त विभागाने कपात लावल्यामुळे प्रत्यक्षात एकूण रु. ६३ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला यापैकी एकूण रु. ५५,६६,३२५ इतका प्रत्यक्ष खर्च झालेला असून रु. ७,३३,६७५ इतकी रक्कम समर्पित करण्यात आलेली आहे.

सारांश, वेतन सदाराखाली रु. २०.२६ लक्ष व वेतनेतर सदराखाली रु. ६३ लक्ष असा एकूण रु. ८३.२६ लक्ष निधी वितरीत करण्यात आला होता व त्यापैकी अनुक्रमे रु. ११,९८,६५८ व रु. ५५,६६,३२५ असा एकूण रु. ६७,६४,९८३ इतका प्रत्यक्ष खर्च झालेला असून अनुक्रमे रु. ८,२७,३४२ व रु. ७,३३,६७५ असा एकूण रु. १५,६१,०१९ इतका निधी समर्पित करण्यात आलेला आहे.

तथापि, विनियोजन लेख्यात मुळ तरतूद रु. ७०.२६ लक्ष तसेच पुरक मागणीद्वारे रु. २० लक्ष अशा एकूण रु.९०.२६ लक्ष पैकी रु. २२.६१ लक्ष निधीचे पुनर्विनियोजन दर्शवून निव्वळ तरतूद रु. ६७.६५ लक्ष दर्शविण्यात आलेली असून प्रत्यक्ष खर्च रु. ८३.२६ लक्ष व परिणामी अधिकचा खर्च रु. १५.६१ लक्ष दर्शविण्यात आला असून, वरिल (अ) व (ब) येथील स्पष्टीकरण विचारात घेता, तो वस्तुस्थितीस धरून नाही. रु. १५.६१ लाख इतका निधी चलनाद्वारे दिनांक ९ एप्रिल २०१२ व दिनांक १६ एप्रिल २०१२ रोजी भारतीय रिझर्व्ह बॅंकेत भरण्यात आला आहे, म्हणून हा निधी २०१२-२०१३ या वर्षात लेखांकित झाला आहे.

महालेखाकार कार्यालयाने अनौपचारीक संदर्भ क्र. लेखापरिक्षा/ एफ.आय.एन.टी/ अशासकीय संदर्भ / अ.सं.वि.वि./ झेड ई -१/ २२३५/ २०११-१२/ UOR-४८९/ जावक क्र. ५५६, दिनांक १९ जानेवारी २०१६.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (अ) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ०२ समाजकल्याण,<br>२०० इतर कार्यक्रम,<br>२०० (०१) (१९) - हज समितीला सहायक अनुदान (२२३५ ए २७६)<br>**मुळ :** रु. ५,००.०० लाख<br>**पुनर्विनियोजन :** रु.(-) ५,००.०० लाख | ------ | ------ | ------- |

**टिपा व भाष्ये -**

**(एक)** औरंगाबाद मध्ये जमीन उपलब्ध न होणे (रु.४२५ लाख) आणि (दोन) वित्त विभागाने ८५% अनुदान देणे (रु. ७५ लाख), यामुळे मार्च, २०१२ मध्ये प्रत्यर्पण/ पुनर्विनियोजन याद्वारे रु.५०० लाख इतका निधी काढण्यात आला.

त्याबाबतची कारणे, मागणी करुन देखील कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१२)

**ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

औरंगाबाद हज हाऊसच्या बांधकामासाठी सदर निधीची तरतूद करण्यात आली होती. मात्र काही तांत्रिक कारणास्तव हज हाऊसकरिता जागेचे संपादन न झाल्याने अनुदान वितरणासाठी मागणी प्राप्त झाली नाही. त्यामुळे सदर अनुदानाची रक्कम परत करण्यात आली आहे. त्यामुळे रु. ५००.०० लक्ष अनुदानाची रक्कम समर्पित करण्यात आली.

सदर ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारीक संदर्भ क्र. लेखापरीक्षा/ एफ.आय.एन.टी/ अशासकीय संदर्भ / अ.सं.वि.वि./ झेड ई-१/ २२३५/ २०११-१२/ UOR-३६७/ जावक क्र. ४९२, दिनांक १७ डिसेंबर २०१५ अन्वये खालील शेऱ्यांसह मान्यता दिलेली आहे.

शेरा :- रु. ५००.०० लाख इतका निधी पुनर्विनियोजन करण्यास कारणीभूत ठरलेली जमिन भू-संपादीत न करण्याची कारणे लोकलेखा समितीस सादर करावीत.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (अ) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ०२ समाज कल्याण<br>२०० इतर कार्यक्रम<br>२०० (०१) (२०) उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीकरिता सहायक अनुदान<br>**मुळ :** ५०,००.००<br>**पुरक :** २२,६८.००<br>**पुनर्विनियोजन :** (-) २४९.२० | ७०,१८.८० | ७०,१८.६२ | - ०.१८ |

**टिपा व भाष्ये -**

मुख्यत्वेकरून**,** वित्त विभागाने ८५ टक्के अनुदान दिल्यामुळे मार्च, २०१२ मध्ये प्रत्यार्पण/पुर्नविनियोजन याद्वारे रु. २४९.२० लक्ष एवढा निधी काढण्यात आला. वित्त विभागाने काढून घेतलेल्या निधीची कारणे, त्याबाबतची मागणी करून देखील प्रतिक्षित आहेत.

**ज्ञापन-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर बचत ही अत्यंत नगण्य असल्यामुळे ती क्षमापित करण्यात यावी.

सदर ज्ञापणास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारीक संदर्भ क्र. लेखापरिक्षा/ एफ.आय.एन.टी./अशासकीय संदर्भ/अ.सं.वि.वि./झेड ई-१/२२३५/२०११-१२/युओआर-४८५/जावक क्र. ५९८ दिनांक १८ जानेवारी २०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे.

(रुपये लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (अ) बचत (- ) |
|---|---|---|---|
| ०२ समाजकल्याण,<br>**२००** इतर कार्यक्रम,<br>**२०० (००) (१६) -** अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी सुरु करण्यासाठी सहायक अनुदान (२२३५ ए ५३४)<br>**मूळ :** १८,००.००<br>**पुर्नविनियोजन :** (-) ८,९९.२७ | ९,००.७३ | १२,७३.३८ | (+) ३७२.६५ |

**टिपा व भाष्ये :-**

रु. ३७२.६५ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, (एक) अपेक्षेपेक्षा कमी खर्च होणे (रु.८० लाख) आणि (दोन) वित्त विभागाने ८५ टक्के अनुदान देणे (रु.८१९.२७ लाख) यामुळे मार्च, २०१२ मध्ये प्रत्यर्पण/पुर्नविनियोजन याद्वारे रु. ८९९.२७ लाख एवढा निधी काढण्यात आला. त्याबाबतची कारणे मागणी करुन देखील प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट, २०१२)

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

प्रत्यक्ष खर्च रु. १२७३.३८ लक्ष इतका झाल्याने प्राप्त अनुदान रु. ९.०० कोटी असल्याने पुनर्विनियोजन झालेले आहे.

सदर ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारीक संदर्भ क्र. लेखापरिक्षा/ एफ.आय.एन.टी/ अशासकीय संदर्भ / अ.सं.वि.वि./ झेड ई -१,२/ २२३५,४२३५/ २०११-१२/ युओआर-३५७/ जावक क्र. ४६८ दिनांक ०४/१२/२०१५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

(रुपये लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| ०२ समाजकल्याण,<br>२०० इतर कार्यक्रम,<br>२०० (०१) (०८) - शहरांमध्ये अल्पसंख्यांक समाजातील मुलींच्या वसतीगृहासाठी सहायक अनुदाने<br>**मुळ :** ४,००.००<br>**पुनर्विनियोजन :** २,००.०० | ६,००.०० | ६,००.०० | ------- |

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

जालना, अकोला, नांदेड, औरंगाबाद, जळगांव व हिंगोली येथे वसतीगृहासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. प्राप्त अनुदानाइतकाच खर्च झाल्याने अभिप्राय नाहीत.

सदर ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारीक संदर्भ क्र. लेखापरिक्षा/ एफ.आय.एन.टी/ अशासकीय संदर्भ / अ.सं.वि.वि./ झेड ई -१,२/ २२३५,४२३५/ २०११-१२/ युओआर-३५७/ जावक क्र. ४६८ दिनांक ०४/१२/२०१५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

(रुपये हजारांत)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| २०५२ - सचिवालय सर्वसाधारण सेवा<br>२०५३ - जिल्हा प्रशासन<br>२०७५ - संकीर्ण सर्वसाधारण सेवा<br>२२०५ — कला व संस्कृती<br>२२३५ - सामाजिक सुरक्षा व कल्याण<br>**मूळ :** २,४९,३६,५५<br>**पुनर्विनियोजन :** ३२,६९,२८<br>वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च, २०१२) | २,८२,०५,८३<br>७१,७७,३८ | २,१४,४६,०१ | - ६७,५९,८२ |

**टिपा व भाष्ये :-**

अनुदानातील खर्च मूळ तरतुदींइतकाही झालेली नाही.

२. अनुदानातील रु. ६७५९.८२ लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता रु. ३२६९.२८ लाख एवढी पूरक तरतूद अनावश्यक असल्याचे सिध्द झाले.

३. अनुदानातील रु. ६७५९.८२ लाख इतकी अंतिम बचत असताना रु. ७१७७.३८ लाख इतका प्रत्यार्पित करण्यात आलेला निधी अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.

४. अनुदानातील बचत पुढील शीर्षाखाली झाली :-

(रुपये लाखात)

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (- ) |
|---|---|---|---|
| **०२ समाज कल्याण**<br>**२०० इतर कार्यक्रम**<br>**२०० (०१) (२१) -** अल्पसंख्यांक शाळांना मूलभूत सोयीसुविधा पुरविण्यासाठी सहायक अनुदान<br>**मूळ :** ४०,००.००<br>**पुनर्विनियोजन :** १,५७.५५ | ४१,५७.५५ | ४१,५७.५६ | + ०.०१ |

वाढीव खर्च भागवण्यासाठी वर नमूद केलेल्या शीर्षाखाली पुनर्विनियोजनाद्वारे रु. ४१२.५५ लाख इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली.

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सदर अधिकचा खर्च हा अत्यंत नगण्य असल्यामुळे तो क्षमापित करण्यात यावा.

सदर ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारीक संदर्भ क्र. लेखापरिक्षा/ एफ.आय.एन.टी/ अशासकीय संदर्भ / अ.सं.वि.वि./ झेड ई -१,२/ २२३५/ २०११-१२/ युओआर-४७९/ जावक क्र. ५९९ दिनांक १८/०१/२०१६ अन्वये मान्यता दिली आहे.

**(रुपये लाखात)**

| शीर्ष | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च | अधिक खर्च (+) बचत (-) |
|---|---|---|---|
| ०२ समाज कल्याण<br>२०० इतर कार्यक्रम<br>२०० (०१) (१६) - राज्य अल्पसंख्यांक आयोग केंद्रपुरस्कृत योजना सहायक अनुदान.<br>**मूळ :** ८३.००<br>**पुनर्विनियोजन :** (-) १६.७५ | ६६.२५ | ९३.६६ | (+) २७.४१ |

**टिपा व भाष्ये :-**

रु. २७.४१ लाख इतका अंतिम अधिक खर्च विचारात घेता, (एक) अपेक्षेपेक्षा कमी खर्च होणे (रु.८.५० लाख) आणि (दोन) वित्त विभागाने ९० टक्के अनुदान देणे व रिक्त पदे भरणे (रु.८.२५ लाख) यामुळे मार्च २०१२ मध्ये प्रत्यर्पण/पुनर्विनियोजन याद्वारे रु. १६.७५ लाख इतका काढलेला निधी अनावश्यक असल्याचे सिध्द झाले, त्याबाबतची कारणे मागणी करुन देखील कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, २०१२)

**ज्ञापन :-**

महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अल्पसंख्याक विकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

या योजनेसाठी सन २०११-१२ या वर्षात रु. ६६,२५,०००/- (अक्षरी रु. सहासष्ठ लक्ष पंचवीस हजार फक्त) निधी शासनाकडून प्राप्त झाला होता. सन २००९-१० या वर्षातील रु. १६,८८,८७७/- (रु.सोळा लक्ष अठ्ठयाऐंशी हजार आठशे सत्त्याहत्तर फक्त) व सन २००९-१० व २०१०-११ मधील वेतनाची रु.१०,५१,६७६/- (अक्षरी रु. दहा लक्ष एक्कावन्न हजार सहाशे श्याहत्तर फक्त) शिल्लक अनुदान दि. १३/०३/२०१२ व दि. ३१/०३/२०१२ रोजी चलनाद्वारे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मध्ये जमा केले आहे. परंतु सदर रक्कम रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जनरल इंश्युरंस फंडामध्ये जमा झाल्याचे खर्चाचा ताळमेळ घालताना निदर्शनास आले. त्याबाबत अधिदान लेखा कार्यालय व महालेखापाल यांना दि.२२/०५/२०१२ व दि. १२/०६/२०१२ च्या पत्रान्वये आयोगाकडून कळविण्यात आले आहे. त्याबाबत सहायक अधिदान व लेखा अधिकारी यांनी क्र.अलेका/रालेवि २ अ/ ६५, दि. ०९/०७/२०१२ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त रु. १६,८८,८७७/- (सोळा लक्ष अठ्ठयाऐंशी हजार आठशे सत्त्याहत्तर फक्त) व सन २००९-१० व २०१०-११ मधील वेतनाची रु. १०,५१,६७६/- (अक्षरी रु. दहा लक्ष एक्कावन्न हजार सहाशे श्याहत्तर फक्त) असे एकूण रु. २७,४०,५५३/- (अक्षरी रु. सत्तावीस लक्ष चाळीस हजार पाचशे त्रेपन्न फक्त) चलनाद्वारे रिझर्व बँक ऑफ इंडिया मध्ये जमा केलेला व जनरल इंश्युरंस फंडामध्ये जमा झालेल्या निधीचे मुख्य लेखाशीर्ष २२३५ खाली समायोजन करण्यात आले असल्याचे कळविले आहे.

सदर ज्ञापनास महालेखाकार कार्यालयाने अनौपचारीक संदर्भ क्र. लेखापरिक्षा/ एफ.आई.एन.ए.टी/ अशासकीय संदर्भ / अ.सं.वि.वि./ झेड ई -१/ २२३५/ २०११-१२/ युओआर-४९०/ जावक क्र. ६०९ दिनांक १९/०१/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे.

**साक्ष :-**

५.२ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात लोकलेखा समितीने दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

अल्पसंख्याक विकास विभागाअंतर्गत बऱ्याच योजनांची अंमलबजावणी झाली नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात पैसे परत करावे लागले, याबाबत स्पष्टीकरण देण्यात देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, अल्पसंख्यांक विकास विभागाची स्थापना सन २००८-२००९ मध्ये झाली. स्थापनेपासूनच वेगवेगळ्या योजना राबविण्याची विभागाची कल्पना होती. त्यासंदर्भातील शासन निर्णय पास होण्यासाठी, मंत्रिमंडळाची मान्यता

घेण्यासाठी काही कालावधी लागला. त्यामुळे काही योजनांचे पैसे परत करावे लागले. परंतु त्याचे इतर योजनांमध्ये पुर्नविनियोजन केले आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाचे एकूण बजेट २८२ कोटी रुपयांचे आहे. त्यापैकी केवळ २१४ कोटी रुपये खर्च केले असून उर्वरित रक्कम प्रत्यार्पित केली आहे. याचे कारण काय आहे अशी विचारणा समतीने केली असता विभागीय सचिवांनी बराच निधी प्रत्यार्पित केल्याचे मान्य केले व याबाबत खुलासा करताना सांगितले की, अल्पसंख्याक विभागाकडे यंत्रणा नसल्यामुळे काही योजनेबद्दल तयारी नसते. त्यामुळे देखील निधी प्रत्यार्पित करावा लागला आहे.

विभागाने मूळ तरतूद देखील खर्च केली नाही व पुन्हा पुरवणी मागणी टाकली व त्यानंतर वर्षाच्या अखेरीस रक्कम परत केली. महालेखाकारांच्या परिच्छेदामध्ये प्रत्येक ठिकाणी सांगण्यात आले की, ८५ ते ९० टक्के निधी वितरित झाला आहे. नॉन प्लॅनच्या खर्चाला कधीच कट लावत नाही. परंतु येथे विद्यार्थ्यांच्या अनुदानावर देखील कट लावलेला आहे. त्याकरिता पूर्ण पैसे दिले नाही. अशा प्रकारे अल्पसंख्यांक विभागाकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे. विभागाकडून आवश्यक ती अंमलबजावणी करण्यात आली नाही. आयटीआय किंवा हज हाऊस संदर्भातील बाब असो यासंदर्भात कोठे जागा न मिळणे, तर काहींचे प्रस्ताव न येणे, अशा बाबी घडल्या आहेत. यावरुन असे दिसून येते की, अल्पसंख्यांक विकास विभागात कामाची गती नाही असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

प्रधानशीर्ष २०५२, सचिवालय सर्वसाधारण सेवा यामध्ये निधी प्रत्यार्पित करण्याचे कारण असे आहे की, अल्पसंख्यांक विभागाकडे ६९ पदे मंजूर होते. सन २०११-१२ मध्ये १८ पदे रिक्त होती. त्यामुळे निधी परत करावा लागला ही बाब नॉन प्लॅनमध्ये आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रिक्त पदांची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सद्यःस्थितीत १० पदे रिक्त आहेत. कक्ष अधिकारी यांची पदे भरण्यात आली असून क्लार्क व इतर पदे भरणे बाकी आहेत तसेच भरण्यात न आलेली पदे व्यपगत झालेली नाहीत.

अल्पसंख्यांक विकास विभाग हा संवेदनशील आहे. सच्चर समितीनंतर या विभागाकडून अल्पसंख्याकांना खूप अपेक्षा आहेत. शिक्षणाचा विकास (एज्युकेशन डेव्हलपमेंट), राहणीमान उंचाविणे (लिव्हींग स्टॅण्डर्ड वाढविणे,) व सामाजिक दर्जा वाढविणे या बाबी आवश्यक आहेत. पण जर विभागाकडे पदे रिक्त असतील तर ही बाब योग्य नाही. सदरहू रिक्त पदांची भरती तातडीने केली पाहिजे व येथून पुढे अशी परिस्थिती उद्‌भवणार नाही, याची देखील काळजी विभागाने घेणे आवश्यक आहे असे समितीने विभागास सूचित केले.

अल्पसंख्याक विकास विभागाला फार कमी निधी मिळतो असे असतानाही त्या निधीतून ७१ लाख रुपये प्रत्यार्पित केलेले आहेत, ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागाकडे स्वतःची यंत्रणा नसल्यामुळे जिल्हाधिकारी व उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून काम करुन घेतले जाते. अल्पसंख्यांक विकास विभागाच्या पोस्ट केवळ मंत्रालयामध्येच आहेत.

मागणी क्रमांक ZE-१ 'सचिवालय सर्वसाधारण सेवा' यामध्ये सन २०११-१२ मध्ये एकूण अनुदान १० लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली पुर्नविनियोजित रककम प्रत्यार्पित केलेली आहे. रुपये १० लाखापैकी ८.५० लाख रुपयांची रक्कम वापरली आहे असे म्हटले आहे. याबाबतचे स्पष्टीकरण देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ही रक्कम ई-गव्हर्नन्सकरिताची आहे. त्यावर्षाकरिता ई-गव्हर्नन्ससचा जो खर्च होता, तो माहिती संचालनालयाने दिला आहे.

तसेच सदर अभिप्रायामध्ये १.५० लाख रुपये प्रत्यार्पित करण्यात आले असे देखील म्हटलेले आहे याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, १० लाख रुपये पुर्नविनियोजन केले होते. हा निधी खर्च झाला नाही. रुपये ८.०५ लाख रुपये रिॲप्रोप्रिएट केलेली आहे.

ई-गव्हर्नन्सच्या योजनेमध्ये १० लाख रुपये तरतूद होती. ही रक्कम ई-गव्हर्नन्सवर खर्च न झाल्यामुळे त्यातील ८.५० लाख रुपये दुसऱ्या योजनेकरिता रिॲप्रोप्रिएट केले व १.५० लाख रुपये समर्पित केले.

रुपये १० लाखांपैकी ८.५० लाख रुपये दुसऱ्या योजनेकरिता रिॲप्रोप्रिएट केले व १.५० लाख रुपये समर्पित करण्यात आले. असे करीत असताना सदरहू ८.५० लाख रुपयांकरिता वित्त विभागाची परवानगी घेणे आवश्यक होते काय? कारण ज्या योजनेकरिता निधी आला असेल तो त्याच योजनेवर खर्च झाला पाहिजे. निधी खर्च झाला नसेल तर प्रत्यार्पित करावा किंवा ॲडीशनल ठेवला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता सदरहू निधी पुरवणी मागणी केल्यामुळे मिळाला होता. रुपये ८.५० लाख रुपये दुसऱ्या योजनेवर खर्च झाले होते.

एका योजनेचे पैसे दुसऱ्या योजनेवर खर्च करता येते का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रधान लेखा शीर्ष बदलायचे नसेल आणि गौण लेखा शिर्षमध्ये पुर्नविनियोजनचे अधिकार खाते प्रमुखांना आहेत. परंतु प्रधान लेखा शीर्ष बदलायचे असेल तर वित्त विभागाची परवानगी घ्यावी लागते.

महालेखाकारांच्या आक्षेपांमध्ये मिळालेले १० लाख रुपये परत गेल्याचे दाखविले आहे व विभागाने ते युटीलाईज केले असे दाखविले आहे. १० लाख रुपयांपैकी ८.५० लाख रुपये दुसऱ्या योजनेकरिता वापरले आहे आणि १० लाख रुपये पुर्नविनियोजन दाखविले आहे. रुपये ८.५० लाख रुपये इतर ठिकाणी वापरल्याचे विभागाने मान्य केले आहे. सदरहू योजना कोणती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही योजना ई-गव्हर्नन्ससाठीची आहे. संगणक खरेदी करणे, वेबसाईट बनविणे यासाठी ही योजना आहे. ई-गव्हर्नन्स ही योजना माहिती तंत्रज्ञान विभागाच्या माध्यमातून केली आहे. महाऑनलाईन, एनआयसीकडूनच काम करुन घेतले जाते. यासाठी १० लाख रुपये निधी होता. परंतु कट लावल्यामुळे १.५ लाख रुपये खर्च केले नाही.

मुख्य लेखाशीर्ष २२३५ "सामाजिक सुरक्षा व कल्याण" याअंतर्गत अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी सहाय्यक अनुदान याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, ही योजना गणवेश पुरविण्याबाबतची आहे सद्या ही योजना बंद झाली आहे. सन २०११-१२ या वर्षामध्ये १८ कोटी रुपये अनुदान होते. १३ कोटी ५० लाख रुपये प्रत्यक्ष खर्च झाला. विभागाचे अभिप्राय निरंक आहे. इतर निधीचे पुर्नविनियोजन केले आहे. म्हणजेच ७५ टक्के निधी खर्च करण्यात आला आहे.

तथापि वित्त विभागाने ८५ टक्के अनुदान दिल्याचे आहे असे महालेखाकारांच्या परिच्छेदात नमूद केले आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ८५ टक्क्यांवर रिमार्क्स दिलेले आहे. यांनी प्रत्येक परिच्छेदाला रिप्रोड्युस केले आहे. आवश्यकता नसताना प्रत्येक बाबीवर असेच लिहिलेले आहे. एकंदरीत करिता हे आवश्यक होते. यांना ८५ टक्क्यांची अडचण नव्हती. मिळालेला निधी खर्च केला असून अतिरिक्त निधी पुर्नविनियोजीत केला आहे.

गणवेश वाटपाचे किती नियोजन होते. रुपये १३ कोटी ५० लाखांची मागणी केली होती की, १८ कोटी रुपयांची मागणी केली होती. कारण विभागाचा नियतव्यय १८ कोटी रुपयांचा होता. गणवेशाचा विषय सेन्सीटीव्ह आहे. विभागाने निधीची कमी मागणी केली होती की, वित्त विभागाने कमी निधी दिलेला आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, १८ कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी १३ कोटी ५० लाख रुपये मिळाले होते. सन २०१२-२०१३ पासून ही योजना बंद करण्यात आली आहे.

प्रधान शीर्ष २२३५ "सामाजिक सुरक्षा व कल्याण" याअंतर्गत अल्पमुदतीत व्यवसायाधारित पाठ्यक्रमांसाठी सहाय्यक अनुदान याअंतर्गत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता अल्पकालावधीतील ट्रेनिंगच्या फीची प्रतिपूर्ती दिली जाते. म्हणजेच एक वर्षाचे किंवा सहा महिन्यांचे कोर्स असतात. या कोर्सेसला एमएसबीटीई, एआयसीटीई, एनसीव्हीटीकडून मान्यता असते. याकरिता ३ कोटी ६४ लाख रुपये खर्च केले असून १ लाख २२ हजार रुपये प्रत्यार्पित केले आहेत. याचा प्रत्येक वर्षी ९ ते १० हजार मुलांना लाभ मिळतो. याची अंमलबजावणी डायरेक्टर ऑफ हायर टेक्निकल एज्युकेशन आणि डायरेक्टर ऑफ व्होकेशनल एज्युकेशनकडून केली जाते असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

तथापि ज्या विद्यार्थ्यांना विभागाकडून ट्रेनिंग देण्यात येत आहे, त्यांचे योग्य रितीने ॲसेसमेन्ट होणे आवश्यक आहे. What exactly these people are going to do in future?. दिलेल्या शॉर्टटर्म कोर्सपैकी किती जणांनी स्वयंरोजगार सुरु केला आहे, किती जणांना नोकरी मिळाली, यासंदर्भातील अपडेट माहिती विभागाने ठेवली पाहिजे. Then we can judge the performance of the Scheme. यामध्ये योजनांचे परफॉर्मन्स ॲसेसमेन्ट नाही. इव्हॅल्युएशन कुठेही नाही. त्यामुळे यासंदर्भातील परफॉर्मन्स कळत नाही. खरे तर ट्रेनिंग घेतलेल्यांचा परफॉर्मन्स कळणे आवश्यक आहे. केवळ संस्थेला पैसे वाटप केले जातात, परंतु त्याचे ॲसेसमेन्ट केले जात नसेल तर निधीचा फायदा झाला किंवा कसे किंवा त्यांना प्रॉपर टिचींग करण्यात आली आहे काय, हे सुद्धा कळणार नाही अशी सूचना समितीने विभागास केली.

या अनुषंगाने विभागीय सचिवांनी खुलासा करताना सांगितले की, संस्थेला पैसा दिला जात नाही तर सदरहू निधी विद्यार्थ्यांच्या अकाऊंटमध्ये ट्रान्सफर केला जातो. आतापर्यंत ४० हजार ७२७ विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचा लाभ मिळालेला आहे.

यावर समितीने असेही सूचित केले की, विद्यार्थ्यांच्या खात्यावर पैसे जमा केले असले तरी, त्यांनी कोणत्या संस्थेमध्ये व कोणता कोर्स पूर्ण केला याची माहिती ठेवण्यात यावी. सदरहू संस्था रेप्युटेड, रिनाऊंड असल्या पाहिजेत. अशा चांगल्या संस्थेंची इम्पॅनल लिस्ट असली पाहिजे. त्यांचे ॲक्रेडीएशन केले पाहिजे. कारण कोणत्याही संस्थेमध्ये ॲडमीशन घ्यायचे व विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचा फायदा न होता, संस्थेलाच पैसे मिळणार, असे व्हायला नको.

यासंदर्भात विभागीय सचिवांनी असे सांगितले की, संस्थेंचे प्रॉपर असेसमेंट केले जाते. तसेच डिपार्टमेंट ऑफ हायर एज्युकेशन वापरत असलेल्या सॉफ्टवेअरमध्ये अशा संस्थांनी रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. रजिस्ट्रेशन करीत असताना सदरहू संस्था शासन मान्य आहे काय, संस्थेकडील कोर्सेसला एमसीबीटीई, एआयसीटीई, एमएसबीटीई यांची मान्यता आहे किंवा कसे हे पाहिले जाते असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

अल्पकालावधीत ट्रेनींग देणाऱ्या संस्थांना शासनाची मान्यता असली पाहिजे. तसेच जे विद्यार्थी तेथे कोर्सेस करतात त्यातून आऊटपूट निघाले पाहिजे. कारण रोज टेक्नॉलॉजी, सॉफ्टवेअर अपडेट होत आहे. अँड्राईड मोबाईल पाहिला तर रोज सकाळी नवीन सॉफ्टवेअर आल्याची माहिती मिळते. विभागाने एमएससीआयटीचे एक सॉफ्टवेअर घेतल्यानंतर किती वर्षांनंतर त्याचे अपग्रेडेशन होते, त्याचे लोकांना आऊटपूट काय मिळते, थोडक्यात मुलांचा डेटाबेस तयार करावा, प्रशिक्षण घेतलेल्या मुलांशी फोनवर संपर्क साधून त्यांच्याकडून हे जाणून घ्यायचे की आपण केलेल्या कोर्सचा उपयोग आपण कसा करीत आहात अशी विचारणा समितीने केली असता याबाबतचे उत्तर विभागांकडून प्राप्त झाले नाही. मात्र विभागाकडून मूल्यमापन करण्यात येणार असून सध्या सॅम्पल सर्व्हेदेखील करण्यात येतो. सद्यःस्थितीत ही योजना सुरु असून या वर्षी याकरिता १० कोटी रुपयांचे बजेट आहे.  एमएसबीटी व इतर एजन्सीद्वारे अप्रुव्ह झालेले कोर्सेस तेच राहतात. विभाग काही कोर्सेसची यादी करीत नाही. प्रत्येक वर्षाचे १० हजारचे टार्गेट आहे. विभागाकडून प्रयत्न करण्यात येणार आहे की, पुढच्या वर्षापासून या संख्येत वाढ व्हावी.

विभागाकडून राबविण्यात येणारे कोर्सेस हे आजच्या परिस्थिती प्रमाणे अपडेट केलेले आहेत काय कारण शासनाचे सेक्टर वगळता प्रायव्हेट सेक्टरमध्ये एमएससीआयटीला काहीही व्हॅल्यू नाही. दरवर्षी नवनवीन कोर्सेस येत असताना यांच्या मार्फत वर्षानुवर्षे तेच कोर्सेस चालविले जातात. असे मत समितीने व्यक्त केले

असता अल्पसंख्यांक विभाग केवळ ट्रान्सफर ऑफ फंड करते. खरे तर उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे हे काम आहे, असे असताना हे केवळ पैसे ट्रान्सफर करतात.

ट्रेनिंगचा फायदा होतो आहे की नाही हे पाहून त्यांनी डिसकंटिन्यु करण्याबाबत निर्णय घेतला पाहिजे असे समितीने सूचित केले असता त्याचे मूल्यमांपन व सॅम्पल सर्व्हे करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

प्रधान शीर्ष २२३५ अंतर्गत स्वयंमसहाय्यता गटाकरिता जे अनुदान उपलब्ध झाले होते त्याबाबत विभागाच्या अभिप्रायामध्ये असे नमूद केले आहे की, प्रशासकीय कारणास्तव केलेली तरतूद या योजनेत अधोरेखित खर्च कमी असल्याने आम्ही सरेंडर केली. हे प्रशासकीय कारण काय होते, ते समितीला अवगत करण्यात यावे असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही स्कीम माविम कडून करून घेतो. अल्पसंख्याक समाजातील गरीब महिलांकरिताची ही स्कीम आहे. दिनांक २८.०३.२०१२ रोजी कॅबिनेट अप्रुव्हल होऊन याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाला होता. त्यानुसार ११ शहरांमध्ये २४०० एसएसजीचा एक ७ वर्षांचा प्रोग्राम होता त्यामध्ये ते सक्षम करून तयार करून घेण्यात आला. त्यामध्ये बँकेशी लिंकअप करून ट्रेनिंग करून हे सर्व करून घेण्यात आले. फेब्रुवारी, २०१२ मध्ये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात आल्याने माविमने काही मागणी केली नाही. विभागाकडून असा प्रयत्न करण्यात येत होता की, कॅबिनेट कडून स्कीम पास करून घ्यावी परंतु तोपर्यंत २८ फेब्रुवारीचा दिवस आला. सद्यःस्थितीत माविम आता तेथे काम करीत आहे.

अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक गटांना पैसे देण्यात येतात काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शासन निर्णयाप्रमाणे ७ वर्षांचा एक कार्यक्रम ठेवलेला आहे. अल्पसंख्याक समाजातील मुस्लीम वस्तीत राहणाऱ्या महिला जेथे राहतात त्या भागामध्ये एंट्री करणे अतिशय कठीण आहे. त्या महिलांना घराच्या बाहेर आणून एकत्र करण्यात माविमला खूप अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. ही सोशल डिफीकल्टी आहे. त्या भागात प्रवेश करून त्या महिलांना एकत्र करण्यास माविमला २ वर्षे लागली. आता ते त्यामध्ये यशस्वी झाले व त्यांनी मुंबई, मुंबई सबअर्बन, नांदेड, मालेगाव, करंजा, वाशिम, परभणी, पुणे, नागपूर, औरंगाबाद, भिवंडी, मुंब्रा, कौसा, मिरज, सांगली अशा ११ शहरांत २५०० ग्रुप्स तयार केले आहेत. त्यांच्यामध्ये सेव्हिंग व आपापसात लोनिंग चालते. ट्रेनिंग व इंटरनल लोनिंग या गोष्टी ग्रुप स्टेबल आहे हे एनशुअर करण्यासाठी दोन अडीच वर्षे केल्याच पाहिजेत. त्यानंतर ते बँकेचे लिंकअप करतात. आता काही ग्रुप्स थोडे स्टेबल झाले आहेत, त्यांचे ते बँकेशी लिंकअप करतात. काही ग्रुप्सच्या बाबतीत स्ट्रेंथनिंग, ट्रेनिंग, मिटिंग हे सर्व सुरू आहे.

अल्पसंख्याक गटाचा क्रायटेरिया काय आहे, सदस्यांची संख्या ७५ पर्यंत वाढविली पाहिजे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, असे काही नाही. सर्वसाधारणपणे ते मुस्लीम वस्तीत जातात. त्याचा क्रायटेरिया असा आहे की, त्या महिला गरीब असल्या पाहिजेत कारण त्यांनाच सेव्हिंग करायचे आहे.

अल्पसंख्याक गटाचा क्रायटेरिया ठरविताना एका गटात अमुक समाजाचे अमुक टक्के लोक असले पाहिजेत असे काही निकष आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी त्यास होकारार्थी उत्तर दिले व क्रायटेरियाबाबतचा शासन निर्णय समितीला देण्याचे आश्वासीत केले.

अल्पसंख्यांक विभाग एसएसजीला किती पैसे देता ? व ते पैसे कशासाठी वापरले केले जातात ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडून एसएसजीला काही पैसे देत नाही. विभाग माविमला पैसे देतो. माविम त्यांच्या सहयोगीनी अपॉईंट करतात. हे पैसे डेव्हलपमेंट व ट्रेनिंग करिता युटिलाईज केले जातात व हे पैसे त्यांना बँकेतून दिले जातात. मौलाना आझाद अल्पसंख्याक महामंडळाकडूनही देतो.

मुंबई, सोलापूर, नांदेड येथे उर्दू घरांसाठी जागाच उपलब्ध झाली नाही असे स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे. उर्दू घर म्हणजे काय ? उर्दू घरासाठी अनुदान याबाबत समितीला माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, उर्दू घर म्हणजे उर्दूच्या प्रचार, प्रसाराकरिता एक छोटेसे ऑडिटोरियम, एक लायब्ररी, १-२ सेमिनार हॉल अशी कल्पना आहे. उर्दूच्या प्रचार, प्रसाराबरोबर विभागाने दुसरे नियम आता तयार केले आहेत. तेथे उर्दूला प्राथम्य दिले जाते. उर्दू मुशायरा, लिटररी सेमिनार, स्टोरी रिडिंग अशा प्रकारचे लिटअरी काम केले जाते.

अल्पसंख्याकांना मुख्य प्रवाहात आणावयाचे असेल तर, त्यांना उर्दूच्या प्रसाराशिवाय इंग्रजी कशी शिकता येईल, त्यांचे बाकीचे पर्सनल डेव्हलपमेंट कसे होईल यावर फोकस केले पाहिजे तरच ते सिस्टममध्ये येतील. पण उर्दूच्या प्रचारा-प्रसाराकरिता उर्दू घर बांधायला निघालात तर ते कसे होईल ? जेथे उर्दू घर बांधावयाचे आहे तेथे जागेची किंमत काय आहे ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जेथे जशी जमीन मिळते तशा प्रकारचे डिझाईन आपण तयार करून घेतो.

अल्पसंख्याक विभागाचा सेंटर पॉईंट फक्त मुस्लीम समाज आहे का, उर्वरित ४-५ जातींच्या लोकांकरिता विभागाकडून काय करण्यात येते याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, याचा उपयोग बाकीच्या लोकांसाठी सुद्धा आहे.

महाराष्ट्रात अशी उर्दू घरे कोठे कोठे बांधलेली आहेत व अन्य अल्पसंख्याक गटाकरिता अशी काही घरे बांधली आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सध्या नांदेडमध्ये

बांधकाम सुरू असून ते डिसेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. यासाठी ८.२३ कोटी रुपयांचे प्रयोजन आहे. विभागास मुंबईमध्ये जागा मिळाली नाही. सोलापूर मध्ये मिळालेल्या जागेचा आकार थोडा वेगळा होता, त्यामुळे त्या आराखड्यामध्ये बदल करायला सांगितला आहे. ते काम आता होत असून पुढच्या वर्षापासून बांधकाम सुरू होईल.

उर्दू घरांसाठी वक्फ बोर्डाची जमीन वापरता येणार नाही काय ? कारण एका बाजूला असे सांगितले जाते की, जागा उपलब्ध नाही. तर दुसऱ्या बाजूला वक्फ बोर्डाची जागा शासन दुसऱ्यांना देते. त्यादृष्टीने वक्फ बोर्डाची जागा देखील वापरली पाहिजे. तसा प्रस्ताव शासनाकडून संबंधित विभागाकडे गेला पाहिजे अशी सूचना समितीने केली.

जशा गर्व्हनमेंट पॉलिटेक्नीक असतात तशा मायनॉरिटीजच्या पॉलिटेक्नीक, मायनॉरिटीजच्या आयटीआय असल्या पाहिजेत. वाशिम जिल्ह्यामध्ये तेथील जे मुस्लीम समाजातील मायनॉरिटीचे लोक आहेत त्यांचा मोटार मॅकेनिक व्यवसायात ९५ टक्के वाटा आहे. मात्र ते बजाज ऑटो किंवा टाटा सारख्या कंपनीत जाऊ शकत नाहीत. कारण त्यांच्याकडे डिग्री नाही. असे प्रशिक्षण देणारे आयटीआय काढले पाहिजेत. मॅकेनिक, मोटार मॅकेनिक, इलेक्ट्रिशिअन, प्लंबर या क्षेत्रात ९० टक्के हे लोक काम करतात. या लोकांना आयटीआय किंवा पॉलिटेक्नीकचा डिप्लोमा दिला तर, त्यांनाही एक स्टेटसचे लाईफ मिळेल. उर्दू घराबरोबरच या गोष्टी केल्या तर, या समाजाला त्यांची जीवन पद्धती बदलण्यास फार मोठ्या प्रमाणावर संधी मिळेल अशी सूचना देखील समितीने केली.

केंद्र शासनाची मल्टी सेक्टोरल डेव्हलपमेंट प्रोग्राम अशी एक स्कीम आहे, त्या अंतर्गत या वर्षी परभणीमध्ये नवीन पॉलिटेक्नीक करिता अप्रुव्हल मिळाले आहे. मंगळूरपीरसाठी सुध्दा असे एक प्रपोजल दिले होते की, तेथे मायनॉरिटीजसाठी ॲडिशनल ब्रँचेस सुरू कराव्यात. पण ते मान्य झाले नाही. आता मंगळूरपीर येथे जागा आहे व हॉस्टेलही आहे तेथे नवीन पॉलीटेक्नीक बांधण्याचे प्रपोजल दिलेले आहे. मंत्री महोदयांनी त्याला अप्रुव्हल दिलेले आहे असे विभागीय सचिवांकडून सांगण्यात आले.

कारंजाला मायनॉरिटी करिता पॉलिटेक्नीक देण्याबाबत वर्षभरापासून मागणी करण्यात येत आहे. तेथे ५२ टक्के मुस्लीम असून मुसलमानांची संख्या ३५ हजार इतकी आहे. विभागाकडून पॉलिटेक्नीकल पाहिजे तेथे ते बांधत नाहीत. व जेथे गरज नाही तेथे मंजूर करण्यात येते. अशावेळी जर कॉलेजमध्ये विद्यार्थी मिळाले नाहीत तर ती कॉलेजस बंद पडतात. त्यासाठी लोकसंख्या किती आहे पाहिले पाहिजे असे समितीने सुचविले असता विभागीय सचिवांनी करंज्याच्या पॉलिटेक्नीकबाबत विचार करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले. तसेच जेथे पॉलिटेक्नीक बंद पडले आहेत त्याची माहिती दिल्यास ते सुरु करण्याचा विभागाकडून प्रयत्न करण्यात येईल असे देखील विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

पॉलिटेक्नीकचे शिक्षण हे सध्या मार्केट डिमांड प्रमाणे आवश्यक आहे. आपल्याकडे डिग्री कोर्सेस एक्सेस झाले आहेत. १ डिग्री कोर्स असेल तर ४ पॉलिटेक्नीक पाहिजे आणि ८ आयटीआय पाहिजे. ८ आयटीआय, ४ पॉलिटेक्नीकचे डिप्लोमा होल्डर आणि १ डिग्री होल्डर असा रेशिओ पाहिजे. असा रेशिओ मार्केटला आवश्यक आहे. तसा तो नाही. डिग्री खूप जास्त झाले आहेत. पॉलिटेक्नीक थोडे कमी आहेत असे मत समितीने व्यक्त केले.

प्रधानशीर्ष २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, राज्य योजनांतर्गत योजना याअंतर्गत अल्पपसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनामध्ये दुसरी पाळी सुरु करण्याबाबत सहाय्यक अनुदान योजना यामध्ये बचत होण्याची कारणे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ५.९९ लाख रुपये इतका खर्च कमी झाला आहे. डिमांड फ्रॅाम डीटी ९.५८ कोटी रुपये होते आणि आपण त्यांना ७.१८ कोटी रुपये रिलिज केले होते. परंतु, डीटी १.२८ कोटी रुपये खर्च करू शकले कारण टिचर अपॉईंटमेंटची प्रोसिजर संपली नव्हती. त्यामुळे त्यांच्याकडून पूर्ण खर्च होऊ शकला नाही.

अल्पसंख्याक बहुल क्षेत्राकरिता विकास कार्यक्रम यामध्ये केंद्र शासनाचा किती हिस्सा आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही  मल्टी सेक्टरल डेव्हलपमेंट प्रोग्राम स्कीम आहे. ही केंद्र शासनाच्या मिनिस्टरी ऑफ मायनॉरिटी अफेअर्सची फ्लॅगशिप स्कीम आहे. याचे उद्दीष्ट असे आहे की, जेथे जेथे सोशल इन्फ्रास्ट्रक्चरची कमी आहे तेथे गॅप फिलिंग करणे. याची अंमलबजावणी करण्याकरिता ज्या जिल्हा किंवा ब्लॉक्सचे सिलेक्शन होते ते देखील केंद्र शासनाकडून केले जाते. यामध्ये असे झाले की, त्यावेळी बुलढाणा, वाशिम, परभणी व हिंगोली हे ४ जिल्हे ११ प्लानमध्ये होते. यामध्ये आपण १५ कोटी रुपयांची शॅडो प्रोव्हीजन ठेवली होती व १३ कोटी रुपये रिलिज केले होते.  त्यावेळेस ११ प्लान मध्ये केंद्र शासनाचा शेअर होता. ७५:२५ असा शेअर आंगणवाडी आणि इंदिरा आवास योजनेसाठी होता. गर्ल्स हॉस्टेल या कंपोनंट करिता ते १०० टक्के देत आहेत. परंतु, १०० टक्के आपला टाईप प्लान पुरत नाही. बाकी पैसे स्टेट प्लान मधून देतात.

फ्री कोचिंग बाबत ही संकल्पना काय आहे ? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की,  एमपीएससी, युपीएससी, १० वी, १२ वी फेल, बँकिंग सीईटी ऑफ इंजिनिअरिंग अँड मेडिकल करिता अल्पसंख्याक समाजाच्या मुलांना कोचिंग देणे. दिनांक २५.०६.२०१३ रोजी या स्कीमचा शासननिर्णय निर्गमित झाला होता. त्या वर्षी सन २०११-२०१२ मध्ये संस्थेच्या सिलेक्शनकरिता आपण हे केले. सन २०१२-२०१३ पासून या स्कीमच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला सुरवात झाली. आता ही स्कीम सुरू असून. प्रत्येक वर्षी साधारणपणे ४ हजार विद्यार्थ्यांना कोचिंग दिले जाते. ठाणे, मुंबई, नागपूर, नाशिक, अमरावती, पुणे अशा ठिकाणच्या १७ संस्था आहेत.

सद्य:स्थितीत ४ हजार विद्यार्थ्यांना कोचिंग देण्यात येत आहे मात्र त्यातील खरोखर किती सिलेक्ट होत आहेत? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, खरोखर सिलेक्ट होण्याबाबत nobody can guarantee. परंतु याचे मूल्यमापन विभागाकडून करण्यात येईल. पण ही गॅरंटी कोणीही देऊ शकणार नाही की, आयएएसचे कोचिंग केले म्हणून आयएएसची परीक्षा पास होणार.

मूल्यमापन केल्यावर ते कळू शकेल असे समितीने सुचविले असता त्याचे मूल्यमापन करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

ही स्कीम सुरू होऊन एकच वर्ष झाले आहे. याचे रिझल्ट्स काय आहेत ते कळलेच पाहिजे, नाही तर पैसे वाया जातील. आपण याद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षण व ट्रेनिंगची क्वालिटी वाढविण्याबाबत प्रयत्न केले पाहिजेत अशी सूचना समितीने केली.

प्रधान शीर्ष २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण यामध्ये प्राथमिक शाळेतील अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी पालकांना प्रोत्साहनपर रक्कम म्हणून भत्ता देणे याकरिता आपले १८ कोटी रुपयांचे नियोजन होते. खरे तर उपस्थिती भत्याला कट लावण्याचे कारण नव्हते. प्रोत्साहन भत्याला आपण पूर्ण सपोर्ट करणे आवश्यक होते. मात्र प्रत्येक शाळेमध्ये १० टक्के मुलांना देखील तो मिळत नाही ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ही योजना सन २००८-०९ ते सन २०१३-१४ पर्यंत सुरू होती. आता ती योजना बंद झालेली आहे.

सन २०११-१२ मध्ये अल्पसंख्यांक विकास विभागाला निधी कमी मिळाला होता त्यावेळी विभागाकडून काही प्रयत्न केला काय ? कारण अल्पसंख्याक समाजामध्ये शिक्षणाचा अभाव आहे. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना सुरू केली आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, १५ टक्के कट लावला होता.

कट लावला होता की, मागणी कमी करण्यात आली होती ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जेवढा निधी मिळाला तेवढा खर्च करण्यात आला. १५.३० मिळाला होता. तेवढा खर्च करण्यात आला. ८५% निधी रिलीज केला. विभागास निधी कमी मिळालेला आहे.

अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदानासाठी सहाय्यक अनुदान याअंतर्गत आयटीआय संस्थेची अंतिम निवड झाली नाही. या संदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, पीपीपी बोर्ड प्रोग्राम होता. काही बेसिक कारणामुळे आयटीआयची निवड झाली नाही. आता पॉलिटेक्निक संस्था बंद करण्यासाठी मुख्य सचिवांनी मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव सादर केला आहे. ही योजना आता आपल्याला बंद करावयाची आहे. गरीब अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना खाजगी आयटीआयची फी परवडत नाही.

समितीने यासंदर्भात विचारणा केली की, नवीन तांत्रिक शाळांना दिलेले अनुदान देखील सरेंडर केलेले आहे. तंत्रनिकेतन संस्थेची अंतिम निवड न झाल्यामुळे रक्कम खर्च झाली नाही यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, पीपीपी मॉडेल होते. ते आता बंद केले जाणार आहे.

सदर योजना काय होती ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ३ कोटी रुपये शासनाकडून मिळणार होते. जमीन, कन्स्ट्रक्शन, कर्मचाऱ्यांचा पगार इ. खर्च खाजगी मालकाकडून केला जाणार होता. खाजगी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये दरवर्षी ४० ते ७० हजार रुपये फी आहे. गरीब अल्पसंख्याक मुले एवढी फी भरू शकत नाही. त्यामुळे ही योजना आता बंद केली जाणार आहे. आयटीआयमध्ये अद्याप केले नाही मात्र तेथे देखील केले जाणार आहे. या दोन्ही योजना रिएप्रोप्रिएट केल्या आहेत.

स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात प्रत्येक गोष्टीला ८५ टक्के अनुदान, संस्थेची निवड न करणे असे मुद्दे आहेत. वारंवार महालेखाकारांनी विचारले आहे की याची कारणे काय आहेत, पैसे का नाही मिळाले, संस्थेची निवड का झाली नाही. यासंदर्भात विभागाकडून उत्तर दिले नाही.

प्रधानशीर्ष २२३५ सामाजिक सुरक्षा आणि कल्याण याअंतर्गत अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रातील क्षेत्रविकास योजनांसाठी सहाय्यक अनुदान यामध्ये ८ लाख रुपये मागील वर्षीचे वापरण्यात आले. हे कसे काय शक्य आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या वर्षी पैसे दिले गेले त्या वर्षी काम संपले नाही तर ते पुढच्या वर्षी वापरता येणार होते. सन २०११ -१२ मध्ये ८ लाख रुपये खर्च करण्यात आले.

सदरहू रक्कम विभागाच्या अकाऊंटमध्ये कशी आली याचा खुलासा करताना महालेखाकारांनी सांगितले की, According to Rule 56 (1) of your G.F.R. the unused funds of your department is supposed to lapse, you cannot use it in subsequent years. Therefore, the explanation given by you is not correct. यावर We will look into the matter असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

प्रधानशीर्ष २२३५ सामाजिक सुरक्षा आणि कल्याण याअंतर्गत प्रवासावरील खर्च यामध्ये पुरवणी मागणीमधून २० लाख रुपये घेतले. पूरक नियतव्यय खर्च केला नाही. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये दोन बाबी आहेत. वेतनेतर बाबीमध्ये खादीमूल हाजींचा समावेश होतो. हजला जाणाऱ्यांना मदत करण्यासाठी त्यांची निवड शासकीय कर्मचाऱ्यांमधून केली जाते. ४१ खादीमूल हाजी मिळतील अशी अपेक्षा होती. मात्र तेवढे एलिजेबल ॲप्लीकेशन आले नाहीत. यामुळे केवळ ३१ खादीमूल हाजी प्राप्त झाले. केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे त्यांची निवड केली जाते. त्यावेळी हज समितीमध्ये अध्यक्ष नव्हते. त्यांचे मानधन व त्यांच्या स्टाफच्या खर्चाची बचत झाली. ३०० हाजींच्या मागे आपण एक खादीमूल

हाजी पाठवतो. तो राज्य शासकीय कर्मचारी किंवा निम शासकीय कर्मचारी असावा. त्याची निवड नियमानुसार केली जाते. निवड झाल्यानंतर ती माहिती केंद्र शासनाला पाठवली जाते. त्यातून केंद्र शासन त्यांच्या नियमानुसार निवड करते. हाजींना यात्रेमध्ये मदत करण्याचे त्यांचे काम असते.

रुपये १५.६१ लाख सन २०१२ मध्ये सरेंडर करण्यात आले आहेत. त्यामुळे बचत राहिली नाही ही बाब समितीने निदर्शनास आणली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, १५ लाख ६१ हजार रुपये एकूण समर्पित रक्कम आहे.

यासंदर्भात महालेखाकारांनी समितीस अवगत केले की, विभागाकडून २०११-१२ या वर्षाच्या खर्चाचा ताळमेळ केला नाही. तसेच सन २०१५-१६ या वर्षाचा देखील खर्चाचा ताळमेळ विभागाकडून करण्यात आलेला नाही. (You have not reconcilled your accounts for the year of 2011-2012. This is the main problem. You have also not reconcilled accounts of 2015-2016. )

अल्पसंख्यांक विभाग लहान असताना देखील विभागाला खर्चाचा ताळमेळ करण्यास अडचण का येत आहे ? विभागाकडून रिकन्सिलिएशन वेळेवर होत नाही अशी खंत समितीने व्यक्त केली. यावर महालेखाकारांनी विभागास सूचित केले की, महालेखाकार कार्यालयाने खर्चाचा ताळमेळ करण्यासाठी नविन ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित केलेली आहे. त्या संगणक प्रणालीचा विभाग वापर करु शकेल. यावर विभागीय सचिवांनी आश्वासित केले की, विभागाकडून महालेखाकारांनी विकसित केलेल्या संगणक प्रणालीचा वापर करण्यात येईल.

(We have launched new software for online reconcillation, you can make use of that software. यावर विभागीय सचिवांनी असे आश्वासित केले की, We will do sir. )

औरंगाबाद येथे हज हाऊसकरिता जागा उपलब्ध झाली नाही. या संदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, आता त्याचे काम सुरू झाले आहे. मंत्रिमंडळाने दि. ३१/३/२०१० मध्ये निर्णय घेतला होता. दि.२७/८/२०१३ मध्ये महसूल व वन विभागाने आम्हाला जागा दिली. तेथे ५३ लोकांनी अतिक्रमण केलेले होते. त्यांना हटवून त्यांचे पुनर्वसन करण्यामध्ये वेळ गेला. आता सिडकोशी करार केला असून त्यांना निधी देखील दिलेला आहे. सध्या तेथील काम सुरू आहे.

प्रधानशीर्ष २२३५, समाजिक सुरक्षा व कल्याण या अंतर्गत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी सुरु करण्यासाठी सहाय्यक अनुदान ९ कोटी रुपये असून प्रत्यक्ष खर्च १२ कोटी ७३ लक्ष रुपये झालेला आहे, अधिकचा खर्च ३ कोटी ७२ लाख रुपये झालेला आहे. या संदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ऑगस्ट २००९ पासून ही योजना असून

ती सन २०१०-११ पासून सुरू झालेली आहे. या रकमेमध्ये कर्मचाऱ्यांच्या पगाराचा समावेश असल्यामुळे अधिकचा खर्च झालेला आहे.

परंतु यासंदर्भात विभागाने पाठविलेली नोट ऑफ एरर ठीक नव्हती ही बाब महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणली असता समितीने विभागास निर्देशित केले की, विभागाने जी नोट ऑफ एरर पाठवली होती, ती एजींनी अमान्य केलेली आहे त्याच्यात विभागाने दुरुस्ती करावी.

प्रधानलेखाशीर्ष २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण याअंतर्गत राज्य अल्पसंख्यांक आयोग, केंद्र पुरस्कृत योजना, सहाय्यक अनुदान याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, सन २००९-१० व २०१०-११ मध्ये उर्वरित निधी दि. ३१/३/२०१२ रोजी चलनाद्वारे रिझर्व्ह बँकेमध्ये जमा केला होता. मात्र तो निधी आरबीआयच्या जनरल इन्श्यूरन्स या हेडमध्ये गेला. विभागाकडून चूक झालेली नाही, आरबीआयकडून चूक झालेली आहे. महाराष्ट्र अल्पसंख्याक आयोगाने हा निधी जमा केला होता. The PAO had sent a Note of Error to A.G.. We are regularly following up with A.G. Office. The A.G. had also said that the Finance Department of our state also made some observation on this issue. पीएओ सांगितले आहे की, ही रक्कम समायोजित करण्यात आली आहे. Yesterday, the A.G. Office said that the Finance Department of our state raised some objection in this matter.

यासंदर्भात महालेखाकारांनी समितीस सांगितले की, these two departments will have to sort out this issue. यावर विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले की, We will sort out this issue.

अल्पसंख्यांक विकास विभागाने संपूर्ण अकाऊंट विभाग दुरुस्त करावा कारण अशी अडचण समितीला इतर कोणत्याही विभागामध्ये दिसत नाही. विभागातील अकाऊंटसचे १०० टक्के रिकन्सिलिएशन झालेले नाही, हे बरोबर नाही असे मत समितीने व्यक्त केले असता वित्त सचिवांनी समितीस अवगत केले की, रिकन्सिलिएशन खर्चाच्या बाजूला कमी आहे मात्र जमेच्या बाजूला अनेक अडचणी आहेत. आता हे समन्वयाने करण्याचा प्रयत्न वित्त सचिवांच्या पातळीवर सुरू झाले आहेत. सन २०१६-१७ मध्ये ही अडचण दूर होईल, या दृष्टीने प्रयत्न करावे लागतील. जी रक्कम जमा केली जाते ती छापिल चलनाद्वारे भरली जाते. चलान बँकेमध्ये भरल्यानंतर सर्व चलनाची प्रत ट्रेझरीला पाठवली जाते. तेथील एका कर्मचाऱ्याकडून सर्व चलनाची माहिती संगणकामध्ये भरली जाते. नंतर खात्याला सांगितले जाते की, तुम्ही जी रक्कम दिली होती ती आम्हाला मिळाली आहे किंवा नाही. अशा प्रकारे रिकन्सिलिएशन होईल या नंतर महालेखाकारांकडून रिकन्सिलिएशन केले जाईल. आता आम्ही शासनाची मंजुरी घेतली आहे. सर्व खात्याने देखील त्या करिता सहकार्य केले पाहिजे. प्रत्येक डिपॉझिट ई-चलनाने करावे. बिल पोर्टलमधून बिल जमा केले तर छापिल बिल जमा केले नाही तरी देखील हा प्रश्न सुटेल. पीए ऑफिसमध्ये एजी करतात, तशी यंत्रणा सध्या आपल्याकडे अस्तित्वात नाही. मात्र ती यंत्रणा तेथे निर्माण करणे अशा ३ गोष्टी आम्ही हाती घेतल्या आहेत. कोऑर्डीनेशनद्वारे हे काम करून घेणे ही माझी जबाबदारी आहे. सन २०१६-१७ पर्यंत या तिन्ही गोष्टी वित्त विभाग पूर्ण करणार आहोत.

नागरी क्षेत्रामध्ये अल्पसंख्याक समाजातील मुलींची वसतिगृहे आहेत. तेथे मोठया प्रमाणात पदे रिक्त आहेत. त्याची परिस्थिती काय आहे, ही पदे का भरण्यात येत नाहीत ? या संदर्भात अद्यावत माहिती समितीस सादर करण्यात यावी. तसेच वित्त सचिव व महालेखाकार यांनी या ठिकाणी सूचना दिल्याप्रमाणे रिकन्सिलिएशन करावे. नोट ऑफ एररमध्ये डिस्क्रिपन्सी आहे. त्या बाबत महालेखाकारांकडून वेटींग करून घ्यावे असे समितीने सुचित केले.

विभागाने अे.सी./डी.सी बिल्स १००% नहीं भेजे है. इसके साथ साथ सन २०१५-१६ पर्यंतचे युटीलायझेशन सर्टिफिकेट्स मे भी पेंडन्सी है. त्यामुळे विभागास केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी मिळत नाही असे महालेखाकारांनी निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी आश्वासित केले की, We get it from the Collector. We regularly follow it up.

अल्पसंख्यांक विभागाला एकूण किती बजेट आहे? यामध्ये केंद्र सरकारचे किती अनुदान आणि त्यामध्ये राज्य सरकारचे किती मॅचिंग ग्रॅण्ड आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडे मल्टीसेक्टरल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम ही एक योजना आहे. त्याचे ११ योजनांमध्ये विभाजन झालेले आहे. यामध्ये ६०:४० चा रेश्यो आहे. यात आंगणवाडी आणि घरकुल योजना या बाबींचा समावेश आहे.

अल्पसंख्यांक विभागाच्या खात्याला केंद्र सरकारचे किती बजेट आणि राज्य सरकारचे किती बजेट असते ?

केंद्र सरकारच्या कोण कोणत्या योजना या विभागाला मिळतात? सर्व योजनांचे या खात्याचे एकूण बजेट किती आहे? व सन २०१५-२०१६ मध्ये अल्पसंख्याक विभागासाठी किती बजेट होते? अशी विचारणा समितीने केली असता सन २०१५-१६ करिता राज्य सरकारने यावर्षी १०० कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे, परंतु तेवढी आवश्यकता पडणार नाही. ६.२ कोटी रुपये वितरित केले आहेत. पूर्ण विभागासाठी ३०९ कोटी रुपयांचे बजेट आहे. राज्य सरकारने १०० कोटी रुपयांची प्रोव्हिजन केली आहे. तेवढी रक्कमही खर्च होणार नाही.

विभागाच्या खात्यामध्ये एकूण ४०० कोटी रुपयांचे बजेट आहे, त्यातील फक्त ५० कोटी रुपये खर्च होतात, ही बाब चुकीची आहे. अल्पसंख्याक विकास विभागात बजेट असताना ते खर्च करीत नाहीत त्यामुळे अल्पसंख्याक समाजावर अन्याय करीत आहोत. अल्पसंख्यांक विभागासाठी असलेले बजेट आपण खर्च करु शकत नाही त्यामुळे या सरकारचा चुकीचा संदेश लोकांमध्ये जाईल.

हे १०० कोटी रुपये खर्चच होणार नाहीत तर मग विभागाकडून अर्थसंकल्पात तरतूद का करण्यात येते ? विभाग बंद करुन टाकावा. ३५० कोटी रुपये ही फार जास्त रक्कम नाही. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी साडेचार हजार कोटी रुपये खर्च करु शकतो, परंतु दुसरीकडे अल्पसंख्याक विभागासाठी ३५०

कोटी रुपये प्लॅन आपण तयार  करु शकत नाही यावरुन शासनाची उदासिनता दिसून येते.  केंद्र सरकारकडून अल्पसंख्यांक विकास विभागाला अधिकचा निधी मिळाला पाहिजे यासाठी राज्य शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. या योजना डेव्हलप केल्या पाहिजेत.  विभाग खात्याची रक्कम खर्च करीत नाहीत त्यामुळे आपण खाते बंद करण्याच्या मार्गावर आहात असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

अल्पसंख्याक विभागासाठी ३०९ कोटी रुपयांचे बजेट आहे त्यामुळे ती पूर्ण रक्कम खर्च झाली पाहिजे. एकतर विभागाचा आऊटले खूपच कमी आहे. या मार्च महिनाअखेर विभागाचा किती निधी खर्च झाला? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बाराव्या वित्त आयोगामध्ये एमएसडीपीचा प्रस्ताव पाठवायचा होता म्हणून त्यावेळी १०० कोटी रुपये ठेवले होते. त्यावेळी ७५:२५ चा रेश्यो होता.  आता नुकताच ६०:४० चा रेश्यो झाला. आपण प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला होता. त्यांनी जर प्रस्ताव मंजूर केला असेल तर We would have required 100 crores. आता त्यांनी ८० कोटी रुपयांचा प्रस्तावाला मंजुरी दिलेली आहे.

८० कोटी रुपयांमध्ये आपल्याला मॅचिंगची किती रक्कम लागेल? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ६०:४० प्रमाणे पहिला हप्ता रिलीज केलेला असून त्यासाठी  ४० कोटी रुपये लागणार असून तेवढेच  ड्रॉ करुन आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना देणार आहोत.

३०० कोटी रुपयांची तरतूद राज्य सरकार करते. सन २०१४-२०१५ या मार्च अखेर किती कोटी रुपये खर्च झाले? अशी विचारणा समितीने केली असता यावर एकूण [१७१ कोटी रुपये आपण खर्च करु शकू.] १७१ कोटी रुपये वितरित केलेले आहेत. असे सांगण्यात आले.

हे पैसे एकूण बजेटच्या खूपच कमी आहेत.  राज्य सरकारचे ५० हजार कोटी रुपयांचे बजेट असते, त्याच्या एक टक्का देखील हे बजेट नसून ते खर्च झाले पाहिजे. याचा अर्थ असा आहे काय की, अल्पसंख्याक विभागाचा विकास खूप झालेला आहे म्हणून खर्च करण्याची गरज नाही.  बाकीचे पैसे रिलीज करा, विभागास काही अडचण असेल तर विभागाने समितीस सांगावी यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाच्या चार योजना आहेत.  यामध्ये मदरसा डेव्हलपमेंट, शाळेच्या पायाभूत सुविधा, शहरी पायाभूत सुविधा आणि ग्रमीण पायाभूत सुविधा यासाठी हे पैसे खर्च करावयाचे आहेत. We have got १०० crores for this.

ज्या ऊर्दू शाळा आहेत त्यांना शिक्षक देत नाहीत, तसेच इतरही सोई सुविधा देत नाहीत असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, खाजगी ऊर्दू शाळेलाही आपण काही ठराविक कामांकरिता देतो. सर्व नगरपालिकांच्या ऊर्दू शाळांना आपण निधी देत नाही, परंतु आपण आता नवीन योजना रिव्हाईज करीत आहोत, त्यामध्ये नवीन शाळांचा समावेश करण्यात येईल.

मराठवाड्यातील ६० टक्के माध्यमिक शाळा या नगरपालिकेच्या आणि जिल्हा परिषदेच्या आहेत. कोकणामध्ये मात्र शाळा नाहीत.  विभागनिहाय अभ्यास केला तर आपल्या लक्षात येईल.  मराठवाड्यामध्ये अल्पसंख्याक समाज जास्त प्रमाणात आहे. मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणात ऊर्दू शाळा आहेत त्यांना निधी

मिळाला पाहिजे, अशी त्यांची मागणी आहे. त्यांना आपण निधी देण्यात येत नाही त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाची जी योजना आहे त्यामध्ये खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये ७५ टक्क्याच्या वर अल्पसंख्याक मुले आहेत तेथे पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामध्ये लायब्ररी, सॉफ्टवेअर खरेदी करणे, सायन्स लेब्रॉरटरीचे सामान खरेदी करणे, इत्यादी कामांसाठी दोन लाख रुपये आपण देतो. बाकीच्या शाळांना सर्व शिक्षा अभियानातून निधी दिला जातो.

अल्पसंख्यांकांची विकासाची जी कामे आहेत त्यासाठी धोरण कसे काय राबविता? प्रत्येक समाजासाठी किती रक्कम खर्च झालेली त्याची सविस्तर माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्व योजना अल्पसंख्यांकाकरिता आहेत त्यामध्ये हज हाऊस, It is not religious, it is Dharmashala for Yatris. शिष्यवृत्ती आपण मेरिटमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांना देतो. टेक्निकल हाईयर एज्युकेशनसाठी देतो. जैन समाजाला ६४००, ख्रिश्चन ला १३०० मुलांना शिष्यवृत्ती दिलेली आहे. बौद्ध लोक येथून शिष्यवृत्ती घेत नाहीत कारण त्यांना सामाजिक न्याय विभागाकडून जास्त प्रमाणात रक्कम मिळते. शिख समाजाच्या ३४३ मुलांना शिष्यवृत्ती दिलेली आहे.

**समितीच्या शिफारशी :-**

**५.३ शिफारस क्रमांक (१) :** अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक समाजाच्या खूप अपेक्षा आहेत. सच्चर समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही आवश्यक आहे. अल्पसंख्याक समाजाचा शैक्षणिक विकास, राहणीमान उंचाविणे व सामाजिक दर्जा वाढविणे आवश्यक आहे. विभागातील पदे रिक्त असतील तर अल्पसंख्याक समाजास योग्य त्या सेवा मिळणार नाहीत. **अल्पसंख्याक विकास विभागात जेवढी पदे रिक्त असतील त्याची माहिती संबंधित विभागाने समितीला दरवर्षी एकदा सादर करावी. तसेच त्यामुळे विभागास मंजूर निधीही खर्च होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. विभागाने रिक्त पदे सहा महिन्यात भरावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**५.४ शिफारस क्रमांक (२) :** अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकरिता विविध प्रशिक्षणच्या योजना विभागाकडून राबविल्या जातात तथापि सदर प्रशिक्षणाच्या योजनांचे अपग्रेडेशन वेळोवेळी होणे आवश्यक आहे. **प्रशिक्षण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचा कितपत फायदा झाला याकरिता प्रत्येक योजनेचे मूल्यमापन करावे व ज्या योजना फायदेशीर नाहीत व कालबाह्य झालेल्या आहेत त्या बंद करुन अल्पसंख्याक समाजासाठी कौशल्य विकासाच्या योजनेबरोबरच संगणकीकृत प्रशिक्षणाची योजना राबविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**५.५ शिफारस क्रमांक (३) :** अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या उपजिवीकेकरिता आवश्यक शिक्षण देणे आवश्यक आहे. सद्यःस्थितीस राज्यात डीग्री कॉलेज, पॉलिटेक्नीकल कॉलेज व आयटीआय संस्थांची संस्था योग्य प्रमाणात नाही,. पदवी कॉलेजसची संख्या जादा आहे. **अल्पसंख्याक समाजासाठी जो निधी येतो त्याचा विनियोग योग्य प्रमाणात करुन त्यांच्यासाठी आयटीआय सुरु करण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे. तसेच केंद्र सरकारच्या नियमानुसार अल्पसंख्याक समाजासाठी शैक्षणिक,**

**तंत्रशिक्षण व तांत्रिक पदवीचे शिक्षण अशा कौशल्य विकासाचे शिक्षण मिळण्यासाठी संस्था स्थापन करण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

**५.६ शिफारस क्रमांक (४) :** अल्पसंख्याक विकास विभागाच्या विनियोजन लेख्यांवरील साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, सन २०११-१२ पासून आजपावेतो ताळमेळाचे काम पूर्ण झालेले नाही. विभागाने चुकीच्या नोंदीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव महालेखाकार कार्यालयास सादर करुन दुरुस्ती केलेली नाही, ही गंभीर बाब आहे. विभागाने प्रलंबित ताळमेळाचे काम व चुकीची नोंद दुरुस्तीचा (Note of Error) प्रस्तावाचे काम १००% पूर्ण करण्यात यावे व महालेखाकार यांचे कार्यालयास तीन महिन्यात सादर करण्यात यावे **तसेच ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सदरहू कामास विलंब केला आहे व ताळमेळ व चुकीची नोंद दुरुस्ती करताना दोषी आढळलेल्या अशा संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**५.७ शिफारस क्रमांक (५) :** उर्दू घर म्हणजे उर्दूच्या प्रचार, प्रसाराकरिता एक छोटेसे ऑडिटोरियम, एक लायब्ररी, १-२ सेमिनार हॉल अशी कल्पना आहे. उर्दूच्या प्रचार, प्रसाराबरोबर विभागाने दुसरे नियम आता तयार केले आहेत. तेथे उर्दूला प्राथम्य दिले जाते. उर्दू मुशायरा, लिटररी सेमिनार, स्टोरी रिडिंग अशा प्रकारची कामे केली जातात. **अल्पसंख्याकांना मुख्य प्रवाहात आणावयाचे असेल तर, त्यांना उर्दूच्या प्रसाराशिवाय इंग्रजी कसे शिकता येईल, त्यांचे बाकीचे पर्सनल डेव्हलपमेंट कसे होईल यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे तरच ते सिस्टममध्ये येतील याबाबत विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**५.८ शिफारस क्रमांक (६) :** अल्पसंख्याक विभागाअंतर्गत असलेल्या मुस्लीम समाजासह बौध्द, जैन, शीख, पारशी व **इतर अल्पसंख्याक समाजाकरिता आवश्यक योजना राबविण्याची कार्यवाही विभागाकडून करण्यात यावी व याबाबतचे धोरण निश्चित करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**५.९ शिफारस क्रमांक (७) :** अल्पसंख्यांक विभागाने अल्पसंख्यांक वर्गासाठी राबविण्यात येत असलेल्या योजना विहित वेळेत पूर्ण कराव्यात व त्यासाठी देण्यात आलेला संपूर्ण निधी त्याच वर्षात वापरण्यात यावा. **जर तो निधी त्या वर्षात खर्च झाला नाही तर तो निधी पुढील वर्षी उपलब्ध करुन देण्यात यावा व सद्य:स्थितीत अपूर्ण व धीम्या गतीने सुरु असलेली कामे तातडीने पूर्ण करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट - अ

**गुरुवार, दिनांक १४ जानेवारी, २०१६**
**लोकलेखा समिती**

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १४ जानेवारी २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-०० वाजता सुरू होऊन दुपारी २-१५ वाजता स्थगित झाली.

**उ प स्थि ती**

**समिती प्रमुख**

**(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख**

**सदस्य**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(८) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(९) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१०) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(३) श्री. श्री. चु.श्रीरंगम, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

(४) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव

**निमंत्रित :-**

**वित्त विभाग**

श्रीमती मनिषा वर्मा, सचिव ( लेखा व कोषागरे)

महालेखाकार कार्यालय

श्री. शिवराज दुप्पे, उप महालेखाकार

**साक्षीदार :-**

**विभागीय प्रतिनिधी**

**(१) पर्यावरण विभाग**

१) श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव

२) डॉ.बी.एन पाटील, संचालक

३) श्री.सो.ना.बागुल, सह सचिव

**(२) सहकार व पणन विभाग**

१) श्री. दिनेशकुमार जैन, अतिरिक्त मुख्य सचिव, कृषी व पणन

२) श्री. सुनील पोरवाल, सचिव, वस्त्रोद्योग विभाग

३) श्री. चंद्रकांत दळवी, सहकार आयुक्त, सहकार विभाग

४) श्रीमती रिचा बागला, संचालक, वस्त्रोद्योग

५) श्री. सदाशिव शिवदास, सह सचिव, पणन विभाग

६) श्री.मिलिंद आकरे, कार्यकारी संचालक, पणन विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील अनुदान क्र. यु- ४ संदर्भात प्रधान सचिव, पर्यावरण विभाग तसेच अनुदान क्र.व्ही-३ संदर्भात अपर मुख्य सचिव, कृषी व पणन आणि प्रधान सचिव, सहकार विभाग यांची साक्ष घेतली.

## लोकलेखा समिती

### बुधवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६

समितीची बैठक बुधवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.२५ वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

**(१) श्री. गोपालदास अग्रवाल,** वि.स.स. तथा **समिती प्रमुख**

सदस्य

(२) श्री.शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री.हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री.योगेश सागर, वि.स.स.

(७) डॉ.अनिल बोंडे, वि.स.स.

(८) श्री.संजय केळकर, वि.स.स.

(९) श्री.सुरेश गोरे, वि.स.स.

(१०) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

(११) श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.

(१२) श्री.संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

२) श्री. श्री.ऋ.श्रीरंगम, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

३) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय, मुंबई, नागपूर
श्रीमती मिनाक्षी मिश्रा, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग ( लेखा व कोषागारे ) मंत्रालय
श्रीमती मनिषा वर्मा

साक्षीदार :-

विभागीय प्रतिनिधी

१) श्री.सुनिल पोरवाल, अप्पर मुख्य सचिव, नियोजन

२) श्री.संजय कुमार, प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग

३) श्री.महेश पाठक, प्रधान सचिव, पशु संवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील अनुदान क्र. डी-५, डी-९ व डी-१०. संदर्भात प्रधान सचिव, पदुम विभाग तसेच अनुदान क्र.ओ-१, ओ-७, ओ-८, ओ-१० संदर्भात अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग व प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.२० वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

**समिती प्रमुख**

**(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख**

**सदस्य**

(२) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(६) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(७) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(८) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(९) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(१०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(११) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(१२) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.

(१३) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्रीमती. मेघना तळेकर, उप सचिव

श्री. चु. श्रीरंगम उप सचिव तथा नि.अ.

श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

वित्त विभाग

श्रीमती मनिषा वर्मा, सचिव ( लेखा व कोषागारे)

महालेखाकार कार्यालय
श्री. शिवराज तुप्पे, उप महालेखाकार

**साक्षीदार :-**

**विभागीय अधिकारी**

श्रीमती जयश्री मुखर्जी, प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग
श्रीमती ऐनूल अक्तार, सह सचिव, अल्पसख्याक विकास विभाग
श्री. ए. त्रिपाठी, सचिव, बालहक्क आयोग
डॉ. के. एम. नागरगोजे, आयुक्त, महिला व बाल विकास
डॉ. सुवर्णा खरात, उप सचिव, शा.शि.विभाग
श्री. श्या. र. चौरे, उप सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग
डॉ. अर्चना पाटील, अतिरिक्त संचालक, (आरोग्य)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील अनुदान क्र. झेडई-०१ संदर्भात प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २ मार्च, २०१६
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २ मार्च, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.०५ वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

**समिती प्रमुख**

**(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख**

**सदस्य**

(२) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(६) श्री.योगेश सागर, वि.स.स.

(७) श्री.संजय केळकर, वि.स.स.

(८) श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(९) श्री.सुरेश गोरे, वि.स.स.

(१०) श्री.वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(११) श्री.राजेश टोपे, वि.स.स.

(१२) श्री.संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

श्री.सोमनाथ सानप, अवर सचिव

**निमंत्रित :-**

**महालेखाकार कार्यालय, मुंबई**

श्रीमती मनिषा मिश्रा,प्रधान महालेखाकार

**वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री.विजयकुमार, प्रधान सचिव

साक्षीदार :-

**नियोजन विभाग**

श्री.सुनिल पोरवाल, अपर मुख्य सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील अनुदान क्र. ओ-१, ओ-७, ओ-८ व ओ-१० संदर्भात प्रधान सचिव, नियोजन विभाग यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १८ मे, २०१६**
**लोकलेखा समिती**

समितीच्या उप समिती-१ ची बैठक बुधवार, दिनांक १८ मे, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.४५ वाजता स्थगित झाली.

**उ प स्थि ती**

(१) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स. तथा निमंत्रक

**सदस्य**

(२) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(३) श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

श्री.श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

श्री.सोमनाथ सानप, अवर सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०११-२०१२ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालावरील अकरावा प्रारुप अहवाल विचारात घेतला.

मंगळवार, दिनांक ५ जुलै, २०१६
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ५ जुलै, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १.३० वाजता सुरु होऊन दुपारी ३.३० वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

**(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख**

**सदस्य**

(२) श्री.शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री.संजय सावकारे,वि.स.स.

(४) श्री.हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(५) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) श्री.संजय केळकर, वि.स.स.

(७) श्री.वैभव नाईक, वि.स.स.

(८) श्री.राजेश टोपे, वि.स.स.

(९) श्री.माणिकराव ठाकरे, वि.प.स.

(१०) श्री.संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

श्री.श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

श्री.सोमनाथ सानप, अवर सचिव

समितीने सुचविलेल्या सुधारणांसह अकरावा प्रारुप अहवाल संमत करण्यात आला.